
सीताचरित्र



सीता-सुवर्णमृग.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

सीताचरित्र.

हिंदी पुस्तकाच्या आधारें

लेखिका,

श्री० सौ० कमळाबाई किबे, 'राजकुमारी' या पुस्तकाची कर्ती.

प्रकाशक.

अनंत नारायण भागवत.

शुक्रवार पेठ, घर नं. २९४ बडवे यांचा वाडा, पुणें.

मुद्रक.

रा. केशव रावजी गोंधळेकर.

जगद्धितेच्छु प्रेस, शनवार ४३२ पुणें.

सन १९१६.

किंमत बारा आणे.

अर्पणपत्रिका.

माझे परमपूज्य व प्रिय आजोबा,

कै. विष्णू केशव सरदेसाई

यांसः—

त्यांनीं रामायणांतील कथाभागांविषयीं बालपणीं गोष्टीच्या रूपानें माझ्या मनावर बडविलेल्या परिणामाच्या स्मरणार्थ मीं हें " सीताचरित्र " त्यांच्या नातीची एक लहानशी कृती त्यांच्या पूज्य चरणीं अर्पण केली आहे, हिचा ते स्वर्गातून आदर करोत.

त्यांची आवडती नात,

सौ. कमळाबाई किबे.



कै. ती. रा. विष्णु केशव उर्फ अण्णा साहेब सरदेसाई.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठें.
१ ....प्रस्तावना	१–९.
२ ....भूमिका	१–७.
१ कांड. जन्म आणि स्वयंवर.	१–१९.
२ कांड. रामचंद्राच्या राज्याभिषेकाची तयारी कैकयीची कुटिलता, रामवनवास, व भरताचा संन्यास.	२०–८३.
३ कांड. विराधवध, पंचवटीनिवास व सीताहरण.	८४–१२६.
४ कांड—वालीवध.	१२७–१९९.
५ कांड–सीतान्वेषण, आणि लंकादहन.	१९१–१७७.
६ कांड—रावणवध, सीतेची परीक्षा, भरतभेट, आणि रामराज्याभिषेक.	१७८–२०९
७ कांड—सीतावनवास.	२१०–२२८.

श्री.

चित्रांची अनुक्रमणिका.

पृष्ठें.

१ सीता–सुवर्ण मृग .... मुखपृष्ठ.

२ श्री. वि. के. सरदेसाई २

३ दिव्यायुध प्राप्ति ११

४ अहिल्योद्धार १२

५ धनुर्भंग १५

६ अयोध्याप्रवेश १९

७ कैकेयीबुद्धिभेद ३७

८ वल्कलपरिधान ६३

९ पवित्र मंदाकिनी ६८

१० पर्णकुटीदर्शन ७७

११ पादुकाप्राप्ति ८३

१२ अनसूया–प्रीतिदान ८९

१३ रावणरामाश्रमगमन ११८

१४ रावणप्रयाण १८५

श्री

प्रस्तावना.

सीता देवीचें चरित्र व तिचें नांव माहित नाहीं, असें हिंदु-समजांत कोणी असेल असें वाटत नाहीं. तिचें पुण्यशील नांव ऐकतांच तिच्याविषयीं वाटत असलेला आदर उलट द्विगुणित वाढतो. आज हजारों शतकांपासून ज्या स्त्रीचें नांव आबालवृद्धा-कडून मोठ्या आदरानें प्रातःस्मरणकाळीं घेतलें जातें, ती स्त्री खरोखरच इतक्या थोर मनाची असली पाहिजे कीं, तिला होऊन इतका काळ जरी लोटला आहे, तरी तिच्याविषयीं वाटणारी पूज्यबुद्धि तिळमात्रहि कमी होत नाहीं. तिच्या चरित्राचें जों जों अधिक मनन करावें तों तों तें प्रेम व आदर वाढवितच जातें, त्याच्याविषयीं केव्हांहि अनादर उत्पन्न होत नाहीं, हा काय त्याचा कमी प्रभाव आहे ! या सीता देवीचें उदात्त चरित्र माझे परमप्रिय आजोबा कै० विष्णु जिवाजी सरदेसाई हे इतक्या गोड व प्रेमळपणानें मला सांगत असत कीं, सीतेचा वनांत जाण्याचा भाग आला म्हणजे तो सांगतां सांगतां त्यांच्या डोळयांतून झर झर अश्रुप्रवाह सुरू होत असे. तो अद्याप मला चांगल्या तऱ्हेनें आठवत आहे इतकेंच नव्हे, तर, तो प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांसमो रच आतांही आहे, असें वाटत आहे. रामायणांतील कथाभाग प्रेमळपणानें सांगतांना त्यांची इतकी एकाग्रता होत असे कीं, त्या वेळीं मला आश्चर्य वाटे कीं, आमचे अण्णा (कारण याच नांवानें मी त्यांना हांक मारीं) रडावयास कां लागतात ? केव्हां केव्हां तर यामुळें मला असें वाटें कीं, रामायणांतील गोष्ट यांनीं सागूंहि नये आणि रडूंही पण नये, हें फार उत्तम. कारण त्या वेळेस ते सीतेच्या दुःखद स्थितीबद्दल रडतात, कां तिच्याबद्दलच्या आदरानें सद्गदीत होतात, हें कोणास माहीत ! पण मला मात्र वाटे कीं, ते रडतात,

तेव्हां त्यांना हें सांगतांना वाईट वाटतें, याकरितां त्यांनीं दुसरी एखादी गोष्ट सांगावी म्हणजे झालें. जें हें थोडेसें माझ्यासंबंधानें विवेचन करावें लागलें, त्यांत माझा खासगी भाग अगदींच टाळतां येईना म्हणून केलें आहे. नाहींतर पुढील संगती चुकली असती. कारण ' सीताचरित्र ' या हिंदी पुस्तकाचें भाषांतर करण्याची मला जी स्फूर्ति झाली, तिचें बरेंचसें श्रेय माझ्या त्या परमपूज्य पितामह अण्णांनाच आहे. हें लिहिण्यास मला खरोखरच फार अभिमान वाटतो. कारण त्यांनीं माझ्या लहानपणीं म्हणजे मीं सुमारें आठ एक वर्षांची असतांना माझ्याकडून क्रमिक पुस्तकें वाचून न घेतां, शिवलीलामृत, रामविजय, वगैरे भक्तिपर ग्रंथ वाचून घेतले. माझें पहिलें क्रमिक पुस्तक म्हणजे शिवलीलामृत हें होय. त्यानंतर रामविजय, भक्तविजय, कथाकल्पतरु वगैरे भक्तिपर ग्रंथ माझ्याकडून ते वाचून घेत असत, व त्यांतील कठीण अर्थ मला नीट समजावून सांगत असत. त्यामुळें रामायण व महाभारत हे ग्रंथ मला अत्यंत पूज्य वाटतात. त्यांचा कोणी उपहास केला, तर मला अत्यंत राग येऊन दुःख होतें, व त्या निंदा करणारांचा मला अगदीं तिरस्कारा वाटतो. तेव्हां प्रस्तुतचें ' सीताचरित्र ' हें पुस्तक त्यांनीं लहानपणीं माझ्या मनावर बिंबविलेल्या परिणामाचें तर अल्पसें फळ नसेलना ? मला तर वाटतें त्यांनींच माझ्या मनाचा कल इकडे वळविला. तेव्हां हें पुस्तक शेवटास गेल्याचें श्रेय खरोखरच त्या पूज्य आत्म्याला आहे, असें माझें मत आहे. हें पुस्तक माझ्या हातून तयार झालेलें पहावयास त्यांचा आत्मा या लोकीं जरी नसला, तरी पण सूक्ष्म रूपानें ते ही माझी अल्प कृती पाहून प्रेमानें मला आशीर्वाद देतील असा त्यांच्यावरील असलेल्या माझ्या अत्यंत प्रेमामुळें मला भरंवसा वाटतो. हें चरित्र लिहितांना अनेक वेळां मला त्यांचें स्मरण झालें. तेव्हां तें ही प्रस्तावना

लिहितांना मी विसरणें अगदीं अशक्य गोष्ट होय ! त्यांच्या पूज्य नांवाचा उल्लेख या ठिकाणीं करणें मला भागच पडलें, म्हणूनच केला आहे.

' सीताचरित्र ' हें भाषांतर असल्याकारणानें त्यांतील प्रत्येक उदात्त विचाराच्या सुंदरपणाचें श्रेय मूळ पुस्तकाच्या कर्त्यालाच आहे; आणि तें वठविण्यांत त्यांनीं आपली कुशलता किती मार्मिकपणानें प्रदर्शित केली आहे, हें संपूर्ण चरित्र वाचल्यावर वाचणारांस कळून येईल. आमच्या समाजांतील भगिनी वर्ग व बालिका वर्ग याला या उपयुक्त पुस्तकाचा परिचय व्हावा, आणि याचें भाषांतर केल्यानें त्यांनाच असा याचा अधिक उपयोग होईल, या सद्धेतूनेंच मीं हें पुस्तक भाषांतर करावयास घेतलें. हाच एक विचार त्यावेळीं माझ्या मनांत सारखा घोळत होता. तेव्हां या पुस्तकाचें चीज करणें किंवा त्यांतील दोषस्थलें दाखविणें हें प्रत्येक महाराष्ट्र भगिनीचें व बंधूचें एक पुण्यदायक कर्तव्य आहे. दुसऱ्याच्या पुस्तकाचें भाषांतर करणें हें स्वतंत्र पुस्तक लिहिण्यापेक्षां गौणच आहे, हें खरें; परंतु रिकामावेळ जाण्याला असलीं भाषांतरेंच माझ्या उपयोगी पडोत अशी मी देवाची प्रार्थना करतें. मूळ हिंदी ग्रंथकार महाशय श्रीरामशर्मा यांनीं वेळोवेळीं जी माहिती दिली, आणि त्यांनी जी सुजनता दाखविली त्याबद्दल, व त्यांच्या सुशिल स्वभावाबद्दल त्यांचे आभार मानणें योग्य आहे. ग्रंथ प्रकाशनाची परवानगी त्यांनीं कांहींहि मोबदला न घेतां दिली, हे त्यांचे उपकार माझ्यावरच नुसते नसून, सर्व महाराष्ट्र भगिनींवर आहेत, असें सगर्व म्हणावें लागतें. हिंदी आणि मराठी भाषेचें प्रेम वरील प्रमाणेंच वृद्धिंगत व्हावें, आणि तिचे सुपरिणाम अखिल भारत वर्षांतील स्त्रीपुरुष समाजावर व्हावेत, अशी सर्व हिंदवासीयांची मनिषा असणारच ! कृपाळु जगदीश ती पुर्ण करो, हीच प्रार्थना

प्रत्येक सुशिक्षित बंधु भगिनी त्या जगच्चालकाजवळ केल्याशिवाय राहणार नाहीं, असें मला वाटतें.

प्रस्तुतचें ' सीताचरित्र ' हें आपल्या इकडील पौराणिक पद्धतीचें सरळ रूपांतर नाहीं. या पुस्तकांत जागजागीं गुणदोषविवेचन फारच मार्मिक व काळजीपुरःसर केलेलें आढळतें. ग्रंथकर्त्याची ती मनोहरविचार सरणी पाहून काय हें उदात्त विवेचन केलें आहे ' असे शब्द आपोआप मुखावाटे बाहेर पडतात. इतका त्यांतील सुंदर विचारांचा परिणाम मनावर होतो. ह्या पुस्तकांतील मूळ प्रस्तावना मुद्दामच येथें दिली आहे. तिच्यांतील ग्रंथ कर्त्याच्या विचारांचा लाभ महाराष्ट्र भगिनींला मिळावा, हाच ती देण्याचा माझा उद्देश आहे. ' सीताचरित्र ' लवकर छापून प्रसिद्ध करावयाचें आहे, तेव्हां तें होईल तितकें लवकर लिहून द्या, असा माझ्या पाठीमागें तगादा रा. रा. अनंत नारायण भागवत यांनीं केल्यामुळें हें काम माझ्या हातून कसें तरी पार पडलें आहे, याचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. त्यांचा तगादा जर नसता तर मी इतक्या लवकर हें केव्हांच लिहून पुरें केलें नसतें, अशी माझ्या मनाची खात्री आहे. तेव्हां व्यावहारिक शब्द ' आभारी आहे ' हे न लिहितां पुढील आणखी पुस्तकांचीं भाषांतरें करण्यास ते असेंच प्रोत्साहन देवोत, हींच माझी सदिच्छा कोणाच्याही प्रेरणेनें कां होईना, सफल होऊन महाराष्ट्र भगिनीच्या कामीं माझा कांहीं तरी वेळ खर्च करण्याची तो जगाचा चालक व आमचा सर्वांचा प्रतिपालक ईश्वर मला सद्बुद्धि देवो, हींच माझी त्याच्याजवळ रात्रंदिवस प्रार्थना आहे. ती पूर्ण करणें, त्या प्रभूच्या हातीं आहे. शेवटीं ' राजकुमारी ' पुस्तकानंतर पुनः महाराष्ट्र भगिनीची भेट घेण्याचा सुप्रसंग साध्वी ' सीतेच्या चरित्रानें ' आणून दिला याबद्दल पुन्हा मूळ हिंदी ग्रंथकाराचे व अलाहाबाद येथील ' इंडियन प्रेसच्या ' चाल-

काचेहि आभार मानणें योग्य आहे. मूळ कर्त्यानें ह्या पुस्तकाचे सर्व हक्क ' इंडियन प्रेसलाच ' दिले आहेत, तेव्हां त्यांना येथें विसरणें योग्यं नव्हे. ईश्वर घडवील तर, पुन्हां लवकरच सर्वांच्या भेटीला येण्याचा भावी विचार व हेतु प्रदर्शित करून ही प्रस्तावना आटपतें.

मु॥. इंदूर.
कार्तिक वद्य प्रतिपदा.
शके १८३७

सौ. कमळाबाई किबे.

भूमिका.

आजपर्यंत जेवढें आम्हीं ऐकिलें आहे, व पाहिलें आहे, त्यांत सीतादेवीची बरोबरी करणारी एकहि स्त्री आम्हांला आढळली नाहीं. आम्हांला अशी सुद्धां शंका वाटते कीं, भविष्यकाळीं तरी जनकनंदिनीच्या गुणाची बरोबरी करील अशी एखादी स्त्री निघेल किंवा नाहीं? आम्हांलाच काय, परंतु मोठमोठ्या प्रतिभाशाली कवींना सुद्धां अशी शंका उत्पन्न झाली. ते या बाबतींत हारले, व निराश झाले. पण त्यांना देखील सीतेप्रमाणें स्त्री आढळली नाहीं. याचमुळें महर्षि वाल्मिकीनें सीतादेवीला ' अनुपमा ' ठरविलें आहे. सरळपणा, सुशीलपणा, सच्चरित्रता, पतिपरायणता, कृतज्ञता, गंभीरता, आणि सुंदरता, या सर्व गोष्टींत सीतादेवी अद्वितीय होती. कोणीं जर आम्हांला विचारिलें कीं, येथें सतीशिरोमणि स्त्री कोण होऊन गेली, तर आम्हीं उत्तर देऊं कीं, ' सीतादेवी. ' जर कोणीं सरलतेच्या व पवित्रतेच्या मूर्तिमान स्त्रीचा शोध केला, तर आमचें लक्ष प्रथम महाराणी सीतादेवीकडेच जाईल. सर्वांत अधिक अलौकिक सौंदर्यसंपन्न नारी कोण झालेली आहे, हें जाणण्याची जर कोणाला इच्छा असेल, तर आम्ही मोठ्या प्रसन्नतेनें उत्तर देऊं कीं ' महाराज रामचंद्राची प्राणेश्वरी सीतादेवीच. '

' होनहार बिरवान के होत चीकने पात '[१] ह्या म्हणीप्रमाणें सीतादेवी बाल्यकालापासून होणार असें वाटूं लागलें. तिचा जन्म राजर्षि जनकासारख्याच्या घरीं झाला, ही तिच्याकरितां मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. राजर्षि जनकाच्या घरीं तिचें लालनपालन होऊन तिच्या स्वाभाविक सरल स्वभावाची व सुशीलतेची वृद्धि झाली. महात्म्या जनकाच्या उदार भावनांचा, त्याच्या सदाचारांचा, त्याच्या धर्मानुराग व कर्तव्यनिष्ठेचा सीतादेवीच्या कोमल

---

१ 'मुलाचीं चिन्हें पाळण्यांत दिसतात,' अशा अर्थाची ही म्हण आहे.

हृदयावर लहानपणापासून उत्तम परिणाम होऊं लागला. जरी हे सर्व सद्गुण सीतादेवींत स्वाभाविक रीतीनें उत्पन्न झाले होते, तरी महात्म्या जनकाच्या प्रत्यक्ष सदाचरणानें ते सर्व अधिकच प्रकाशित झाले. राजा जनकाच्या धार्मिक शिक्षणानें सीतादेवीच्या स्वाभाविक सद्गुणांत इतकी शक्ति उत्पन्न केली कीं, त्यामुळें सर्व जगांत सर्व सदाचारिणी सतींत सीतादेवीचा सन्मान सर्वत्र झाला.

सर्वांत भाग्याची गोष्ट ही कीं, सीतादेवीला अनुरूपपति मिळाला. असा अनुकूल शोभाधाम, मनोभिराम, रामचंद्र पति मिळाल्यानें सीतेचें भाग्य शंभरपट वृद्धिंगत झालें. अशा गुणभिज्ञ स्वामीच्या हातांत आत्मसमर्पण करून सीतादेवी कृतार्थ आणि कृतकृत्य झाली. तिनें आपल्या स्वामीची सेवा कशी केली, त्याचा किती मान ठेविला, आणि त्याच्या आनंदाकरितां किती कष्ट सहन केले, इत्यादि गोष्टी सांगण्याची येथें अवश्यकता नाहीं. या सर्व गोष्टींचें प्रत्यक्ष प्रमाण तिच्या जीवितांतील प्रत्येक गोष्ट वाचून विदित होईल. ती पतिलाच आपलें आराध्य दैवत, आणि पतिलाच आपलें सर्वस्व समजत असे. पतीच्या सुखांतच ती आपलें सौख्य समजे व पतीच्या दुःखानेंच दुःखी होई. सीतादेवी आणि रामचंद्र हीं दोघें दंपती एकमन, एकसंकल्प, आणि एकप्राण होतीं. दोघेंहि धर्मानुरागी, दोघेंहि सत्यवादी, दोघेंहि विशुद्धवादी, आणि दोघेंहि अलौकिक गुणांची खाण होतीं. दोघेंहि जगांत जणूं काय, सौंदर्य आणि लावण्य यांचें मूर्तिमंत उदाहरण होतीं. याचें नांव अध्यात्मिक संमीलन, आणि यालाच शास्त्रकारांनीं खरा विवाह म्हणून म्हटलें आहे.

सीतादेवी अनंत गुणांची आधारमूर्ति होती. तिच्या गुणांचें वर्णन कुठपर्यंत करावें ! ज्या वेळेस तिच्या पतीला वनवासाची आज्ञा झाली, व ती तिला कळली, त्या वेळेस तिनें जें दुष्कर कर्म

केलें, आपल्या पातिव्रत्य धर्माचें खरें प्रेम दाखविलें, तें कुणाशींहि लपलेलें नाहीं. एका राजकन्येनें राजस्नुषा होऊन राजकीय विला-सांचा लागलेंच त्याग करून आपल्या धर्माचें पालन करण्याकरितां पतिदेवाबरोबर दोन चार दिवसांकरितां नव्हे, तर चौदा वर्षें वनांत जाणें, ही सहज गोष्ट नव्हे !

सीतादेवीनें पतीसह वनांत राहूनहि उत्तम रीतीनें आपल्या कर्तव्याचें पालन केलें. सीतादेवी म्हणत असे कीं, पतीच्या चरण कमलांचें दर्शन घडतांच जो आनंद वाटतो तो अनिर्वचनीय आहे. पतीसह वनांत असतांना, ती वनालाच अयोध्येपेक्षां जास्त समजत असे. जेव्हां रामचंद्रांनीं वनांतील दुःखांचें वर्णन करून तिला सांगि-तलें, तेव्हां तिनें जें कांहीं उत्तर दिलें, तें भारत वर्षांतील ललनांनीं सदोदित लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ती म्हणाली,‘हे नाथ, आपल्याशि वाय अयोध्या मला नरकतुल्य आहे; आणि आपल्या बरोबर वनांतहि राहणें स्वर्गाप्रमाणें आहे.’ तिचें मत होतें कीं, स्त्रियांना पतीशिवाय दुसरें आराध्य दैवतच नाहीं. पतिच स्त्रियांना पूज्य देव, तेंच व्रत, तोच नियम आणि तेंच तीर्थ आहे. तिची ही निश्चयपूर्वक खात्री होती कीं, जी स्त्री पतिदेवाचा अनादार करून नांवाला कल्पित देवाचें पूजन करते, व सचेतन तीर्थ अशा आपल्या पतीला सोडून जड तीर्थाच्या लोभांत पडते, ती घोर पापाची भागिनी होते. पति-व्रता स्त्रिया आपल्या पतीलाच सर्वस्व मानतात.

रावणाच्या तडाक्यांत सांपडूनहि सीतादेवीनें आपल्या धर्माचें रक्षण करून आपल्या आत्मिक बलाचा फारच चांगल्या तऱ्हेनें परिचय करून दिला. रावणानें सीतादेवीला अनेक प्रकारचें प्रलो-भन दाखविलें, अनेक प्रकारची लालूच दाखविली, व धाकही दाख-विला; परंतु ती आपल्या धैर्यापासून तिळमात्रहि विचलित झाली नाहीं. “ धर्मो रक्षति रक्षितः ” या अनुसाराप्रमाणें शेवटीं सीते-

च्या धर्मबलानेंच तिचें रक्षण केलें. तिच्या धैर्यानेंच तिच्या विपत्तीच्या महासागरांतून तिला पार केलें.

सीतेला अभिमान तर शिवलाच नव्हता. ती सर्वांशीं समभावानें वागे. तिनें कधींच कोणाला त्रास दिला नाहीं. आपल्या स्वामिव्यतिरिक्त तिनें कोणाहि पुरुषाकडे वांकड्या दृष्टीनें पाहिलें नाहीं. ईश्वराच्या कृपेनें तिचें सर्व कुटुंब सदाचारी व धर्मनिष्ठ होतें. एका लक्ष्मणाचेंच उदाहरण पहा ना ! वाल्मिकी रामायणांत लिहिलें आहे कीं, लक्ष्मणानें एकवारहि सीतेकडे लक्षपूर्वक पाहिलें नाहीं. फक्त वंदन करतांना तिचे चरण दिसत त्यांकडेंच त्याचें लक्ष असे. याला प्रमाण म्हणजे ऋष्यमूक पर्वताच्या कथेचें स्मरण करावें. जेव्हां सीतेच्या दागिन्यांची परीक्षा करण्याकरितां लक्ष्मणास सांगितलें, त्या वेळेस त्याला फक्त पायांतीलच दागिने ओळखतां आले. हातांतील कंकणें पाहून तो म्हणाला ' हीं मला ओळतां येत नाहींत.' तात्पर्य हेंच कीं, जशी सीतादेवी शुद्धाचरणी, पवित्र स्वभावाची व पतिव्रता होती, त्याचप्रमाणें तिचे पति, दीर, आणि सर्व संबंधी धर्मात्मे व सदाचारी होते.

पतिव्रता स्त्री पतीच्याकडून कितीहि कष्ट झाले तरी आपल्या मनांत कुविचाराला केव्हांहि थारा देत नाहीं. पति वाटेल तें बोलो, परंतु साध्वी स्त्री पतिदेवाची सेवासुश्रुषा आपल्या हातांनीं करण्यांत आपल्याला भाग्यवान समजते.

सीतादेवीच्या हृदयांत धर्मरक्षणाची कल्पना आणि कर्तव्यपालनाचा उत्साह फार प्रबल होता. ज्या वेळेस सीतादेवी गर्भवती होती, त्या वेळेस लोकनिंदेच्या भयानें रामचंद्रांनीं तिचा त्याग केला होता. त्या प्रसंगीं आपल्या त्यागाविषयीं लक्ष्मणाला ती जें कांहीं बोलली, त्यावरून वाचक व वाचिकांना सीतादेवीच्या महानुभवाचें अनुमान करतां येईल. ती गंगेच्या किनाऱ्यावर लक्ष्म-

णाला म्हणाली, 'पतिच स्त्रीचा देव, पतिच बंधु, व पतिच गुरु असतो. माझ्या प्राणदानानें जर पतीचें मंगल होत असेल, तर मी ते सहर्ष देण्यास तयार आहें.'

याप्रमाणें सीतादेवीनें आपलें सर्व जीवन धर्म, कर्म व कर्तव्य-पालन यांचें पालन करण्यांत व्यतित केलें. तिनें केव्हांहि आपला वेळ व्यर्थ घालविला नाहीं. ती सदा कांहीं ना कांहीं कार्य करीतच राही. ती आपल्या सर्व कार्यांत धर्म, सत्य, व न्याय यांकडे लक्ष ठेवीत असे. तिनें मनानें, वाचेनें, व कृतीनें केव्हांहि अधर्म व अन्याय केला नाहीं. तिच्यांत किती तरी गुण असे होते कीं, त्यांचा प्रभाव दुसऱ्यावर सहज होई. तिच्या सुशीलतेमुळें सर्व स्त्रिया तिच्या अधीन रहात असत. तिचें भाषण कोमल, मधुर आणि प्रिय होतें. तिनें कटु शब्दांनीं केव्हांही आणि कोणाचेंही मन दुखविलें नाहीं.

या ठिकाणीं कोणी अशी शंका काढतील कीं, जेव्हां रामचंद्र मारिचाच्या पाठीमागें लागून दूर गेले होते, तेव्हां सीतेनें अनेक कटु आणि दुष्ट भाषणांनीं लक्ष्मणाचें मन निरर्थक दुखविलें होतें; परंतु विचार करून पाहिलें तर त्यामध्यें जरा रहस्य होतें असें आढळून येतें. रामचंद्राविषयीं सीतेच्या मनांत जें अत्यंत प्रेम होतें, त्यामुळेंच तिच्या तोंडून तसले शब्द बाहेर पडले. यावरून रामचंद्रावर तिचें किती प्रेम होतें, हेंहि पण दिसून येतें. आपल्या प्राणेश्वरावर येणाऱ्या आपत्तीच्या शंकेनें घाबरून जाऊन लक्ष्मणाला ती दोनचार मर्मभेदक शब्द बोलली असल्यास त्यांत नवल करण्याची गोष्ट नाहीं. तें सर्व त्या प्रसंगीं योग्यच होतें. तें स्वाभाविक व तिच्या अनुरूप होतें.

अशी जगन्मान्या, त्रिभुवनसुंदरी, सच्चरित्रा, सतीमूर्धन्या, धन्या, जानकी देवीचें पावन व अनुकरणीय चरित्र ऐकण्याची को-

णत्या स्त्रीच्या व पुरुषाच्या हृदयांत इच्छा उत्पन्न होणार नाहीं. सर्वगुणाढ्या सीतादेवीचे सद्गुण ऐकून सर्व सज्जन स्वर्गसुखाचा अनुभव घेऊं लागतात. तिच्या अशा परम पावन गुणावलीनें आमच्या हृदयांत प्रवेश करून आह्मांला तिचें चरित्र (सीताचरित्र) लिहिण्याची प्रेरणा केली. जरी सीतेचें चरित्र आणि तत्संबंधीं असगारीं अनेक पुस्तकें अनेक भाषांतून लिहिलीं गेलीं आहेत, तरी ज्या तऱ्हेचें सीताचरित्र आम्ही सांप्रत लिहिलें आहे, त्याप्रकारचें पुस्तक आह्मांला जितकी माहिती आहे तिच्यावरून वाटतें कीं हिंदींत अद्याप झालें नाहीं. आणि कदाचित् झालें असल्यास आमच्या पाहण्यांत आलें नाहीं. आतां फक्त बंगाली भाषेंत एक 'सीता' नांवाचें पुस्तक फार सुरेख लिहिलेलें आहे. तें आह्मीं वाचलें, आणि त्याची तऱ्हा आह्मांला पसंत पडली. आमचें हें सीताचरित्र बंगाली 'सीते'च्या धर्तीवर वाल्मीकीरामायणाच्या आधारानें लिहिलें आहे.

जेथें आह्मी वाल्मीकि रामायणाच्या श्लोकाच्या आधारानें हिंदी अनुवाद दिला आहे, त्या अनुवादावर आह्मी " " हें चिन्ह करून तेथेंच खालीं सर्ग व कांड यांची संख्या दिली आहे. कोठें कोठें अत्युपयोगी श्लोक सुद्धां जसेच्या तसे ठेऊन त्यांचें सरळ भाषांतर हिंदींत केलें आहे.

सीतादेवीचें चरित्र मुख्यतः स्त्रियांना फारच लाभदायक आहे. स्त्रियांकरितां जर कोणतें चारित्र आदर्शरूप असेल तर तें 'सीताचारित्रच,' होय. सीतेचें सर्वच चरित्र उपदेशानें भरलेलें आहे. तिच्या जीवनांतील एक एक प्रसंग स्त्रियांना किती तरी बोधग्रहण करण्यास शिकवीत आहे. स्त्रियांकरितां ज्या गुणांची आवश्यकता आहे ते सर्व गुण सीतादेवींत विद्यमान होते. एवढ्याकरितां तिचें चरित्र वाचून व तें नीट समजून घेऊन आणि मनन करून तसाच

त्यांतील अमोल उपदेश ग्रहण करून स्त्रिया आपल्या ठिकाणीं तिचे सर्व सद्गुण संपादन करूं शकतील अशी आमची खात्री आहे.

सध्यांच्या काळीं स्त्रीशिक्षणाच्या उपयोगी पडणाऱ्या अशा हिंदी पुस्तकांचा अभाव पाहून हें ' सीताचरित्र ' आम्हीं लिहिलें आहे. आम्हांला आशा वाटते कीं, भारतवर्षीय ललनावर्ग हें चरित्र वाचून यांतील कांहीं तरी उपदेश ग्रहण करील.

आम्हीं आमचें काम केलें आहे. स्त्री-शिक्षोपयोगी उत्तम पुस्तकांचा बहुतेक अभाव पाहून आमच्या मनांत हें पुस्तक लिहिण्याची प्रबल उत्कंठा झाली होती, ती ईश्वराच्या कृपेनें आणि इंडियन प्रेसचे मालक व हिंदी पुस्तकांचे परम उत्साही प्रकाशक श्रीमान् बाबू चिंतामणि घोष यांच्या सहाय्यानें पूर्ण झाली. आतां हिंदी पाठक आणि पाठिका यांचें हें पुस्तक वाचून यांतील सार ग्रहण करण्याचें कर्तव्य आहे, तें ते करतील.

या पुस्तकानें भारतवर्षीय महिलागणाला थोडासा जरी लाभ झाला, तरी तेवढ्यानेंच आमच्या श्रमाचें सार्थक झालें असें आम्ही समजूं.

मु॥. इंदूर ता. १९-२१-१९१९.
करवीचा बंगला. } लेखक.

सीताचरित्र.

पहिलें कांड.

जन्म आणि स्वयंवर.

ज्या प्रदेशाला हल्लीं तिरहुत म्हणतात, व ज्यांत सांप्रत दरभंगा संस्थानाचा समावेश होतो, त्याला व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशाला प्राचीन काळीं मिथिला म्हणत असत. या मिथिला प्रदेशांत पूर्वीं मोठे मोठे प्रतापी राजे राज्य करीत होते. मिथिला प्रदेशाच्या प्राचीन राजांचा वंश फार उच्च, प्रतिष्ठित व विख्यात होता. या वंशाचा मूळ पुरुष निमि असून हाच या वंशाचा पहिला राजा होय. यामुळेंच या वंशाला निमिवंश म्हणतात. त्या महात्म्या निमीला मिथि आणि मिथीला जनक असे पुत्र झाले. त्याच्याच नांवावरूत मिथिलेच्या सर्व राजपुरुषांना ' जनक ' म्हणत.

ज्या वेळेस अयोध्याधीश महाराज दशरथ आपल्या शुभजन्मकर्मांनीं समस्त आर्यभूमीला व विशेषतः अयोध्येला कृतार्थ व पवित्र करीत होते, त्याच वेळेस मिथिलाधिपति महाराज जनक आपल्या पवित्र राजसिंहासनावर विराजमान होऊन आपल्या कुलाची मानमर्यादा वाढवीत होते. महाराज जनक अद्वितीय विद्वान्, अद्वितीय ज्ञानी आणि अद्वितीय जितेंद्रिय होते. त्यांची धार्मिकता व सच्चरित्रता समस्त भूमंडलांत पसरली होती. ते त्यांच्या वेळच्या सर्व राजांत मोठे तत्त्वज्ञानी होते, व एवढ्याच

करितां ऋषिमंडळींनीं त्यांना 'राजर्षि' या संबोधनानें अलंकृत केलें होतें. वास्तविक ते धर्म व न्याय या दोन्ही गोष्टींतही ज्ञाते होते. अनेक दूरदूरचे लोक, तसेच ब्राह्मण, ऋषि, व मुनि त्यांच्यापाशीं तत्त्वज्ञान शिकण्याकरितां व आपापल्या शंकांचें समाधान करून घेण्याकरितां येत असत. याशिवाय या गोष्टीला आणखी मोठें प्रमाण तें कोणतें पाहिजे! एका क्षत्रियराजाजवळ तत्त्वज्ञान शिकण्याकरितां ऋषि–मुनींनीं येणें, यावरूनच राजर्षि जनक हे अद्वितीय तत्त्वज्ञानी व मोठे विद्वान् होते, हें सिद्ध होत आहे. याच कारणावरून ते सदेह असूनही त्यांस लोक 'विदेह' म्हणत असत. सारांश हाच कीं, ते देहपरायण नव्हते. तसेच ते इंद्रियवशभूत नसून कामवासनेच्या जाळ्यांतही फसले नव्हते. ते पूर्ण तृषारहित होते. परंतु अशा स्थितींतही ते प्रजापालन व राजकार्य हीं उत्तम रीतीनें करीत होते. अशा तत्त्वज्ञान्याकडून राज्यकारभार उत्तम रीतीनें चाललेला पाहून सर्व लोक आपापल्या ठिकाणीं चकित होत असत. अनेक देशदेशांतराहून पुष्कळ ब्रह्मज्ञानि ऋषि, मुनि वगैरे राजर्षि जनकाच्या सभेंत येऊन त्यांच्याबरोबर अनेक गूढ विषयांवर चर्चा करीत असत. राजा जनकाची विद्वत्ता व सौजन्य पाहून सर्व लोक आनंदित होत असत.

ज्या जगमान्य व असामान्य स्त्रीचें चरित्र आह्मी लिहीत आहों, ती नारीकुलभूषण सतीशिरोमणि श्रीसीतादेवी त्या महाराज जनकाची कन्या होय. राजर्षि जनकानें आपल्या या कन्येचें लालनपालन अशा रीतीनें केलें कीं, ती चंद्रकलेप्रमाणें दिवसेंदिवस वाढूं लागली. ज्याप्रमाणें विरल ढगांतून चंद्राची श्वेत व चारु चमक दिसावी, त्याप्रमाणें सीतादेवी जशी जशी थोर होऊं लागली तशी तशी तिच्या कोमल शरिरावर रूपलावण्याची प्रभा चमकूं लागली. या वेळेस सीतादेवीच्या लावण्याकडे पाहून नागरिक जन मनांतल्यामनांत म्हणत असत कीं, जनक महाराजांची हीं कन्या साधारण नाहीं.

ही कोणी महातेजस्वी देवकन्या आहे. सीतादेवीचें अलौकिक सौंदर्य शांत स्वभाव, व सरलता, कोमलतादिसद्गुण पाहून सर्व लोक म्हणत कीं हीं राजकन्या नसून महाप्रतापशालिनी देवकन्या आहे. त्यांचा असा समज होण्याला कारणही पण तसेंच होतें. तें हें कीं, जे गुण सीतादेवीमध्यें होते, ते गुण प्राकृत मुलींत दिसून येत नसत.

कुमारिका सीतेचा स्वभाव अति कोमल, अति मधुर व सर्वप्रिय होता. त्याला पाहून असेंच ह्मणावें लागे कीं, जणू काय जनक महाराजाच्या राजमहालांत स्वर्गांतून अमृतबिंदुच पडला. राजर्षि जनकाच्या राज सभेंत जितके मोठमोठे तपस्वी, ऋषि, व मुनि येत होते, त्या सर्वांनीं सीतेच्या पवित्र स्वभावाची, व अनुरूप लावण्याची प्रशंसा केली. राजर्षि जनक प्रायः प्रति दिवशीं ऋषि, मुनींबरोबर सभेंत बसून परमार्थ तत्त्वाचा विचार करीत असत. 'त्यांच्या सभेंत दूरदूरचे अनेक तपस्वी नित्यशः येत असत,' हें आम्ही प्रथमच सांगून चुकलों आहोंत. त्या वनवासी ऋषि, मुनींच्या मुखांनीं तापसाश्रमाचें वर्णन ऐकून ऐकून सीतेच्या कोमल हृदयांत त्या आश्रमाचें दर्शन घेण्याची अत्यंत लालसा उत्पन्न झाली. पवित्र ऋषिकन्या व ऋषिपत्न्या यांच्या बरोबर वनांत निवास करण्याची व क्रीडा करण्याची तिची ती लालसा दिवसेंदिवस वाढत चालली. सीतेच्या मनांतील ती इच्छा ओळखून दूरदर्शी तपस्व्यांनीं हीं मुलगी केव्हां ना केव्हां तरी आपल्या पतीबरोबर वनांत अवश्य निवास करील असें सांगितलें. खरोखरच सीतेचा कल लहानपणापासूनच प्राकृत शोभा पाहण्याकडे अधिक असे. जितका आनंद तिला प्राकृतिक सौंदर्य पाहून होत असे, तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपासून होत नसे. याच कारणामुळें सीतादेवीची चौदा वर्षेंपर्यंत आपल्या स्वामीबरोबर वनांत राहून व तेथील प्राकृत

शोभा पाहून कधींच तृप्ति झाली नाहीं. प्राकृतिक सौंदर्य पाहून ती मनांत इतकी आनंदित होत असे कीं, तिला त्यापुढें स्वर्गसुख देखील तुच्छ वाटे. दुर्गम वन, भयंकर गुहा, व प्रचंड नदी पाहूनही तिच्या मनांत भीति उत्पन्न होत नसे. हें सर्व पाहून उलट तिच्या मनाला एक प्रकारचा आनंदच होई. पृथ्वीचें सौंदर्य पाहून तिला इतका आनंद होई कीं, त्याचें वर्णनच करतां येत नसे. कवींनीं तर येथपर्यंत लिहिलें आहे कीं पृथ्वीचें सौंदर्य पाहून सीतेच्या मनांत जसा अनुराग उत्पन्न होत असे, तसा अनुराग इतरांच्या मनांत झाला नसेल. या अनुरागप्रियतेमुळेंच सीता ही पृथ्वीची प्रियकन्या म्हणून तर प्रसिद्ध नसेल !

सीतेच्या जीवनसंबंधीं घटनेचा आद्योपांत विचार करून बरेच लोक असें म्हणतात कीं, विधात्यानें सीतेला घोर दुःखें भोगण्याकरितांच निर्माण केली होती. परंतु आमचें मत असें म्हणणाऱ्यांच्या विरुद्ध आहे. आमच्या मतें तर ईश्वरानें तिला फळांफुलांनीं भरलेल्या वृक्षांच्या वनांत हरिणबालकाबरोबर क्रीडा करावयास व भोळ्या स्वभावाच्या तापसकन्यांबरोबर वनविहार अर्थात् भ्रमण करावयास जन्म दिला होता. आम्हांला असें वाटतें कीं मणिरत्नांनीं अशा ऐश्वर्ययुक्त पदार्थांनीं भरलेल्या राजमहालांत विधात्यानें सीतेला जन्म न देतां जरी हिरव्यागार वृक्षांनीं भरलेल्या व मृगपक्षिसेवित अशा एखाद्या आश्रमांत उत्पन्न केलें असतें तरी एवढ्यानें सुद्धां सितेला आपल्या जन्माचें साफल्य झालें असें वाटलें असतें. परंतु हृदय कांपवून सोडणाऱ्या अशा कठीण अग्नि–परीक्षेंत तिला उत्तीर्ण करून सर्व जगाला पातिव्रत्य धर्माचें अभ्दुत महात्म्य काय आहे, हेंच परमेश्वराच्या मनांत दाखवावयाचें होतें. ज्या सीतादेवीनें आपल्या धर्माचें रक्षण करून स्त्रीजातीची योग्यता वाढविली त्या सीतेची धन्य होय. याच तिच्या धर्मरक्षणामुळें तिचें नांव सर्व

जगांतील सतीमहिलामंडळांत पूज्य मानलें जात आहे. असो.

लहानपणापासूनच सीतेच्या गुणांची प्रशंसा होऊं लागली. ऋषि, मुनि वगैरे सीतेचीं लक्षणें पाहून तिच्या भाग्याची स्तुति करीत. राजर्षि जनक आपल्या प्रिय कन्येची याप्रमाणें केलेली प्रशंसा ऐकून फार प्रसन्न होत असे. ज्या वेळेस शैशवावस्था जाऊन सीतेला किशोरावस्था प्राप्त झाली त्यावेळेस अंधकार व प्रकाश यांचें मीलन होतांना जशी उषा शोभते तशी ती शोभूं लागली. मलयाचलपवनस्पर्शानें ज्याप्रमाणें पुष्पकळी हळूहळू उमलूं लागते, त्याप्रमाणें पित्याच्या संरक्षणाखालीं सीतेचें मनसुमनही उमलूं लागलें, व प्रसन्न दिसूं लागलें.

फूल उमलण्याच्या पूर्वीं त्याच्या पाकळ्यांमध्यें एक तऱ्हेची अनिर्वचनीय शोभा लपलेली असते. तसेंच सीतादेवीचें भावी चरित्र व कोमलता इत्यादि सद्गुण फार मधुर दिसत. आतां राजर्षि जनकाला रात्रंदिवस हीच चिंता लागली होती कीं, हें कन्यारत्न कोणा पुण्यशील वराच्या हातीं सोंपूं! विधात्याची लीला मोठी विचित्र आहे. त्यानें निर्माण केलेला संसार नेहमीं सारख्या स्थितींत रहात नाहीं, ह्यामध्यें बिचाऱ्या विधात्याचा काहींच अपराध नाहीं. ईश्वराच्या प्रकृति मायेचा स्वभावच असा आहे कीं, ती एकसारख्या स्थितींत केव्हांच राहूं शकत नाहीं. जेव्हां जड प्रकृतीची ही स्थिति आहे, तिच्यांत इतकी अस्थिरता आहे तेव्हां चेतन जीव प्राण्यांची तर गोष्ट काय सांगावी ? त्यांच्यांत जितकी अस्थिरता असेल तेवढी कमीच आहे. प्रकृतीच्या या परिवर्तनशीलतेमुळें प्राचीन कालांत व वर्तमान कालांत जमीनअस्मानाएवढें अंतर आहे. प्राचीन काळची गोष्ट सोडून द्या. शंभर सवाशें वर्षांपूर्वीं जो काल होता तो आज दृष्टीस देखील पडत नाहीं; असें कां! परंतु असेंच म्हणावयाचें कीं, जें काल होतें तें आज नाहीं, व जें आज आहे तें उद्यां नसणार.

या वेळेस आपण इतर गोष्टी सोडून विवाहसंस्कार या विषयाचा थोडासा विचार करूं. पाणिग्रहण करण्याची जशी रीत आजकाल या देशांत प्रचारांत आहे, तशी पद्धत प्राचीन काळीं नव्हती. प्राचीन काळीं विवाह करण्याची पद्धत निराळी होती. त्या वेळेस हल्लीं-प्रमाणें मातापिता डोळे झांकून मुलीला वाटेल तेथें लोटीत नव्हते. ते प्रथम कन्येची योग्यता, गुण, कर्म, स्वभाव योग्य समगुणी वर पाहून त्याच्याशीं कन्येचा विवाह करीत. प्राचीन काळीं ही रीत देखील प्रसिद्ध होती कीं, वराला पाहणें, व स्वीकार व अस्वीकार करणें हें कन्येच्या संमतीवर अवलंबून होतें. प्रथम कन्या ज्या वराला आपल्या गुणकर्मस्वभावाला अनुकूल समजत असे त्याचा स्वीकार करून नंतर आपल्या मातापित्याच्या आज्ञेनुसार त्याच्या बरोबर विवाह करीत असे. ह्या रितीला ‘ स्वयंवर ’ म्हणत असत. भारत वर्षांत प्रथम प्रायः क्षत्रियांतच ही स्वयंवराची चाल प्रचलित होती. प्राचीन कालांत बल व वीरता यांचाही विशेष आदर होता. येथपर्यंत कीं, कन्या देखील बलहीन व भीरु पुरुषाबरोबर विवाह करणें पसंत करीत नसत. त्या तसें करणें चांगलें समजत नव्हत्या, एवढेंच नव्हे तर मोठमोठ्या समारंभांतून त्या त्यांचा उघड तिरस्कार करीत असत. प्रथम स्वयंवराकरितां मोठ्या समारंभाची एक सभा होत असे; त्यामध्यें बलवान् व शूर वीरांची परीक्षा घेत असत. जो कोणी त्या परीक्षेंत उत्तीर्ण होईल त्याला कन्यारत्न उपहारादाखल दिलें जात असे. पूर्वीं कन्येची किंमत तिच्या सुदृढ-पणावर अवलंबून असे. हल्लींप्रमाणें लोक आपली चेतनापूर्णसुव-र्णाची जड, जड सुवर्णाच्याबद्दल डोळे मिटून देत नसत. प्राचीन काळीं चेतनसुवर्णाचा मोबदला चेतन सूर्यांतच केला जात असे. अस्तु.

राजर्षि जनकानें त्या काळच्या पद्धतीप्रमाणें बलवीर्यांत बरोबर असणाऱ्या वीर पुरुषाबरोबर सीतेचा विवाह करण्याचें निश्चित केलें.

कारण, सीतेची देखील इच्छा महाबली व शूर, वीर पुरुषाबरोबर विवाह करण्याची होती.

एके वेळीं प्रजापतीदक्षानें यज्ञ केला त्यामध्यें मोठमोठे देवगण, ऋषिगण, मुनिगण वगैरेंना निमंत्रण केलें होतें. यज्ञाच्या प्रारंभीं निमंत्रित लोक येऊं लागले. त्या यज्ञांत काय कारण असेल तें असो. पण दक्षानें त्रिपुरारि शिवाला निमंत्रण पाठविलें नव्हतें. हें जेव्हा शिवाला कळलें, तेव्हां त्यानें क्रुद्ध होऊन दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस करण्याचें मनांत आणिलें. याप्रमाणें त्रिशूलधारी शिवानें क्रोधानें संतप्त होऊन यज्ञ विध्वंसण्याकरितां जाण्याची तयारी केली.त्या वेळेस त्यांच्यापाशीं एक फार मोठें धनुष्य होतें. तें महाधनुष्य हातांत घेऊन शिव देवांना म्हणाले, 'देवगण हो, तुम्ही देखील मला बोलाविण्याकरितां दक्षाला सूचना केली नाहीं, व यज्ञामध्यें माझा आदरसत्कार होऊं दिला नाहीं, याकरितां मी तुमचासुद्धां नाश करून टाकतों. शिवाच्या मुखांतून असें उग्र वाक्य निघतांच देवगण त्यांची स्तुति करूं लागले. त्यांची प्रार्थना ऐकून महादेव प्रसन्न झाले. त्यांनीं प्रसन्न होऊन तें महाधनुष्य देवांना दिलें. तें महाधनुष्य देवांनीं राजर्षिजनकाच्या पूर्वजांच्या स्वाधीन केलें होतें. त्या धनुष्याची आठवण करून राजर्षि जनकानें प्रतिज्ञा केली कीं, जो शूर, वीर, ह्या धनुष्याची प्रत्यंचा चढवून ह्यांतून बाण सोडील त्या वीर पुंगवाबरोबर मी आपली प्रियकन्या सीता हिचा विवाह करून देईन. जेव्हां सीतेचें वय विवाह होण्यास योग्य झालें तेव्हां तिच्या सौंदर्यगुणांची प्रशंसा ऐकून दूरदूरचे राजे व राजकुमार तिच्या बरोबर विवाह करण्याच्या इच्छेनें मिथिलेंत येऊं लागले. परंतु सीता ही वीर्यशुल्का होती. बल हेंच तिचें मोल होतें. म्हणून राजर्षि जनकानें कोणाच्याच प्रार्थनेकडे लक्ष दिलें नाहीं. त्यामुळें सर्व लोक मनांत खिन्न होऊन परत गेले. ज्यांनीं राजाची प्रतिज्ञा ऐकिली ते लोक धनुष्याची

प्रत्यंचा चढविण्याचा उद्योग करूं लागले. परंतु तें धनुष्य इतकें मोठें होतें कीं, त्याची प्रत्यंचा चढवून बाण सोडण्याची गोष्ट तर दूरच राहिली, पण तें कोणालाही उचलतां देखील आलें नाहीं. जेव्हां मोठमोठे वीरमन्य राजेलोक धनुष्य उचलण्याला असमर्थ झाले, तेव्हां राजा जनकानें त्यांनाही नकारात्मकच उत्तर दिलें; तेव्हां ते देखील हताश होऊन गेले. ह्या प्रकारानंतर कांहीं दिवसांनीं एका सुधन्वा-नामक महापराक्रमी राजानें येऊन राजर्षि जनकाच्या राज-धानीला वेढा दिला. त्यानें जनकराजाकडे एक दूत पाठवून असें कळविलें कीं, आपण फार लवकर महादेवाच्या धनुष्यासह सीता-देवीला माझ्याकडे पाठवून द्या. राजर्षि जनकानें त्याची ती प्रार्थना मान्य केली नाहीं. ही गोष्ट राजा सुधन्व्याला फार लागली. त्यामुळें दोघांच्या मनांत अत्यंत वितुष्ट येऊन, दोघांची लढाई जुंपली. त्या दोघांमध्यें फार दिवसपर्यंत युद्ध होऊन शेवटीं युद्धांत सुधन्वा राजा मारला गेला, व जनकाचा विजय झाला. ज-नकराजानें सुधन्व्याचें राज्य आपल्या राज्याला जोडून तें त्यानें आपला धाकटा भाऊ जो कुशध्वज त्याला दिलें. सुधन्व्याचा परा-जय ऐकून अन्य देशचे राजेलोकही जनकाबरोबर अगदीं तुटकप-णानें वागूं लागले. ते आपल्या मनांत म्हणत कीं—आमचा तिरस्कार करण्याकरितांच असली अवघड प्रतिज्ञा जनकराजानें केली आहे. सारांश, असा विचार करून पुष्कळ राजे एकत्र मिळून मिथिलेवर चालून आले. त्यांचेंही म्हणणें हेंच होतें कीं, एक तर सीता आ-म्हांस द्या अथवा युद्धास तयार व्हा. राजर्षि जनक हेही कांहीं सामान्य मनुष्य नव्हते. तेही फार बलवान् होते. ते आपल्या वचनाचे पक्के होते. त्यांनीं त्या सर्व राजांचा तिरस्कार करून त्यांस सांगून पाठविलें कीं—'ठीक आहे मी युद्धास तयार आहें. परंतु मी माझी प्रतिज्ञा खोटी करून तुम्हांस सीता देणार नाहीं.' याप्रमाणें युद्ध ठरलें,

व तें सरासरी एक वर्षपर्यंत चाललें होतें. शेवटीं त्याही युद्धांत राजे लोक हरले व राजर्षिजनकाला पुनः विजयश्रीनें वरिलें. या युद्धांत विजय मिळाल्यामुळें राजा जनकाला अत्यंत आनंद झाला हें खरें, परंतु तेव्हांपासून आपली प्रतिज्ञा खरी कशी होईल, अशी मात्र त्यास चिंता लागली. कांहीं दिवसांनीं राजर्षि जनकानें एका यज्ञानुष्ठानाला आरंभ केला. त्या महोत्सवास येण्याकरितां त्यानें अनेक देशांतील ऋषि, मुनि, व तपस्वी यांना निमंत्रण पाठविलें. त्याप्रमाणें दूरदूरचे अनेक ऋषि, मुनि, व ब्राह्मण येऊन त्या यज्ञोत्सवांत संमेलित झाले. त्या वेळेस यज्ञभूमीची शोभा पाहण्यासारखी होती. कोठें वेदपाठी वेदघोष करीत होते. कोठें होता जन 'स्वाहा' म्हणून प्रज्वलित अग्निकुंडामध्यें सुगंधित चरूची आहुती टाकीत होते. कोठें दर्शनेच्छु लोक यज्ञकर्म व महातेजस्वी ऋषि मुनींच्या संघांचें दर्शन घेऊन आपल्या जन्माचें साफल्य झालें असें मानीत होते. राजाजनक यज्ञानुष्ठान व येणाऱ्या लोकांचें स्वागत करण्यांत निमग्न झाले होते. त्या वेळेस त्यांना असें वर्तमान कळलें कीं, आपल्या शिष्यांसह महर्षि विश्वामित्र देखील यज्ञोत्सवाकरितां आले आहेत. हें ऐकतांच राजर्षि जनक आपल्या पुरोहित व मंत्र्यांना पुढें करून आपण विश्वामित्राच्या भेटीकरितां निघाला. जनकानें त्या महर्षि विश्वामित्राला पाहतांच प्रणाम केला; व योग्य रितीनें त्यांस अर्घ्यपाद्य देऊन बसण्यास आसन दिलें. दोघांनाही भेटून आनंद झाला. कुशलप्रश्न झाल्यावर महर्षि विश्वामित्र राजा जनकानें दिलेल्या आसनावर बसले; ते बसल्यानंतर राजा जनक व इतर मंडळीही तेथेंच शेजारीं बसली.

महर्षि विश्वामित्राच्या शिष्य मंडळींत दोन धनुर्धारी वीरकुमार पाहून जनक राजाला फार आश्चर्य वाटलें. मृगचर्मधारी, फलाहारी व वनविहारी तपस्वयांच्यामध्यें प्रासादविहारी, व शस्त्रास्त्रधारी

कुमारांना वीरवेषानें सुसज्जित पाहून आश्चर्य वाटणें हीच खरी आश्चर्याची गोष्ट होती. त्यांच्या मुखावर कोमलतेशिवाय क्षात्रतेजही हीं पूर्णपणें चमकत होतें. त्यांचा पराक्रम सिंहाप्रमाणें होता. मस्त हत्तीप्रमाणें त्यांची गति असून देवांप्रमाणें त्यांचें सौंदर्य झळकत होतें. रूपलावण्य पाहून जनक राजाला हे दोन देवच स्वर्गांतून पृथ्वीवर अवतीर्ण झाले आहेत, असें वाटलें. तारांगणांनीं व्यापिलेल्या आकाशाची चंद्र-सूर्यामुळें जशी शोभा दिसते, तशीच त्या दोन वीरकुमारांमुळें ऋषिमंडळाची दिसत होती. त्या दोन्ही कुमारांचें तें अद्भुत सौंदर्य पाहून जनक राजानें मोठ्या नम्रतेनें विचारिलें, कीं 'हे तपोधन, आपल्या शिष्य मंडळींत जे हे दोन वीरकुमार विराजमान होऊन त्यांची शोभा वाढवीत आहेत, हे कोण ? कोणाचे पुत्र ? व कोठचे राहणारे आहेत. हे सुकोमलकुमार आपल्याबरोबर अशा दुर्गम मार्गानें कोणत्या कारणानें भ्रमण करीत आहेत. कृपा करून ही सर्व हकीकत मला सांगावी. मी हें सर्व ऐकण्यास अत्यंत उत्कंठित झालों आहे. राजर्षि जनकानें असें विचारिल्यावर विश्वामित्र म्हणाले ' राजा, हे दोन्ही राजकुमार अयोध्याधीश महाराज दशरथाचे पुत्र आहेत. राजा दशरथानें वृद्धावस्थेंत पुत्रकामेष्ठि यज्ञ केल्यामुळें त्याला चार मुलगे झाले, हे आपण ऐकिलेंच असेल. त्याची ज्येष्ठ महाराणी कौसल्या देवी हिचा पुत्र हा घनःश्याम राम, दुसऱ्या कैकई देवीचा सुशील भरत, व तिसऱ्या सुमित्रा देवीला दोन जुळीं मुलें झालीं, तीं लक्ष्मण व शत्रुघ्न होत. हा जो रामाजवळ गौरवर्ण राजकुमार बसला आहे, हाच लक्ष्मण. हे चौघे बंधु प्रियदर्शन, मधुरभाषणी, सुशील, विद्वान् व धनुर्विद्येचे अत्युत्तम ज्ञाते आहेत. ह्यांच्यामध्यें परस्पर अद्भुत व अनुपमेय बंधुप्रेम आहे, एवढेंच नव्हे तर लक्ष्मण रामचंद्रावर व शत्रुघ्न भरतावर अत्यंत प्रेम करतो. हे जसे शांत व सुशील आहेत, तसेच शक्तिसंपन्न व



दिव्यायुधप्राप्ति.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

पराक्रमीहि आहेत. राजा, आतां तुला हे राजकुमार कोण आहेत, हें कळलें ना ? आतां हे माझ्याबरोबर कां आले आहेत याचें कारण ऐक. कांहीं दिवसांची गोष्ट आहे. मी एकदां यज्ञानुष्ठाला आरंभ केला होता. परंतु मारीच वगैरे राक्षसांनीं येऊन माझ्या यज्ञाचा विध्वंस केला. एक वेळ नव्हे तर अनेक वेळां त्यांनीं असेंच केलें. जेव्हां त्या राक्षसांनीं माझ्या सर्व आश्रमाचा नाश केला, तेव्हां आश्रमवासी समस्त ऋषि. मुनि यज्ञ-कार्य करण्यास असमर्थ झाले. तेव्हां मी माझ्या सहाय्यार्थ ह्या राम-चंद्राला आणण्याकरितां अयोध्येला गेलों, व तेथें जाऊन राक्षसांला मारण्याकरितां अयोध्यापति दशरथापासून यांस मागून आणिलें. त्या वेळीं यांचें वय अतिशय लहान असल्यामुळें ह्यांना पाठविण्याला दशरथराजा अनमान करूं लागला. परंतु त्याचे कुलगुरु वसिष्ठ यांनीं त्याला समजाविल्यावर त्यानें रामचंद्राला माझ्याबरोबर पाठविलें. हे राम लक्ष्मण फार सुशील, नम्र, व मोठ्या शांत स्वभावाचे आहेत. पित्याची आज्ञा मिळतांच हे माझ्याबरोबर आले. रस्त्यांत नानाप्र-कारचीं झाडें, अरण्यें, वनें, उपवनें, पर्वत, नद्या वगैरे अनेक चम-त्कार पाहून त्यांची माहिती ऐकिण्यासाठीं हे फार उत्सुक झाले. त्याप्रमाणें बरीचशी माहिती देऊन मीं त्यांच्या मनांचें समाधान केलें. यामुळें मार्गक्रमणाचे त्यांना क्लेश झाले नाहींत. परतु हे राजकुमार भुकेनें व तहानेनें व्याकूळ होत असत. ज्याप्रमाणें नूतन केळीचीं पानें तीव्र उन्हाची तिरीप लागून करपून जातात, त्याप्रमाणें हे दोघे बंधु व्याकुळ होत असत. त्यांना असे वारंवार थकलेले पाहून मी शरयू नदीच्या तीरावर त्यांना बला व अतिबला ह्या विद्या शिकविल्या. ह्या विद्येच्या प्रभावामुळें क्षुधा व तृषा ह्यांची त्यांस बाधा न होतां चालण्याचे श्रमही कमी वाटतात. यानंतर आह्मी सर्व मंडळी गंगा-पार उतरून एका भयंकर निर्जन वनांत जेथें ओढ्याच्या पाण्याच्या

आवाजाव्यतिरिक्त कांहींही ऐकूं येत नव्हतें, अशा ठिकाणीं येऊन पोहोंचलों. त्या वनांत नानातऱ्हेचे पशु, पक्षी, भयंकर नाद करीत होते. कोठें मत्त हत्ती व कोठें विक्राळ सिंह गर्जना करीत होते, तर कोठें निरनिराळे प्राणी हृदयांत धडकी भरविणारे शब्द करीत होते. त्या वनांत मनुष्याचें दर्शन तर दुर्लभच होतें. तेथें नानातऱ्हेचे वन्य पशु इतस्ततः भ्रमण करीत होते. त्या ठिकाणीं मनुष्यप्राणी नसण्याचें एक कारण होतें. तेथें त्राटिका नांवाची एक राक्षशीण रहात होती. ती मोठी शक्तिवान् असून मनुष्यप्राणी पहातांच त्याला खाऊन टाकीत असे; व याचमुळें तें वन निर्जन होतें. तिच्या भी-तीनें पशु देखील लपत फिरत होते. तेथें पोहचतांच मीं रामचंद्राला तिचा सर्व वृत्तांत सांगितला, व तिला ठार मारण्याची आज्ञा केली. तेथें काय उशीर. माझें म्हणणें ऐकतांच हे लोकहितकारी काम समजून रामानें लागलींच धनुष्याला बाण लाविला. धनुष्याचा टण-त्कार ऐकतांच ती राक्षसी धांवतच त्याच्यापाशीं आली. तिच्या बरोबर या रामाचें फार वेळ घोर युद्ध झालें. शेवटीं रामचंद्रानें तिच्या हृदयमर्मस्थानीं एक विषम अचूक बाण मारिला. त्याबरोबर तिला मूर्च्छा येऊन ती लागलीच गतप्राण होऊन जमिनीवर पडली. तिचा वध होतांच मला अत्यंत आनंद झाला; आणि राक्षसांना मारून माझ्या यज्ञाचें यांच्या हातून उत्तम प्रकारें रक्षण होईल अशीही माझी त्याच वेळेस खात्री झाली. त्या वेळेस मी त्यांच्यावर प्रसन्न होऊन त्यांस बरीच अस्त्रविद्या शिकविली, व तीं तीं अस्त्रें कुशलतेनें अस्त्रें कशीं सोडावीं, आणि त्यांचा उपसंहार कसा करावा, याही गोष्टी त्यांस उत्तम रीतीनें अवगत करून दिल्या.

तेथून निघून मग आम्ही थोडक्याच दिवसांनीं सिद्धाश्रमाला जाऊन पोहचलों. तेथें पोंहचल्यावर या दोघां बंधूंनीं मला सांगितलें कीं, आपण येथें खुशाल यज्ञानुष्ठानास आरंभ करावा. जर राक्षस



अहिल्योद्धार.


लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

त्याला विघ्न करूं लागले, तर आम्हीं त्यांना ठार मारून आपल्या यज्ञाचें रक्षण करूं. मग मीं तेथें यज्ञाला प्रारंभ केला. यज्ञ होतच होता. इतक्यांत त्याचा धूर पाहून राक्षस धांवून आले, व त्रास देऊं लागले. मी तर यज्ञांतील दीक्षितच होतों, त्यामुळें मला बसल्या ठिकाणाहून उठतां येईना. यज्ञभूमीवर अगदीं यज्ञकुंडांत रक्ताच्या थेंबाचा वर्षाव होऊं लागला. राक्षस जमून यज्ञकुंडांत अपवित्र वस्तु टाकूं लागले. हें पाहतांच या दोघाबंधूंनीं राक्षसांवर बाणांचा वर्षाव सुरू केला. रामचंद्रानें त्यांच्याबरोबर बराच वेळ युद्ध करून शेवटीं त्यांस आपल्या भीम पराक्रमानें दशदिशांस पळावयास लाविलें. लक्ष्मणानेंही आपल्या अप्रतिम साहसानें राक्षसांचे पाय भूमीला लागूं दिले नाहींत. रामचंद्रानें मारीच नांवाच्या राक्षसाला असा एक बाण मारला कीं, तो त्यासरसा अगदीं दूर अंतरावर जाऊन पडला. त्या राक्षसांमध्यें सुबाहु नांवाचा एक महाबलवान् राक्षस होता, तो त्या युद्धांत रामाच्या हातून मारला गेला. तो मेल्यावर बाकीचें त्याचें राक्षसदल वाट फुटेल तिकडे पळत सुटलें. नंतर माझा यज्ञ निर्विघ्नपणें पार पडला. राजा, यांची ही वीरता पाहून मी अत्यंत संतुष्ट झालों व त्यांस अनेक आशीर्वाद दिले. सिद्धाश्रमनिवासी सर्व ऋषि, मुनि यांचा अपूर्व पराक्रम पाहून यांस ‘ धन्य, धन्य, ’ म्हणूं लागले.

राजा, जेव्हां माझा यज्ञ यथासांग आणि सानंद पूर्ण झाला, तेव्हां आपल्याही येथें एक महायज्ञ होणार असल्याचें मी आनंददायक वर्तमान ऐकिलें. तें ऐकतांच हा यज्ञ पाहण्याची मला प्रबल इच्छा उत्पन्न झाली. त्याच वेळेस आपल्या येथें असलेल्या एका महाधनुष्याचें मला स्मरण झालें. तें धनुष्य आपल्या येथें कसें आलें, हें मीं नंतर या दोघांस सांगितलें. तें ऐकून हे दोघे तें धनुष्य पाहण्यास अत्यंत उत्सुक झाले, आणि याचमुळें मी यांना बरो-

बर घेऊन येथें आलों. मार्गांत आम्हीं सर्व जणांनीं विशालानामक नगरींत वास करून गौतम मुनीच्या पवित्र आश्रमाचें दर्शन घेतलें. हे दोघे बंधु तें धनुष्य पाहूं इच्छितात, तेव्हां कृपा करून तें यांना दाखविल्यास मलाही त्यापासून अत्यंत आनंद होईल.

महर्षि विश्वामित्राच्या तोंडून ही रामलक्ष्मणाची प्रशंसा ऐकून राजा जनकालाही फार संतोष वाटला. त्यांनींही त्या दोघांची स्तुति करून त्यांचें मोठ्या प्रेमानें आणि आदरानें स्वागत केलें. महार्षि विश्वामित्राचा कीर्तिगौरव सर्वत्र पसरला होता; तेव्हां राजर्षि जनकाच्यानें महात्म्या विश्वामित्राच्या वचनाचा कसा अनादर करवेल! त्यांच्या आज्ञेवरून त्यानें सेवकास तें धनुष्य आधलें दिवशींच महासभेंत आणून ठेवण्यास आज्ञा केली. तें धनुष्य फार मोठें होतें. बऱ्याच सेवकांनीं मिळून तें धनुष्य यज्ञमंडपांत आणून ठेविलें. जेव्हां सेवक धनुष्य घेऊन यज्ञमंडपांत आले, तेव्हां विश्वामित्र रामचंद्रास संबोधून म्हणाले—' वत्स, हें पहा धनुष्य आलें. आतां तूं याचें नीट नीरीक्षण कर. विश्वामित्राची अशी आज्ञा होतांच रामचंद्र आपल्या जागेवरून उठले आणि ज्या पेटींत तें प्रचंड धनुष्य ठेविलें होतें, तिच्याजवळ गेले. धनुष्याकडे पाहून रामचंद्र म्हणाले—' काय , मी या धनुष्याला नुसता हातच लावूं किंवा बाण जोडूं , ! हें वाक्य रामचंद्रानें फारच हळू उच्चारिलें, तथापि तें जनक आणि विश्वामित्र यांनीं ऐकिलेंच. त्यांनीं मोठ्या आनंदानें ' हें धनुष्य उचलून याला बाण जोड ' असें त्यांस सांगितलें. ती त्यांची आज्ञा ऐकून रामचंद्रानें सर्वांसमक्ष तें धनुष्य सहज उचलिलें. ज्या धनुष्याला उचलण्याकरितां शेकडों मोठमोठे योद्धे उद्योग करून शेवटीं भागले, व ज्यांच्यांनीं तें नुसतें जागचें हालवलें सुद्धां नाहीं, त्या महाधनुष्याला श्रीरामचंद्रानें सहज लीलेनें उचललेलें पाहून सर्वांस मोठा आचंबा वाटला. त्या धनुष्याला



धनुर्भंग.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई

उचलून व त्याची प्रत्यंचा चढवून रामचंद्र बाण सोडणार इतक्यांत त्याचे दोन तुकडे होऊन तें भूमीवर पडलें. धनुष्य प्रचंड तर खरेंच. तें मोडलें तेव्हां त्याचा एवढा मोठा आवाज झाला कीं तो ऐकून सर्व लोक क्षणभर दचकले. धनुष्यच मोडलें असें नाहीं, तर त्याबरोबर जनक राजाचें चितारूप जाळेंही लागलेंच ताडकन तुटून गेलें.

धनुष्य मोडलेलें पाहून राजा जनकाची चिंता कोठच्या कोठें पार विलीन होऊन गेली. राजा जनकाला त्याबद्दल अत्यंत हर्ष झाला. ज्याप्रमाणें अग्नीच्या एका ठिणगींत सर्व जग भस्म करून टाकण्याची शक्ति असते, त्याप्रमाणें रामचंद्राच्या सुकोमल शरिरांत अपार बलविक्रम असलेला पाहून तो त्यांची प्रशंसा करूं लागला. त्यांतच आपली प्रतिज्ञा खरी झालेली पाहून त्यास पराकाष्ठेचा आनंद झाला. जेव्हां हें शुभ वर्तमान सर्व मिथिलेंत पसरलें तेव्हां सर्व लोक आनंदांत निमग्न झाले. लागलेंच घरोघर मंगल उत्सव सुरूं झाले. वाद्यें वाजूं लागलीं, व मंगलगीतें ऐकूं येऊं लागलीं. जनकाच्या राजमहालांत सर्वत्र आनंदीआनंद पसरला, व सीतेच्या विवाहाची तयारी सुरू झाली. जरी जनकपूर स्वच्छ व सुंदर होतें, तरी सीतेच्या या विवाहोत्सवाच्या प्रसंगीं सर्व लोक आपापलीं निवासस्थानें शृंगारूं लागले. सर्व राजपथ स्वच्छ करून व शृंगारून सज्ज केले.

नंतर राजा जनकानें विश्वामित्राची आज्ञा घेऊन हें शुभ वर्तमान कळविण्याकरितां चतुर दूतांस शीघ्रगामी रथांत बसवून अयोध्येंत पाठविलें. दूतांनीं अयोध्येस लवकरच पोहचून रामलक्ष्मणाचें कुशलवृत्त व रामहस्तें झालेला धनुष्यभंग या गोष्टी दशरथास कळविल्या. आपल्या पुत्रांचा कुशल समाचार ऐकून राजा दशरथास फारच आनंद झाला. ते राजा जनकाच्या निमंत्रणाप्रमाणें रामचंद्राच्या विवाहाकरितां वऱ्हाडासह जनकपुरास जाण्यास निघाले. वऱ्हाड मंडळी लवकरच मोठ्या समारंभानें जनकपुरास पोहोंचली.

विवाहाच्या वेळेस सीतेचें वय काय होतें, याचा निर्णय होत नाहीं. याबद्दल आदिकवि श्रीवाल्मिकींनीं जें कांहीं लिहिलें आहे त्यावरूनच अनुमान केलें पाहिजे. श्रीरामचंद्राबरोबर आपला विवाह होण्याची वेळ आलेली पाहून सीतेच्या मनांत एक अपूर्व भावना उत्पन्न झाली होती. रामचंद्राच्या अश्रुत पराक्रमाची व अनुपम लावण्याची गोष्ट ऐकून ती मनांतल्या मनांत प्रसन्न झाली. तिच्या मनांत रामचंद्राबद्दल श्रद्धा व पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. ज्याप्रमाणें दैववान् मनुष्याला अधिक द्रव्य मिळाल्यावर आनंद होतो, त्याप्रमाणें भावी स्वामीचें पौरुष, लावण्य, व पराक्रम यांची गोष्ट ऐकून सीता आपल्याला मनामध्यें मोठी दैववान् समजूं लागली. जरी सीतेचा अद्यापि विवाह झाला नव्हता, तरी ती शिक्षित होती, व धर्माचें मर्म उत्तम रीतीनें जाणणारी होती. कारण तिच्या मातापित्यांनीं तिचें मन सुशिक्षणानें भरून टाकिलें होतें. तेव्हां रामचंद्रांनीं धनुष्याचा भंग करतांच ती त्यास देवाप्रमाणें मानूं लागली. खरोखरच सीता पतिव्रताधर्माचें महत्व जाणत होती, एवढ्यामुळें लोक अद्यापि तिला पूज्य मानतात व तिचें प्रातःकाळीं नामस्मरण करतात.

ज्याप्रमाणें सूर्य आपली ज्योती चंद्रास देऊन त्यास प्रकाशित करतो, त्याप्रमाणें पुरुषोत्तम भगवान् रामचंद्राच्या हातांत प्राणतुल्य कन्या सीतेला देण्याचा जनकानें विचार केला. विवाहाची तयारी होऊं लागली. राजा दशरथ मिथिलेस येऊन पोहचल्यावर राजा जनकानें त्यांची उत्तम व्यवस्था ठेविली. त्यांचा यथायोग्य सन्मान केला. जनकास सीतेपेक्षां एक लहान कन्या होती. तिचें नांव उर्मिला. तिचा लक्ष्मणाबरोबर विवाह करून देण्याचें त्यानें लगेंच निश्चित केलें. राजा जनकाचा धाकटा बंधु जो कुशध्वज त्यास दोन मुली होत्या. त्याही अत्यंत रूपवती, गुणवती व विद्यावती होत्या. वसिष्ठ-विश्वामित्रांनीं मिळून राजा जनकाची संमति घेऊन त्या दोघींचाही

विवाह भरत व शत्रुघ्न यांच्या बरोबर त्याच वेळेस करण्याचें ठरविलें चौघां राजकन्यांचे विवाह चौघां राजपुत्रांबरोबर होणार यामुळें सर्व नगरवासीयांस आनंद व उत्साह वाटला.

विवाहकाल प्राप्त झाला, तशा राजकुमारी सुंदर वस्त्रालंकारांनीं भूषित अशा होऊन लग्नमंडपाकडे जाण्यास निघाल्या. चौघीजणी आपल्या पित्याबरोबर अलंकृत होत्सात्या तेथें येऊन पोहोचल्या. विवाहकालीं वैदिक धर्मानुसार वेदी तयार केली. त्यानंतर ईश्वराची प्रार्थना व उपासना करून अग्निस्थापना झाली. सुगंधित द्रव्यांनीं उत्तम हवन केल्यावर जनकानें लज्जावनत मुख सीतेला रामचंद्रासमोर बसवून अग्नीस साक्षीस ठेवून म्हटलें–' रामचंद्रा, ही माझी कन्या आतां तुझी सहधर्मिणी झाली. तूं हिचा हात आपल्या हातांत घे. तुझें कल्याण असो. ईश्वराच्या कृपेनें ही पतिव्रता होवो, व छायेप्रमाणे तुझ्या बरोबर असो.' (वा. अ. १३.) असें म्हणून राजर्षीनें मंत्रानें पवित्र केलेलें उदक रामचंद्राच्या हातावर घातलें. श्रीरामानें हर्षभरित होऊन सीतेचें पाणिग्रहण केलें. मंडपांत बसलेले सर्व लोक त्यास धन्यवाद देऊं लागले. चहूंकडून आनंदमय टाळयांचा गजर होऊन पुष्पवृष्टि झाली. मंगलवाद्यध्वनानें सर्व मंडप भरून गेला, वधूमाच्या सुगंधानें सर्व मिथिला नगरी व्याप्त होऊन गेली.


सीतेचें पाणिग्रहण झाल्यावर जनकानें दुसऱ्या तिघी कन्यांचें विधिपूर्वक पाणिग्रहण करविलें. उर्मिलेचा लक्ष्मणाबरोबर, मांडवीचा भरताबरोबर, व श्रुतकीर्तीचा शत्रुघ्नाबरोबर विवाह झाला. त्या वेळीं आनंदाला तर सीमाच नव्हती. कोपाचा शब्द कोठेंही ऐकूं येत नव्हता. राजा दशरथ आपले चौघे पुत्र व त्यांच्या वधु घेऊन आपल्या जानवशाच्या ठिकाणीं परत आला. तेथें आल्यावर त्यानें अनेक मंगल समारंभ केले.

जेव्हां सीता रामचंद्राबरोबर जानवशाच्या घरीं येऊन पोहचली, तेव्हां आपल्या पतीला प्रथम पहातांच तिला हर्ष झाला.

आपल्या स्वामीचें हर्षोत्फुल्ल मुख पाहून तिचेंही चंद्रवदन प्रफुल्लित झालें. रामचंद्राचें दर्शन होतांच सीतेला असें वाटलें कीं 'रामचंद्र नुकतेच यौवनावस्थेंत पदार्पण करीत आहेत. रामचंद्राच्या शरीरांतून दिव्य सौंदर्यरस टपकत होता. त्यांचा सर्व देह सुदृढ, सुरूप, व सर्व शक्तीचा आधारस्तंभच वाटे. त्यांच्या सुंदर भुवया व मानसिक तेज-हीं सच्चरित्राचें प्रत्यक्ष प्रमाण दर्शवीत होतीं. त्यांच्या राजीवनयनांतून प्रतिभा प्रदिप्त झाली होती, व त्यांच्या मुखावर एक विशेष प्रकारचें तेज चमकत होतें. त्यांची सौम्य मूर्ति व प्रसन्न वदन पाहून पाहणाराचें चित्त आनंदमय होऊन जात असे. अपवित्र व कुकल्पना मनांत असलेल्या कुजनांच्याहि मनांत त्यांना पाहून साधुत्व उत्पन्न होई. अनेकवार त्यांचें दर्शन घेऊनही मनाची कधीं तृप्ति होत नसे. सीतेला त्यांचें दर्शन होतांच, 'देवांप्रमाणें यांची सदैव पूजा करावी' असेंच तिला वाटे. सीतेनें आपल्या देवरूप पतीचें दर्शन घेतांच मनांतल्यामनांत त्याच्या चरणकमलांवर आपला देह अर्पण केला.

आतां रामचंद्राविषयीं पाहूं. नववधू सीतेला प्रथमच पाहिल्याबरोबर रामचंद्राच्या मनांत जो भाव उत्पन्न झाला, तो वर्णन करतां येत नाहीं. तो भाव लिहितां येत नाहीं एवढेंच नव्हे, तर तो लिहितां येणेंच अशक्य आहे. कारण कीं त्या वेळीं त्याच्या मनांत जो भाव उपन्न झाला तो अनुपम व अभूतपूर्व होता. सीतेची पवित्र व सौम्य मूर्ति रामचंद्राच्या हत्पटलावर पूर्णपणें उमटली गेली. रामचंद्रानें त्या मूर्तीला देवतेप्रमाणें आपल्या हृदयमंदिरांत स्थापिली. त्यांनीं एकदां जी मूर्ति हृदयांत धारण केली, ती मग एक क्षणभरहि तेथून कधीं दूर केली नाहीं.

विवाह झाल्याबरोबर दुसरे दिवशीं वरात जाण्याची तयारी होऊं लागली. जनकानें आपल्या मुलींना व जामातांना पुष्कळ



अयोध्याप्रवेश

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

वस्तु आंदण दिल्या. जाण्याच्या वेळीं जनकराजा थोडे दूर त्यांस पोचविण्यास गेला. त्या वेळेस त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात असून त्याचा कंठ सद्गदीत झाला. स्नेहानें हृदय भरून आलें. धैर्याशिवाय अशा वेळीं कशाचा अवलंब होणार! शेवटीं त्याचेंच त्यानें अवलंबन केलें. शोकवेग आंवरून राजर्षि जनक आपल्या महालांत परत आले. ज्याप्रमाणें अमावस्येच्या रात्रीं चंद्राच्या चांदणीशिवाय पृथ्वीवर अंधकार पसरलेला असतो, त्याप्रमाणें सीतेच्या जाण्यानें राजा जनकाचें मंदिरच काय, परंतु सारी मिथिला नगरी शोभाहीन व आनंदरहित भासूं लागली. परंतु राजा जनक हे महाज्ञानी होते. ते स्नेह व मोह यांना आंवरून पूर्ववत निर्लिप्त होऊन राज्यारभार पाहूं लागले.

इकडे राजा दशरथ आपल्या पुत्रांना व मुनांना बरोबर घेऊन आनंदानें अयोध्येस जाण्यास निघाले. थोडे दूर जातात तोंच त्यांचा आनंद नष्ट झाला. कारण कीं, रामचंद्राच्या हातून धनुष्यभंग झाल्याचें ऐकून भीमकर्मा परशुराम अत्यंत रागावले होते. ते अकस्मात येऊन त्यांनीं त्यांस मार्गांत अडविलें. त्यांनीं राम लक्ष्मण यांस पुष्कळ प्रश्न केले. त्या प्रश्नोत्तरांत रामचंद्रापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. ते शेवटीं त्यांत हरले, आणि आपल्या ठिकाणीं निघून गेले. नंतर राजा दशरथ आनंदानें मार्गक्रमण करूं लागले. अयोध्येजवळ आल्याचें आनंदायक वर्तमान जेव्हां सर्वांस कळलें, तेव्हां अयोध्येतील स्त्रीपुरुष आनंदसागरांत बुडून गेले. राजमहालांत आनंदाला पारावार नव्हता. जेथें सीतादेवीसारख्या देवीचें पदार्पण होणार होतें, तेथें कोणच्या प्रकारची कमरता असूं शकणार आहे! राणीवसांतील स्त्रियांनीं मुलाचें व सुनेचें चंद्राप्रमाणें मुख पाहतांच लिंबलोण केलें. त्यांचा आनंद गगनांत मावेना. सीतेचा जेव्हां गृहप्रवेश झाला, तेव्हां तेथें नानाप्रकारचे मंगलोत्सव सुरू झाले.

दुसरें कांड.

रामचंद्राच्या राज्याभिषेकाची तयारी कैकयीची कुटिलता, रामवनवास, व भरताचा खरा संन्यास.

अहाहा, हा पर्वत किती तरी रमणीय आहे! ही लहान नदी पर्वतापासून निघाली आहे. कशी सुंदर नदी आहे हो! हिचें जल किती श्वेत, किती निर्मल, व किती पवित्र आहे. हिचें पाणी दगडांतून खळखळ वहात असल्यानें फेंसाळून गेलें आहे. त्यांत कोठें कोठें लहानमोठे भोंवरे उत्पन्न झाले आहेत. हिची गति मोठी विचित्र आहे. ही चंचल स्वभावाच्या, अभिमानी बालिकेप्रमाणें दिसत आहे. ही पुढें पुढें दिव्य दुर्वांकुरांमधून गंभीर भाव धारण करीत व कोठें कोठें गहन कांतारांतून आपल्या दोन्ही किनाऱ्यांवरील सुगंधित वृक्षांना, व पुष्पांना जातां जातां स्पर्श करीत अर्थात त्यांतील पुष्पपराग ग्रहण करीत जणूं काय नाचत जात आहे.

अहाहा, ही पर्वत कुमारी लहानशी नदी किती मनोहारिणी आहे. कशी सुंदर आहे. पहा, बघतां बघतां हिचें निर्मल जल महानदांत मिळून गेलें. नदानें मोठ्या प्रसन्नतेनें नदीचा प्रचंड वेग आपल्या हृदयांत सांठवून टाकला. पण ज्या वेळेस त्यानें तो तिचा वेग धारण केला त्या वेळेस त्याचेंही हृदय संक्षोभित झालें होतें. उभयतांच्या संगमानें पाणीही वाढलें. त्या लहान नदीचें अस्तित्व त्या विशाल महानदाच्या गंभीर हृदयांत पार कोठच्या कोठें नाहींसें झालें. त्या नदीचा ओघ आपल्यांत मिळवून घेऊन, आणि त्यामुळें अधिक बलवान् होऊन त्या नदानें किती तरी शुष्क शेतें हिरवींगार करून टाकलीं. किती तरी हिरवींगार शेतें पाण्यानें भरून गेलीं. याप्रमाणेंच

किती तरी गांवांस व खेड्यांस आपल्या जलाचा फायदा देत हा महानद वेगानें वहात जात आहे. आतां तर महासागराला मिळून त्यानें आपल्या जन्माचें साफल्य केलें.

अहाहा ! हा महानद नदीचा संगम किती चित्ताकर्षक व बोधप्रद आहे ! निर्मल स्वभावाची बालिका प्रभांत वेळेंत (आपल्या बाल्या. वस्थेंत) फुलें वेंचून, पक्ष्यांचें मधुर गायन व भाषण ऐकून व हरिण-बाळकाप्रमाणें इकडे तिकडे स्वैरपणें उड्या मारून केव्हां चंचलता व केव्हां गंभीरता धारण करीत आहे. या अनंत संसारांत परमेश्व-रानें त्या बालिकेच्या प्रारब्धांत जें कांहीं लिहिलें असेल तें भोग-ण्याकरितां तिचें जीवन दिवसेंदिवस वाढत होतें. जेव्हां योग्य वेळीं ती बालिका आपल्या अनुरूप पतीच्या हातांत आपलें जीवन सम-र्पण करते तेव्हां ती बालिकारूपी नदी आपल्या स्वतंत्रतेला आपल्या जीवनाला पतिरूप नदांत विलीन करते. त्या वेळीं ती आपल्या जीवनाचा आधार आपला पति होय, ह्यांतच धन्यता मानीत असते. शेवटीं तीं दोघें मिळून उत्साहानें संसारांत सच्च-रित्रानें राहून आपल्या जीविताचें सार्थक करतात. नंतर तीं आपलें कर्तव्य करून जगदीश्वर भगवानाच्या नियमसागरांत निमज्जित होऊन जातात. हीच अवस्था पूज्य श्रीसीतादेवी व श्रीरामचंद्र यांची झाली.

सीतादेवीनें आपला पवित्र जीवनस्रोत श्रीरामचंद्राच्या जीवन-स्रोतांत मिळवून टाकिला. तिच्या जीवनतरंगांत श्रीरामचंद्राचा जी-वनतरंग मिसळून जाऊन दोघांचा जीवनप्रवाह समभाव झाला. जिकडे तिच्या स्वामीचा जीवनप्रवाह वाहत होता, तिकडेच सीता-देवीनें आपलाही जीवनप्रवाह प्रवाहित केला. आतां सीतादेवीचें स्वातंत्र्य श्रीरामचंद्राच्या स्वातंत्र्यांत मिळून गेलें. जेव्हां सीतादेवीचें मन व प्राण तिच्या स्वामीच्या मनांत व प्राणांत मिळून गेले तेव्हां विरहाचा संभव तरी कसा होईल! केव्हांही होणार नाहीं. अशा

अद्भुत संगमाला कोणीही दूर करूं शकणार नाहीं. गंगायमुनेचा संगम झाल्यावर गंगाजलास यमुनाजलापासून कोणी अलग करूं शकला आहे काय ! केव्हांही नाहीं. पवित्र नद्यांचा हा संगम, ज्याप्रमाणें पवित्र आहे त्याचप्रमाणें किंबहुना अधिकच हा मनुष्य जीवनाचा संगम अधिक पवित्र होतो. या पवित्र जीवनसंगमाचेंच नांव विवाह होय. याशिवाय विवाहांत काय आहे ! यामुळें दोन व्यक्तींचा जीवनप्रवाह एकचित्त होऊन वहात जातो. जो मनुष्य या पवित्र संगमाचें महात्म्य जाणतो, व त्याच्या गौरवाला ओळखतो, तो त्या संगमाचा वियोग स्वप्नांतही पहात नाहीं.

पतीची जीवन नदी वहातां वहातां पाहिजे तर मरुभूमीच्या रेताड मैदानांत शुष्क होवो, अथवा वाटेल तर नवीन उत्साहानें नानादेश व नानाप्रदेश यांत आपली प्रभा दाखवीत महासागराकडे वेगानें जावो, सहधर्मिणी त्याची साथ केव्हांही सोडीत नाहीं. ती सदा त्याची सहाचारिणीच रहाते. पति सुखांत अगर दुःखांत राहो, ती त्याची अनुगामिनीच राहते. पति दयाशील अगर निष्ठुर होवो, पत्नी त्याला देवाप्रमाणेंच मानते. पति स्त्रीविषयीं आपलें कर्तव्य जरी करीत नसला, तरी पत्नीनें आपल्या कर्तव्यांत कमतरता केलेली कोणीं पाहिली आहे काय! पतिव्रता स्त्री पतीपासून कोणत्याही मोबदल्याची इच्छा करींत नाहीं. ती निःस्वार्थ व निष्काम होऊन मनानें, वाचेनें व प्रत्यक्ष कृतीनें पतीची सेवा करीत असते. पतिपरायणता हीच तिच्या जीवाची सफलता होय; व हाच तिचा धर्म आहे ! ह्याच धर्माचें पालन करण्यांत ती आपलें जीवन अर्पण करते. तिच्या कर्मानुसार परमेश्वर तिला ज्या स्थितींत ठेवतो, त्या अवस्थेंत राहून जगांत ती कीर्ति प्राप्त करून घेते. आंपली सीतादेवी ही पतीची सहधर्मिणी झाली आहे. आतां ती आपला धर्म कसा काय चालविते हें पहावयाचें आहे.

फूल फुलल्यावर ज्याप्रमाणें त्याचा सुगंध थोडा थोडा चहूंकडे दरवळूं लागतो, त्याप्रमाणें विवाह झाल्यावर सीता देवीचें हृदयपुष्प विकसून एक प्रकारच्या दिव्य सुगंधाचा तिला अनुभव येऊं लागला. त्या सुगंधानें सीता देवीचें हृदय आनंदानें भरून गेलें. असा हा अपूर्व आनंद अनुभवण्याचा तिच्या आयुष्यांत हा पहिलाच प्रसंग होता याच्या पूर्वीं तिला असा अनुभव कधींहि आला नव्हता. हा प्रकार (भाव) तिला अगदीं नवीनच होता. त्या अभूतपूर्व आनंदास लपविण्याचे सीता देवीनें पुष्कळ यत्न केले, पण त्यांत तिला यश आलें नाहीं. तिच्या लपविण्यानें तो भाव मुळींच लपला गेला नाहीं. त्या वेळेस सीता देवीचें मन इतकें प्रफुल्लित, आनंदित व उत्साहित होतें कीं, त्यामुळें तिच्या चेहऱ्यावर तो भाव जास्तच प्रकट होत होता. जेव्हां जेव्हां त्याच्या मनांत श्रीरामचंद्राविषयीं विचार येत, तेव्हां तेव्हां ती हातांतील काम सोडून उत्सुक होऊन बसे. ती आपले हेतु लपवूं शकत नव्हती, हें याचें कारण होय. इतकेंच नव्हे तर त्या वेळीं एखादी मैत्रीण रामचंद्राविषयीं चर्चा करीत असली तर सीतादेवी ती अगदीं एकाग्रतेने ऐके. परंतु तेवढ्यानें तिची तृप्ति मुळींच होत नसे. यायोगानें तिचा हेतु सर्वांना कळून चुके. ज्या ज्या वेळेस सीतादेवी रामचंद्राविषयीं बोलूं लागे, त्या त्या वेळेस ती एकदम खालीं पाहूं लागे. केव्हां केव्हां अशा आनंदानें व मोदभरानें ती खालीं पाहूं लागे कीं, त्यामुळें तिचा तो भाव तत्काळ प्रकट होई. अशा अनेक प्रकारच्या गोष्टी होत असत कीं, तिचा तो भाव लपविण्याचा प्रयत्न निरर्थक होई.

यौवनावस्थेंत प्रवेश करतांच सीतादेवीच्या जीवन सागरावर जोरानें प्रेमलहरी उचंबळूं लागल्या. त्या प्रेमतरंगांचा अर्थ ती समजून गेली. त्याचा अर्थ दुसरें कोण समजूं शकलें असतें! ती गोष्टही दुसऱ्या कोणास लपण्यासारखी नव्हती. सीतादेवी त्या

कालापासून इतकी प्रेमभरित झाली कीं, ती स्वतःला पार विसरून गेली; तशीच ती इतकी पतिपरायण झाली कीं, ती केवळ आपल्या पतीकरितांच आपलें जीवन चालवूं लागली.

मागें आम्हीं हें सांगिमलेंच आहे कीं, रामचंद्रजीस सीतादेवीचें प्रथम दर्शन होतांच त्याच्या निर्मल हृदयावर तिची प्रेमळ मूर्ति त्याच वेळेस कोरली गेली. रामचंद्र त्या सौम्य मूर्तीस आपल्या हृदयपुष्प मंदिरांत अधिष्ठित करून श्रद्धेनें व प्रीतीनें तिचें ध्यान करीत. सीतादेवीच्या सच्चरित्राचा जसा त्यास अनुपम अनुभव येऊं लागला, तसें श्रीरामचंद्राचें प्रेम अनेक पटीनें वृद्धिंगत होत गेलें. सीतादेवीचें चरित्र इतकें मोहक व पवित्र होतें कीं, त्यामुळें रामचंद्राचें हृदय अगदीं द्रवून गेलें. रामचंद्रानें प्रथमारंभींच सीतेस देवीप्रमाणें आपल्या हृदयमंदिरांत अधिष्ठित केलें. ती नवयौवना, कृशांगी सीतादेवी दिवसेंदिवस आपला अनुराग वाढवूं लागली. जेव्हां जेव्हां सीतादेवीचें ते स्मरण करीत. तेव्हां तेव्हां त्यांच्या हृदयांत एक अनिर्वचनीय आनंद उचंबळूं लागे. आपल्या हृदयांत सीतादेवीचें स्थान आहे असें समजून तें स्थान ते स्वच्छ ठेवीत.

श्रीरामचंद्रजीची गोष्ट काय विचारावयाची आहे! त्यांच्यासारखा पुरुष संसारांत झाला नाहीं व पुढें होण्याची आशाही नको ! त्यांच्या सारखा कोणी झाला तर तेच होतील, दुसरा कोण होऊं शकणार ! परोपकार तर त्यांच्यांत मूर्तिमंत वास करीत होता. लहानपणापासून दुसऱ्याच्या हिताकरितां ते मनापासून प्रयत्न करीत. ते दुसऱ्यास सुखी पाहून सुखी होत व दुःखी पाहून दयार्द्र होत. त्यांचें शील, सौजन्य व बंधुप्रेम अवर्णनीय होतें. लहानपणापासून त्यांना हेंच शिक्षण मिळालें होतें कीं, दुसऱ्यांशीं प्रेमभावानें वागून त्यांस आपलेंसें करावें ! सर्व प्रजाजनांना ते समभावानें पहात असत. ते

मितभाषी असून मिष्टभाषणी होते. तसेच ते सत्यवादी व हितभाषणीही होते. याकरितां प्रजा त्यांच्यावर विशेष प्रेम करी. विवाह झाल्यावर तर परोपकार करण्याचें व्रत त्यांनीं अधिक चालविलें, व लोकप्रियतेचीं कामें ते अधिक करूं लागले. हीं कामें करण्यांत त्यांस जितका आनंद वाटे, तितका दुसऱ्या कोणत्याही कामांत वाटत नसे. विविध ज्ञानाच्या परिशीलनानें त्यांचें ज्ञान फारच वाढलें होतें. धनुर्विद्येनें त्यांचें बल, तेज, व पराक्रम अधिकच वृद्धिंगत झाले होते. रामचंद्र माता, पिता, व गुरु यांचे अनन्य भक्त होते. त्यांच्या सेवेंत त्यांनीं कधींहि हयगय केली नाहीं. माता, पिता, व गुरु हे त्यांच्या मतें तीन देवच होते, एवढेंच नव्हे तर त्यांची अनन्य भावानें सेवा करणें हें ते आपलें प्रधानकर्तव्य समजत असत. विद्वान् ब्राह्मण, व संन्यासी यांचाही ते सत्कार करीत. दोन्हीं वेळेस संध्या करून ते विधिपूर्वक अग्निहोत्रही पाळीत. अतिथीची सेवा हें त्यांचें मुख्य काम होतें. सर्वांचा ते यथोचित आदरसत्कार करीत असत. मित्रांबरोबर कसें वागलें पाहिजे हें ते उत्तम प्रकारें जाणत असत. याशिवाय सीतादेवीला सदैव प्रसन्न ठेवणें हेंही ते एक आपलें कर्तव्यच समजत होते. सीतेची विद्यमानता हें आपल्या सर्व शुभकर्मांचें अधिष्ठान आहे, ही त्यांची भावना होती. तात्पर्य, सीतादेवीला संतुष्ट ठेवणें ही एक मोठी उपासना आहे, असें त्यांस वाटत असे. तिला संतुष्ट ठेवणें हें कार्य कांहीं सहज नव्हतें. कारण तिला संतुष्ट ठेवण्याकरितां शुद्ध मन व संकल्पाच्या भावना पाहिजे होत्या. मलिन व कुवासनायुक्त अंतःकरण असणारा तिला संतुष्ट राखण्यास असमर्थच होता. रामचंद्रांनीं सीतेवरील आपलें प्रेम इतकें वाढविलें व तिच्या प्रेमसूत्राशीं आपलें प्रेमसूत्र इतकें दृढ केलें कीं, तीं दोन्हीं सूत्रें अगदीं एकजीव होऊन गेलीं. त्याचप्रमाणें परस्परांचा परस्परांवरील अनुराग इतका दृढ होऊन गेला कीं, आतां आपलें हें प्रेम-

बंधन कोणीहि शिथिल करूं शकणार नाहीं अशी रामचंद्राची व सीतादेवीचीहि पूर्ण खात्री झाली.

रामचंद्रजी राजनीति जाणत्यांमध्येंहि श्रेष्ठ होते. ते जसे नीतिमान् होते तसेच धर्मज्ञहि होते. धर्म आणि नीति यांमध्यें ते भेदाभेद करीत नव्हते. त्यांच्या दृष्टीनें हीं दोन्हीं एकच होतीं. जो धर्म तीच नीति, व जी नीति तोच धर्म. परंतु एका गोष्टीच्या मात्र ते अगदीं विरुद्ध होते. कुनीति ही ती गोष्ट होय. हिचा मात्र ते मनापासून तिरस्कार करीत असत. त्यांना नेहमीं सत्य व न्याय्य मार्ग पसंत वाटे. विवाह झाल्यावर रामचंद्राकरितां एक निराळें मंदिर बांधण्यांत आलें. राज्यकारभारांत रोज ते आपल्या पित्यास मदत करीत असत. नंतर आपल्या मातांची सेवा करून जो वेळ मिळे त्यांत आपल्या मंदिरांत येऊन विश्रांति घेत असत. तेथें आल्यावर ते सीतादेवीला प्रेम भरीत दृष्टीनें पाहून मनांत अत्यंत संतुष्ट होत असत. तिचें मनोरंजन करून तिला नानाप्रकारचा उपदेश करीत असत. त्याचप्रमाणें नानाप्रकारची धर्मचर्चा करून व पातिव्रत्य धर्मावर भाषणें करून तिला ते धर्माचें गुह्य समजावून देत असत. सीतादेवी रामचंद्राची अमृतवाणी ऐकून फार संतुष्ट होत असे, व त्यांचीं सर्व भाषणें अगदीं लक्षपूर्वक ऐकत असे. केव्हां केव्हां ती आपल्या बाल्यकालांतील गोष्टीहि आपल्या पतीस सांगत असे. मागें आम्हीं सांगितलेंच आहे कीं, सीतादेवी जेव्हां आपल्या पित्याच्या गृहीं ऋषींबरोबर संभाषण वगैरे करीत असे, तेव्हांपासून तिला तपोवन व ऋषींचे आश्रम पाहण्याची प्रबल इच्छा उत्पन्न झाली होती. पतीबरोबर संभाषण करतांना केव्हां केव्हां वनांत जाण्याची तिची ती इच्छा जागृत होई. आपल्या पतीबरोबर पुष्पित वनांत विहार करण्याची तिला वारंवार इच्छा होई. दयामय रामचंद्र आपल्या प्रियेच्या इच्छेप्रमाणें तिला वनविहार करण्यास

नेणार नाहींत काय? ते तिची इच्छा पूर्ण करणार नाहींत कां! जेव्हां सीता त्यांस आपली इच्छा दर्शवीत असे, तेव्हां त्यांस आनंद होई. रामचंद्रहि देवीरूप सीतेचा यथोचित सत्कार करण्यास व तिला सदा संतुष्ट ठेवण्यास किमपीहि आळस करीत नसत.

लक्ष्मणाहि मनानें व वाचेनें रामचंद्राचा अनन्य भक्त होता. तो लहानपणापासून रामचंद्रावर अत्यंत प्रीति करी. जेथें रामचंद्र जातील तेथें धनुष्यबाण घेऊन लक्ष्मण त्यांच्या पाठीशीं तयारच असे. रामचंद्रहि लक्ष्मणाला विचारिल्याशिवाय कांहीं करीत नसत. सीतेवर देखील लक्ष्मणाची भक्ति असे. तो तिला सुमित्रेप्रमाणें मानीत असे. सीतादेवी देखील धाकट्या बंधूप्रमाणें अथवा पुत्राप्रमाणें त्याच्यावर प्रेम करी.

कौसल्यादि सासवांची सीतादेवी मोठ्या श्रद्धेनें सेवा करीत असे. सर्व राण्या सीतेची सेवा व तिची श्रद्धा पाहून संतुष्ट होत. त्या या सर्वांना सीता आपल्या मुलीप्रमाणें वाटे. तात्पर्य, सीतादेवीनें सर्वांना आपल्या सद्गुणांनीं अगदीं मोहून टाकिलें होतें. याच कारणामुळें जेव्हां ती आपल्या मातापित्यांस सोडून सासरीं आली, तेव्हांपासून तिला एक क्षणभरहि त्यांचें वियोगदुःख वाटलें नाहीं. खरोखरीच सीतादेवी त्यांची ‘ गृहलक्ष्मी ’ होती. तिचें अलौकिक प्रेम व पावित्र्य यांनीं सर्व राजवाडा खुलून उठत होता. जेव्हां कधीं ती क्षणमात्र बाहेर जात असे, तेव्हां तें स्थल तिच्याशिवाय अंधकारमय असें भासत असे.

याप्रमाणें सीतादेवीला सासरीं राहून बारा वर्षें होऊन गेलीं. आतां तिच्यांत पूर्वींपेक्षां फार फरक पडला. आतां ती क्षणांत चंचल व क्षणांत गंभीर भाव धारण करीत नव्हती. नवयौवनावस्थेंतील तिच्या सौंदर्यांत आतां फार फरक पडला आहे. ती आतां तारुण्यांतील मध्यावस्थेंत येऊन पोंहचली आहे. पण तिच्या मुखावरील

सरलता व पवित्रता अद्यापि जशीच्या तशीच आहे. तींत लेशमात्र फरक नाहीं. आतां तिच्या सौंदर्यांत चंचलतेचा पूर्ण अभाव असून त्या जागीं गांभीर्याची छटा पसरली आहे. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारची तेजस्विता सांप्रत दिसत आहे. महात्मा रामचंद्रहि उत्तरोत्तर तिच्यावर अधिकाधिक श्रद्धा ठेवूं लागले. पतिपत्नी दोघें इतकीं प्रेमी व अनुरागी झालीं कीं त्यांचें हृदय एकच होऊन गेलें आहे. त्यांचीं शरिरें निराळीं असूनहि मन एक आहे. ज्याप्रमाणें रामचंद्र तिचें हृद्गत जाणत त्याचप्रमाणें तीहि त्यांचे मनोगत ओळखीत असे. याप्रमाणें त्यांचे दिवस सुखांत जात असतां, एकाएकीं त्यांच्या जीवननाटकांतील एका नवीन अंकाला प्रारंभ झाला. राजा दशरथाला जरी वृद्धावस्थेंत चार पुत्र झाले होते, तरी त्या चोघांनीं थोडक्याच कालांत आपल्या गुणांनीं प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली होती. ती ऐकून राजा दशरथ फार आनंदित होत. त्यांना संतानाभावाचें जें दुःख झालें होतें तें आतां पार नष्ट झालें. तो आपल्या पुत्रांस प्राणांपेक्षां अधिक समजत असे; व तेहि आपल्या पित्यावर मनःपूर्वक श्रद्धा ठेवीत. जरी चौघे बंधु गुणी, सज्जन, विद्वान् मातृपितृभक्त, धनुर्विद्याविशारद व महापराक्रमी होते, तरी तारांगणांत जसा :चंद्र शोभतो, :तसे रामचंद्र त्यांच्यामध्यें शोभत असत. ते प्रियदर्शन मिष्ठ तथापि सत्य भाषण करणारे होते. ते जसे शस्त्रास्त्रविद्येंत पारंगत होते, तसेच विनयी व क्षमाशीलहि होते. ते जसे एकीकडे प्रजेचें कल्याण करण्यांत मग्न असत, तसेच दुसरीकडे दुष्टांना शासन करून योग्य न्याय देण्यांतहि तत्पर असत. याप्रमाणें राजगुणानें विभूषित होऊन रामचंद्र सर्व प्रजाजनांचे व विशेषतः वृद्ध राजा दशरथाचें प्रीतीचें स्थान बनले. खरोखर प्रजाहि दशरथापेक्षां रामचंद्रावर अधिक प्रेम दर्शवीत असे. एकंदर सर्व प्रजावर्गाची रामचंद्रावरील श्रद्धा, प्रेम, व अनुराग पाहून राजा

दशरथाला जो कांहीं आनंद होई, तो अवर्णनीय होय. त्याच्या सुखाचा सुखाचा अनुभव तेच जाणत.

जेव्हां राजा दशरथ अत्यंत वृद्ध झाला, व त्याचें राज्यकारभारांतील बल कमी होत गेलें, तेव्हां लोकाभिराम रामचंद्रास युवराज करून आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचा त्यानें निश्चय केला. या उद्देशाप्रमाणें राजा दशरथानें विलंब न करतां आपले मंत्री यांस याबद्दल विचारिलें. त्यांचेंहि या गोष्टीला अनुकूल मत मिळालें. नंतर राजा दशरथानें आपले मांडलिक, सामंत, व अन्यान्य राष्ट्रीय प्रधानपुरुषांस निमंत्रण पाठवून आपल्या राजधानीस बोलाविलें. त्याप्रमाणें ते सर्व आल्यावर त्यानें त्यांचा यथोचित आदरसत्कार केला.

प्राचीन कालांत राजे महापराक्रमी व महाबली असूनहि जनरंजन करणें हाच आपला मुख्य धर्म समजत असत. राजाचें कर्तव्यहि हेंच आहे. जो राजा आपलें हें कर्तव्य नीट रीतीनें करीत नाहीं, तो कर्तव्यभ्रष्ट होतो. यामुळें प्राचीन राजे फार कष्ट सोसून प्रजाकार्यापासून विन्मुख होत नसत; व याचमुळें न्यायप्रियराजांचें नांव जितक्या प्रेमानें तेव्हां घेतलें जात होतें तितक्याच आदरानें तें आजपर्यंतहि घेतलें जात आहे. जोंपर्यंत जगांत चंद्रसूर्य विद्यमान राहतील, व या भूमीवर एकही आर्य जिवंत राहील, तोंपर्यंत या पुण्यशील राजांची कीर्ति अचल राहील. जुना इतिहास पाहतां असें दिसून येतें कीं, त्या कालीं प्रजा देखील राजांस देवाप्रमाणें समजून त्यांची भक्ति करीत. ते स्वेच्छाचारी नव्हते, व मंत्र्यांच्या सल्ल्यावांचून कोणचीहि गोष्ट करीत नसत. हट्ट व दुराग्रहाचें तर नांवच नव्हतें. राज्यकारभारांत मंत्रीच केवळ नसून राज्यांतील प्रमुख प्रमुख पुरुषांचाहि सल्ला घेतला जात असे. प्रजेच्याविरुद्ध काम करण्यास ते भीत असत. ज्या ईश्वरानें लक्षावधि लो-

कांचा त्यांस अधिपति केलें आहे त्यानें जर त्यांचें इच्छित पूर्ण करून त्यांस संतुष्ट केलें नाहीं तर तो राजा कशाचा! राजाचें अस्तित्व प्रजेकरितांच आहे. प्रजेच्या सुखाकरितां राजाला जीवापाड कष्ट केले पाहिजेत.

त्या कालीं सत्याला मोठा मान असे. जे लोक राजसभेंत बसून आपलें मत देत असत, ते आपली स्वतंत्रता कधींहि गमावून बसत नसत. फाजील खुशामत करण्याची त्यांना मुळींच संवय नव्हती. ते आपलें मत स्वतंत्रपणें व न भितां प्रदर्शित करीत; व राजेहि तें मोठ्या श्रद्धेनें ऐकून घेऊन मान्य करीत असत. ते राजाच्या भीतीनें त्याच्या अन्यायी कार्याला मत देत नसत. राजा दशरथानें बोलाविलेले सर्व लोक असेच कार्यतत्पर, निर्भय मनाचे व न्यायप्रिय होते.

जेव्हां मंत्रीजन राजसभेंत येऊन आपापल्या पदावर विराजमान झाले, तेव्हां राजा दशरथ त्या सर्वांना उद्देशून म्हणाला—'प्रियसज्जनहो' मी आतां वृद्ध झालों. फार मेहनत करून मी हा राज्यशकट आजपावेतों चालविला. माझ्या वृद्धावस्थेमुळें प्रजापालन करण्यास मी आतां असमर्थ झालों आहे. या कारणांमुळें सर्व राज्यकारभार माझा ज्येष्ठ पुत्र रामचंद्र याजवर सोंपवून निश्चितपणानें ईश्वरभजनांत काळ घालवावा असें मीं योजिलें आहे. कारण हें शरीर नाशवंत आहे. कोण जाणे हें केव्हां नष्ट होऊन जाईल तें! एवढ्याचकरितां सर्व कारभार सोडून ब्रह्मज्ञानांत मग्न होऊन रहाणें हेंच मला उचित आहे. आपल्या शास्त्रांतहि हेंच सांगितलें आहे कीं, मुलगे मोठे झाल्यावर त्यांच्यावर सर्व गृहस्थाश्रमाचा भार सोंपवून आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. पित्याचें हेंच मुख्य कर्तव्य आहे. तेव्हां याबद्दल आपली सर्वांची काय संमति आहे हें मला सांगा. माझा रामचंद्र याला योग्य आहे किंवा नाहीं! अथवा

यापेक्षां अधिक दुसरा कोणी योग्य आपणांस वाटत असेल तर तसेंहि सांगा.

दशरथाच्या तोंडून रामचंद्राच्या राज्याभिषेकाचें वर्तमान ऐकून सर्व लोकांनीं आपला आनंद प्रदर्शित केला. सर्वजण लगेच ह्मणाले ' रामचंद्रावर सर्व राज्याचा अधिकार सोंपवावा.' नंतर रामचंद्रालाच राज्याचा अधिकार कां द्यावा याचीं त्यांनीं कारणें सांगितलीं. मंत्री लोकांची व सर्व लोकांची संमति मिळाल्यावर दशरथानें रामचंद्राला राज्यावर बसविण्याचें शुभ वर्तमान जाहीर केलें. हें वर्तमान ऐकून सर्व नगरवासी लोक आनंदित होऊन गेले. लगेच सर्व नगरांत आनंदोत्सव सुरू झाले. नागरिकांनीं घरोघर स्वच्छता करून दरवाजावर तोरणें लाविलीं, व चहूंकडे चंदनाचे सडे घातले. राज्याभिषेकाचें वर्तमान ऐकून त्यांनीं दानधर्महि केले. राजमहालांतील वर्तमान तर पुसूंच नये. तेथें जणूं काय आनंदसागरावर लाटा उसळूं लागल्या होत्या. मंत्रीजन दशरथाच्या आज्ञेप्रमाणें राज्याभिषेकाची तयारी मोठ्या जारीनें करूं लागले. राजगुरु वसिष्ठांनीं राज्याभिषेकाच्या प्रारंभीं करावयाचे नियम व व्रतें रामचंद्राकडून करविलीं. सीताहि वसिष्ठाच्या आज्ञेप्रमाणें ईश्वरोपासना करूं लागली. याप्रमाणें उभयतां सीता–रामचंद्रांनीं वसिष्ठांनीं सांगितलेलीं सर्व व्रतें आचरिलीं.

राजमहिषी होण्याच्या मंगल वार्तेनें सीतेला आनंद झाला काय? मुळींच झाला नाहीं. सीता साधारण स्त्री नव्हती. तिला मान व पदवी यांची हांव नव्हती. सीतेच्या स्वभावांत मान व महत्त्वाकांक्षा यांचा लवलेशहि नव्हता. याकरितां ती आपल्या स्वतःची चिंता मुळींच करीत नसे. पतीचें सुख व आनंद सोडून इतर कोणत्याही गोष्टीची तिला काळजी वाटत नव्हती. पतीच्या आनंदांत तिला आनंद वाटत असे, व त्याच्या दुःखामुळें ती दुःखित होई. सीतेनें

अहंकार व ममता यांजवर विजय मिळविला होता. ती केवळ पती-करितांच जीवन धारण करीत असे. स्वामीचा प्राण तोच आपला प्राण अशी तिची भावना होती. तिनें आपली स्वतंत्रता रामचंद्राच्या स्वतंत्रतेंत मिळवून दिल्यामुळेंच त्या दोघांत भेद नाहीं असें म्हणतात. तीं दोघें एकच होतीं. याच कारणामुळें रामचंद्राला सुख प्राप्त झालें ह्मणजे सीतेलाही सुख प्राप्त होई. आज राजमहिषी होण्याचें ऐकून तिला यत्किंचित्‌ही आनंद झाला नाहीं, व उद्यां जर कांहीं संकट उपस्थित होऊन राज्य सोडण्याची वेळ आली तर तिला त्याबद्दल कष्ट वाटतील का ! केव्हांच वाटणार नाहींत. तेव्हां तिला जो आनंद होणार तो महाराणी होण्याच्या भावाचा नसून आपल्या परमेश्वरास राज्य प्राप्त होणार म्हणून झाला होता. सीतेच्या पवित्र चरित्रांत हाच विषेश आहे. तिच्या चरित्रांतल्या या गूढाचा उलगडा झाल्यावर तिचें सच्चरित्र समजण्यास मग फारसें जड जाणार नाहीं.

जेव्हां ती रात्र संपून दिवस उगवला, तेव्हां सर्व लोक आज रामचंद्राला राज्याभिषेक होणार म्हणून आनंदित झाले. सीता-रामचंद्र हीं दोघेंही रात्रभर ईशप्रार्थना करून प्रातःकालीं त्या राज्याभिषेकाच्या शुभ घटकेची वाट पहात बसलीं.

ईश्वराची लीला किती विचित्र आहे ! एका क्षणांत इकडील सृष्टि तिकडे होऊन जाते. एका क्षणानंतर दुसऱ्या क्षणीं काय होणार आहे, हें कोणीहि सांगू शकत नाहीं. आज जो लक्षाधीश आहे, त्यावर उद्यां दारोदार भटकण्याची पाळी येते; व जो काल मूठभर धान्याकरितां व अंगभर वस्त्राकरितां दारोदार भटकत असूनहि तीं त्यास प्राप्त होत नव्हतीं, तो आज राजविलासी थाटानें रहात आहे. या जगांत कशांतच स्थिरता नाहीं. सर्व संसार अस्थिरतेनें

भरलेला आहे. अशा स्थितींत कोणीहि आपल्या रूपाचा, धनाचा, कुटुंबाचा, व शक्तीचा अभिमान धरतां कामा नये !

ईश्वराची घटना मोठी विचित्र आहे. ईश्वरानें दुष्ट मनुष्यांनाहि कां उत्पन्न केलें हें कशावरून समजावें ! जेव्हां नीच प्रकृतीच्या मनुष्याची आठवण होते, तेव्हां आपणांस मोठा अचंबा वाटतो. दुष्ट मनुष्याच्या हातून होणार नाहीं, असें जगांत कोणतेंच कार्य नाहीं. दुष्टाचा स्वभावच दुष्टपणानें भरलेला असतो. त्याच्या रोमरोमांत तो भिनून गेलेला असतो. भलेपणाचें तर नांव सुद्धां या लोकांना माहीत नसतें. या त्यांच्या स्वभावामुळें त्यांच्याशीं जरी कोणी उत्तम रीतीनें वागलें तरी ते त्याचा मोबदला आपल्या दुष्ट वागणुकीनेंच देतील. ते फक्त दोषच पहात असतात. जर कोणी एखादा सभ्य मनुष्य अशा माणसास सदुपदेश करील किंवा चांगली वस्तु देईल, तर ती गोष्ट त्यांस मुळींच रुचणार नाहीं. ते त्याच्या भलेपणास दूर लोटून सदा असत्याचाच अंगिकार करतात. वाईट मनुष्यें पावित्र्य व सदाचरण यांच्या नेहमीं विरुद्ध असतात. तीं कोणासही सुखी पहात नाहींत. दुसऱ्याचें सुख पाहून त्यांच्या मनांत द्वेष उत्पन्न होतो. जर केव्हां कोणा मनुष्यांत त्यांनीं निष्कलंकता, साधुता, व पावित्र्य पाहिलें, तर ते आपल्या खोट्या कल्पनांनीं त्यांना कलंकित करण्याचा प्रयत्न करतात. असभ्यता व पापाची वृद्धि होत असलेली पाहून त्यांना जितका आनंद होतो, तितका इतर कशापासूनहि होत नाहीं. त्यांचें चांगलें करा किंवा न करा, त्यांचें आपलें अहितचिंतन चालावयाचेंच ! ते इतके आपमतलबी होतात कीं, ते दुसऱ्याच्या सुख–दुःखाची मुळींच पर्वा करीत नाहींत. तात्पर्य असे दुष्ट लोक समाजांत कलंकरूप होत, व याचमुळें समाजांत असमाधान व अकल्याण हीं पसरत आहेत.

मंथरा अशाच नीच स्वभावाची होती. ती स्त्री होती. शिवाय

ती वृद्ध असून जरा कुबडी व दिसण्यांत अत्यंत कुरूप होती. वाल्मिकींनीं व तुलसीदासजींनीं आपल्या काव्यांत कुबजा, मंथरेच्या दूषित प्रकृतीचें विस्तृत विवेचन केलें आहे. त्या कविवर्यांनीं तिच्या दुर्भावाचें व दुष्ट मनाच्या प्रवृत्तीचें फारच सुरेख वर्णन केलें आहे. ती कैकयीची दासी होती. ती कैकयीच्या माहेरूनच आली होती. यामुळें ती कैकयीच्या हिताकरितां फारच जपत असे. ती ' दशरथाला आपल्या मुठींत ठेव ' असाच तिला नेहमीं उपदेश करीत असे. जरी कैकयी राजकन्या व राजमहिषी होती तरी तिचें हृदय थोर नव्हतें. कैकयी उत्तम स्वभावाची नव्हती तरी साधारण स्त्रियापेक्षां तिच्यांत कमीपणा नव्हता. तिचें हृदय जितकें उदार असावयास पाहिजे होतें, तितकें नव्हतें. जरी ती नीचपणाचा तिरस्कार करीत असे, तरी तिच्या स्वभावांत दृढनिश्चयीपणा मुळींच नव्हता. ती स्वतःच्या बुद्धीनें कोणचेंहि काम करीत नसे. यामुळें तिला प्रत्येक कामांत मंथरेचें सहाय्य घ्यावें लागे. तिच्या संमतीशिवाय तिच्या हातून कांहींच होत नसे. मंथरा चतूर असून कुटिलनीति पारंगत होती. ती कुटिलनीतीच्या द्वारें कैकयीचें काम उत्तम रीतीनें साधून देत असे. तिची बुद्धि फार तीक्ष्ण होती. ती कैकयीस कोणच्याच गोष्टींत अडचण पडूं देत नव्हती. मंथरा तिला इतकें शिकवून ठेवीत असे कीं, ती वृद्ध राजास आपल्याच ताब्यांत ठेवण्याचा यत्न करी. राजा दशरथाला तीन राण्या होत्या. तथापि मंथरेच्या शिकवणीनें तो कैकयीलाच अधिक समजे. जरी त्याचें प्रेम कौसल्येवरहि कमी नव्हतें, तरी कैकयीवर त्याची अत्यंत प्रीति होती.

ज्या वेळेस राजा दशरथानें पुत्रकामेष्ठी यज्ञ केला होता, आणि त्यानंतर त्याच्या तिन्ही राण्या गर्भवती झाल्या होत्या, त्या वेळेस मंथरेच्या मनांत एक भयंकर चिंता उत्पन्न झाली होती. ती ही कीं, जर कैकयीस प्रथम मुलगा न होतां तो दुसऱ्या कोणा राणीस झाला

तर कैकयी राजमाता होणें अशक्य होणार! कारण धर्मशास्त्रानुसार ज्येष्ठ पुत्राला गादीचा अधिकार मिळणार. पण मंथरा ज्या दत्ताला भीत होती, तेंच दैव दत्त म्हणून पुढें उभें राहिलें. कारण कैकयीचा मुलगा भरत हा दुसराच होता. चौघां बंधूंत कौसल्यानंदन रामच वडील होते; आणि याचमुळें त्यांचाच गादीवर अधिकार होता. पण कैकयीस या गोष्टीची मुळींच काळजी वाटत नसे. देवानें आपणास सुशिक्षित मुलगा दिल्याबद्दल त्याचे ती मनापासून आभार मानीत असे. ती मंथरेप्रमाणें स्वार्थी व अदूरदर्शी नव्हती. ती इतर राजकुमारांवरहि भरताप्रमाणेंच प्रेम करी. रामचंद्राची सुशीलता, सत्यता, व बंधुभावामुळें ती सर्वांपेक्षां त्याच्यावर फारच प्रेम करी. रामचंद्र सर्व प्रिय होते; मग कैकयीलाच ते प्रिय असले तर त्यांत नवल काय! या वेळपर्यंत कैकयीच्या मनांत रामचंद्राविषयीं दुष्ट भावना मुळींच नव्हती. कैकयीच्या उर्मट दासीनें आपल्या विषारी कुटिल नीतीनें अजूनपर्यंत तिचें मन बदलून टाकलें नव्हतें. मंथरा फार बुद्धिवान. ती योग्य कालाची मार्गप्रतिक्षा करीत होती; आणि तिच्या सुदैवानें तो लवकरच आला.

आम्ही मागें सांगितलेंच आहे कीं, रामचंद्राच्या राज्याभिषेकाचें शुभ वर्तमान सर्व अयोध्येंत पसरल्यामुळें सर्व नगर त्या आनंदसागरांत बुडून गेलें. जेव्हां हें आनंददायक वर्तमान मंथरेनें ऐकिलें, तेव्हां मौज पहाण्यास ती गच्चीवर सहज गेली, तोंच नगरांतील सर्व गृहें तोरणें, पताकांनीं विभूषित केलेलीं, रस्त्यांवर चंदनाचे सडे घातलेले, व पुष्पांच्या माळांनीं मंडित केलेले असें तिच्या दृष्टीस पडलें. रात्रीं दीपोत्सव होणार म्हणून झाडासारखे खांब रोविले होते. यज्ञशाळा स्वच्छ करून ठेवलया होत्या. मंथरेस त्या वेळीं जिकडे तिकडे आनंदाशिवाय दुसरें कांहींच दिसलें नाहीं. अयोध्यावासी लोक सुंदर वस्त्रालंकारांनीं मंडित होऊन आनंदांत मग्न असलेले तिला

आढळले. या महोत्सवाचें कारण समजावें म्हणून तिनें आपल्या शेजारींच उभ्या असलेल्या दासीला विचारिलें, कीं, ‘ अग, या महोत्सवाचें कारण काय? नगरांत हें काय चाललें आहे. ’

मंथरेनें विचारिल्यावर दासीनें इत्थंभूत हकीकत व कारण तिला सांगितलें. रामचंद्राच्या युवराजपदारोहणाच्या बातमीनें तिच्या आशेची पूर्ण निराशा झाली. तिनें लगेच मनांत विचार केला कीं, काय, खरोखरच कौसल्यानंदन रामचंद्र गादीवर बसणार! आजच कैकयीचा सौभाग्यसूर्य अस्तास गेला काय? भरताला नेहमीं कर-तांच परतंत्रता भोगावी लागणार काय! या दुष्ट विचारांनीं कुब-डीच्या कलुषित हृदयांत अगदीं खळबळ उडवून दिली. तिच्या डोक्यांत मोठ्या विचारांचें कंदन माजून गेलें. तिला आतां खात्रीनें वाटलें कीं या मातापुत्राचें पुढील आयुष्य अंधकारमय झालें. राज्य स्वाधीन केल्यावर मग त्यांस कोण पदच्युत करणार! तर मग भरताच्या उद्धाराचा कांहींच मार्ग दिसत नाहीं काय! ’ असें मनाशीं म्हणून तिनें थोडासा विचार केला! असा कांहीं वेळ विचार केल्यावर तिची कुटिल दृष्टि विस्तृत झाली. तिच्या तोंडावर आनं-दाची झाक दिसूं लागली. निराशेचें स्थान आशेनें पटकाविलें. जरासा विचार केल्यावर मंथरा मंदिरांत निघून गेली.

कैकयीच्या महालांत गेल्यावर मंथरा तिला म्हणाली ‘ महाराज, आपण तर नेहमीं आपल्या सुखांत दंग असता, आपल्या घरांत काय होत आहे, याचा आपणास मुळींच पत्ता नसतो. आपणास नेहमीं असें वाटतें कीं आपणच काय ती राजाची आवडती राणी! आणि ह्याचा आपणास अभिमानहि वाटतो! पण तो सर्व पार विसरून जा. महाराज, तें आपलें सुखस्वप्न धुळीस मिळालें, धुळीस! मंथरेनें असें म्हटल्यावर, याचा अंतस्थ हेतु काय असें कैकयीनें तिला विचारिलें. तेव्हां तिनें तिला सर्व हकीकत सांगितली.



कैकेयी बुद्धिभेद.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

मंथरेच्या तोंडून रामाच्या राज्यारोहणाचें वृत्त ऐकून कैकयीचें मुख आनंदोत्फुल्ल झालें. असा आल्हादजनक वृत्तांत सांगितल्याबद्दल तिनें आपल्या गळयांतील मौक्तिक हार काढून तो मंथरेस पारितोषिक म्हणून देण्यास पुढें केला, तोंच मंथरेचें तोंड रागानें लालबुंद होऊन गेलें. तिनें तो हार घेऊन दूर फेंकून दिला, व तिच्या मंद-बुद्धिची मनसोक्त निंदा केली. तिनें त्या वेळीं कैकयी राणीवर खूप तोंडसुख घेतलें. राणीची समजूत करून देण्याच्या उद्देशानें ती तिला म्हणाली—'पहा राम राजा झाला, तर तुला फायदा तर कांहीं नाहींच, पण उलट तुझें फारच नुकसान होईल. असें झाल्यानें रामाच्या आधीन राहून भरताला आपलें सर्व आयुष्य कंठावें लागेल. एवढेंच नव्हे तर आपणासहि प्रत्येक कामांत सीतेच्या व कौस-ल्येच्या तोंडाकडे पहावें लागेल, याचकितां तर आपणास आपलें व आपल्या पुत्राचें हित पहावयाचें असेल व सुखानें आयुष्य कंठावयाचें असेल तर लवकरच आपण कांहीं उपाय शोधा. जेणें करून रामाला राज्य मिळतां तें भरतास मिळेल. हेंच तुम्हाला मनःपूर्वक सांगतें. याला कांहीं तरी उद्योग करावा लागेल.

रामचंद्रावरील प्रेमामुळें प्रथम तर कैकयीनें मंथरेचें ऐकिलें न ऐकिलेंसेंच केलें; व तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण शेवटीं मंथरेचाच हेतु तडीस गेला. तिचाच त्या कामांत विजय झाला. कूटनीति जाणणाऱ्या मंथरेपुढें कैकयीचें काय चालणार! ती मंथरेच्या कपटमोहजालांत तेव्हांच फसली. तिच्या त्या मोहजा-लांत सांपडल्यावर तिची साधुता तर कोणीकडच्या कोणीकडे पार नाहींशी झाली. लगेच, ' मी याबद्दल नेटानें प्रयत्न करीन ' अशी कैकयीनें प्रतिज्ञा केली. पहा, मंथरेच्या शिकवणीनें तिच्या बुद्धींत कसा फरक पडला तो! थोड्याच वेळांत ती सुवर्णी काळया नागि-णीप्रमाणें विषारी नागीण बनली. कैकयी मंथरेला म्हणाली—" मंथरे,

तूंच माझी हितेच्छु आहेस. तूंच मला या आपत्तीच्या निवारणाचा विचार सांग. मी खरेंच सांगतें कीं, जर महाराज भरताला राज्य न देतां रामास देतील, तर मी खास प्राणत्याग करीन " कैकयी आपणास अनुकूल आहे असें पाहून मंथरा मनांतल्या मनांत खुशालून गेली. ती म्हणाली. ' याचा तर उपाय माझ्या हातांत आहे. जेव्हां महाराज दशरथ युद्धास गेले होते, तेव्हां ते त्या वेळीं घायाळ झाले असतां, आपण त्यांची उत्तम सुश्रुषा केली. त्या आपल्या सेवेनें संतुष्ट होऊन ते त्या वेळेस आपणास ' दोन वर माग ' असें म्हणाले होते. पण तेव्हां आपण एकही वर मागितला नाहीं. ' वेळ पाहून मागेन' एवढेंच आपण म्हणालां होतात. काय, आपण हें विसरलांत ! ते वर मागण्याची हीच वेळ आहे. एका वरानें रामचंद्राला चौदा वर्षें वनवास, व दुसऱ्या वरानें भरताला राजसिंहासन; हीं मागा. रामचंद्र लोकप्रिय आहे, व त्याच्यावर सर्व लोक प्रीति करतात, हें खरें आहे, तरी भरत गादीवर बसला म्हणजे तो चौदा वर्षांच्या अवधींत आपल्या बुद्धिमत्तेनें सर्व प्रजेस अनुकूल करून घेईल यांत तिळमात्र संशय नाहीं. याकरितां आतां तूं मलिनवेष धारण करून क्रोधागारांत जाऊन पडून रहा, आणि जितका चेहरा तुला शोकपूर्ण करतां येईल, तितका कर. अशा स्थितींत राजा दशरथ तुला पहाण्यास खास येईल. त्या वेळीं तुझें धैर्य दिसेल. तूं आपला हट्ट निश्चयानें तडीस ने. राजाला सत्यांत गुंतवून तूं आपले ते मागील वर या वेळीं मागून घे; आणि ते मिळेपर्यंत जमिनीवरून उठूंच नकोस. राजा सत्यवादी असल्यामुळें तो आपली प्रतिज्ञा केव्हांही भंग होऊं देणार नाहीं. ज्या योगानें तुझें काम सफल होईल असा हा एकच उपाय आहे.'

मंथरेच्या या भाषणानें कैकयीस फार हर्ष झाला. ती प्रसन्न होऊन तिची फार प्रशंसा करूं लागली. तिनें मोठ्या प्रेमानें, नंतर

मंथरेला गाढ आलिंगन दिलें, व तिला बहुमूल्य वस्त्रालंकार देऊन आपली कृतज्ञता प्रकट केली.

राजा दशरथानें रामचंद्राच्या राज्यारोहणाची हकीकत जाहीर करून, हें शुभ वर्तमान प्रथम कैकयीस जाऊन कळवावें, म्हणून ते तिच्याच महालाकडे वळले. तेथें जाऊन पहातात तों ती महालांत नाहीं. असें पहातांच ते आश्चर्यचकित होऊन गेले. एका दासीच्या मुखानें त्यांनीं ऐकिलें कीं, ती फार रागावली असून क्रोधागारांत जाऊन निजली आहे. हें ऐकून त्यांच्या पोटांत धस्स झालें. त्यांनीं तेथें जाऊन पाहिलें तों राणी मलीन वस्त्र परिधान करून जमिनीवर निजली आहे. दागिने वगैरे काढून फेंकून दिले आहेत, व ती एकसारखी रडत आहे. प्रियकर राणीची ही दशा पाहून राजा दशरथाचें हृदय दयेनें भरून आलें. त्यानें मोठ्या शांतपणानें तिच्या रागाचें कारण विचारिलें. राजा दशरथ वारंवार तिला रागाचें कारण विचारीत असतांहि कैकयीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ती हळूं हळूं मात्र स्फुंदत होती. पुष्कळ वेळां विचारूनहि जेव्हां राणीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं, तेव्हां त्याचें हृदय भयानें कापूं लागलें. ते तिला ह्मणाले, ‘ काय, तुला कांहीं झालें तर नाहीं. तुझा कोणी अपमान तर केला नाहीं; अथवा तुझ्या कामांत कोणी अडथळा तर केला नाहीं. ’ ह्याप्रमाणें अत्यंत व्याकूळ होऊन, राजा तिला वारंवार विचारूं लागला. कांहीं वेळानें कैकयी अश्रु पुसून सद्गदीत होऊन म्हणाली, ‘ महाराज , मला कोणताही रोग झाला नाहीं, किंवा माझा कोणी अपमानही केला नाहीं. अथवा माझ्या कामांत कोणी अडथळाहि केला नाहीं. माझी आपल्याला एक प्रार्थना आहे. जर ती पुरी करण्याचें आपण वचन द्याल तरच सांगेन, आणि तरच माझा शोक दूर होईल. असें जर न होईल तर मी येथल्या येथें प्राण देईन हें पूर्णपणें लक्षांत ठेवा. इतकें ऐकून राजा हांसून म्हणाला

' तूं जें सांगशील तें मी प्रतिज्ञेनें पूर्ण करीन, हें शपथेवर सांगतों !' जेव्हां राजानें तिला शपथपूर्वक सांगितलें तेव्हां राजा सत्याच्या जाळ्यांत पुरा सांपडला, अशी कैकयी राणीची खात्री झाली. आतां आपला स्वार्थ साधून घेण्याची हीच चांगली वेळ आहे, असें जाणून ती म्हणाली-' महाराज, जेव्हां शंभर दैत्यांबरोबर आपण लढाईला गेलां होतां, तेव्हां मीहि आपल्याबरोबर होतें. आपण जेव्हां त्या लढाईंत जखमी झालां होतां, तेव्हां मी आपली पराकाष्ठेची सेवा केली होती. त्यामुळें आपण संतुष्ट होऊन मला दोन वर दिले; परंतु मी ते त्या वेळेस मागितले नाहींत. ही गोष्ट आपणांस आठवत असेलच. मी ते वर आतां आपणापासून मागून घेतें. ते माझे वर आपण आतां ऐका. पहिल्या वरानें उद्यां प्रातःकालीं श्रीरामाला चौदा वर्षें वनवासाला पाठवून द्या, व दुसऱ्या वरानें रामचंद्राच्या ऐवजीं भरताला राज्याभिषेक करा. आपण आजपर्यंत आपल्या प्रतिज्ञा खऱ्या करीत आलां आहांत. तेव्हां या वरांची पूर्तता करून हीहि प्रतिज्ञा खरी करा. हीच माझी प्रार्थना आहे.

हृदय हालवून सोडणारी ही कैकयीची वाणी ऐकून राजा दशरथ छिन्नतरुप्रमाणें धाडकन् जमिनीवर मूर्च्छा येऊन पडला. त्याचें तोंड सुकून गेलें, कंठ रुद्ध झाला, व नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. आपण जागृतावस्थेंत आहोंत, किंवा स्वप्नावस्थेंत आहोंत याचें त्यांस अचेतन झाल्यामुळें बराच वेळ भान नव्हतें. कांहीं वेळानें त्याची मूर्च्छा गेली. नंतर त्यानें एक दीर्घ सुस्कारा टाकून तिला म्हटलें-'हा दुष्टे पापिणी, रामचंद्रानें असा तुझा काय अपराध केला आहे ! तो तर तुला आपल्या मातेहूनहि अधिक समजतो. ज्या जिव्हेनें रामाला वनवासाला पाठवा अशी वाणी उच्चारिलीस, त्या तुझ्या जिव्हेचे तुकडे तुकडे कां नाहीं झाले ! रामचंद्रावांचून मी एक क्षणभर देखील जगणार नाहीं, हें तुला माहित

नाहीं काय ! हे कैकयी, राग शांत कर व कृपा करून दुसरा वर माग '!

स्त्रिया स्वभावतः दयाळु असतात. त्यांचें हृदय कोमल असतें, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या हृदयांत उच्च कल्पनांची कमतरता नसते. जेव्हां त्यांच्या मनांत धर्मकल्पना येतात, तेव्हां त्या पतिव्रतेची मूर्तिच दिसतात. त्यांच्या चारित्र्याचें मुख्य अंग निःस्वार्थता हेंच आहे. त्याचप्रमाणें जेव्हां त्यांच्या मनांत दुष्ट वासना, अधार्मिक कल्पना उत्पन्न होतात, आणि त्यांची वाईट मार्गाकडे प्रवृत्ति होते, तेव्हां संसारांत असें एकहि कृत्य नाहीं, कीं, जें त्यांच्या हातून होऊं शकणार नाहीं. त्या आपल्या कुकल्पनांनीं सर्व जगांत अस्वस्थता व अनर्थ पसरून देतात. त्यांच्या हातून होणार नाहीं, असें एकही दुष्ट कृत्य नाहीं. त्या वेळीं त्यांच्या हृदयांत कोमलतेच्या जागीं कठोरता, दयेच्या स्थानीं निर्दयता, व निःस्वार्थाच्या ठिकाणीं स्वार्थपरायणता उत्पन्न होते.अगदीं हीच स्थिति यावेळीं कैकयीची झाली होती. ज्या वेळीं तिच्या हृदयांत अपवित्र कल्पनांची वृद्धि झाली, जेव्हां तिचें मन मंथरेनें कलुषित केलें, तेव्हां तिच्या मनांत राक्षसी स्वार्थपरतेनें आपलें ठाणें दिलें होतें. त्या वेळेस ती स्वार्थानें इतकी अंध व मंदबुद्धि झाली होती कीं, राजाच्या दरडावणीचा तिच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. तिनें राजाचें मुळींच ऐकिलें नाहीं, व त्याची दीनदशा पाहून तिच्या मनाला किंचित्‌ही द्रव आला नाहीं. उलट ती राजाचाच उपहास करूं लागली, व त्याचें शोकपीडित हृदय वाग्बाणांनीं विंधुं लागली. त्या वेळेस राजाची बुद्धि भ्रष्ट झाली होती, व तो विमूढ झाला होता. बालकाप्रमाणें रडत रडत तो कैकयीच्या चरणावर मस्तक ठेवी, केव्हां शोकानें मूर्च्छित होई, व केव्हां केव्हां तो मुक्त कंठानें रूदनहि करी; पण कैकयीचें कठीण हृदय द्रवलें नाहीं. या प्रकारांत ती सर्व रात्र निघून गेली.

दिवस उगवतांच रामराज्याभिषेकाची जिकडे तिकडे तयारी

होऊं लागली. सर्व सिद्ध, महर्षि सभेंत येऊं लागले. परंतु दिवस उगवल्यावर जेव्हां फार वेळ होऊन गेला, राजा आला नाहीं, तेव्हां आणखी थोडा वेळ वाट पाहून नंतर सर्व लोकांनीं त्याला बोलावून आणण्याकरितां सुमंतास राणीवशांत पाठविलें. सुमंत लागलाच राजाच्या शयनागारांत त्याच्या पलंगाशेजारीं जाऊन उभा राहिला. त्यानें श्रीरामचंद्राला राज्याभिषेक करण्यास चलण्याबद्दल राजाला मोठ्या प्रेमानें व नम्रपणानें विनंति केली. सुमंताच्या भाषणानें त्यास अत्यंत दुःख झालें. राजा दशरथ सुमंतास म्हणाला–'सुमंत तुझें हें भाषण ऐकून माझ्या मनाला तर फार दुःख होत आहे, राजा दशरथाच्या तोंडचें हें भाषण ऐकून सुमंत आश्चर्यचकित होऊन गेला. तो किंचित् मागें सरला. त्यानें मनांत विचार केला कीं, हा रंगांत भंग झाला ? आज राजाच्या तोंडून असे दुःखदायक शब्द कसे निघतात ! सुमंत असा विचारांत गढून गेला असतां, कैकयी त्याला म्हणाली—' सुमंत्रा ' रामराज्याभिषेकाच्या विचारानें महाराजांस फार जाग्रण झालें आहे. ते त्यामुळें थकले आहेत. याकरितां तूं रामचंद्रासच येथें घेऊन ये. त्याला पहाण्याची त्यांची इच्छा आहे, हें ऐकून सुमंत्र राजाज्ञेची वाट पाहूं लागला. राजाचीहि हीच इच्छा दिसतांच तो रामाला आणण्याकरितां निघून गेला.

राज्यारोहणाच्या आधीं एक दिवस सीतारामचंद्रांनीं रात्रभर ईश्वराची पूजा, प्रार्थना वगैरे केली; व दिवसा राज्याभिषेक होणार तेव्हां तशा तयारीनें तीं दोघें आपलीं नित्यकामें आटोपून त्या वेळेची वाट पहात बसलीं होतीं, हें मागें आम्हीं सांगितलेंच आहे. इतक्यांत राजा दशरथानें धाडलेल्या सुमंत्रानें येऊन त्यांस नमस्कार केला; व ' महाराजांनीं आपणांस बोलाविलें आहे, ' असें सांगितलें. राज्याभिषेकाचेंच हें निमंत्रण आहे, असेंच त्यांना वाटलें. रामचंद्र अनन्य पितृभक्त होते. ते लागलेच पित्राज्ञेप्रमाणें सुमंत्राबरोबर

राजाकडे जाण्यास निघाले. अंतःपुरांत पोहचल्यावर राजा व कैकयी दुःखसागरांत मग्न झाले आहेत हें पाहून रामचंद्र आपल्या ठिकाणीं फार विस्मित झाले. राजाचें मुख निस्तेज झालें होतें, व त्याच्या नेत्रांतून अश्रुहि गळत होते. रामचंद्रानें पुढें होऊन लागलेंच राजाच्या पायांवर मस्तक ठेविलें. रामचंद्राला नमस्कार करतांना पाहून राजा दशरथ ' हा रामा, ' इतकेंच म्हणाला. पितृभक्त रामाला पित्याची ही अवस्था पाहून अत्यंत खेद व विस्मय वाटला. त्यानें मातेला प्रणाम करून तिला विचारिलें—'आई, मला पाहून महाराजांना दुःख कां होत आहे! नेहमींप्रमाणें ते माझ्याशीं प्रेमानें कां बोलत नाहींत; व माझ्या पाठीवरून हातही ते कांग फिरवीत नाहींत! ते आज इतके कष्टी कां आहेत! कां, त्यांची प्रकृति नीट नाहीं. किंवा माझ्या हातून त्यांचा कांहीं अपराध तर घडला नाहीं ना! जर यांपैकीं एखादें कारण तुला कळलें असेल, तर कृपा करून तें लवकर सांग. मला हें पित्याचें दुःख पहावत नाहीं. पित्याची ही अवस्था पाहून माझें चित्त व्याकूळ होत आहे, व हृदयहि व्यथित होत आहे.

हें रामचंद्राचें विनीत भाषण ऐकून कठीण हृदयाच्या व कलुषित मनाच्या कैकयीवर त्याचाहि कांहीं परिणाम झाला नाहीं. ती दुष्ट निर्लज्जपणानें म्हणाली—' रामचंद्रा ' तुझ्या पित्याचें शरीर निरोगी आहे, व तूं ही त्याचा कांहीं अपराध केला नाहींस. यांना हें इतकें दुःख होण्याचें कारण कांहीं वेगळेंच आहे! त्यांनीं आपल्या मनांत कांहीं गोष्टींचा विचार केला होता, पण त्याचा तुझ्यापुढें उल्लेख करण्यास त्यांस संकोच वाटतो. ते तुझ्यावर प्राणापलीकडे प्रेम करतात, व तुझें अप्रिय असें कोणचेंहि करूं इच्छित नाहींत; याकरितां हे स्वस्थ बसले आहेत. यांनीं कांहीं प्रतिज्ञा केली होती. तुला जर तिचें पालन करावयाचें असेल तर दृढ प्रतिज्ञा कर म्हणजे मी तुला सर्व हकीकत सांगतें. '

रामचंद्र धार्मिक शिरोमणी होते. पित्राज्ञापालन हें आपलें कर्तव्य आहे, असें ते समजत असत. कैकयीनें असें म्हटल्यावर त्यांनीं कशी कठीण प्रतिज्ञा केली होती, तीं वाल्मिकीच्याच वाणीनें ऐका—

" अहो धिङ् नार्हसे देवि! वक्तुं मामीदृशं वचः ।
अहंहिवचनाद्राज्ञः पतेयमपि पावके ॥
भक्षयेयं विषं तीक्ष्णं पतेयमपिचार्णवे ।
नियुक्तो गुरुणा पित्रानृपेणच हितेनच ॥
तद्ब्रूहि वचनंदेवि ! राज्ञोयदभिकाङ्क्षितम् ।
करिष्येप्रतिजानेच रामो द्विर्ना विभाषते ॥ "

वा. रा. काण्ड २ सर्ग १८ ॥

" हे देवि धिक्! धिक्! आपणास असें बोलणें योग्य दिसत नाहीं. मी पित्याकरितां अग्निकुंडांत उडी घेईन. अगाध समुद्रांत बुडी मारीन, हालाहाल विषसुद्धां प्राशन करीन. कारण कीं ते माझे पिता, दुसरे गुरु, तिसरे हितकारी, व चौथे राजा आहेत. तर देवि, राजानें जें कांहीं ठरविलें असेल तें तूं मला सांग. मी तें सर्व पूर्ण करीन, अशी प्रतिज्ञा करतों. माते, राम कोणचीहि गोष्ट दोनदां केव्हांच बोलत नाहीं, हें पूर्णपणें लक्षांत असूं दे ! "

हें रामाचें भाषण ऐकून निर्दय कैकयी रामाला म्हणाली— ' वत्सा, राजानें मला दोन वर दिले आहेत. ते मी आतां त्यांच्याजवळ मागतें. पहिल्या वरानें भरतास राज्य, व दुसऱ्या वरानें तुला चौदा-वर्षें वनवास. पण तुझ्यावरील प्रेमातिशयामुळें ते तुला तशी आज्ञा करूं इच्छित नाहींत, व आपलें वचन खोटें करून धर्मभ्रष्ट होऊं इच्छितात. जर तुला आपल्या पित्याच्या सत्य वचनाचें रक्षण करणें असेल, तर तूं आजच वल्कलें परिधान करून वनवासास निघून जा. तुझ्या राज्याभिषेकाकरितां जी तयारी झाली आहे, तिनें

भरतास राज्याभिषेक होईल. तूं आतां वनवासास जाण्यास उशीर करूं नकोस. जोंपर्यंत तूं येथें राहशील, तोंपर्यंत राजा शोकावस्थेंत राहील, व मी अन्नपाणीहि घेणार नाहीं. याकरितां वनवासास जाण्याची लवकर तयारी कर."

वाचकहो, कैकयीच्या तोंडून असें दारुण भाषण ऐकून रामचंद्राला वाईट वाटलें कीं काय! याचा आपणच विचार करा. त्याचें त्यांना मुळींच वाईट वाटलें नाहीं. रामचंद्र कांहीं साधारण मनुष्य नव्हते, तर त्यांस वनांत जाण्याचें ऐकून वाईट वाटेल. ते धैर्यवान् अर्थात विचारी होते. राज्याभिषेक होणार म्हणून ज्यांच्या तोंडावर आनंदाची छाया दिसली नाहीं, त्यांच्या चेहऱ्यावर वनवासास जावें लागणार म्हणून मग उदासीनता तरी कोठून दिसणार! त्यांना राज्यप्राप्तीचा जसा हर्ष नव्हता, तसें वनवासाचें दुःखहि वाटलें नाहीं. त्यांना दोन्ही अवस्था सारख्याच होत्या. कैकयीच्या मुखानें वनांत जाण्याचें ऐकून रामचंद्र म्हणाले—

'अहंहि सीतां राज्यंच प्राणानिष्टान्धनानिच ।
हृष्टो भ्रात्रे स्वयं दद्याम्भरताय प्रचोदितः ॥
किं पुनर्मनुजेंद्रेण स्वयं पित्रा प्रचोदितः ।
तव च प्रिय कामार्थं प्रतिज्ञामनुपालयन् ॥'

वा. रा. काण्ड. २ सर्ग १९,

'मी आपल्या व वडिलाच्या सांगण्याप्रमाणें भरताला राज्यच काय, पण सीता व माझे प्राणहि देण्यास तयार आहें; मग राज्याची ती कथा काय! मी भरताला सर्वस्व देण्यास समर्थ आहे. आतां तर साक्षात् पित्याचीच आज्ञा आहे, व आपलेहि हेतु सफल होत आहेत. देवि, आपण महाराजांस संतुष्ट करा. मी आतां वनांत चाललों. सीतेची समजूत करण्यास व माता कौसल्येला एकदां नमस्कार करून येण्यास जेवढा वेळ लागेल तेवढाच कायतो!

वडिलांनीं अशा क्षुल्लक गोष्टीबद्दल दुःख कां करावें! हेंच मला कळत नाहीं. मला फक्त याच एका गोष्टीचें वाईट वाटतें. जरी त्यानीं मला प्रत्यक्ष ‘ जा ’ म्हणून सांगितलें असतें, तरी मी ती त्यांची आज्ञा पालन केली असती. असो. मी आपलीहि ही आज्ञा त्यांच्या आज्ञेपेक्षां कमी समजत नाहीं. मी आतांच वनवासास जाण्याची तयारी करतों- ”

असें कैकयीस सांगून, रामचंद्र तिला व पित्याला नमस्कार करून लगेच कौसल्येच्या प्रासादाकडे जाण्यास निघाले. जेव्हां लक्ष्मणाला रामाच्या वनवासाची हकीकत समजली, तेव्हां तो क्रोधानें संतप्त झाला; त्याचें सर्व अंग थरथर कापूं लागलें. रामचंद्र निघून गेल्यावर राजा दशरथ ‘ हा राम हा राम’, म्हणून अत्यंत शोक करूं लागला, आणि तसें करतां करतां त्यांस प्रबल मूर्च्छा आली. अहाहा ! राजा दशरथाच्या धर्मपरायणतेची धन्य आहे! राजाची अवस्था त्यावेळीं फार शोचनीय झाली होती. राजा दशरथानें एकदां संतुष्ट होऊन कैकयीस दोन वर दिले होते, तेच आतां त्यास काळरूप झाले. आपल्या स्त्रीनें सुद्धां आपणास असत्यवादी म्हणूं नये, व सत्यधर्माचें रक्षण व्हावें, एवढ्याचकरितां त्या सत्यधर्मपरायण राजानें आपल्या प्राणापेक्षांहि प्रिय अशा आपल्या पुत्रास वनवासास पाठविलें. राजा दशरथाची या अश्रुतपूर्व धर्मपरायणतेची कोठवर तारीफ करावी. जो राजा रणक्षेत्राच्या एकांतस्थानीं स्त्रीस दिलेलें वचन पूर्ण करण्यास आपल्या प्राणाहूनहि प्रिय अशा पुत्रास दोनचार महिने किंवा दोनचार वर्षेंहि नाहीं, तर पूर्ण चौदा वर्षेंपर्यंत वनवासास जाण्यास भाग पाडतो, त्या राजाइतकी सत्यप्रियता आजपर्यंतच्या कोणच्या राजांत दिसली आहे काय ! या अद्भुत लीलेच्या गूढ रहस्याचा भेद करण्यास सुविचारावलंबनच केलें पाहिजे. खोल विचारांतीं असें

आढळून येतें कीं, प्राचीनकाळीं भारतवर्षांत स्त्रियांस उचित तो मान दिला जात असे. त्या वेळचे लोक स्त्रियांशीं एकांतांत केलेलें भाषणहि पूर्ण करण्यास झटत असत. पाहिजे तर सबंध जगाचा जरी नाश झाला तरी प्राचीन आर्य सत्यापासून भ्रष्ट होत नसत. प्राचीन लोकांच्या गोष्टी लिहून त्या न्याय मंदिरांत नोंदून ठेवण्याची त्यावेळीं आवश्यकता नव्हत्ती. त्यांची नोंदणी कचेरी म्हणजे त्यांचें अंतः-करणच ! त्यांच्या अंतःकरणावर उमटलेल्या गोष्टी दगडावर खोद-लेल्या गोष्टींप्रमाणें कायम रहात असत. पृथ्वी इकडची तिकडे होईल, पण आर्यांनीं बोललेले शब्द सत्यच होतील. राजा दशरथानें कैकयीसमोर जी प्रतिज्ञा केली होती ती याप्रमाणें पालनांत जी त्याची सत्यप्रियता दिसून येत आहे, व स्त्रियांचा उचित असा मान ठेवणें हें किती आवश्यक आहे, या त्याच्या आंगच्या दोन्ही गुणांचें यामुळें चांगलें दिग्दर्शन होत आहे, असें आह्मांस वाटतें.

जेव्हां स्वतः राजा दशरथ महाराज इतके सत्यप्रतिज्ञ होते, तेव्हां त्यांचे पुत्र श्रीरामचंद्र हे त्यांच्यापेक्षां कसे कमी असतील ? किंबहुना ते कांहीं गुणांत आपल्या पित्यापेक्षांहि श्रेष्ठ होते. यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. हेंच सर्वथा सत्य आहे. रामचंद्रा-प्रमाणें पितृभक्त पुत्राचें दुसरें उदाहरण पाहिल्यानेंहि सांपडणार नाहीं. कोठून सांपडणार ! नाहींच आहे. त्यांनीं पित्राज्ञा शिरोवधार्य करून राज्य तृणवत् समजून त्याचा त्याग केला; व चौदा वर्षें वनवास पतकरला. या त्यांच्या सद्गुणाबद्दल त्यांना सर्व जग आज पूज्य भावानें प्रणाम करीत आहे. असो.

कौसल्येच्या मंदिरांत जाऊन जों राम पहातात, तों माता मंदि-रांत देवपूजा करीत आहे, व मंत्रोच्चार करून अग्निकुंडांत हवन करीत आहे. जेव्हां रामचंद्रानें मातेच्या पायांवर डोकें ठेविलें, तेव्हां प्रेमभरानें कौसल्या उठून उभी राहिली. तिनें रामाला आलिंगन

देऊन त्याच्या मस्तकाचें अवघ्राण केलें. रामचंद्राच्या मस्तकावरून हात फिरवून ती म्हणाली—" रामचंद्रा, आज मोठा मंगल दिवस आहे. आज तुझे वडील तुला युवराज पदवी देणार आहेत ! " मातेच्या भाषणाचा उद्देश समजून श्रीरामचंद्र म्हणाले, " आई, आपण व्यर्थ आनंद मानीत आहांत. तुमच्या सीतेवर व लक्ष्मणावर मोठी आपत्ति आली आहे. ती हीच कीं, कैकयी मातेच्या प्रतिज्ञा-पूर्तीकरितां राज्य सोडून चौदा वर्षें वनवासाला जाण्याची पित्यांनीं मला आज्ञा केली आहे'. हें ऐकून कौसल्येचे पाय जमिनीवर ठरे-नात. ती लागलीच निर्मूल लतेप्रमाणें जमिनीवर धाडकन् पडली.राम-चंद्रानें लक्ष्मणाच्या सहाय्यानें तिला कसें बसें उठवून बसविलें. फार वेळानें जेव्हां तिची मूर्च्छा दूर झाली, तेव्हां ती रडूं लागली. थोड्याच वेळांत रामचंद्राच्या वनवासाचें वर्तमान सर्व राजवाड्याभर झालें. ज्या ज्या कोणास हें वृत्त कळलें, त्या त्या सर्वांस त्यामुळें दुःख झाल्याशिवाय राहिलें नाहीं. चोहोंकडे हाहाकार उडून गेला. त्या हाःहाःकाराचा हृदयविदारक नाद ऐकून लक्ष्मणाचा क्रोधाग्नि अधिकच भडकला. तो कौसल्येच्या व रामचंद्राच्या समोरच राजा दशरथाची निर्भत्सना करूं लागला. तो म्हणाला कीं, "महाराजांची बुद्धि फिरली आहे. ते स्त्रैण झाले आहेत. अशा स्त्रैणाची आज्ञा पालन करण्याची तर मला मुळींच आवश्यकता वाटत नाहीं. मी आतांच दशरथ, कैकयी, भरत, व त्यांचे इतर सहाय्यक यांना ठार मारतों. काय, मी जिवंत असतां, हे लोक रामचंद्राला वनवासास पाठवितात ! " लक्ष्मणाचें हें क्रोधयुक्त भाषण रामचंद्राला मुळींच आवडलें नाहीं. ते म्हणाले—' लक्ष्मणा, हें तूं काय करीत आहेस ! पिता हाच मूर्तिमंत धर्म आहे. पुत्राकरितां पिता हाच साक्षात् देव आहे या संसारांत पित्याप्रमाणें दुसरा कोणी पूज्य नाहीं. पित्याची आज्ञा पालन करणें हाच पुत्राचा मुख्य धर्म आहे. जर आपण आपल्या

पित्याच्या धर्माचें रक्षण करूं शकत नाहीं, तर आपल्या जगण्याचें फल काय ? भरत फारच सुशील व नम्र आहे. त्यानें आपला काय अपराध केला आहे ! देवी कैकयी आपली वंदनीय माता आहे. त्यांची निंदा करण्यांत आपल्या हातून फारच मोठा अपराध होत आहे." हें रामाचें भाषण ऐकून लक्ष्मण खालीं मान घालून उगीच उभा राहिला.

रामानें वनांत जाण्याची दृढ प्रतिज्ञा केली आहे, व वनांत जाण्याचा त्याचा निश्चय कांहीं केल्या बदलणार नाहीं, असें जेव्हां कौसल्येनें जाणिलें, तेव्हां ती रामाला म्हणाली—' हे पुत्रा , जर तूं वनांत जाणार, व माझ्या सांगण्यानेंहि रहात नाहींस, तर मला तरी बरोबर ने. ' परंतु पति असतांना स्त्रिनें पतीला सोडून वेगळें राहूं नये. स्त्रीकरितां पति हीच गति आहे, पतीची सेवा करणें हाच स्त्रीचा मुख्य धर्म आहे. मी वनांत गेल्यावर वडिलांना फार दुःख होईल. तूं जर येथें न रहाशील, तर वडिलांना धीर कोण देईल ! व त्यांची सेवा कोण करील, अशी रामानें कौसल्येची समजूत केली.

' राम आपल्या निश्चयापासून यत्किंचितही ढळणार नाहीं, व वनांत अवश्य जाणार, असें जेव्हां कौसल्येनें पाहिलें, तेव्हां तिनें डोळ्यांत आंसवें आणून रामचंद्राला आशीर्वाद दिला, व वनांत त्याला सुखी ठेवण्याविषयीं ईश्वराची वारंवार प्रार्थना केली. याप्रमाणें मातेची समजूत करून व तिच्या चरणांला वंदन करून लक्ष्मणासह रामचंद्र सीतेच्या मंदिराकडे निघून गेले.

जोंपर्यंत आपला खरा प्रेमविषय मनुष्य भेटत नाहीं, तोंपर्यंत कोणी मनुष्य अतिशय कष्ट व मनःपीडा सहन करतो. दुःखांत धीर देणाऱ्या मित्रापुढं आपले मनोविकार छपले जात नाहींत. अतिपरिचित मित्रापुढें, खऱ्या प्रेम करणाऱ्या मनुष्याजवळ, व अभिन्न हृदयजनापुढें आपलें मन खुलें करणें भागच पडतें. अभिन्न हृदयासमोर हजारों उपाय केले तरी आपण आपले मनोविकार लपवूं शकत

नाहीं; ते तेव्हांच प्रकट होतात. ते न सांगण्याची इच्छा असूनहि आपोआप प्रकट होतात. लपत नाहींत.

रामचंद्रांनीं आपले मनोविकार या वेळपर्यंत मोठ्या पराकाष्ठेनें दाबून ठेविले होते. दशरथाजवळून वनाला जाण्याची आज्ञा मिळाल्यापासून ते लक्ष्मणाला भेटून व कौसल्येचाहि निरोप घेऊन परतले, तरी देखील त्यांनीं आपलें चित्त ढळूं दिलें नाहीं. येथपर्यंत त्यांचें हृदय हाललें नाहीं. पण जेव्हां ते सीतेच्या महालाजवळ आले, तेव्हां त्यांची फार शोचनीय स्थिति झाली. त्यांच्या हृदय मंदिराच्या मर्यादेंत राहिलेल्या शोकसागराला आतां एकदम भरती आली. त्यांचे नेत्र अश्रूंनीं भरून आले. चेहऱ्यावर चिंतेची छटा दिसत होती; व त्यांच्या हृदयांत नानाविचारांचें तुमुल युद्ध सुरू होतें. सीतादेवी आपलें नित्यकर्म आटोपून आनंदानें स्वामीच्या दर्शनाची उत्सकतेनें वाट पहात बसली होती. इतक्यांत आपल्या समोर स्वामीला पाहून ती उठून उभी राहिली. परंतु त्यांचें मुख निस्तेज पाहून तिच्या पोटांत धस्स झालें. सीतादेवी खरी प्रतिव्रता होती. तिला त्यांचें दुःख पहावेना. त्यांना दुःखी पाहून तिचें हृदय कांपूं लागलें. ती व्याकूळ होऊन म्हणाली–' हे नाथ, विद्वान् ब्राह्मणांनीं तर आज पुष्य नक्षत्रावर आपल्याला राज्याभिषेक करण्याचें ठरविलें होतें, मग आपण या वेळेस असे खिन्न कां ? या वेळीं आपल्या मस्तकावर श्वेत छत्र नाहीं, व आपले चवरी वारणारे आज कां बरें दिसत नाहींत ? सूत, मागध, व बंदिजन आपल्या चहूं बाजूंला स्तुतिस्तोत्रें कां गात नाहींत ? वेद पठन करणारे लोक आपल्या मस्तकावर दही व अक्षता कां टाकीत नाहींत. आपल्याकरितां सुवर्ण चित्रयुक्त आसनें घेऊन सेवकजन कां आले नाहींत ! व आज आपणाला राज्याभिषेक होणार असून आपल्या चेहऱ्यावर आनंद कां नाहीं ? आपण असे उदासीन कां ? हे नाथ, काय झालें असेल

तें लवकरच सांगा. आपल्यामुखाकडे पाहून माझें हृदय विदीर्ण होतें.' सीतेचें असें हें कारुणिक विलापयुक्त भाषण ऐकून रामचंद्र म्हणाले. ' श्रीपूज्यपाद पित्यानें मला चौदा वर्षें वनवासास जाण्याची आज्ञा केली आहे.' असें म्हणून वनवासास जाण्याचीं सर्व कारणें त्यांनीं सीतेस सांगितलीं. शेवटीं ते म्हणाले—' वडिलांची आज्ञा पालन करण्याकरितां मी वनास जातों, व याकरितांच मी तुला भेटावयास आलों आहें?'

त्या वेळीं रामचंद्रांनीं सीतेला थोडाबहुत उपदेश केला. ते म्हणाले—' सीते, ऐक. मी पित्याची आज्ञा पालन करण्याकरितां वनास जातों. माझ्या मागें तूं कोणत्याही प्रकारें चिंता करूं नकोस. माझ्या पश्चात् भोग–विलास कमी करून तुला व्रतोपवास वगैरे जास्त करावे लागतील. मी गेल्यावर तुलाहि मजप्रमाणेंच ब्रह्मचर्य पाळावें लागेल. तूं प्रति दिवशीं प्रातःकाळीं उठून अग्निहोत्र आटोपून माझ्या पूज्य पित्याच्या चरणांचें दर्शन घेत जा. माझ्या वियोगानें माझ्या मातापित्यांना फार दुःख होईल, याकरितां तूं त्यांची सुश्रुषा करून त्यांना धीर देत जा. एक माझीच माता नव्हे तर, कैकयी व सुमित्रा या दोघींहि तुला त्याचप्रमाणें पूज्य आहेत. सर्व सास्वांची एकाच मनोभावानें सेवा करणें हा तुझा धर्म आहे. प्राणप्रिय भरत, व शत्रुघ्न यांना बंधु व पुत्राप्रमाणें मान. आजपासून भरत या वंशाचा व देशाचा राजा झाला आहे. पहा, कधीं त्याचें वाईट चिंतूं नकोस. परस्परांत विरोधभाव उत्पन्नच होणार नाहीं, असें तुझें वर्तन असूं दे. राजाला नेहमीं प्रसन्न ठेविलें पाहिजे. जर त्याच्या विरुद्ध कांहीं करण्यांत आलें, तर तो रुष्ट होतो. राजा अपराधी पुत्रालाहि दंड करून घरांतून काढून देतो; व हितकारी योग्य मनुष्याचा वरवरच कां होईना, फार सन्मान करतो. एवढ्याचकरितां तुला सांगणें आहे कीं, तूं भरताच्या सह्यचाप्रमाणें

वाग, व त्याच्या विरुद्ध कांहींहि करूं नकोस. वनास जाण्याच्या पूर्वीं ही एकच गोष्ट तुला सांगावयाची आहे कीं, ' तूं यावेळपर्यंत सांगितल्याप्रमाणें वाग. यांतच तुझें कल्याण आहे, व याप्रमाणें चालणें हा तुझा धर्म आहे."

(वा. रा. का. २ सर्ग २६).

ईश्वरेच्छा मोठी बलवान आहे. आतां एका क्षणापूर्वीं सीतादेवी बसल्याबसल्याच आपल्या मनांत विचार करीत होती कीं, पतीला राज्याभिषेक झाल्यावर मला ' महाराणी ' म्हणतील ! परंतु तिची ती आशा, तिचे ते विचार सर्व कांहीं स्वप्नाप्रमाणें झाले. थोड्या वेळापूर्वीं ज्यांच्या राज्याभिषेकाचा उत्सव सुरू होता, ते आतां वनास जाण्यास तयार झाले आहेत. संसाराची ही विचित्रता, व ईश्वराची ही बलवती इच्छा क्षणांत कांहींच्या कांहींच स्थित्यंतर करून टाकते. या गोष्टीचा विचार केला असतां कोणची गोष्ट स्थिर आहे याचा मनाला विचार पडतो. पळामध्यें काय होईल याचें ज्ञान कांहींच नसतें. कोणालाच याचें ज्ञान नसतें. ईश्वराची जर इच्छा असेल तर वाटेल तें होऊं शकतें. जो आज राजा आहे, तो उद्यां रंक होणार, या गोष्टीवर कोणी विश्वास ठेवील काय ? व जो आज अकिंचन आहे, तो उद्यां राजराजेश्वर होऊन सिंहासनावर बसणार आहे ! ईश्वराच्या ईच्छेप्रमाणें सर्व गोष्टी संभवनीय आहेत. संसारांत कोणीही आपल्याबद्दल अभिमान बाळगूं नये. पहा, रामचंद्राला राज्याभिषेक होणार म्हणून हर्षहि नव्हता; त्याचप्रमाणें त्याच्या संबंधानें जेव्हां ईश्वराची दुसरीच इच्छा उत्पन्न झाली, तेव्हां सांसारिक विषय भोगून पंकांत लिप्त होऊन अभिमानी जनांप्रमाणें मानमर्दनाकरितां तो परमात्मा काय नाहीं करूं शकणार ! परंतु अशा वेळीं सीतेला प्रणाम केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. आम्हीं मागें लिहिलें आहे कीं ' सीतादेवी साधारण स्त्री नव्हती.

ती जर एखाद्या अशिक्षित स्त्रीप्रमाणें असती तर तिच्या स्वामीच्या तोंडून राज्याभिषेकाच्या ऐवजीं वनवासाचें हृदयविदारक वर्तमान ऐकून तिचें हृदय दुभंग झालें असतें; ती मूर्च्छित झाली असती, व तिच्या मानसिक भावांत सहजच बदल झाला असता. तिनें त्या वेळेस आपल्या गगनभेदी मुक्त रोदनस्वरानें सर्व राजमहाल दणाणून सोडला असता. कैकयीला तिनें अपशब्दांची लाखोली वाहिली असती; व ईश्वराला आणि विधात्याला शेंकडो शिव्याशाप तिनें दिले असते. या दुःखाचें मूळ तो आहे. म्हणून त्यास दोषहि दिला असता. दुसरी कोणी साधारण स्त्री असती तर तिनें श्रीरामाला या कार्यापासून परावृत्त करण्याचा खास प्रयत्न केला असता. स्वार्थाच्या मोहांत गुंतून तिनें पतीलाहि त्याच्या निश्चयापासून ढळविलें असतें. साधारण स्त्री अशा कठीण प्रसंगीं धैर्य सोडून आपल्या पतीलाहि धैर्यापासून भ्रष्ट करती. परंतु आह्मीं प्रथमच सांगून ठेविलें आहे कीं, ' सीतादेवी साधारण स्त्री नव्हती. सीता आपणा स्वतःला अगदीं विसरून गेली होती. ती आपल्या पतीलाच आपलें सर्वस्व समजत होती. ती आपल्या पतीच्या आत्म्यांतच आपला आत्मा मिळवून एकरूप होऊन गेली होती. महाराणी होण्याला न मिळाल्यामुळें तिला लेशमात्र दुःख झालें नाहीं. आज्ञारूपी धर्माचें पालन करण्याकरितां आपला पति मोठ्या आनंदानें वनास जात आहे, हें पाहून तिला फारच समाधान वाटलें. सीतादेवी अशा या संकटाच्यावेळीं धैर्यहीन झाली नाहीं. ती दुःखानें अधीर न होतां आपल्या कर्तव्याविषयीं विचार करीत होती. तिनें शांतपणानें व सावधपणानें पुढील गोष्टींचा विचार केला. ज्या वेळेस श्रीरामानें वनास जाण्याची हकीकत तिला सांगितली, त्या वेळेस ती ऐकून तिनें आपल्या मनाशीं कांहीं विशिष्ट गोष्टींचा विचार केला. ' भरताच्या आश्रयाखालीं मला ठेऊन श्रीराम वनास जातात, ' याच एका गोष्टीचें सीतेला त्यावेळीं

अत्यंत दुःख वाटलें. रामाचा हा विचार पाहून तिला रागहि आला. परंतु तिचा कोपहि साधारण स्त्रीप्रमाणेंच नीचभावयुक्त नव्हता. तिच्या त्या कोपांत पवित्रता व पूर्णप्रेम भरलेलें होतें.

सीतादेवी म्हणाली:—" नाथ, मला आपण नीच स्वभावाची स्त्री समजून का असल्या प्रकारें भाषण करतां ? आपलें हें भाषण ऐकून मला हासूं येत आहे. आपण मला जी गोष्ट सांगितली आहे, ती आपल्यासारख्या सर्वशास्त्रपारंगत, महावीर, राजकुमाराला कदापिहि इष्ट नाहीं. असें सांगण्यांत आपलीहि निंदाच होत आहे. पिता, माता, भ्राता, पुत्र, व सून हीं सर्व आपल्या कर्मांचीं फळें भोगतात, परंतु एक स्त्रीच जगांत अशी आहे कीं, जिला आपल्या पतीच्याच नशिबावर अवलंबून रहावें लागतें. असें आहे तर, ज्या अर्थीं आपणाला वनवासाला जाण्याची आज्ञा आहे, त्या अर्थीं ती मलाही जाण्याला झाल्यासारखीच आहे. मी आपणाहून भिन्न नाहीं. पुरुषाची छाया पुरुषापासून भिन्न होते काय ! माता, पिता, व बंधु वगैरे हे तर निराळेच राहिले, पण स्त्री आपलें स्वतःचें कल्याण किंवा बरें वाईटहि आपण स्वतः करूं शकत नाहीं. तिच्या परम कल्याणाचें साधन, कल्याणस्वरूप, व एकमात्रगति तिचा पतिच आहे. जर आपण वनास जाण्याचें प्रस्थान ठेविलें आहे, तर मी आपल्यापुढेंच आहे. ही गोष्ट मी आपल्या मनची सांगतें असें नव्हे, तर शास्त्रांतच असें लिहिलें आहे; आणि माझ्या बालपणीं माझ्या मातापितरांनीं मला असाच उपदेश केला आहे. याकरितां आपला सहवास मी सोडूं शकत नाहीं. मीं तर आपला कांहीं अपराध केला नाहीं ! मग आपण मला येथें ठेवण्याचा हा असह्य दंड कां करूं इच्छितां हेंच मला कळत नाहीं. आपल्याबरोबर मी निर्जल व निर्जन वनांतहि सुखानें राहीन. तें भयंकर अरण्यहि मला आपल्या सहवासानें मोठें सुखदायक होईल. मी त्रैलो-

क्याच्याहि सुखाची इच्छा करीत नाहीं. मी फक्त आपल्या सहवासाचीच इच्छा करतें. आपल्याबरोबर राहण्यांतच मला खरें सुख मिळणार. आपल्याला सोडून वेगळें राहून स्वर्गांतील सुखाचीहि मी इच्छा करीत नाहीं. वनांत मी फळेंमूळें खाऊन राहीन; व आपल्याला दुःख देणार नाहीं. घोर वनांत राहून आपल्या चरणाची सेवा करितांना मला पित्याच्या घरींच असल्यांप्रमाणें वाटेल. मला बरोबर घेऊन चलण्यांत आपणाला मुळींच त्रास होणार नाहीं. मी आपल्याशिवाय एक क्षणभर देखील जिवंत राहाणार नाहीं. मी आपल्या पुढेंपुढें कंटक दूर करीत चालेन. ज्याप्रमाणें निर्जल अथवा मरुभूमींतील प्रवासी आपल्या कमंडलूंतील उरलेलें पिण्याचें पाणी फेंकून देत नाहीं, तर तें आपल्याजवळ बाळगितो, त्याचप्रमाणें आपण मला आपल्याबरोबरच घेऊन चला. येथें मागें ठेवूं नका. आपण मला बरोबर घेऊन जाऊं नये, असा माझ्यामध्यें कांहीं एक दोष नाहीं. आपण वीरपुरुष आहांत. जर आपण मला वनांत बरोबर घेऊन जाणार नाहीं, तर लोक आपणाला काय म्हणतील? कांहीं लोक आपणाला शौर्यांत कमी समजण्याचा मात्र संभव आहे."

(वा. रा. कांड २ सर्ग २७.)

वाचकहो, सीतादेवी आपल्या कर्तव्याला कशी उत्तम रीतीनें जाणत होती, हें आतां आपणच पहा. तिनें अशा रीतीनें आपल्या स्वामींचें वनांत जाण्याचें वृत्त ऐकून मलाही आपणाबरोबर चलावयाचें आहे, असें रामाला सांगितलें. जिथें पति तिथें त्याची पत्नी सहचारिणी असणार. सीतेचें हें किती साधें व स्वाभाविक भाषण आहे ! सीतादेवी म्हणाली कीं, मी आपल्यापुढें खडे व कंटक दूर करीत चालेन. यांत पतिप्रेम किती उत्तम तऱ्हेनें झळकत आहे, तें पहा. हेतु हा कीं, मार्गांत जर कांटे वगैरे असतील, तर ते प्रथम माझ्या पायास लागून नाहींसे होतील, आपल्या पायाला लागणार

नाहींत, हा भाव. किती सुंदर हा भाव, किती प्रेमयुक्त भाषण हें! यांत पातिव्रत्याचें किती तरी सुंदर दिग्दर्शन आहे बरें! मरुदेशांतील प्रवाशाच्या कमंडलूंतील अवशेष राहिलेल्या पाण्यासंबंधाची गोष्ट सीतेनें सांगून मर्मभेदी व करुणरसपूर्ण अशा प्रेमाची पराकाष्ठा दाखविली आहे.

सीतादेवी फार बुद्धिवान्, व दूरदर्शी होती. वनांतील क्लेशाची कल्पना येऊन स्वामी आपणाला बरोबर नेणार नाहींत, हा विचार मनांत येऊन ती म्हणाली कीं–' हे नाथ, सिंह, व्याघ्र, इत्यादि हिंस्र पशूंनीं भरलेल्या वनांत तपस्व्याचा वेष घेऊन नित्य आपल्या सेवेंत रहावें, हींच माझी आंतरिक इच्छा आहे. ज्या सरोवरांत कमळें फुलत आहेत, जेथें भृंग गुंजारव करीत आहेत, हंसांचा मधुर शब्द ऐकूं येत आहे, तेथें स्नान करून, वानर, हत्ती, व रीस यांच्या संगतींत राहून मी आपली चरणसेवा करीन. तेथें कांहीं मला पित्याच्या गृहापेक्षां कमी आनंद वाटणार नाहीं. आपल्या आज्ञेचें पालन करून व तेथील पर्वत व नद्यांचें दर्शन घेऊन मी आपल्या जीविताचें साफल्य समजेन. माझी पक्की खात्री आहे कीं, आपल्याबरोबर राहण्यांत मला कष्ट वाटणार नाहींत. मी आपली वीरता उत्तम प्रकारें जाणतें. यामुळें मला दृढ आशा व आपल्याबद्दल पूर्ण भरंवसा आहे कीं, मी एकटीच काय, परंतु शेंकडों प्राण्यांचेंहि पालनपोषण आपण एकटे करूं शकतां. एवढ्याकरितां मी आपल्याबरोबर येण्याचें करणार. मी आपली छाया आहे. आपण मला कोणच्याहि प्रकारें अलग करूं शकत नाहीं. मी वनांत कोणत्याहि प्रकारचे चांगले चांगले खाद्यपेयांचे पदार्थ आपणाजवळ मागणार नाहीं, हे मी आपणाला प्रथमच सांगतें. कंदमूलांवरच मी निर्वाह करीन. सुंदर रेशमी कपड्यालत्यांचीहि मला जरूरी नाहीं. मी अगदीं साध्या राहणीनेंच आपल्याला

कृतार्थ समजेन. मग तर झालेंना! याप्रमाणें मीं आपल्याबरोबर आपला काळ मोठ्या आनंदानें व सुखानें घालवीन.'

(वा. रा. का. २ सर्ग. २७)

सीतादेवीला प्राकृतिक सौंदर्य पाहण्याची लहानपणापासूनच फार उत्सुकता होती, हें आह्मीं पहिल्या कांडांत सांगितलें आहे. तिनें आपल्या पित्याच्या गृहीं तापसांच्या तोंडून आश्रमासंबंधाच्या पुष्कळ गोष्टी ऐकिल्या होत्या, त्यामुळें वन्य आश्रम पाहण्याची इच्छा तिच्या मनांत अत्यंत प्रबल झाली होती. एवढ्याचकरितां आपल्या बालपणांतील वन्य आश्रमांत तपस्विनीप्रमाणें राहण्याची ती इच्छा यावेळीं आपल्या पतीबरोबर जाऊन ती पूर्ण करणार होती. आतां उत्तम संधि आली आहे, असेंच तिला वाटलें. वनांत फार दुःख होईल, वनवास हा फार दुःखदायी आहे, हें सीतेला माहीत नव्हतें. तपस्वीजनांचे आश्रम फार चांगले असतात, त्यांच्या आसपास सुंदर सुंदर उपवनें असतात, तेथें नानाप्रकारच्या पक्ष्यांचीं सुस्वर गाणीं ऐकूं येतात, तेथील वनश्री मोठी मनोहर असते, असेंच तिनें यावेळपर्यंत ऐकिलें होतें. वनांत असे असे भयंकर प्राणी आहेत कीं, ज्यांच्या आरोळ्या ऐकून मोठमोठ्या धैर्यवान् पुरुषांच्याहि हृदयांत धडकी भरते, हें तिला माहीतही नव्हतें. या सर्व गोष्टींचा विचार करूनच रामचंद्र सीतेला बरोबर नेण्यास कांकू करूं लागले.

रामचंद्रांनीं वनांतील क्लेशांचें वर्णन करण्याच्या इच्छेनें सीतेला बराच उपदेश केला. ते म्हणाले—' प्राणप्रिये, वनांत एक प्रकारचे नव्हे, तर अनेक प्रकारचे क्लेश सहन करावे लागतील. तेथें पर्वतांतील गुहांत राहणारे सिंह रात्रंदिवस ओरडत असतात. अनेक भयंकर जीवजंतु अहोरात्र खुल्या मैदानांत हिंडत असतात. ते आपल्याला एकटें पाहून खाऊन टाकतील. मस्त, खुनी अशा जंगली हत्तींपासून आपलें संरक्षण करण्याचें काम सोपें नाहीं. तेथील मार्ग

सुगम नसतात, मोठे दुर्गम आहेत. तहान लागली असतां तेथें वेळेला पाणीहि प्यावयास मिळणार नाहीं. तेथें दिवसभर चालून रात्रीं वृक्षाखालीं पानांची शय्या करून निद्रासुख अनुभवावें लागणार. भूक लागल्यास वृक्षांपासून पडलेल्या फळांवर ती शमवावी लागणार, त्याचप्रमाणें तहान लागल्यास नदीचें किंवा झऱ्याचें पाणी पिऊन ती भागवावी लागणार. रोज तिन्ही वेळ स्नान करावें लागणार; आपल्याच हातांनीं वनांतून फुलें आणून अग्निहोत्राचें काम आपल्यालाच करावें लागेल. वानप्रस्थाश्रमाच्या सर्व धर्मांचें पालन करावें लागणार. वनांत असे असे भयंकर सर्प व अजगर आहेत कीं, ते मार्गांत तोंड पसरून बसलेले असतात, आणि जो कोणी येईल त्यास दंश करतात. मच्छरांचा तर कांहीं ठिकाणच नाहीं. तें तर त्यांचें घरच आहे. त्यांच्यापासून सुटका करून घेणें मोठें कठिण काम आहे. कोठपर्यंत त्यांचें वर्णन करूं; वनांत असंख्य संकटें आहेत. तेथें सुखाचा लवलेशहि नाहीं; तर सर्वदूर दुःख आहे. वनवासाचें कठिण दुःख तुझ्यानें सहन करवणार नाहीं. याकरितां तूं वनांत येऊं नकोस.' (वा. रा. कां. २ सर्ग २८)

हें रामचंद्राचें भाषण ऐकून सीतादेवीच्या डोळ्यांना अश्रुधारा लागल्या. ती दुःखित अंतःकरणानें म्हणाली–' नाथ, आपण वनवासाचे जे दोष, अवगुण दाखविले ते सर्व आपल्या स्नेहमय सहवासानें मला गुणकारीच होतील. सिंह–व्याघ्रादिक हिंस्र पशूंचें व जीवजंतूंचें जें भय सांगितलें, त्याची मला मुळींच भीति वाटत नाहीं. कारण, वनपशु आपलें दर्शन होतांच निर्वैर होतील. मी खरोखरच आपल्याबरोबर येणार. आपल्याशिवाय मी जिवंत राहूं शकत नाहीं. आपल्याजवळ आपल्या संरक्षणाखालीं असल्यावर मला कोणीही कुदृष्टीनें पाहूं शकत नाहीं. जेव्हां मी आपल्या पित्याच्या घरीं होतें,

तेव्हां मी ब्राह्मणांच्या तोंडून ऐकिलें आहे कीं-'मला वनांत जावें लागणार.' आतां तें ब्राह्मणाचें वचन सत्य झालेंच पाहिजे. मी वनवासांतील दुःख चांगल्या प्रकारें जाणतें. पण तें दुःख कोणाला ? जे जितेंद्रिय नाहींत त्यांना ! 'मला वनवास भोगावा लागेल' म्हणून जेव्हां मीं पित्याच्या घरीं माझ्याबद्दलची ही भविष्यवाणी ऐकिली, तेव्हांपासून वनांत जाण्याची माझ्या मनांत प्रबळ इच्छा उत्पन्न झाली होती. आतां ती इच्छा पूर्ण होण्याचा समय जवळ आला आहे. पतिसेवा हाच स्त्रियांचा धर्म आहे. जेव्हां आपण वनांत जाल, तेव्हां मी येथें राहून आपली सेवा कशी करणार ? अशा आपल्या पतिव्रता स्त्रीस आपण वनांत कां नेणार नाहीं, याचें कारण काय बरें ? तें कळेल तर बरें होईल. जर आपण मला वनांत बरोबर घेऊन जाणार नाहीं, तर मी आपल्या मागें जलांत किंवा अग्नींत पडून, अथवा विष खाऊन प्राणत्याग केल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेवा.' (वा. रा. कां. २ सर्ग २९.)

हें बोलतां बोलतां सीतेचा कंठ दाटून आला. तिच्यानें पुढें बोलवेना, व तिच्यावर रागाचीहि थोडीशी छटा दिसूं लागली.

अशी पुष्कळ तऱ्हेनें सीतेनें रामाची समजूत करून पाहिली. परंतु रामांनीं तिला आपल्याबरोबर वनांत घेऊन जाण्याचें नाकारिलें. हें पाहून सीतेला अत्यंत वाईट वाटलें. अश्रूंनीं तिचें वक्षस्थल भिजून गेलें. सर्व तऱ्हेनें जेव्हां सीतेची निराशा झाली तेव्हां तिनें एक निराळीच युक्ति काढिली. तिनें प्रीति व अभिमानपूर्ण अशी मग रामचंद्राची थट्टा चालविली. ती म्हणाली—'नाथ, जर माझे तात आपणाला वरून पुरुष, व आंतून स्त्री असे समजते, तर त्यांनीं मला आपल्या हातांत कधींच सोपविली नसती. जर त्यांना आपण इतके भित्रे आहांत, असें माहीत झालें असतें, तर त्यांनीं आपल्याबरोबर माझा विवाहच करून दिला नसता. लोक तर

आपल्या बलाची व तेजाची पुष्कळच तारीफ करीत होते. त्या सर्व गोष्टी आज स्वप्नवत् झाल्या म्हणायच्या. मी आपणास सत्यवान् समजतें; व आपण मला सावित्री समजनां. मी आपला सहवास कधींहि सोडणार नाहीं. मी पतिव्रता आहे, व मला माझ्या मातापितरांनीं पातिव्रत्य धर्माची शिक्षा दिली आहे. तें शिक्षण माझ्या मनांत पूर्णपणें ठसलें आहे. मी आपल्या त्या धर्माचें पालन करण्याकरितां आपल्याबरोबर येईन. आपणाला माझा त्याग करणें उचित नाहीं. वनांत जीं दुःखें आहेत म्हणून आपण सांगितलीं, व जीं सांगण्याचीं बाकी राहिलीं असतील, तीं सर्व मला मान्य आहेत. तेथें कंद, मूळें, फळें, वगैरे जें कांहीं मिळेल, तें सर्व मी अमृताप्रमाणें मानीन. या गोष्टीची तर आपण मुळींच चिंता करूं नये. आपण माझ्यासारख्या निरपराधिनी, पतिव्रता, व पतिप्राण स्त्रीला येथें सोडून कां जातां, हें मला कळत नाहीं. मी उगीच अशी तशी स्त्री नाहीं. मी परपुरुषाच्या वाऱ्यासहि उभी राहणार नाहीं. एवढ्याकरितां मी पूर्ण निश्चयानें सांगतें कीं, मी आपणाबरोबर वनांत अवश्य येईन.' (वा. रा. कां. २ सर्ग. ३०).

वाचकहो, जेव्हां रामांनीं 'मी वनांतून परत येईपर्यंत तूं भरताजवळ रहा' असें सीतेस सांगितलें, तेव्हां ही गोष्ट सीतेच्या हृदयास शस्त्राप्रमाणें टोंचली. तिला अत्यंत दुःख झालें. ती दुःखांतःकरणानें म्हणाली—'नाथ, आपण हें काय म्हणालांत? वाटेल तर आपण भरताच्या आधीन रहा, पण या गोष्टींत आपण माझ्यावर सक्ती करूं शकत नाहीं. मी भरताच्याच काय, पण आणखी कोणाच्याहि स्वाधीन राहूं शकत नाहीं. मी आपल्याला वारंवार सांगत आहें कीं, 'मी आपल्याबरोबर येणारच? याबद्दल आपण खात्री ठेवा. मला तर आतां आपल्याबरोबरच रहावयाचें आहे. तें मग वन असो, अथवा स्वर्ग असो. आपण कोठेंहि असा, मी आपल्या-

बरोबर आहे. जेव्हां मी आपल्याबरोबर वनांत येईन, तेव्हां वनांतील दुर्गम मार्ग देखील माझ्याकरितां सुखदायक होऊन जातील. त्यामुळें मला मार्ग चालवयाचे कष्ट वाटणार नाहींत. अरण्यांत रस्त्यांत, पडलेले कुशकंटक मला रुई-प्रमाणें वाटतील. प्रबल वायुवेगानें जेव्हां धूळ माझ्या अंगावर उडेल, तेव्हां मी तिला केशर, व चंदनाप्रमाणें मानीन. वनांतील पर्णश-य्याहि माझ्याकरितां कोमल, मऊ, रेशमी बिछान्यापेक्षांहि अधिक सुखदायक होईल. हे नाथ, मला आपल्याबरोबर वनांत कोणतेहि कष्ट वाटणार नाहींत.' (वा. रा. का. २ सर्ग. ३०).

स्त्रियांचा स्वभावच असा असतो कीं, पतीच्या घरीं राहून जेव्हां त्यांना फार दिवस होतात, तेव्हां त्या माहेरीं जाण्यास कधीं कधीं हट्ट करतात. हीच शंका रामचंद्राच्या मनांत आली. ते मनांत विचार करूं लागले कीं, जर मीं हिला वनांत नेली, तर ही तेथें माहेरीं जाण्याची आठवण काढून घोंटाळा होईल. ते आपल्या या विचारांत आहेत, इतक्यांत सीता म्हणाली—' नाथ, मी वनांत आपल्याबरोबर आल्यावर आपल्या आईबापांची आठवण काढणार नाहीं. आपल्याला ज्यापासून कष्ट होतील असें काम, अथवा भाषण देखील मी तेथें करणार नाहीं. जेथें आपण आहांत, तेथें माझ्या-करितां स्वर्गच आहे; व आपला वियोग हाच महानरक आहे. आपल्या-वांचून मी जीवंत राहणार नाहीं हें आपण अगदीं निश्चित समजा. चौदा वर्षेंच काय, पण चौदा क्षण मात्रही मला आपला वियोग सहन होणार नाहीं. ' असें बोलून स्नेहानें व्याकूळ होऊन सीता-देवी रामचंद्राच्या समोर स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. दयानिधि रामचंद्राला सीतेची ती कारुणिक दशा फार वेळ पहावली नाहीं. तिचें दुःख पाहून त्यांचेंहि हृदय भरून आलें. त्यांच्याहि नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. ते सीतेस म्हणाले, ' देवी, मी हे

तुझे कष्ट पाहूं शकत नाहीं. तुला दुःख देऊन मी स्वर्गाचीहि इच्छा करीत नाहीं. भीतीची गोष्ट तर काय ! मी सर्व गोष्टींबद्दल निर्भय आहें. मला खात्री आहे कीं, मी तुझें सर्व प्रकारें संरक्षण करूं शकेन. मी तुझी आंतरिक इच्छा जाणण्याकरितांच आतांपर्यंत तुला बरोबर घेऊन जाण्याचें केलें नाहीं. तूं माझ्याबरोबर वनांत येण्यास तयार झाली आहेस, याबद्दल आतां माझी पूर्ण खात्री झाली आहे, मी तुला मोठ्या आनंदानें सांगतों कीं, तूंही आतां धर्मपालनाचा दृढ संकल्प कर. हे प्रिये, तूं जी हकीकत सांगितली आहेस, व तूं जें कांहीं करूं इच्छित आहेस, ती गोष्ट फारच उत्तम आहे. तेंच तुझें कर्तव्य आहे, व तोच तुझा धर्म आहे. दोन्हींहि कुलांची प्रतिष्ठा यांतच आहे. बरें तर, आतां वनांत निघण्याची तयारी कर. तूंहि आतां आपलीं वस्त्रें, भूषणें, धन, रत्न, अन्न वगैरे सर्व पदार्थ ब्राह्मणांना दान कर. हें सर्व त्वरित कर; कारण आजच वनांत जाण्याची तयारी आहे.' (वा. रा. कां. २ सर्ग. ३०).

जेव्हां रामचंद्रानें सीतेस आपल्याबरोबर वनांत नेण्याचें कबूल केलें, तेव्हां सीतेस फार आनंद झाला. शेवटीं प्रेमाचाच विजय झाला. सीतेच्या विशुद्ध प्रेमामुळें रामाला हार खावी लागली. सीतेनें आपल्या स्वामीच्या आज्ञेप्रमाणें लागलेच आपले सर्व पदार्थ ब्राह्मणांस दान करून टाकले. ज्या वेळेस सीतेचें व रामचंद्राचें हें वरील भाषण झालें, त्या वेळेस लक्ष्मणहि त्यांच्याबरोबरच होता. सीता वनांत खास येणार अशी जेव्हां त्याची त्यावेळेस खात्री झाली, तेव्हां तो हात जोडून नम्रपणानें रामाला म्हणाला,'महाराज,जर वनांत जाण्याचा आपण दृढ संकल्प केला आहे, तर मलाहि आपण चिरसंगीसेवक म्हणून बरोबर घेऊन चला.' लक्ष्मणाचें हें विनम्र भाषण ऐकून रामचंद्रांनीं त्याची पुष्कळ समजूत केली. त्याचें आपल्या बंधूवर



वल्कलपरिधान.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

फार प्रेम होतें. लहानपणापासून ज्या आपल्या बंधूबरोबर त्याचें खाणें, पिणें, व राहणें, झालें, तो चौदा वर्षे त्याला आतां सोडून कसा बरें राहील ? शेवटीं रामचंद्रांनीं लक्ष्मणासहि आपल्याबरोबर वनांत येण्याची परवानगी दिली.

लक्ष्मणानेंहि आपल्या जवळील सर्व धनरत्नसंचय ब्राह्मणांस दान करून तोहि त्यांच्याबरोबर वनांत जाण्यास तयार झाला. त्रिवर्गहि वनांत जाण्याच्या तयारीनें राजा दशरथाजवळ निरोप मागण्यास गेले. ज्या सीतादेवीचें साधारण लोकांस नखहि दृष्टीस पडत नसे, ती सीतादेवी आपल्या पति व दीराबरोबर वनांन अनवाणी जात आहे, असें पाहून सर्व आबालवृद्ध व स्त्रिया रडूं लागल्या. सर्वजण दशरथ व कैकयी यांना दोष देऊं लागले. त्या तिघांना आपल्याकडे येतांना पाहून दशरथ राजा मोठ्यानें विलाप करूं लागला. कौसल्या सुमित्रा इत्यादि राण्या तर शोकाकुल होऊन मोठ्यानें रडूं लागल्या. इतक्यांत पित्याच्या चरणांवर मस्तक ठेवून रामचंद्र वनांत जाण्याची परवानगी मागूं लागले. राजानें मोठ्या कष्टानें त्यांना वनांत जाण्याची परवानगी दिली. अशा स्थितींत दुष्ट कैकयीनें मुनीचीं चिरवल्कलें त्यांस नेसण्याकरितां पुढें आणून ठेविलीं. रामचंद्र व लक्ष्मण तीं चटदिशीं नेसले. पण सीता तें हातांत घेऊन तशीच उभी राहिली. कारण तिला तें कसें नेसावें हेंच कळेना. राजमहालांत राहणाऱ्या राजकन्येला व राजपुत्र वधूला तपस्विनीचें वल्कल नेसणें कोठून माहित असणार! तिनें तें वरूनच गुंडाळून घेतलें. तें पाहून वसिष्ठ व मंत्री यांना फार दुःख झालें. त्यांनीं सीतेला तें नेसूं नको म्हणून आग्रह केला. दशरथानें मग चौदा वर्षें टिकतील अशीं वस्त्रें व दागदागिने सीतेला दिले. नंतर त्रिवर्गांनीं प्रत्येकाचा निरोप घेतला. जेव्हां लक्ष्मण सुमित्रेची आज्ञा मागण्यास तिच्याकडे गेला, तेव्हां तिनें ती त्याला मोठ्या प्रसन्न

मनानें दिली. जाते वेळेस तिनें ' तूं सुखानें वनांत जा; वन हेंच अयोध्या समज; रामाला पित्याप्रमाणें मानून सितेला मातेप्रमाणें समज ' असें सांगितलें.

सीतादेवीनें जेव्हां कौसल्येला नमस्कार करून तिचा निरोप घेतला, तेव्हां तिनें तिला आपल्या पोटाशीं अगदीं कवटाळून धरिलें. तिच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. मोठें धैर्य करून तिनें त्या वेळीं सितेला दोन उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. ती म्हणाली–' स्त्रियांचा धर्म आहे कीं पति कोणत्याहि स्थितींत असो, स्त्रीनें त्याचा सदैव आदरच केला पाहिजे. जी स्त्री वैभवकालीं पतीला मान देते, विपत्तीच्या प्रसंगीं त्याचा अनादर करते, तिची इह लोकीं तर निंदा होतेच, पण परलोकींहि तिला अत्यंत दुःख भोगावें लागतें. पतिव्रता स्त्री नेहमींच पतिसेवा करीत असते. पति कोणत्याहि स्थितींत असला तरी स्त्रीला तो देवरूपच आहे. सती स्त्रियांचें मन वस्त्राकडे लागत नाहीं, व भूषणांतच तें गुंग होऊन जात नाहीं. त्या सदा पतिसेवेंत निमग्न असतात. त्यांचें मन नेहमीं पतीच्या आज्ञेची उत्सुकतेनें वाट पहात असतें. पतिसुश्रूषेपेक्षां स्त्रियांना दुसरें मोठें भूषण नाहीं. जी स्त्री आपली कुलमर्यादा वाढविते, सदा सद्धर्म पालन करण्यास तत्पर असते, तीच साध्वी, तीच पतिव्रता, आणि तीच सति म्हणविली जाते. तिलाच या लोकीं अनुपम सुखसौभाग्याचा लाभ होतो. पतीची आराधना हेंच सतीचें प्रधान कर्तव्य आहे. पहा रामचंद्राला राज्याच्या ऐवजीं वनांत पाठविण्यांत येत आहे. चुकून देखील त्याचा अपमान करूं नकोस. पति जरी दरिद्री असला, तरी पत्नीला तो पूज्यनीयच आहे,

(वा. रा. कां. २ सर्ग ३९.)

कौसल्येचा हा उपदेश शांत चित्तानें ऐकून घेऊन सीतादेवी मोठ्या नम्रतेनें म्हणाली–, आर्ये, आपण जो मला बहुमोल उपदेश

केलांत, त्याप्रमाणेंच मी आपलें वर्तन ठेवीन. पतिव्रता स्त्रियांनीं काय केलें पाहिजे हें मी शास्त्रांत वाचलें आहे, व विद्वानांच्या तोंडून ऐकिलेंहि पण आहे. पतिव्रता धर्माची शिक्षा मला माझ्या आईबापांकडून लहानपणींच मिळाली आहे. त्याची मला चांगली आठवण आहे. ज्याप्रमाणें चंद्रापासून किरणें वेगळीं रहात नाहींत, अग्नीपासून त्याची दाहक शक्ति नष्ट होत नाहीं, जलामधून आर्द्रता नाहींशी होत नाहीं, तशीच मी धर्माला केव्हांहि सोडणार नाहीं. मला पक्कें ठाऊक आहे कीं माता, पिता, बंधू, व स्वजन हीं परमित धन देतील, परंतु पति आपल्या स्त्रीला अपरमित धन देतो. तर मग मी असल्या देवरूप पतीचा कां आदर करणार नाहीं? मी पतीलाच देव समजतें. मी केव्हांहि आपल्या धर्मापासून पतित होणार नाहीं.'

सीतेचें हें भाषण ऐकून कौसल्येला मनांत फार आनंद वाटला. इतक्यांत सुमंत रथ तयार करून घेऊन आला. रामचंद्र, सीता, व लक्ष्मण त्यांत बसल्यावर रामानें सांगतांच रथ चालूं लागला. त्यांना वनांत जातांना पाहून अयोध्यावासी सर्व अबालवृद्ध हा: हा:-कार करूं लागले. त्या लोकांचें रामचंद्रावर इतकें प्रेम होतें कीं, त्यांच्याशिवाय आपण अनाथाप्रमाणें राहणें त्यांना योग्य वाटलें नाहीं, म्हणून तेहि त्यांच्या रथामागून जाऊं लागले.

रामचंद्रानें पाठीमागें पाहिलें तों अयोध्यावासी नरनारींचा मोठा समुदाय व्याकुल होऊन रडत आपल्या मागें मागें येत आहे. 'परत जा, म्हणून रामचंद्रांनीं त्यांना पुष्कळ सांगितलें, पण त्यांनीं त्यांचें मुळींच ऐकिलें नाहीं. ते तसेच दु:ख करीत पाठीमागें धांवत जात होते. ते सुमंताला तोंडानें म्हणत होते कीं ज्या अयोध्येमध्यें आमचे हितैषि रामचंद्र रहात नाहींत तेथें आम्हांला राहून तरी काय करावयाचें ? याचेंच नांव खरें प्रेम. प्रेमाची कसोटी आपत्कालींच आहे. अशा वेळीं जे बंधु, बांधव, इष्टमित्र, स्वजन व परिजन मदत

करतात, तेच खरे बांधव होत. तेच खरे इष्टमित्र, व तेच खरे परिजन होत.

आपल्या प्रजेची ती अनुपम भक्ति पाहून रामचंद्राच्या नेत्रांतून अश्रुजलधारा वाहूं लागल्या. त्यांनीं त्या वेळेस कांहींच न बोलतां रथ वेगानें हांकण्याची सुमंतास आज्ञा केली. रथ आधींच वेगानें चालूं लागला. पण पौरजनांनीं आपलें धैर्य सोडलें नाहीं. पुनः ते रथामागून धावूं लागले. साधारण लोकांची तर गोष्ट निराळीच राहो. परंतु त्यांत जे वृद्ध लोक होते, व ज्यांच्यानें वार्धक्यामुळें रथाच्या मागें धांववलें नाहीं, ते रस्त्याच्यामध्येंच उभें राहून उच्च स्वरानें आक्रोश करूं लागले. त्यांची ती कारुणिक स्थिति पाहून रामचंद्राचें हृदय दयार्द्र झालें. ते सीतेसह सर्व जनांबरोबर पायींच चालूं लागले. याप्रमाणें चालत चालत ते तमसा नदीजवळ येऊन पोहचले. तेथें येतांच सूर्यास्त झाला. रात्र पडली. सुमंतानें थकलेल्या घोड्यांना दाणापाणी पाजलें. इतक्यांत चहूंकडे काळाकुट्ट अंधार पडून रात्रीचें साम्राज्य सुरू झालें. जे पदार्थ दिवसा चांगले स्पष्ट दिसत होते, ते त्या अंधारांत लीन होऊन गेले. अंधकारानें आपलें आधिपत्य सर्व पदार्थांवर स्थापित केलें. दिवसा चिंवचिंव करणाऱ्या चिमण्यांनीं मौनव्रत धारण केलें. तमसेचें जलहि अंधकारांत विलीन झालें. रामचंद्राच्या रथाच्या मागें जितके लोक आले होते, ते सर्व तिच्या किनाऱ्यावर येऊन मुक्काम करूं लागले. एक तर ते लोक विरहानें व्याकुळ होऊन मार्ग चालण्याच्या श्रमानें अगदीं थकून गेले होते. त्यांची स्थिति खरोखर करुणाजनक होती.

तमसा नदीच्या किनाऱ्यावर रामचंद्राच्या सभोंवतीं ते सर्व लोक जमले. सर्व जन दमले असल्यामुळें हळूं हळूं निद्रावश झाले. सर्व निजल्यावर सीता व लक्ष्मणासह रामचंद्र तमसेच्या तिरीं बसून झाल्या गोष्टींचा विचार करूं लागले. त्यांना विषाद वाटला. शोकार्त

पिता, विलाप करणारी माता, दुःखार्त स्वजन, व प्रेमविव्हल अयोध्यानिवासी लोक यांचें स्मरण करून ते आपलें हृदय शोकानलानें दग्ध करूं लागले. त्या वेळेस दोघां बंधूंचें व सीतेचें हृदय दुःखानें व्याकुल झालें. कसें तरी करून त्या प्रज्वलित झालेल्या शोकाग्नीला कांहींसा शांत करून त्यांनीं संध्यावंदन केलें. नित्यकर्म आटोपल्यावर रामचंद्र लक्ष्मणाला म्हणाले, ' बा लक्ष्मणा, वनवासाची आजची आपली ही पहिलीच रात्र आहे. याप्रमाणें आपणाला वनवासांत चौदा वर्षें काढिलीं पाहिजेत. आजची ही पहिलीच रात्र तमसेच्या तीरावरच घालविण्याचा मी बेत केला आहे. जरी या ठिकाणीं फळमूळांची कमतरता नाहीं, तरी मी आज उपवास करावा, असें इच्छितों. मी पाणीमात्र पिईन. '

यानंतर लक्ष्मणानें रामचंद्राकरितां सुंदर पर्णशय्या तयार केली. रामचंद्र व सीता त्या पर्णशय्येवर निजले, परंतु सुमंत व लक्ष्मण उभयतां रामचंद्राचे गुण वर्णन करीत जागत बसले. ते जरा देखील निजले नाहींत. लक्ष्मणासारख्या भ्रातृसेवी महात्म्याला बंधूची सेवा व त्याचे गुण वर्णन करतांना केव्हांतरी झोंप येईल कां? केव्हांहि येणार नाहीं.

थोडी रात्र असतांच रामचंद्र जागे झाले, तों अद्यापि अयोध्यावासी लोक झोंपेंतच आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. ते जागे होण्याच्या पूर्वींच तेथून निघावें असे रामचंद्रांनीं ठरवून त्याप्रमाणें ते रथांत बसून निघाले. त्यांनीं रथ इतक्या वेगानें हांकला कीं, ते थोड्याच वेळांत फार दूर निघून गेले. तेथें कोसल देशाच्या सीमेला लागून एक नदी होती. तिचें नांव वेदश्रुति. ती उतरून ते सरळ दक्षिण दिशेला गेले. याप्रमाणें चालतां चालतां गोमती व स्यंदिका या नद्या पार होऊन ते समृद्धशाली श्रृंगवेरपुराजवळ जाऊन पोहचले. त्या शृंगवेरपुराजवळ त्रिपथ गामिनी कलनादिनी भागीरथी वहात

होती. त्या सुरजन-मनमोहिनी, सुरम्यतट शोभिनी जान्हवीची शोभा पाहून व सीतेला ती दाखवीत असतां रामचंद्राला एक वृक्ष दिसला. तो इंगुदी वृक्ष होता. तेथेंच रात्रभर राहण्याच्या विचारानें रामचंद्रांनीं सुमंताला रथ थांबविण्यास आज्ञा केली. रथांतून उतरून ते सर्वजण तेथेंच विश्रांति घेत बसले.

शृंगवेरपूरच्या राजाचें नांव गुह होतें. तो निषाद-भिल्ल जातीचा होता. तो बालपणापासून रामचंद्राचा मित्र होता. रामचंद्र आपल्याच हद्दींत येऊन विश्रांति घेत आहेत, हें वर्तमान ऐकून त्याला आनंद झाला. तो आपल्याबरोबर मंत्री व वृद्ध लोक घेऊन रामचंद्राकडे आला. त्यानें आपल्या मित्राच्या स्वागतार्थ बरोबर फळें वगैरे आणिलीं होतीं. दोघेहि मोठ्या प्रेमानें भेटले. रामचंद्राचा गुहानें मोठ्या प्रेमानें सत्कार केला. त्याचें आदरातिथ्य पाहून त्यांना संतोष वाटला. पण त्याच्या राजकीय थाटाच्या सत्काराचा रामचंद्रांनीं स्वीकार केला नाहीं. कारण ते वनवासी मुनींचें व्रत घेऊन वनांत आले होते. त्यामुळें घोड्याकरितां दाणा, वैरण त्यांनीं घेतली, परंतु आपल्याकरितां कांहीं एक घेतलें नाहीं.

संध्याकाळ झाली तसें रामचंद्रांनीं संध्यावंदन केलें. संध्याकाळचीं नित्य कर्में आटोपल्यावर रामचंद्राकरितां लक्ष्मणानें स्वच्छ व थंडगार पाणी आणिलें. तें पाणी पिऊन ते सीतेसह भूमीवर निजले. पहिल्यानें कांहीं वेळ लक्ष्मण रामचंद्राचे पाय दाबीत बसला, नंतर हातांत धनुष्यबाण घेऊन व वीरासन ठोकून तो बाजूला पहारा करीत राहिला. तो मुळींच निजला नाहीं.

रामचंद्राच्या ठिकाणीं लक्ष्मणाची अत्यंत प्रीति पाहून गूहानें त्याच्या भक्तीची व प्रेमाची अत्यंत प्रशंसा केली. जेव्हां रात्र फार झाली, व लक्ष्मण निजत नाहीं, असें गूहानें पाहिलें, तेव्हां तो म्हणाला, ' महाराज आपण आतां आराम करा. मी धनुष्यबाण



पवित्र मंदाकिनी.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

घेऊन पहारा करतों. याप्रमाणें गूहानें जरी त्यास पुष्कळदां सांगितलें, तरी लक्ष्मणानें तें ऐकिलें नाहीं. तो म्हणाला ' पहा, रघुतिलक रामचंद्र व सीता जर भूमीवर निजलीं आहेत, तर माझ्या विश्रांतीची ती काय कथा ? ' असें म्हणून जिच्यामुळें रामचंद्राच्या वियोगानें त्यांचे मातापिता, भाऊबंद, स्वजन, परिजन, आणि राष्ट्रनिवासी लोक फार दुःखित झाले होते, ती सर्व हकीकत क्रमवार लक्ष्मणानें गूहाला सांगितली. याप्रमाणें ती सर्व वियोग कथा सांगतां सांगतां रात्र संपून गेली. ती सांगत असतां लक्ष्मणाच्या नेत्रांतून एकसारखे अश्रु वहात होते. प्रातःकाल होतांच रामचंद्र उठले. स्नान, संध्या वगैरे नित्य कृत्यें आटोपल्यावर ते गंगापार जाण्याचा विचार करूं लागले. कशा रीतीनें गंगा उतरावी याचा ते मनाशीं विचार करीत आहेत, इतक्यांत गूहानें एक सुंदर नौका किनाऱ्याजवळ आणून उभी केली. रामचंद्रजी नौकेंत चढण्याची तयारी करूं लागले. त्यांना सुमंताला तेथून परत पाठवावयाचें होतें; तेव्हां ते म्हणाले, ' सुमंत तूं लवकर परत राजाकडे जा ! बस्स, येथपर्यंतच आम्हांला रथाची आवश्यकता होती. आतां आम्हीं पायांनींच गहन अरण्यांत जाऊं. ' असें ऐकतांच त्याच्या डोळ्यांतून बाष्पधारा वाहूं लागल्या. तो रडूं लागला. या वेळपर्यंत रामचंद्राच्या बरोबर असल्यानें त्याला विरहदुःखाचें दुःख झालें नव्हतें. त्याचा शोक या वेळपर्यंत थांबून राहिला होता. परंतु आतां जेव्हां त्याची खात्री झाली कीं—' आतां खरोखरच रामचंद्राचा वियोग होणार, व सीता आणि लक्ष्मणाच्या विरहाचें दारुण दुःख खास भोगावें लागणार, तेव्हां त्याचें हृदय कंपित झालें. नेत्रांतून टपटप अश्रु बिंदू गळूं लागले, आणि त्याचा कंठ भरून आला. सुमंताला असा कष्टी झालेला पाहून रामचंद्रांनीं त्याची मोठ्या मधुर वाणीनें समजूत केली. ते म्हणाले ' सुमंता, मातापित्यांना व गुरु-

जनांना माझा प्रणाम सांग. परदेशीं गेलेल्या भरत शत्रुघ्नाला प्रेमानें मी विचारिलें म्हणून सांग. समस्त प्रजाजनांना आमचें आंतरिक प्रेम प्रकाशित कर. '

त्यानंतर दोघांबंधूंनीं मुनिवेष धारण करून सुमंत व गुह यांचा निरोप घेतला. मग सीतेला घेऊन तें नावेंत बसले. थोड्याच वेळांत नांव दक्षिण दिशेच्या किनाऱ्याला लागली. तिघेहि सानंद गंगा पार उतरले.

आतां रामचंद्रानीं दुर्गम वनांत प्रवेश केला. गहन वनांत शिरतांच भावी आपत्तीची चिंता वाहून रामचंद्र लक्ष्मणाला म्हणाले, ' बंधो, पहा बरें येथून आतां फार अवघड वाटेनें चालावें लागेल. या वनांत कोणी मनुष्य देखील दिसत नाहीं. येथें एखादें शेत अथवा वाटिका नाहीं. येथील रस्ता बिकट आहे. कुठें उंच तर कुठे खोल खळगे. येथें जानकीचें रक्षण फार जपून केलें पाहिजे. तूं पुढें पुढें चल. नंतर जानकी, तुम्हां दोघांना संभाळीत मी तुमच्या मागून चालतों. पुढें तूं व मागें मी. वनांत कसें दुःख आहे, हें आज जानकीला कळून येईल. ' (वा. रा. कां २ सर्ग ९२).

आपल्या स्वामीच्या मुखानें असें भीतिदायक भाषण ऐकून सीता देवीच्या मनांत वनवासाच्या दुःखाचें चित्र खचीत उभें राहिलें असेल ! परंतु ती भ्यायलीहि नाहीं, व अधीरहि झाली नाहीं. याचें कारण हें होतें कीं तिच्या मनांत स्वामीविषयीं अकृत्रिम व आंतरिक प्रेम होतें. त्या प्रेमामुळें व पतीसेवाधर्मापुढें अत्यंत कठीण दुःखहि ती कांहींच समजत नसे; व दुसरें रामचंद्राच्या पराक्रमाविषयीं तिला पूर्ण खात्री होती. यांच्याबरोबर राहण्यांत आपत्तीचें कांहीं कारण नाहीं, असें तिला पूर्णपणें वाटत होतें. यामुळें तिला वनवासाचें दुःख वाटत नव्हतें; व तिसरें कारण तिला बालपणापासून सृष्टिसौंदर्य पाहण्याची आवड होती; त्या योगानें तिला

कसलाच त्रास वाटला नाहीं. ही आमच्या मनाची कांहीं कल्पना नव्हे, अथवा आह्मी कांहीं तरी उगीच सांगतों असेंहि पण नव्हे. थोड-क्याच वेळांत सीतादेवी भयानक, गहन वनाला आपल्या स्वाधीन करून घेऊन त्याला घराच्या अंगणाप्रमाणें अथवा बागेप्रमाणें करून टाकील, त्यावरून वरील विधानाची वाचकांस सत्यता कळून येईल. वर लिहिलेलीं तीन कारणें जर प्रबल नसतीं, तर सीता-देवीसारख्या महातेजस्विनी स्त्रीला वनवास असह्य वाटला असता. तिच्यानें वनवासाचें दारुण दुःख सहन करवलें नसतें.

आतां तिकडे आपण सुमंताची हकीकत काय झाली ती पाहूं. जोंपर्यंत रामचंद्र, सीता, लक्ष्मण हीं तिघें गंगापार होईपर्यंत दिसत होतीं, तों पर्यंत सुमंत एकसारखा त्यांच्याकडे पहात होता. जेव्हां ते दूर जाऊन दिसेनासे झाले, तेव्हां सुमंत दगडी पुतळ्याप्रमाणें स्तब्ध उभा राहिला. शेवटीं डोळ्यांतून अश्रु वाहत आहेत, अशा स्थितींत तो रथ घेऊन परतला. ज्या मार्गानें तो आला होता. त्याच वन्य मार्गानें तो परत अयोध्येला गेला.

कसा विचित्र समय आहे! जो राजकुमार नेहमीं राजकीय थाटानें रहात होता, राजकीय थाटाचीं वस्त्रें नेहमीं नेसत होता विमानाशिवाय बाहेर निघत नसे, जमिनीवर पाय ठेवण्याची ज्याला कधीं संवय नाहीं, जो नेहमीं देवांनाहि दुर्लभ असें अन्न सेवन करणारा व एकटा तर कधींच राहणारा नाहीं, अशा त्या राजकु-मार रामचंद्राच्या स्थितीविषयीं विचार करण्यानें हृदय विदीर्ण होतें. वाणी स्तंभित होते, व लेखणी लिहित असतां कांपते; आणि असें मनांत येतें कीं तेच दशरथनंदन राजकुमार रामचंद्र आणि लक्ष्मण आज तापस वेषधारी मुनीप्रमाणें वनांत जात आहेत. त्यांनीं राजकीय वस्त्रांऐवजीं चीरवल्कलें धारण केलीं आहेत. आज त्यांच्या जवळ कांहीं वाहन नाहीं. अनवाणी आणि विषम मार्गांनीं ते आज

फिरत आहेत. आज त्यांच्या भोजनाकरितां वन्य फळेंमुळेंच आहेत. आज ते राजकुमार एकटे निर्जन वनांत जात आहेत. जगदीश्वराची माया व शक्ति मोठी विचित्र आहे. त्याच्यासमोर मोठमोठ्या राजराजेश्वरापर्यंतच्या लोकांनाहि आपले प्रतापी मुकुट नमवावे लागतात.

याप्रमाणें तीं तिघें चालत असतां, संध्याकाळ झाली. आतां तेथें त्या तिघांशिवाय चौथें कोणींच नव्हतें. असहाय्य घोर वनांत जाण्याचा त्या तिघांवर हा पहिलाच प्रसंग आहे. दिवस मावळल्यावर त्या निर्जन वनांत कुठेंतरी ते त्रिवर्ग थांबले. सायंकाळचीं नित्य कर्मं आटोपून रामचंद्र लक्ष्मणास म्हणाले 'बंधो, आतां तूं निर्जन वनांत आहेस. आतां येथें नगराचें स्मरण नको. आतां तूं आणि मी मिळून एक पर्णकुटी बांधूं. तृणशय्या रचूं. सर्व कांहीं आतां हातानेंच करावें लागेल. एवढ्याकरितां फार धैर्यानें वागलें पाहिजे.

त्यांनीं ती रात्र त्या निर्जन वनांत व्यतीत केली. प्रातः काळ झाला, तशीं नित्यकृत्यें आटोपून पुनः ते दक्षिण दिशेला वाट चालूं लागले. त्या वेळेस पतीबरोबर सृष्टिसौंदर्याचें व स्थलांचें दर्शन होतांच सीतेला किती तरी आनंद वाटला. वन्य आश्रम पाहण्याची सीतेला पहिल्यापासून आवड होती, हें आम्ही प्रथमच सांगितलें आहे. याच कारणामुळें दुर्गम कंटकाकीर्ण विषम मार्गाला व भयानक वनालाहि ती फुलाप्रमाणें समजत होती.

याप्रमाणें त्रिवर्ग मार्ग चालत चालत संध्याकाळच्या सुमारास प्रयाग तीर्थाजवळ येऊन पोहचले. जवळच भारद्वाज ऋषींचा आश्रम होता. आश्रमांत जातांच त्यांनीं भारद्वाज ऋषीला प्रणाम केला. भारद्वाज ऋषींची ओळख होतांच त्यांनीं त्यांचा चांगला सत्कार केला. त्या मुनीनें त्यांस उत्तमोत्तम फळें खाण्यास देऊन

रहाण्यास एक चांगली पर्णकुटी दिली. सायंकाळचीं कृत्यें आटोपून त्यांनीं थोडेसें जलपान केलें, आणि नंतर रामचंद्र भारद्वाज मुनींजवळ येऊन बसले. त्या वेळेस त्यांच्याजवळ दुसरे ऋषि, मुनि, व त्यांचे शिष्यहि येऊन बसले. तेथें कांहीं वेळपर्यंत विविध विषयांवर बरीच चर्चा झाली. शेवटीं भारद्वाज ऋषींनें 'चौदा वर्षें याच आश्रमांत व्यतीत कराल तरी बरें आहे,' असें रामचंद्रास सांगितलें. आपण येथें राहिल्यानें आम्हांलाहि विशेष आनंद होईल. हा आश्रम फार उत्तम आहे. येथून नगरही जवळच आहे. आपण व सीता येथें राहिल्याचें वर्तमान ऐकून सीतेला भेटण्याकरितां बऱ्याच स्त्रिया रोज येथें येतील. असें होण्यानें सीतेचें मन येथेंच रमूं लागेल, व तिच्याशीं संभाषण करून इतर स्त्रियांनाहि पातिव्रत्य धर्माचें महात्म्य अनायासेंच परिचित होईल. परंतु मुनीचें हें भाषण रामचंद्रास आवडलें नाहीं. ते मोठ्या नम्रतेनें भारद्वाज ऋषीला म्हणाले कीं—' आह्मी जर येथें राहिलों तर आमचा समाचार अयोध्येंत लवकर कळेल; व त्यामुळें तेथील लोक रोज मला भेटण्याकरितां येऊन, येथें गर्दी होईल. त्या गर्दीमुळें आपल्याला विनाकारण त्रास होईल, त्या योगानें आपणालाहि बरें वाटणार नाहीं. याकरितां आपण एखादें असें एकांत स्थळ दाखवा कीं जेथें जनकनंदिनीला सर्व तऱ्हेनें विश्रांति मिळेल.

रामचंद्रांनीं असें म्हटल्यावर फार वेळ विचार करून भारद्वाज म्हणाले, ' येथून थोडचा दूर ' चित्रकूट ' नांवाचा एक सुंदर पर्वत आहे. तेथें आपल्याला सर्व तऱ्हेचें सुख होईल. तेथें फळें व पाणी हीं उत्तम आहेत. आपण येथें राहिलांत तर सर्वांत उत्तम आहे. पण येथें जर आपण राहूं शकत नसाल, तर तेथेंच जा. '

याप्रमाणें राहण्याच्या स्थलाविषयीं निश्चय ठरल्यावर थोडा वेळ पर्यंत बोलत बसून रामचंद्र झोंपीं गेले. प्रातःकाळीं उठल्यावर नि-

त्यकर्में आटोपून त्यांनीं भारद्वाज ऋषी जवळ पुढें जाण्याकरितां परवानगी मागितली, आणि नंतर ते त्रिवर्ग चित्रकूटाकडे रवाना झाले. मुनि व त्यांचे शिष्य आपली कृपा दाखविण्याकरितां कांहीं दूरपर्यंत त्यांस पोंचवावयास आले. यमुनेच्या तिरीं येतांच लक्ष्मणानें कांहीं वाळलेलीं लांकडें गोळा करून तीं एकेठिकाणीं बांधून तिची तर तयार केली; व तिच्यामध्यें हिरवींगार पानें घालून सीतेला बसण्याकरितां एक खुर्चीं केली. त्या तरींवर त्रिवर्ग बसून हलकें हलकें यमुनेच्या दक्षिण तीरावर येऊन उतरले. याप्रमाणें यमुना नदीपार होऊन ते थोडे दूर गेले नाहींत तोंच त्यांस श्याम-नामक एक मोठा वडाचा वृक्ष दिसला. त्याच्या आसपास खूप शाखा पसरल्या होत्या, तो वृक्ष दुरून आकाशासारखा वाटे. त्या वृक्षाच्या निबिड छायेंत थोडा वेळ विश्रांति घेऊन व त्याची शोभा अवलोकन करून रामचंद्र पुढें गेले.

त्या श्यामवृक्षापासून पुढें कांहीं कोस चालून गेल्यावर त्यांस मनोहर असें एक निळें वन लागलें. तें वन फार सुंदर होतें. तेथें नानातऱ्हेचे फुलांचे ताटवे लागले होते. सीतेला फुलांची आवड किती आहे, व सृष्टिसौंदर्य पाहण्याची तिला किती गोडी आहे, हें रामचंद्रास चांगलें माहित होतें. यामुळें ते लक्ष्मणाला म्हणाले–' लक्ष्मणा, मैथिली ज्या प्रकारचीं फुलें व जी कांहीं वस्तू मागेल ती तिला ताबडतोब आणून देत जा. तिची कोणचीहि इच्छा मनांतल्यामनांतच राहील असें करूं नकोस, व होऊंहि नये. रामचंद्र असें सांगत आहेत, तोंच तें रमणीय वन लागलें. त्याच्यांत असे मोठमोठे वृक्ष होते, अशा सुंदर लता होत्या, व असे मोठमोठे गुल्म होते कीं, तसे सीतेनें पूर्वीं कधींहि पाहिले नव्हते. ते पाहून तिला मोठी प्रसन्नता वाटली. ती जेव्हां जेव्हां अदृष्टपूर्व अशा वृक्षांचीं वगैरे नांवें विचारी तेव्हां रामचंद्र तिला

योग्य उत्तरें देऊन संतुष्ट करीत. कोणचेंहि फूल, एखादें नवीन पान तिला हवेंसें वाटलें कीं, लक्ष्मण तिला तें चटदिशीं आणून देत असे. याप्रमाणें सर्व दिवसभर वनांत फिरून तेथील गोडगोड फळें खाऊन तिघांनीं आपली क्षुधाशांत केली. त्या वनांत एक मनोहर नदी वहात होती, त्या नदीच्या किनाऱ्यावर त्यांनीं ती रात्र घालविली.

प्रात:काळ झाल्यावर पुन्हां त्यांनीं मार्ग चालण्यास आरंभ केला. लवकरच ते चित्रकुटाजवळ येऊन पोहचले. चित्रकूट पर्वत रमणीय होता. तेथें फळें व फुलें पुष्कळ होतीं. तेथील पाणी फारच चांगलें व पाचक होतें. असंख्य ऋषि व मुनि तेथें निवास करीत होते. कुठें नदी वहात आहे, तर कोठें झरे दृष्टीला पडत. कोठें गुहा, तर कोठें खडक, तर कोठें सपाट मैदान नजरेस पडे. कोठें सुगंधी फुलें फुललीं होतीं तर कोठें सघन वृक्षाची ओळच्या ओळ दिसे. कोठें नानातऱ्हेच्या लता वाऱ्याच्या झुळुकेबरोबर डोलत होत्या. कोठें सरोवरांत कमळें फुललीं असून भुंगे या फुलांवरून त्या फुलांवर उडत होते. रामचंद्रांनीं त्या वनांत प्रवेश केला तेव्हां वसंत ऋतु होता. यामुळें वृक्ष फुलांनीं भरून विस्तवासारखे चमकत होते. कोठें कावळे काव काव करीत होते, तर कोठें हत्तींच्या झुंडीच्या झुंडी एका गर्द झाडींत फिरत होत्या. त्यावेळची वनाची शोभा काय विचारावी? एक तर चित्रकूट नेहमींचाच शोभादायक, त्यांत वसंत ऋतु, मग काय! यामुळें त्याची शोभा द्विगुणीत झाली होती.

रामचंद्राबरोबर फिरून फिरून सीतेनें वनाची पुष्कळ शोभा पाहिली. ती पाहून तिला अत्यंत हर्ष झाला. वनाची कमनीय शोभा पाहून सीतेचें हृदय प्रफुल्लित झालें. तिचें सुकलेलें मुखकमल विकसित झालें. मार्ग चालतांना तिला जो थकवा आला होता, तो यामुळें पार नाहींसा झाला. त्या वनाची शोभा पाहून मार्गांतील

क्लेश ती विसरून गेली. वनाची शोभा पहाण्यांत ती इतकी गर्क झाली होती कीं, ती केव्हां रामचंद्राच्या मुखाकडे पाही, तर केव्हां त्या वनाकडे अवलोकन करी. इकडे तर वनाची शोभा व दुसरीकडे पतीचें मुखारविंद पाहून सीतेला आनंद वाटला. याप्रमाणें चालतां चालतां तीं सर्वजण वाल्मिकी ऋषीच्या आश्रमांत येऊन पोहचलीं. रामचंद्राला भेटून महर्षि प्रसन्न झाले. त्यांनीं वन्य फलमूलांनीं त्या तिघांचा सत्कार केला.

ज्या आदि कवीच्या पीयूषवर्षाणि लेखणींतून ही पवित्र रामकथा निघून भारतवर्षांतील प्रत्येक मनुष्याच्या कर्णकुहरांत शिरून अमृताचा वर्षाव करून व प्रतिदिवशीं कोट्यवधी हिंदु लोकांना साधुता, सत्यपरायणता, आणि पवित्रता यांचा उपदेश करून संसारांत धर्माचा विस्तार करीत आहे, त्या कविकुल शिरोमणी महार्षि वाल्मिकी मुनीच्या आश्रमांत महात्मा रामचंद्राचें आगमन होणें, या मुळें मनांत एक प्रकारचा अद्भुत भाव उत्पन्न होतो. आतांपर्यंत भगवान वाल्मिकी मुनि क्रौंच पक्षाच्या वधानें दुःखी होऊन त्यांच्या मुखांतून अकस्मात सुललित श्लोकाचा उच्चार झाला नाहीं, आतांपर्यंत त्यांच्या विमल अंतःकरणांत रामायणाची कथारचना करण्याचा संकल्प प्रादुर्भूत झाला नाहीं व आतांपर्यंत तो सत्यवती वनचारी राजकुमार अतिथि, जगांत त्यांची कीर्ति कौमुदी पसरविण्याला पुढें मुख्य कारण होईल ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींहि आली नाहीं. असें जरी धरून चाललें, व असा संभवहि आहे कीं, वाल्मिकीना त्या वेळेस रामचंद्राची असाधारण पितृभक्ति, व धार्मिक श्रद्धा पाहून एका अपूर्व अनुभवाचा आनंदलाभ झाला. हेंही होऊं शकेल कीं, पतिबरोबर वनांत विहार करणारी, पातिव्रत्याची प्रत्यक्ष मूर्ति, नवयौवना जी सीता तिचें दर्शन प्रथम होतांच त्यांनाही जणू काय ही कोणी साक्षात् देवीच आहे असें वाटलें; व महातेजस्वी लक्ष्मणाची असा-



पर्णकुटीदर्शन.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

धारण भ्रातृभक्ति पाहून त्यांस अनिर्वचनीय आनंद झाला, हेंही एक कारण असेल ! परंतु यांच्याबरोबर व यांच्या जीवन आणि नामाबरोबर आपला शाश्वत संबंध जोडला जाईल, या गोष्टीची अद्यापि त्यांना कल्पनाहि नव्हती. त्याचप्रमाणें जोंपर्यंत चंद्रसूर्य राहतील व भारत वर्षांत एक तरी आर्य अवशेष राहील तोंपर्यंत यांचा व आपला अच्छेद आणि अढळ संबंध राहील, ही गोष्ट एकवारहि त्यांच्या मनांत आली नाहीं. तसेंच महर्षि वाल्मिकी मुनीच्या ओजस्विनी लेखणींतून आपलें चरित्र आदिकाव्य रूपानें लिहिलें जाऊन प्रत्येक सुजन आपल्या तोंडानें रामनाम गाऊन आपल्या जन्माची सफलता समजेल, इतक्या तें योग्यतेचें होईल, याहि गोष्टीची कल्पना स्वतः रामचंद्राच्या मनांत आली नसेल. ते तर आपली धर्मपत्नी व कनिष्ठभ्राता लक्ष्मण यांच्यासह पित्याच्या आज्ञेचें पालन करण्याकरितां वनांत आले होते, व येतां येतां अकस्मात वाल्मिक मुनीच्या आश्रमांत येऊन पोहचले होते. मुनीनें त्यावेळीं राजभक्ति, अतिथि पूजा या कर्तव्यानें खरोखरच प्रेरित होऊन त्यांचा सत्कार केला. अस्तु.

त्या रमणीय चित्रकूटावर पोहचतांच रामचंद्राचेंहि मन प्रसन्न झालें. सीतेची इच्छा पाहून त्यांनीं तेथेंच कांहीं दिवस राहण्याचा निश्चय केला. वडील बंधूच्या आज्ञेप्रमाणें लक्ष्मणानें तेथें एक सुंदर कुटी तयार केली. ती कुटी त्यानें काड्यांची बनविली. वर मोठमोठीं पानें घालून ती आच्छादून टाकिली. त्या कुटींत अग्निहोत्र करण्याकरितां त्यानें एक वेदीही तयार केली. लक्ष्मणानें तयार केलेली ती कुटी पाहून रामचंद्र प्रसन्न झाले. ते मग त्या कुटींत राहूं लागले. लक्ष्मणहि श्रद्धा भक्तीनें त्यांची तेथें सेवासुश्रुषा करून आपल्या जन्माचें साफल्य समजूं लागला.

चित्रकूट पर्वतावर कुटींत राहून सीतेला तेथील शोभा पाहून प्रति दिवशीं आनंदाचा लाभ होऊं लागला. ती रोज आपले इच्छे-

प्रमाणें पतीबरोबर गुहा, दाट झाडी व झरे पाहून आपलें मनोरंजन करी. त्या मनोहर वनाला व पवित्र आश्रमालाच आपलें नेहमींचें निवासस्थान समजून ती आनंद प्राप्त करून घेऊं लागली.

बरें, आतां आपण रामचंद्र वगैरेंना चित्रकुटावर सोडून थोडा-वेळ अयोध्येकडे वळूं. रामचंद्राच्या वियोगानें राजा दशरथाची व त्याच्या राज्याची काय स्थिति आहे ती पहा !

वर आह्मीं लिहिलेंच आहे कीं रामचंद्राला गंगाकिनाऱ्यावर सोडून त्यांच्या आज्ञेप्रमाणें सुमंत अयोध्येस परत यावयास निघाला. ज्यावेळेस तो अयोध्येस पोंहचला, त्यावेळेस रामचंद्राचा वनवास पक्का ठरला; म्हणजे अयोध्यावासी लोक त्याला पाहतांच अत्यंत शोकाकुल झाले. त्यावेळेस राजा दशरथाला जेवढें दुःख झालें असेल, तेवढें दुसऱ्या कोणालाहि झालें नसेल. ते तर नेहमीं विलाप—संताप करून करून अगदीं भ्रमिष्ट झाले. विलाप करणाऱ्या राण्यांना—त्यांतून मुख्यतः कौसल्येला म्हणाले ‘ आतां माझा अंतकाळ जवळ आला आहे. माझ्या लाडक्या रामाच्या वियोगानलांत मी फार दिवस जगत नाहीं. ’ त्यावेळीं राणी कौसल्येसहि कांहीं कमी दुःख नव्हतें; परंतु आपल्या प्रबल शोकावेगाला तसेंच धैर्यानें आंवरून धरून ती राजाची समजूत करूं लागली. तिनें परोपरीनें त्याची पुष्कळ समजूत केली. परंतु राजाचें विरहानलदग्ध हृदय कौसल्येच्या शीतल वाक्यांनींहि शांत झालें नाहीं. पुत्रनिर्वासनाच्या सहाव्या रात्रीं राजा दशरथाचे प्राणरूपी पक्षी ‘ राम राम ’ म्हणत गगनमंडळांत उडून गेले.

महाराज दशरथाचें प्राण विसर्जन झाल्याचें कोणालाच कळलें नाहीं. कारण ती वेळ मध्यरात्रीची होती. त्यावेळीं सर्व राण्या दुःखमग्न झोंपेंत होत्या. प्रातःकाळ झाला तेव्हां रोजच्या प्रमाणें सूत, मागध, बंदीजन द्वारावर येऊन राजाचें मंगल स्तुति-गान

करूं लागले. त्या वेळेस राजद्वारावर इतका कोलाहल झाला कीं तो ऐकून वृक्षांवरील पक्षीहि जागे झाले. तेहि आपल्या कलकलरवानें जणूं काय भूपतीला जागे करीत आहेत, असें वाटलें.लोक भगवंताचें नांव घेऊन स्तोत्रें म्हणूं लागले. वीणा वाजत होता. राजाच्या स्नानाकरितां दासी पाणी घेऊन आल्या. त्यांनीं स्नानगृहांत आंघोळीची तयारी केली. हें सर्व झालें; परंतु प्रातःकाळ झाला तरी सुद्धां जेव्हां राजा जागा होईना, नित्यकृत्यें करण्याची वेळ टळून गेली, तेव्हां राण्या घाबरून जाऊन राजाच्या शय्येजवळ गेल्या. तेथें जाऊन पाहतात तों त्यांच्या हाताला राजाचें शरीर थंडगार लागलें; त्याबरोबर त्यांना विजेचा धक्का बसल्यासारखें झालें. लक्षपूर्वक पाहिलें तों राजाचा देह निर्जीव झाला असें त्यांस आढळून आलें. विपत्तीवर विपत्ति पाहून त्या सर्व घाबरून गेल्या. राजा दशरथाची परलोक गमनाची वार्ता सर्व अयोध्येभर हां हां म्हणतां पसरली. सर्वत्र हाःहाःकार उडून गेला. चहुंकडे शोक सागराच्या लाटा उसळूं लागल्या; सर्व अयोध्यावासी जन आपलीं कर्तव्यकर्में विसरून दुःखांत चूर होऊन गेले. भरत व शत्रुघ्न आपल्या मामाच्या घरीं गेले होते. तेथें त्यांना इकडील कांहींच वर्तमान ठाऊक नव्हतें. राजा दशरथाची अंतेष्टि-क्रिया करण्याकरितां जवळ एकही पुत्र नसावा, अं ? केवढी आपत्तीची वेळ ती ?

मुनिराज वसिष्ठांच्या आज्ञेनुसार राजाचा मृतदेह तेलाच्या कढईत ठेवण्यांत आला; व भरताला बोलाविण्याकरितां एका दूताला सत्वर पाठविण्यांत आलें. दूत लवकरच कैकेय देशास जाऊन पोहचला. ' गुरुजींची आपणांस अशी आज्ञा आहे कीं, ' आपण लवकर अयोध्येस चलावें. ' एवढेंच दूतानें भरताला सांगितलें. हे त्याचे शब्द ऐकतांच भरत शत्रुघ्नासह अयोध्येस येण्यास निघाला. इतक्या तांतडीनें कां बोलाविलें म्हणून भरताला संदेह वा-

टला. अयोध्येंत पोहोंचतांच जिकडे तिकडे दुःखमय स्थिति पाहून त्यांचें हृदय भीतीनें धडधडूं लागलें. मार्गांत कित्येक वेळां भरतानें दूताला विचारलें, पण त्यानें कांहींच वर्तमान सांगितलें नाहीं. कारण वसिष्ठांनीं त्याला कांहीं बोलूं नको म्हणून ताकीद केली होती. अस्तु. ज्या वेळेस व्याकुळ चित्त होऊन भरत आपल्या मातेच्या मंदिरांत जाऊन पोहोंचला, त्या वेळेस सर्वांच्या अगोदर दशरथ व रामचंद्र यांचा कुशल समाचार त्यानें कैकयीस विचारिला· तिनें त्याला त्याचें उत्तर न देतां आपल्या पित्याचें व इतर मंडळींचें कुशल विचारलें. त्यानंतर तिनें रामविरहामुळें राजाच्या मृत्यूचें व रामवनवासाचें समग्र वर्तमान त्यांस सांगितलें. धर्मात्मा भरत हें हृदयविदारक वर्तमान ऐकतांच मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला. पुष्कळ वेळानंतर जेव्हां तो सावध झाला तेव्हां पापिणी कैकयीला दोष देऊं लागला. सर्व अनर्थाचें मूळ ही मंथरा असें जाणून त्यानें तिला कडक शासन केलें. त्या वेळेस शत्रुघ्नानें तिच्या कुटिलतेचें व कुचाळीचें तिला चांगलें फळ दिलें. गुरु वसिष्ठ व मंत्री यांनीं एकत्र होऊन राजाचा अंत्य संस्कार करावयास भरतास सांगितलें. त्यांच्या सांगण्याप्रमाणें कसें बसें दुःख आंवरून त्यानें राजाची क्रिया केली. चंदनादि सुगंधित द्रव्यांनीं राजा दशरथाचा प्रतापी देह अग्नींत भस्म होऊन पंच महाभूतांना मिळाला. जें राजशरीर कांहीं दिवसांपूर्वीं राजकीय उपभोगानें धन्य म्हणविलें जात असे त्याची आज राख होऊन गेली. भरतानें पित्याचें अंत्य कर्म केलें खरें, पण तो शोकमग्न असल्यामुळें त्याला दिवसाभोजन व रात्रीं निद्रा हीं माहीत नव्हतीं. रात्रंदिवस पित्याचा मृत्यु व रामाचें वनवासास जाणें या शोकामुळें त्याचें हृदय जळत असे.

राजा दशरथाची अंत्य क्रिया झाल्यावर गुरुवसिष्ठांनीं व मंत्र्यांनीं त्यास राजतिलक करण्याविषयीं पुष्कळ वेळां सांगितलें. सचिवांनीं

त्याची समजूत केली. पण त्यानें राज्याभिषेक करून घेण्याचें कबूल केलें नाहीं. भरताला सर्वांनीं परोपरीनें सांगितलें तरी सुद्धां त्यानें या बाबतींत कोणाचेंहि ऐकिलें नाहीं. यापेक्षां भरताची धर्मात्मता ती आणखी कशी असावी ! तो खरा खरा धर्मात्मा होता. ज्येष्ठ बंधू असतां कनिष्ठ बंधूला कदापिही राज्य मिळत नाहीं, हें त्यास पूर्णपणें माहित होतें, यामुळें ज्येष्ठ बंधू असतां आपण राज्य सिंहासनावर बसणें त्यास आवडेना. त्यानें सर्वांना स्पष्ट उत्तर दिलें कीं ज्या धर्मपालनाकरितां माझ्या पित्यानें रामाला वनवास भोगायला लाविलें, व त्याच्या वियोगामुळें मृत्यु देखील पसंत केला, ज्या धर्मरक्षणाकरितां सर्व प्रिय रामचंद्रहि राज्य सोडून व मुनिवेष धारण करून वनाला गेले, ज्या धर्मसंरक्षणाकरितां सीतादेवीनें आपल्या स्वामीकरितां वनांत गमन केलें, व ज्या धर्मरक्षणाकरितां महावीर लक्ष्मणहि बंधूचे अनुगामी झाले, त्या धर्माचा मी कसा त्याग करूं ! मी धर्मशास्त्राचें अध्ययन व परिशीलन केलें नाहीं काय ! काय, मी राजा दशरथाचा पुत्र नव्हे, किंवा धर्मधुरंधर रामचंद्राचा लहान भाऊहि नाहीं! धर्माविरुद्ध कोणतेंहि काम करून राजा दशरथ व महात्मा रामचंद्र यांना मी कलंक लावूं इच्छित नाहीं.

शेवटीं भरतानें सर्वांच्या संमतीनें ' रामचंद्राला परत आणून राज्यावर बसवूं व आपण त्याची सेवा करून जन्मसाफल्य करूं ' असें ठरविलें. असा विचार करून भरत वनांत जाण्यास निघाला. त्याच्याबरोबर रामचंद्राला भेटण्याकरितां पुष्कळ लोक निघाले. राजगुरु राजमंत्री, माता व अन्यान्य अयोध्यावासी अनेक स्त्रीपुरुषहि निघाले.

वाटेनें चालतांना भरताला मुळींच क्लेश वाटले नाहींत. रामचंद्र जेथें जेथें थांबले तीं तीं स्थळें पाहून भरताला दुःख वाटे. वाटेंत गुहाला भेटून भरत जेव्हां भारद्वाज ऋषीच्या आश्रमांत पोहचला, तेव्हां

त्याचा व त्याच्या परिवाराचा त्यांनीं चांगला आदर सत्कार केला. ऋषीच्या आदरातिथ्यानें सर्व लोक संतुष्ट झाले. नंतर तेथून भारद्वाज ऋषींनें दाखविलेल्या मार्गानें तो लवकर चित्रकूट पर्वतावर जाऊन पोहचला. तेथें पोहचतांच भरतानें सर्व सैन्य दूर ठेविलें. फक्त शत्रुघ्न, सुमंत, मंत्री व गुह यांना बरोबर घेऊन भरत एकटाच रामचंद्राकडे जाण्यास निघाला. ज्यावेळेस भरताचें सैन्य त्या वनांत जाऊन पोंहचलें, त्यावेळेस याच्या गर्दीनें व कोलाहलानें तेथील पशु पक्षी वाट फुटेल तिकडे पळत सुटले. ती गर्दी पाहून रामचंद्रांनीं त्याचें कारण लक्ष्मणास विचारिलें. ' कदाचित् भरत येत असेल, असें लक्ष्मणानें पाहून सांगितलें. ते असे आपसांत बोलत आहेत तोंच भरत येऊन पोहचला. तेथें येतांच त्यानें रामचंद्राच्या चरणावर मस्तक ठेविलें रामचंद्राचा मुनिवेष व पित्याचा मृत्यु आठवून तो रडूं लागला. त्यावेळेस भरताचा कोणता वेष होता, हें आपणास माहित आहे काय? तोहि रामचंद्राप्रमाणें मुनिवेशांतच होता. त्या वेळेसच काय, पण जेव्हां रामचंद्र मुनीप्रमाणें वेष धारण करून वनांत गेले असें ऐकिलें, तेव्हांच त्यानें राजकीय थाट सोडून देऊन मुनीचीं चिरवल्कलें धारण केलीं. पितृवियोग व भ्रातृनिर्वासन याच्या योगानें भरताला फार दुःख झालें. तो त्यामुळें अगदीं दुर्बल होऊन गेला होता. या कारणानें रामचंद्राला त्याला एकदम ओळखण्याची देखील पंचाईत पडली. रामचंद्रांनीं भरताला हृदयाशीं कवटाळून धरिलें. नंतर त्यांनीं त्याला कुशल समाचार विचारिला. भरताच्या तोंडून पित्याचा स्वर्गवास ऐकून रामचंद्राला अपार दुःख झालें. ते दुःखानें विलाप करूं लागले.

भरत शत्रुघ्नाला भेटून ते तेथेंच बसले होते, इतक्यांत कौसल्यादि मातांना घेऊन वसिष्ठहि तेथें येऊन पोहचले. त्या वेळेस सीतेची दशा अंतःकरणाला दयेचा पाझर फोडणारी होती. भूक,



पादुकाप्राप्ति.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

तहान, व ऊन सहन करण्यानें ती दुर्बल व मलीन झाली होती. ती इतकी कीं तिला पाहतांच कौसल्येच्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. आपल्या सासऱ्याच्या परलोकगमनाचें वर्तमान ऐकून सीतेलाहि फार दुःख वाटलें. ते परस्परास भेटून जेव्हां त्यांचा दुःखवेग जरा कमी झाला, तेव्हां भरतानें रामचंद्राला अयोध्येला परत चलण्याविषयीं विनयपूर्वक प्रार्थना केली. त्या वेळेस तेथें हजर असलेल्या सर्व मंडळींनींहि त्याच्या प्रार्थनेला अनुमोदन दिलें; परंतु सत्यव्रती, सत्यसंघ, धर्मधुरंधर, पित्याचे अनन्य भक्त, रामचंद्रानें त्याची ती प्रार्थना मान्य केली नाहीं. त्यांनीं भरतालाच राज्य पालन करण्यास सांगितलें. त्यांनीं शेवटीं सर्वांस सांगितलें कीं, पित्याची आज्ञा भंग करून स्वतःला व पित्याला मी पापाचे अधिकारी करीत नाहीं. ज्या सत्य धर्माचें पालन करण्याकरितां पित्यानें स्वर्गाचा मार्ग पतकरला, तो सत्य धर्म मला पाळलाच पाहिजे. शेवटीं भरतानें जेव्हां पाहिलें कीं कांहीं केल्या रामचंद्र अयोध्येला परत येत नाहींत, तेव्हां तो नम्रपणानें म्हणाला ‘ महाराज ’ जर आपण पित्याच्या आज्ञापालनाकरितां घरीं येत नाहीं, तर आपल्या चरणपादुका मला द्या. त्या मी आज सिंहासनावर स्थापून आपला प्रतिनिधि या नात्यानें राज्याचें काम चालवीन. सर्वांची तशीच इच्छा पाहून रामचंद्रांनीं आपल्या खडावा काढून भरताला दिल्या. डोळे अश्रूंनीं भरून आले आहेत, अशा स्थितींत त्या घेऊन त्यानें रामचंद्राचा निरोप घेतला. रामचंद्र, लक्ष्मण व सीता यांनीं सासू, गुरु, व मंत्री यांना नमस्कार केला. अखेर ते सर्व राम, लक्ष्मण व सीतादेवी यांना त्या घोर वनांत एकटे सोडून अयोध्येला परत गेले. अयोध्येला पोहचतांच भरतानें रामचंद्राच्या खडावा राज्य सिंहासनावर स्थापन केल्या व आपण अयोध्येच्या बाहेर नंदीग्रामांत मुनीवेष धारण करून राज्यकारभार पहात राहिला.

तिसरें कांड.

विराधवध, पंचवटीनिवास, व सीताहरण.

आतां चित्रकूटाच्या वृत्तांताकडे वळूं. भरत अयोध्येस परत गेल्यावर रामचंद्र, सीता लक्ष्मणासह त्या चित्रकूटावरच राहूं लागले. एके दिवशीं रामचंद्रानीं पाहिलें कीं बरेच तपस्वी, ऋषि व मुनि आपापसांत कांहीं कुजबुजत आहेत. त्यांच्या भाषणाकडे त्यांचें अधिक लक्ष वेधण्याचें कारण कीं, ते लोक मधून मधून त्यांचें नांव घेऊन त्यांच्याकडे अंगुलीनिर्देश करीत. रामचंद्रांनीं शंकित होऊन ' आपण सर्वजण कसला विचार करीत आहांत, ' असें त्यांपैकीं एका मुनीला हांक मारून विचारिलें. ' आपल्यापासून तर या लोकांना कांहीं त्रास पोंचत नाहीं ना, ' अशीहि त्यांना भीति वाटली. त्यांना विचारतांच त्यांची ती शंका दूर झाली खरी; पण आम्हांला राक्षसांपासून उपद्रव होतो, असें त्यांनीं सांगितलें. ते जीं कांहीं यज्ञयागादिक धार्मिक कृत्यें करीत, त्यांत राक्षस विघ्नें आणीत. खर, दूषण, वगैरे राक्षसांपासून सुरक्षित राहण्यास काय उपाय करावा, याचा विचार करण्याकरितां ते सर्व मुनि एकत्र जमले होते, व तें स्थान सोडून दुसरीकडे जाण्याचा त्या सर्वांचा विचार चालला होता. ते सर्व मुनि येथून जाणार म्हणून रामचंद्रासही वाईट वाटलें. त्यांनींही लगेच दुसरीकडे जाण्याचा निश्चय केला. बरेच तपस्वी तर लगेच निघूनहि गेले. परंतु त्यांच्यापैकीं जे जरा अधिक विचारशील, दूरदर्शी, आणि रामचंद्राचा पराक्रम जाणणारे होते, ते रामचंद्राच्या बाहुबलावर व पराक्रमावर विश्वास ठेवून तेथेंच राहिले. रामचंद्र व लक्ष्मण दोघेहि महाबली आहेत, यांच्या आश्र-

योनें राहण्यांत कोणत्याच प्रकारचें भय नाहीं, असेंच त्यांना वाटत होतें.

चित्रकूटावर आल्यापासून सीतेनें रामचंद्राची सेवा मोठ्या श्रद्धेनें व भक्तीनें केली. त्यामुळें रामचंद्र फार प्रसन्न झाले. रामचंद्र संतुष्ट झालेले पाहून सीतेच्या हर्षाला सीमा राहिली नाहीं. तिनें तेथील वनश्री व पवित्रस्थानें फिरून पाहिलीं; त्यांची शोभा पाहून तिला आनंद वाटला. भरताच्या सेनेची छावणी तेथें पडून हत्ती, घोडे यांच्या फिरण्यानें तेथील तृणानें परिपूर्ण असलेल्या प्रदेशाची शोभा पुष्कळच कमी झाली होती. त्यामुळें तें स्थल सोडून दुसरीकडे जाण्याचा रामचंद्रानीं पक्का विचार केला. शिवाय तें वन सोडून जाण्याला त्यांना आणखींहि पण बरींच कारणें होतीं. त्यांच्या माता, आणि बंधु भरत, ही मंडळी त्यांस तेथूनच भेटून परत गेल्यामुळें, तेथें त्यांच्या मनाला उल्हास वाटेनासा झाला होता. ज्या ठिकाणीं एखादी दुःखदायक गोष्ट घडून येते, ती जागा मग एखाद्याला भयानक व शून्य वाटूं लागते. तेथें राहण्याला मन घेत नाहीं. निरुपायानें त्याला ती जागा सोडावी लागते, व असें होणें ही गोष्ट स्वाभाविक आहे. तीच अवस्था यावेळीं रामचंद्राची झाली. ज्या ठिकाणीं त्यांनीं पित्याचा हृदयविदारक निधनवृत्तांत ऐकिला, व अपार शोक केला, ज्या ठिकाणीं भरत, गुरुजन, आणि माता यांच्याबरोबर सजल नयनांनीं गोष्टी केल्या, तें स्थान त्यांना शांतीदायक वाटेल काय? नाहीं, केव्हांहि वाटणार नाहीं. ते जोंपर्यंत तेथें राहतील, तोंपर्यंत त्यांस स्वजनांचें स्मरण वारंवार होणार, आणि तें जोंपर्यंत होणार तोंपर्यंत त्यांच्या चित्ताला स्वास्थ्य मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां या स्वजनस्मरणरूप दुःसाध्य रोगाची तें स्थान सोडणें, हीच चिकित्सा होती. यामुळेंच त्यांनीं या सर्व गोष्टींचा विचार करून तें स्थान सोडण्याचा दृढ संकल्प केला.

नंतर सीता देवीला व लक्ष्मणाला बरोबर घेऊन रामचंद्र चित्रकूटाहून निघाले ते अत्रिऋषींच्या आश्रमास येऊन पोहचले. अत्रिऋषि मोठे महात्मा व वृद्ध होते. त्यांच्या स्त्रीचें नांव अनसूया होतें. ती महान पतिव्रता व धर्मपरायण स्त्री होती. ती नेहमीं पतीजवळ राहून त्याची सेवा, सुश्रुषा करीत होती. ती मोठी विदुषी होती. धर्मशास्त्राचें मर्म ती उत्तम रीतीनें जाणत होती. ती पतीसह यमनियमांचें साधन करून ईश्वरभजन करीत असे. महर्षि अत्रीच्या मनांत आपल्या पत्नीसंबंधानें अत्यंत आदर असून तीं दोघें मोठ्या प्रेमानें रहात असत.

अत्रीऋषींच्या आश्रमांत पोहचतांच रामचंद्रास समोरच अनसूया दिसली. अनसूया वृद्ध होती, त्यामुळें तिचें केंस शुभ्र झाले होते. ती महान तपःस्विनी होती. रामाच्या आज्ञेवरून सीता तिच्याजवळ गेली. सीतेनें तिला आपलें नांव सांगून नमस्कार केला. अनसूयेनें तिला आशीर्वाद देऊन कुशल समाचार विचारिला. तिचें कुशल विचारिल्यावर ती सीतेला उपदेश करूं लागली. ती म्हणाली: —

" त्यक्त्वा ज्ञातिजनं सीते मानवृद्धिंच मानिनि ।
अवरुद्धं वने रामं दिष्ट्या त्वमनुगच्छसि ॥
नगरस्थो वनस्थो वा शुभो वा यदि वाशुभः ।
यासां स्त्रीणां प्रियो भर्ता तासां लोका महोदयाः ॥
दुःशीलः कामवृत्तो वा धनैर्वा परिवर्जितः ।
स्त्रीणामार्यस्वभावानां परमं दैवतं पतिः ॥
त्वाद्विधस्तु गुणैर्युक्ता दृष्ट लोक परावराः ।
स्त्रियः स्वर्गे चरिष्यन्ति यथा पुण्यकृतस्तथा ॥
तदेवमेतें त्वमनुव्रता सती, पतिप्रधाना समयानुवर्तिनी ।
भव स्वभर्तुः सहधर्मचारिणी, यशश्च,धर्मश्च ततः समाप्स्यसि॥."

(वा. रा. कां. २ सर्ग ११७).



अनसूया-प्रीतिदान.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

' हे सीते, तूं घरदार, धनदौलत, आप्तस्वकीय या सर्वांना ोडून वनवासी रामचंद्राबरोबर फिरत आहेस, ही मोठ्या आनं- ाची गोष्ट आहे. कारण पति नगरांत फिरत असो, अथवा वनांत असो, तो चांगला असो किंवा वाईट असो, स्त्रीनें नेहमीं त्याची ूजाच केली पाहिजे. जी स्त्री कोणत्याहि दशेंत पतीला पूज्य ानते, ती मोठी भाग्यवान् होय, म्हणून समजावें. तिला पुढील जन्मीं ार सुख मिळतें. शास्त्राचें म्हणणें हेंच आहे कीं ' पति कितीहि ाईट स्वभावाचा असो, तो कितीहि स्वेच्छाचारी होवो, तो कितीहि निर्धन असो, तो उत्तम स्वभावाच्या स्त्रीला देवाप्रमाणेंच आहे. हे सीते, ू खरी पतिव्रता व पतिपरायण हो. तुझ्याप्रमाणें पतिसेवा करणाऱ्या स्त्रिया पुण्यलोकाला प्राप्त करून घेतात. एवढ्याचकरितां हे जानकी, ू पतीच्या अनुकूलतेप्रमाणें राहून त्याची खरी सहधर्मिणी हो. शी वागलीस म्हणजे तुला यश व धर्म हीं दोन्हीं प्राप्त होतील."

अहाहा, किती सुंदर, अनुपम, उपदेश आहे. किती अमूल्य शिक्षण आहे. पातिव्रत्य धर्माचा असा उच्च आदर्श संसारांत कुठेंच देसत नाहीं. जर त्या धर्मपंथावर चालून स्त्री आपल्या कर्तव्याचें ालन करील, तर ती साधारण स्त्री खास नव्हे. ती साक्षात् लक्ष्मीच ोय. आम्ही तिला देवीप्रमाणेंच मानतों. ज्या स्त्रियांनीं या उप- ेशाप्रमाणें आपलें पातिव्रत्याचें व्रत चालविलें असेल, त्या स्त्रियांना र्व जग लक्ष्मी, सरस्वती, समजूनच हाक मारील. पातिव्रत्य ध- र्माचें रक्षण करणाऱ्या स्त्रिया जगाचें भूषण आहेत. ज्या देशांत सल्या पतिव्रता स्त्रिया जन्म घेतात, तो देश धन्य होय. देव करो, आणि या उपदेशानुसार आजकालच्या स्त्रियाहि आपल्या धर्माचें पा- न करण्याचें कर्तव्य समजोत. ईश्वर करो, व प्राचीन कालच्या ुवतींप्रमाणें वर्तमानकालच्या युवतीहि या उपदेशाला कंठहार ानून तो सदैव धारण करोत.

एखाद्या मनुष्याला ज्या विषयाचें विशेष ज्ञान असतें, ज्याबद्दल त्याला अत्यंत प्रेम वाटतें, व जो त्याला आपल्या प्राणासारखा आवडतो, त्या विषयासंबंधानें जर त्याला कोणी अधिक माहिती सांगितली, किंवा उपदेश केला, तर त्याच्या मनांत एक अद्भुत भावना उत्पन्न होते. माता ही प्रेमाची खाण आहे. तिला प्रेमाची व स्नेहाची साक्षात् मूर्ति म्हणतात. त्या मातेला जर कोणी मातृप्रेमासंबंधानें उपदेश करूं लागलें, तर तिच्या मनांत जसा एक प्रकारचा अद्भुत भाव उत्पन्न होतो, तसाच भाव पतिव्रता व पतिपरायण स्त्रीला पातिव्रत्य धर्माचा उपदेश केला असतां तिच्या मनांत उत्पन्न होतो. तिच्या हृदयांत एक प्रकारची असहिष्णुता उत्पन्न होते. सीतादेवीची हीच स्थिति होती. तिनें जेव्हां पतिव्रता धर्माचा तो उपदेश ऐकिला, तेव्हां तिच्या हृदयाला तो असह्य झाला. तिला असला उपदेश ऐकून वाईट वाटत होतें, किंवा तिला तो आवडत नव्हता, असें नाहीं. तर सीतेला असल्या उपदेशाची अवश्यकताच नव्हती. ती पतिव्रताधर्माचें रहस्य पूर्णपणें जाणत होती. हें त्यांतलें मुख्य कारण होतें. वंदनीय अनसूयेच्या मुखानें पतिव्रताधर्माचा उपदेश ऐकून सीतेनें लागलेंच उत्तर दिलें कीं 'आर्ये, मी हा धर्म बालपणापासून शिकलें आहे. आतां अधिक तें काय शिकावयाचें आहे ? अहाहा, बाळपणींहि मिळालेल्या शिक्षणाचा प्रवाह कांहीं विलक्षण आहे. सीतेनें आपल्या स्वामीच्या चरणीं आपलें प्राण अर्पण केले, हेंच बालपणीं मिळालेल्या शिक्षणाचें फळ होय. सीता राज्यवैभवाचा त्याग करून आपल्या पतीची सेवा करीत फिरत होती हेंहि, त्याच शिक्षणाचें फळ होय. सीतेचे तेजस्विता, उच्च प्रकृति, धर्मभाव, आणि आत्मिक बल या तिच्या अंगच्या गुणांची कौतुक करावें तितकें थोडेंच ?

अनसूयेचा उपदेश ऐकून सीतेनें जें उत्तर दिलें, तें स्त्रियांनीं

ऐकण्यासारखें आहे, इतकेंच नव्हे तर तें त्यांनीं रात्रंदिवस मनन करण्यासारखेंच आहे.

सीता म्हणाली, ' देवी, आपण जो उपदेश केला तो फार मूल्यवान आहे. परंतु हे आर्ये, मला ही गोष्ट पक्की माहीत आहे कीं, स्त्रियांना एक मात्र गुरु पतीच आहे. त्याचप्रमाणें मला हेंहि माहित आहे कीं, पति दरिद्री असो, अथवा कुचरित्र असो, अचरित असो, स्त्रीनें त्याची सेवा केलीच पाहिजे. मग ज्या स्त्रीचा पति जितेंद्रिय, गुणाढ्य, दयाळु, धार्मिक व प्रीतिमान, धनाढ्य, आणि शूरवीर असेल, तिची गोष्ट तर विचारूंच नये ! मी ज्या वेळेस वनांत येण्यास निघालें, त्यावेळेस पूजनीय कौसल्या देवीनेंहि मला असाच उपदेश केला होता; व लहानपणीं माझी माता देखील मला असलाच उपदेश करी. तो मला नेहमीं आठवतो. मी त्याला विसरलें नाहीं. वास्तविक पतिसेवा हीच स्त्रियांची तपश्चर्या आहे, ही गोष्ट माझ्या मनावर माझ्या मातेनें पूर्णपणें बिंबविली आहे '

(वा. रा. कां. २. सर्ग ११८).

सीता देवीचे हे गंभीर विचार व पवित्र भाषण ऐकून अनसूया फार संतुष्ट झाली. तिनें प्रसन्न होऊन एक सुंदर माला, वस्त्र, आभूषण, व अंगराग वगैरे बऱ्याच वस्तु तिला पारितोषिक म्हणून दिल्या. त्या अंगराग नांवाच्या उटण्यानें सीतेच्या शरिराला व सीतेच्या शरिरामुळें त्या अंगरागाला फार शोभा आली. याप्रमाणें सीतादेवीचा सत्कार करून एकांतांत तिच्या स्वयंवराचा सर्व वृत्तांत अनसूयेनें तिच्याकडून ऐकून घेतला.

सूर्य अस्ताला गेल्यावर अनसूयेनें दिलेलीं वस्त्रभूषणें परिधान करून सीता रामचंद्राकडे गेली. ऋषिपत्नीनें दिलेलें तें प्रतिदान पाहून रामचंद्र फार संतुष्ट झाले. लक्ष्मणालाहि तिचा सत्कार केलेला पाहून आनंद वाटला.

प्रातःकाळ झाल्यावर आपल्या बंधु व स्त्रीसह रामचंद्र अत्रि ऋषिजवळ निरोप मागण्यास गेले. त्यांचा निरोप घेऊन ते भयंकर दंडक वनांत जाऊन पोहचले. तें वन सघन वृक्षांनीं व त्यापेक्षांही निबीड अंधकारानें भरलेलें होतें. पशु, पक्षी तेथें नेहमीं किलबिल करीत होते. कोठें सिंह, वाघ, अस्वलें, इत्यादि हिंस्र पशु हिंडत होते, तर कोठें महाभयंकर राक्षसांची झुंड प्राणिमात्राला भीति दाखवीत स्वच्छंदानें भ्रमण करीत होती. तर कोठें कोठें तपोधन ऋषींचे पवित्र आश्रम वनाची शोभा वाढवीत होते. त्रिवर्गांनीं त्या वनाची शोभा पाहून आपले नेत्र व मन सफल केलें. ते ज्या ज्या वनवासी तपस्व्यांच्या आश्रमांत गेले, त्यांनीं त्यांनीं त्यांचा मनापासून सत्कार केला.

सीतादेवी आतांपर्यंत वनाची शोभा पाहून मोहित झाली होती. तरी रोजच्या रोज दुसरें नवें वन पाहण्याची लालसा तिच्या मनांत अधिक वृद्धिंगत होत होती. वनांत आनंदीआनंद आहे; दुःखाचें नांव नाहीं, अशीच तिची आतांपर्यंत पूर्ण खात्री होती. वनवासांत केव्हां केव्हां भयंकर आपत्तिहि येत असते, अशी कल्पना तिच्या स्वप्नांत देखील आली नाहीं. पण एके दिवशीं तिला वाटलें कीं वनांत नेहमीं आनंदच मिळत नाहीं; तर केव्हां केव्हां मोठी आपत्तिही भोगण्याचा प्रसंग येतो.

एके दिवशीं प्रातःकाळीं सीता लक्ष्मणासह रामचंद्र एका तपस्व्याबरोबर बोलत चालले होते. ते जरा पुढें गेले असतील इतक्यांत एक भयंकर राक्षस त्यांच्या समोरून येतांना दृष्टीस पडला. त्याचें नांव विराध होतें. जवळ येतांच दोघां बंधुसमोर सीतेला उचलून त्यानें खांद्यांवर घेतलीं, आणि आपला मार्ग धरला. सीतेची ही दुर्दशा पाहून रामचंद्राला फार दुःख झालें. त्या वेळेस दोघां बंधूंनीं मोठ्या रागानें व कठोरपणानें त्याच्यावर बाणांचा वर्षाव केला.

त्यांच्या तीक्ष्ण बाणांच्या वर्षावानें व्यथित होऊन त्यानें सीतेला खालीं ठेविलें, आणि नंतर तो राक्षस त्यांच्या अंगावर धांवला. जवळ जातांच त्यानें त्या दोघांनाहि उचलून आपल्या खांद्यावर घेतलें. सीता तेथेंच रडत उभी होती. तिच्या समोर रामलक्ष्मणांना घेऊन त्या गहन वनांत तो लगेच दिसेनासा झाला. पतीची व दिराची ती दशा पाहून सीतेला अत्यंत दुःख झालें. तिला तेथें क्षणभरसुद्धां उभें राहवेना. तीहि मग रडत रडत राक्षसाच्या मागें जाऊं लागली. ती शोकविव्हल होऊन त्याला म्हणाली—' हे राक्षसा, तूं ह्या सुशील, पितृभक्त, व सत्यपरायण दोघां बंधूंना सोडून दे. आणि त्यांच्या ऐवजीं मला घेऊन जा.' याप्रमाणें सीतेनें त्या वेळीं पुष्कळ विलाप केला. सीतेचा तो विलाप ऐकून त्या दोघां बंधूंनीं त्याच्या खांद्यावर बसल्यां बसल्या तरवारीनें त्याचे लांब हात तरवारीनें तोडून नंतर त्याला ओढून त्याचे लगेच तुकडे तुकडे करून त्यास जमिनींत गाडून टाकलें. याप्रमाणें विराधाला मारून ते दोघे विजयी वीर सीतेजवळ येऊन पोहचले, आणि त्यांनीं तिची समजूत करून तिचें भय नाहींसें केलें.

जरी सीतेला या एकाच गोष्टीवरून वनवासांतील दुःखाचा अनुभव आला होता, तरी ती विचलित झाली नाहीं. आपल्या स्वामीच्या बरोबर राहून अत्यंत कठीण दुःख सहन करण्याची तिची तयारी होती, हें त्याचें कारण होतें. पतीच्या सहवासजन्य आनंदापुढें अत्यंत कठीण दुःखाची क्षिती ती मुळींच बाळगीत नसे. खरोखरच पतिदेवाची सेवा करण्यांत पतिव्रता स्त्रियांना जसा आनंद वाटतो, तसा आनंद त्यांना दुसऱ्या कोणत्याही गोष्टींत वाटत नाहीं; आणि याच कारणामुळें सीतेला पतीबरोबर राहण्यांत यत्किंचितही भय वाटलें नाहीं. ती आपल्या पतीबरोबर व दिराबरोबर पूर्ववत वनांत शोभा पहात फिरूं लागली. तें वन मोठें भयंकर व दुर्गम होतें

असलें बिकट वन सीतेनें पूर्वीं केव्हांहि पाहिलें नव्हतें, याकरितां रामचंद्र एखादें निरुपद्रवी व भयशून्य स्थळ तेथें कांहीं दिवस राहण्याकरितां शोधूं लागले.

थोडें दूर गेल्यावर तीं सर्वजण शरभंग ऋषीच्या आश्रमीं जाऊन पोहचलीं. त्या महात्म्यानें त्यांचें उत्तम प्रकारें आदरातिथ्य केलें. शिष्टाचार झाल्यावर रामचंद्रानीं त्या महर्षींस विचारिलें, ' महाराज जेथें आम्ही सुरक्षितपणें आणि स्वस्थपणें राहूं असें स्थळ कोणचें आहे! तें कृपा करून सांगा. ' त्यावरून त्या महर्षीनें त्यांना सुतीक्ष्ण ऋषीच्या आश्रमाला जाण्यास सांगितलें. रामचंद्र तिकडे जाण्यास निघणार इतक्यांत शरभंगऋषींचें देहावसान झालें. त्यांच्या निधनाची बातमी ऐकून आसपासचे ऋषि, मुनी, आणि तपस्वी तेथें एकत्र जमले. त्यांत त्यांचे कित्येक शिष्यहि होते. ते सर्वजण रामचंद्रास म्हणाले ' भगवन् ' येथें आम्हांस दुष्ट राक्षसांपासून फार त्रास होतो. त्यांना मारून आपण आमचें रक्षण करावें. राजा धर्माचा रक्षक आहे. तो जर त्याचें रक्षण करणार नाहीं. तर मग कोण करील ' ! रामचंद्राला या सर्व गोष्टी माहीत होत्या. त्यांनीं त्या शरणागत ऋषींना अभय देऊन सांगितलें कीं ' पित्याची आज्ञा पालन करण्याकरितां जरी मी सध्यां वनांत आलों आहे, तरी या वेळीं मी आपणासर्वांच्या आधीन आहें. आपल्या धर्ममार्गांतील कंटकरूप राक्षसांना मारून मी आपली सेवा करीन. आपलें सर्वांचें भय दूर करणें हाच माझा परम धर्म आहे. मी एकटा नसून माझ्याबरोबर माझा धाकटा बंधू वीर लक्ष्मणहि आहे. त्याच्या सहाय्यानें मी दुष्ट राक्षसांचा संहार करीन. आपण निर्भयपणें वाटेल तेथें राहून तपश्चर्या करावी.

याप्रमाणें शरभंग ऋषीच्या आश्रमांत ऋषि–मुनींना अभय-प्रदान करून रामचंद्र सीता व लक्ष्मणासह सुतीक्ष्ण ऋषीच्या

आश्रमांत जाऊन पोहचले. महर्षी सुतीक्ष्णानें त्यांचा आदरपूर्वक सत्कार करून त्यांस तेथें कांहीं दिवस राहण्याचा आग्रह केला. परंतु तेथें राहणें त्यांस आवडलें नाहीं. ते रात्रभर तेथें राहून प्रातःकाळीं उठून मुनीला म्हणाले ' भगवन्, आपण माझें फारच आदरातिथ्य केलेंत. आपण केलेल्या सन्मानाबद्दल मी सदैव आपला कृतज्ञ राहीन. आतां मला आपण जाण्याची आज्ञा द्यावी. या दंडक वनांतील सर्व आश्रम पहावे अशी माझी इच्छा आहे. महर्षीनें जातेवेळीं सांगितलें कीं, ठीक आहे. ' आपण दंडक वनांतील सर्व आश्रमांचें दर्शन घ्यावें; परंतु परत जातेवेळीं येथें येऊन अवश्य भेटून जावें, एवढीच विनंति आहे, '

जेव्हां सर्व ऋषींच्या समक्ष राक्षसांना मारण्याची रामचंद्रांनीं प्रतिज्ञा केली, तेव्हांपासून जानकीच्या मनांत अनेक प्रकारची चिंता उत्पन्न झाली. त्या दिवसापासून तिचें मन अस्वस्थ झालें. रामचंद्रांना कांहीं गोष्ट सांगण्याकरितां ती अत्यंत उत्कंठित झाली होती; परंतु तिला तसें करण्याला सवड न मिळाल्यामुळें ती त्यांच्याशीं या वेळपर्यंत बोलूं शकली नाहीं. सीतादेवी रामचंद्राची साधारण पत्नी अथवा सहचारिणी नव्हती; तर ती त्यांची सहधर्मिणी व जीवन-मार्गांतील संगातीण होती. मनुष्यजन्माची हीच सफलता आहे, हें तिला पक्कें माहीत होतें. मानवजातीचा धर्मप्रचार हाच एक उद्देश आहे. धर्मसाधनांत विवाह हा परम सहाय्यक आहे, आणि याच कारणांमुळें त्याची इतकी प्रतिष्ठा व पवित्रता आहे. या विवाहरूपी पवित्र सूत्रांत दोन मानव आत्मे एकरूप होऊन जातात; अथवा एकमेकाच्या बलानें बलिष्ठ होऊन धर्माच्या खडतर मार्गावर चालण्यास समर्थ होतात. केवळ विवाहाच्या योगानें दोन अपूर्ण मानव-आत्मे पूर्णत्वाला प्राप्त होतात. पति आपल्या पुण्यबलानें स्त्रीचें रक्षण करतो, व स्त्री आपल्या पुण्यप्रभावानें पतीचें रक्षण करते.

याप्रमाणें परस्पर एक दुसऱ्याचें रक्षण करून दोघेही सुरक्षित राहून धर्मांचें साधन करतात. या दोघांपैकीं एक जर निर्बल झाला, तर दुसराही त्याबरोबर निर्बल होऊन जातो. त्याची मोठी दुर्दशा होते. एवढ्याकरितांच त्यांना प्रथम विवाहद्वारा पूर्ण बलिष्ठ करून नंतर धर्मसंचय केला पाहिजे. ज्या धर्मांत स्त्रीला अधिकार नाहीं, पतीवर तिचें स्वामित्व नाहीं, व जेथें एकाचा दुसऱ्यावर विश्वास नाहीं तेथें विवाहाचें नांव घेणेंसुद्धां व्यर्थ आहे. विवाहाची सफलता पतिपत्नीच्या ऐक्यावरच निर्भर आहे. पत्नीचा पतीवर पूर्ण अधिकार असेल तरच त्यांत पत्नीचें पत्नित्व आहे. स्त्रीचा अधिकार काय, व धर्म काय हें सीतेला पूर्णपणें माहीत होतें. या कारणांमुळें पतीच्या फक्त शारीरिक व मानसिक उन्नतीचाच ती विचार करीत नसे, तर त्याच्या आत्मिक उन्नतीचाहि विचार तिच्या मनांत नेहमीं जागृत होता. एखाद्या कार्यामुळें स्वामीच्या धार्मिक कामांत जर किंचित् न्यूनता तिला भासली, तर ती दूर करण्याचा ती नेहमीं प्रयत्न करी. सीतादेवी खरोखरच आपल्या पतीवर पूर्णश्रद्धा व भक्ति ठेवीत असे. ती नेहमीं आपल्या पतीदेवाची विद्या, बुद्धि, व धर्मज्ञान यांची प्रशंसा करीत असे, व गोष्टही अशीच आहे कीं रामचंद्र खरोखरच अनुपम धर्मात्मा होते. ते सीतेहूनहि विशेष धर्मनिष्ठ होते, एवढ्याचमुळें सीतेला उपदेश करण्याला ते पात्र होते असें नाहीं. ही गोष्ट आम्ही कांहीं उगीच सांगत नाहीं. सीतेचाहि विश्वास तसाच होता. अशी स्थिति असताहि जर केव्हां तरी एखाद्या कार्यांत रामचंद्र विन्मुख होतांना तिला आढळले, तर ती विनयानें हात जोडून आपल्या मधुर शब्दांनीं त्यांस त्या कार्याला प्रवृत्त करीत असे. खरोखर हा स्त्रीचा अधिकारच आहे, व तो ती चांगल्या प्रकारानें जाणत होती. अशा वेळीं तिच्या योग्य सांगण्याचा रामचंद्रांनीं केव्हांहि अनादर केला नाहीं, हें येथें सांगण्याची अवश्यकता नाहीं. कोणत्याहि बाबतींत

तिनें जर कांहीं सांगितलें तर ते लक्षपूर्वक ऐकत, व आदरपूर्वक ग्रहणहि करीत. तेहि पण सीतेचा नेहमीं आदरच करीत. खरोखर स्त्री पुरुषांत परस्परांवर श्रद्धा असणें हेंच खऱ्या प्रेमाचें लक्षण आहे. जेथें हें लक्षण नाहीं, तेथें पवित्र दांपत्यप्रेम कुठलें ! आणि जेथें प्रेम नाहीं तेथें आनंद कोठला ?

राक्षसांना मारण्याची रामचंद्रांनीं प्रतिज्ञा केली, त्या वेळेपासून सीतेला त्यांच्याशीं कांहीं बोलावयाचें होतें, पण तिला संधिच मिळाली नाहीं, असें आह्मी मागें सांगितलें आहे. ती संधि आतां मिळाली. जेव्हां ते त्रिवर्ग सुतीक्ष्ण मुनीच्या आश्रमापासून कांहींसे दूर आले, तेव्हां संधि पाहून सीतादेवी रामचंद्राला म्हणाली. ' प्राणपति धर्माची गती मोठी अगम्य व गहन आहे. जोंपर्यंत मनुष्य व्यसनाचा परित्याग करीत नाहीं, तोंपर्यंत त्याला धर्माचें साधन घडत नाहीं. जगांत जितकीं दुर्व्यसनें आहेत, त्यांत तीन महाव्यसनें समजावीं. मिथ्या कथन, इंद्रियाधीनता, आणि अकारण क्रोध; हीं तीं होत. पहिलीं दोन व्यसनें तर आपणामध्यें नाहींतच. परंतु अकारण प्राण्याची हिंसा हा दोष आपल्यामध्यें शिरूं पहात आहे. आतांपर्यंत आपण अकारण हिंसा केली नाहीं, पण आतां कोण जाणे कां तें असलें पाप करण्याचा विचार आपण मनामध्यें आणिला आहे ! त्या दिवशीं आपण ऋषीसमोर राक्षसांना मारण्याची प्रतिज्ञा केली, आणि एवढ्याचकरितां आपण आतां दंडकारण्यांत चाललों आहोंत.

महाराज, माझें मन अतिशय चंचल झालें आहे. मी आपल्या विषयीं पुष्कळ विचार करतें आहे. क्षणोक्षणीं मला विषम उद्वेग वाटतो. मला आपला दंडक वनांत जाण्याचा विचार बरा वाटत नाहीं. तेथें जाण्यांत हानीशिवाय लाभ तर कांहींच नाहीं. तेथें गेल्यावर राक्षसांबरोबर आपलें युद्ध खास होणारच. कारण आपण

या वेळेस सशस्त्र आहांत; आणि शस्त्र जवळ असलें म्हणजे क्षत्रियाचें बल वाढत असतें. याकरितां मला वाटतें कीं आपण दंडक वनांत जाऊं नये."

सीतादेवी इतकेंच म्हणून राहिली नाहीं. तिनें रामचंद्राला एक आख्यायिका सांगून त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. ती म्हणाली 'महाराज, एकेवेळीं कोणी राजा आपली तरवार एका ऋषीपाशीं ठेवून गेला. तो ऋषिहि ती तरवार आपल्या जवळ काळजीपूर्वक बाळगीत असे. ती तो आपल्या जवळून कधींच दूर करीत नसे. याप्रमाणें होतां होतां कांहीं दिवसांनीं त्या ऋषीचा स्वभाव अगदीं बदलून गेला. त्याच्या हृदयांत हिंसेची कल्पना उत्पन्न झाली. शेवटीं त्याला जंगली पशु मारण्याचा इतका नाद लागला कीं तो आपली तपश्चर्या करण्याचें अगदीं विसरत चालला. त्याची सर्व पूजा, अर्चा अगदीं मातीमोल झाली. शस्त्र जवळ असल्यामुळें मनुष्याचें मन सहजच हिंसेकडे वळतें. हे नाथ, मी आपल्याला उपदेश करीत नाहीं, किंवा रागानेंहि सांगत नाहीं; तर स्नेहानें वश होऊन मी आपणाला स्मरण दिलें, कीं शस्त्र जवळ असलें म्हणजे साधुसारख्याच्या विमल चित्तांत देखील विकार उत्पन्न होऊन फरक पडतो. निरपराध प्राण्यांना मारणें उचित नाहीं. जर आपणाला ऋषींचें रक्षण करावयाचें आहे तर त्यांच्या शत्रूंना मारा; पण अपराधी व निरपराधी यांना विचार न करतां मारणें ठीक नाहीं. आपण तर तापसाचा वेष धरून वनांत आलां आहांत. राजाचीहि आज्ञा हीच होती. मग शस्त्र धारण करून निरपराधी प्राणी मारण्याची वाईट इच्छा कां बरें धरतां! कुठें शस्त्र व कुठें वनवास! कुठें क्षत्रियाचें क्रूर कर्म, आणि कुठें तपस्व्यांची अनुपम दयायुक्त सहनशीलता. ह्या दोन्ही गोष्टी परस्पर अगदीं भिन्न आहेत. वनांत राहून तप तरी करा, किंवा क्षत्रियांची हिंसा तरी

पतकरा. एका वेळेस एकच गोष्ट घडूं शकते. दोन घडूं शकत नाहींत. मी आपल्याला आग्रह करीत नाहीं; परंतु मला वाटतें कीं आपण मुनिधर्माचा स्वीकार करावा, त्यांच्या व्रताचें पालन करावें. आपण पवित्रात्मा होऊन धर्माचरण करावें. आपण दयाळु आहांत. दयावृत्तीचें पालन करा, धर्माचा विघात करणें आपल्याला योग्य नाहीं. धर्मापासूनच अर्थ; धर्मापासूनच सुख, व धर्मापासूनच सर्वांची उन्नति आहे. ' धर्म एव हतो हन्ती धर्मोरक्षति रक्षितः ' मी आपल्यापुढें धर्माविषयीं बोलणें म्हणजे सूर्याला दिवा दाखविण्याप्रमाणें आहे. आपण स्वतःच धर्माचें मर्म चांगल्या तऱ्हेनें जाणत आहांत. मी जें कांहीं बोलत आहे, तें स्त्री जातीच्या स्वाभाविक गुणाचें एक दर्शक समजावें. आपणाला कोणीच उपदेश करूं शकत नाहीं. यावेळेस आपण लक्ष्मणासह विचार करून धर्माला अनुसरून जें उचित असेल तें करा. "

(वा. रा. कांड. ३ सर्ग ९)

रामचंद्र मोठे विद्वान्, मोठे धैर्यवान् आणि विचारशील होते. ते आपल्या पतिप्रिया प्रियतमेचें भाषण ऐकून प्रसन्न झाले. त्यांनीं तिला सांगितलें कीं, ' प्रिये, राक्षसांनीं फार त्रासवून सोडल्यामुळें बरेच ऋषि, मुनि माझ्याजवळ येऊन ' आमचें रक्षण करा ' असें विनवूं लागले; तेव्हां ' राक्षसांना मारून मी तुमचें व तुमच्या धर्माचें रक्षण करीन ' असें मी त्यांना वचन दिलें. ' आर्त लोकांचें रक्षण करणें हें क्षत्रियाचें मुख्य कर्तव्य आहे. नरमांस भक्षक राक्षसांना मारून हें वन निष्कंटक करणें, हें माझें प्रधान कर्तव्य आहे. एवढ्याचकरितां ऋषींचें रक्षण करण्याचा भार मी आपल्यावर घेतला आहे. आमच्या क्षात्र धर्माला अनुसरूनच मी अशी प्रतिज्ञा केली. देवी, मला सत्य फार प्रिय आहे, सत्यासारखी पवित्र वस्तु संसारांत मला दुसरी कोणतीच प्रिय नाहीं. प्रतिज्ञा करून मी

कधींहि विन्मुख होणार नाहीं. मी माझ्या शब्दाला प्राणांपेक्षांहि अधिक मानतों. प्राण गेला तरी माझें वचन असत्य होणार नाहीं. कदाचित् वेळ प्रसंगीं तुझा व लक्ष्मणाचा मला त्याकरितां त्याग करावा लागला, तरी तो मी करीन, पण एकवार केलेली प्रतिज्ञा केव्हांहि भंग होऊं देणार नाहीं. जरी ऋषींनीं मला सांगितलें नसतें, तरी मला त्यांचें रक्षण करणें प्राप्तच होतें. आतां तर मी त्यांच्या समोर प्रतिज्ञा करून चुकलों आहे, आणि त्यांच्या सत्यापासून ढळणें कधींच होणार नाहीं. जानकी, तूं जें प्रेमानें सांगितलेंस, त्याबद्दल मला राग मुळींच वाटत नाहीं, तर उलट आनंदच होतो. परंतु तूं जें हें भाषण केलेंस तें तुला व तुझ्या कुलाला शोभत नाहीं. तूं मला प्राणाहूनहि अधिक आहेस, तर विचार करून तूंहि माझ्या कार्याला अनुकूल हो, आणि आपली संमति दे.'

सीता देवी खरी पतिव्रता होती. पतीचें भाषण ऐकून ती संतुष्ट झाली. ती मग आपल्या स्वामीच्या संकल्पाविरुद्ध कांहींच बोलली नाहीं.

नंतर सीतेला व लक्ष्मणाला घेऊन रामचंद्र दंडक वनांत भ्रमण करावयास निघाले. तेथें त्यांनीं किती तरी आश्रम, नद, नद्या, पर्वत, गुंफा, उपवनें, वनें, व सरोवरें इत्यादि पाहिलीं. दंडकवनांतील या नानाप्रकारच्या गोष्टी पाहून त्यांना फार हर्ष वाटला. त्या वनांत कुठें अनेक प्रकारचे पक्षी उडत होते, तर कुठें सिंह, वाघ, हत्ती वगैरे पशु शब्द करीत होते. कुठें लहान झुळझुळ झरे वाहत होते, तर कुठें विकटाकार राक्षस हिंडत होते. केव्हां त्यांना आनंद वाटे, तर केव्हां भीतिहि वाटे. केव्हां ऋषींना भेटल्यावर रामचंद्राला हर्ष होई, तर केव्हां ऋषिपत्न्या व त्यांच्या कन्या यांना पाहून सीतेचें मन प्रसन्न होई. त्यावेळीं त्यांना जो आनंद होई, त्याचें वर्णन कोण करूं शकणार! कुठें वर्षभर तर कुठें सहा

महिने, तर कुठें एखाद दुसरा आठवडा. याप्रमाणें त्यांनीं त्या वनांत तेथील आनंदाचा उपभोग घेत सुमारें दहा वर्षें काढिलीं.

याप्रमाणें दंडकारण्यांत हिंडून सत्यप्रतिज्ञ रामचंद्र सुतीक्ष्ण मुनींच्या आश्रमांत परत आले. तेथें ते मग कांहीं दिवस स्वस्थपणें सुखानें राहिले. तेथें रहात असतां त्यांना एके दिवशीं अगस्ति ऋषींचें दर्शन झालें. त्यांना भेटून रामचंद्राला आनंद झाला. अगस्ति मुनींच्या आश्रमाचें दर्शन करून ते नंतर त्याचा बंधु इध्मवाहन याच्या तपोवनांत गेले. तें तपोवन रमणीय होतें. तेथून परत येतांना ते पुनः अगस्ती ऋषीला भेटले. त्या तिघांचा विनयशीलपणा पाहून अगस्ती ऋषीला प्रसन्नता वाटली, व त्यांनीं त्या तिघांना उत्तम आशीर्वाद दिला. नंतर ते रामाला म्हणाले ' या वनांत फिरून फिरून तुम्हीं दमत असाल; सीतेला तर श्रम मुळींच सहन होत नसतील. तसेंच या वनांत हिंडतांना तिला फार दुःखहिं होत असेल. तर आतां हे रामा, सीतेला सुख मिळेल असा कांहीं उपाय कर. तिनें तर, आपलें कर्तव्य करून जीवित-साफल्य केलें आहे. राजवैभव सोडून ती तुझ्याबरोबर वनांत आली, या कारणानें तिचें नांव पतिव्रता, व पूजनीय स्त्रियांत गणलें जाईल. तुम्हांला वाटेल तर तुम्ही सर्वजण या आश्रमांत सुखानें रहा.

हें अगस्ती मुनींचें भाषण ऐकून ' येथें एखादें एकांत स्थान कुठें आहे कां ' म्हणून रामचंद्रांनीं त्यांना विचारिलें. किंचित् विचार करून त्यांनीं एक स्थळ सांगितलें. तें त्यांच्या आश्रमापासून सात आठ कोस दूर होतें. तें फार रम्य होतें. अगस्ती मुनींच्या सांगण्यावरून रामचंद्रांनीं तेथें जाण्याचा निश्चय केला, आणि लगेच मुनीला वंदन करून ते त्या स्थळाकडे निघून गेले. तें स्थान पंचवटी होय.

पंचवटीची शोभा पाहून त्यांचें मन सुप्रसन्न झालें; आणि पंच-

वटी खरोखर होती हि फार सुंदर. आदि कवि वाल्मिकीनें पंचवटीचें वर्णन विस्तारपूर्वक केलेलें आहे. त्यांच्या वर्णनाचा थोडासा सारांश मी खालीं देत आहें.

' त्या आश्रमाजवळ गोदावरी नांवाची नदी होती. तिचें उदक फारच गोड व पाचक होतें. जागजागीं सुंदर सरोवरें असून त्यांत कमलपुष्पें फुललीं होतीं. गोदावरीच्या तीरावर हंस, सारस व चक्रवाक इत्यादि अनेक पक्षी क्रीडा करीत होते. गोदावरीच्या व सरोवराच्या कांठची शोभा पहाण्यासारखी होती. जेथें तेथें मोर टाहो फोडीत होते, व आनंदानें आपले सोनेरी पिसारे पसरून नाचत होते. कावळे काव काव करून आकाश गर्जवून सोडीत होते. एका बाजूला पर्वतमाला आकाशांतील कृष्णवर्ण ढगाप्रमाणें दिसत होती. त्या वनांत अनेक जातीचे वृक्ष होते. साल, ताल, तमाल, खजूर, आंबे, अशोक, अर्जुन, चाफा, केवडा, चंदन वगैरे वृक्ष फलपर्णांनीं अगदीं भरून गेले असल्यामुळें पथिकांचें मन सहज हरण करीत. तें वन पाहून सीतेला जो अत्यानंद वाटला, त्याचें वर्णन करतां येत नाहीं. सीतेची तेथें रहाण्याची इच्छा पाहून रामचंद्रांनीं लक्ष्मणाला एक पर्णकुटिका तयार करावयास सांगितलें. तेथें काय उशीर! भ्रातृभक्त लक्ष्मणानें ती आज्ञा ऐकतांच एक सुंदर पर्णशाला तयार केली. पर्णशाला थोड्या अवकाशांत तयार झालेली पाहून रामचंद्रांनीं लक्ष्मणाला प्रेमानें दृढालिंगन दिलें. नंतर भार्या व बंधु यांच्यासह रामचंद्र तेथें राहूं लागले. त्या मनोरम जागेंत राहून व त्या वनाची अपूर्व शोभा अवलोकन करून सीतेला इतका आनंद वाटूं लागला कीं, पंचवटीपुढें ती घरचे सर्व राजभोग पार विसरून गेली. त्या निर्जन परंतु अत्यंत रमणीय आश्रमांत राहून तिला असें वाटलें कीं पितृघरचें सौख्य यापुढें तुच्छ आहे.'

परंतु हाय,! सीते, तुला कांहींच माहीत नाहीं, इतकेंच नव्हे

तर तुला अजून त्या गोष्टींचा पत्ताहि नाहीं. त्या अद्याप तुझ्या स्वप्नांत सुद्धां आलेल्या नाहींत. ज्या आश्रमांत तूं पतीसह स्वतंत्रतेनें राहून आनंद उपभोगीत आहेस, त्याच आश्रमांत एके दिवशीं आपल्या प्राणेश्वराच्या वियोगामुळें तुला विलाप करीत बसावें लागेल! तुझ्या हाःहाःकारानें व हृदयविदारक रोदनानें सर्व आकाश भरून जाईल. हाय! ज्या स्थलाला सीतेनें आनंदभवन मानलें होतें, कारण तें स्थलहि तसेंच रमणीय होतें, तेंच स्थल एके दिवशीं तिला नरकाहूनही अत्यंत भयावह होईल, हें कोण बरें सांगूं शकेल!

अशा त्या सुंदर पंचवटीमध्यें रामचंद्र, सीता लक्ष्मणासह राहूं लागले. तेथें रहात असतां सीतेनें व लक्ष्मणानें त्यांची श्रद्धापूर्वक पुष्कळ सेवा केली. त्या उभयतांच्या सुश्रुषेमुळें रामचंद्राचें अंतःकरण फार प्रसन्न झालें. जेव्हां त्यांच्या आश्रमासमोर रंगी बेरंगी पिसाऱ्यांचे मोर आपापले पिसारे पसरून आनंदानें नृत्य करीत, तेव्हां ती मौज पाहून सीतेला फार आनंद होई. प्रातःकालीं सीता जेव्हां रामचंद्राबरोबर फिरावयास जाई तेव्हां मार्गांत इकडून तिकडे व तिकडून इकडे बागडत असलेलीं हरिण बालकें मृगनयनी सीतेकडे पाहून स्तब्ध उभीं रहात. सीतेची ती सौम्य व रम्य मूर्ति पाहून तीं किंचित देखील भीत नसत. तीं केव्हां केव्हां निःशंकपणानें तिच्या तोंडाकडे पहात पहात चरत असत. कांहीं हरिण बालकें तर शांत स्वभावाच्या सीतादेवीचीं इतकीं परिचयाचीं झालीं होतीं कीं, जणू काय तीं तिचीं पाळलेलींच आहेत. तीं सीतेच्या मागून मागून नेहमीं फिरत. त्यांच्या पर्णकुटीजवळच्या वृक्षांवर नानाप्रकारचे पक्षी येऊन बसत, आणि अनेक प्रकारचे शब्द करून त्यांच्या कानांत जणूं काय अमृतधारांचा वर्षाव करीत. आपल्या सुंदर करकमलांनीं सुगंधित पुष्पांच्या माला-

करून ज्यावेळेस सीता आपल्या पतीच्या कंठांत घालीत असे, व अनेक जातींच्या फुलांचे दागिने करून ते ती आपल्याही अंगावर घाली, त्यावेळेस तिला जो आनंद वाटे त्याचें वर्णन कोण करणार! आपल्या प्रिय पत्नीला पुष्पालंकारांनीं अलंकृत पाहून रामचंद्राच्या हृदयांत एक प्रकारचा अद्भुत भाव उत्पन्न होई. एक वेळां रामचंद्रांनीं स्वतः फुलें तोडून आणून त्यांचें एक कर्णभूषण बनविलें, व प्रेमानें आपल्या हातांनीं त्यांनीं तें तिच्या कानांत घातलें. पतिदेवाच्या हातून आपला इतका आदर झालेला पाहून सीता लज्जेनें अगदीं चूर होऊन गेली. त्यावेळेस लज्जा व आनंद हे दोन भाव एकाच वेळीं तिच्या मुखावर स्पष्ट दिसत होते. केव्हां केव्हां सीता आपल्या पतीबरोबर सरोवरांतील उमललेलीं कमळें तोडावयास जात असे. तेव्हां गोदावरीच्या तीरावर राजहंस व सारस पक्षी बसलेले पाहून तिचें मन प्रफुल्लित होई. ती ज्यावेळेस रामचंद्राबरोबर हलके हलके गोदावरीच्या कांठानें फिरत असे, त्यावेळेस तिच्या नूपुरांचा मंजुळ ध्वनि ऐकून राजहंसाहि चकित होऊन तिच्याकडे पहात, आणि तिच्या मंदगतीचें अनुकरण करीत. केव्हां केव्हां ती त्यांच्याबरोबर उंच पर्वताच्या शिखरावरहि जात असे. त्यांचें सौंदर्य पाहून ती आनंदित होई. रामचंद्र व सीता हीं दोघें जशीं वनाची शोभा पाहून आनंदित होत असत, तसाच लक्ष्मणहि आपल्या धार्मिक वर्तनानें आपल्या ठिकाणीं आनंदमग्न होई. त्या उभतांची आज्ञा मनापासून पाळणें, व त्यांची मनोभावानें सेवा करणें हाच लक्ष्मणाचा मुख्य धर्म होता. त्या धर्माचें पालन करण्यांत तो नेहमीं तत्पर असे. तो नित्य गोदावरीचें जल तशींच वनांतून फळें, मूळें, कंद, दुर्वा व समिधा आणि दुसऱ्याहि अनेक आवश्यक वस्तु आणीत असे. त्याची परिचर्या पाहून तीं संतुष्ट होत. सीता आणि रामचंद्र जेव्हां एकांतांत बोलत बसत

असत, तेव्हां त्यांच्या भाषणांतील बराच भाग लक्ष्मणासंबंधाचा असे. सीतेनें आपल्या करमणुकीकरितां आपल्या पर्णकुटीजवळ बरींच झाडें व वेली लाविल्या होत्या. सकाळ, संध्याकाळ, ती त्यांना आपल्या हातानेंच पाणी घाली.

वाचक हो! सीता, रामचंद्र, व लक्ष्मण हीं तिघें नेहमी आपला काळ अशाच तऱ्हेच्या मनोरंजनांत घालवीत असत, असें आपण समजूं नका. पूजेच्यावेळीं पूजा, फिरण्याच्यावेळीं फिरणें, जे कोणी मुनि, ऋषि, त्यांच्या भेटीला येत, त्यांना भेटणें, व चर्चा करणें वगैरे सर्व कामें तीं नियमित वेळीं करीत. सारांश, ते आपला वेळ क्षण-भरहि व्यर्थ दवडीत नसत.

याप्रमाणें पंचवटींत ते सर्व सुखानें रहात होते. परंतु तें त्यांचें सुख फार दिवस टिकलें नाहीं. कांहीं दिवसानंतर त्यांना एका आपत्तीला तोंड देण्याची पाळी आली. एके दिवशीं हे त्रिवर्ग आपल्या पर्णकुटींत आनंदानें बसले असतां एक राक्षसी फिरत फिरत तेथें आली. तेथें आल्यावर ती लक्ष्मणाचें रूप पाहून अत्यंत मोहित झाली. नंतर तिची दृष्टि जेव्हां रामावर गेली तेव्हां तर ती आपलें देहभानच विसरली. दोघां बंधूंचें तें रूप लावण्य पाहून त्या राक्षसीच्या मनांत तत्क्षणीं पाप उत्पन्न झालें. लगेच दोघांपैकीं कोणचा तरी एक पति निवडावा असें तिच्या मनानें घेतलें. तिची दुष्ट भावना जाणून उभयतांनीं तिला बरेंच धमकाविलें, व तिची निर्भत्सनाहि केली. त्यांच्या तिरस्कारपूर्ण भाषणानें तिला राग आला; ती संतापानें त्यांना म्हणाली ' ज्या स्त्रीमुळें तुम्हीं इतके गर्विष्ठ झालां आहांत, त्याच स्त्रीला मी आतांच खाऊन टाकतें. ही मेल्यावर मग तर तुम्हीं माझ्याशीं लग्न लावाल कीं, नाहीं; ' असें म्हणून ती एकदम सीतेकडे धांवत गेली. हें पाहतांच दोघे बंधु किंचित् घाबरले, लगेच ते रागानें लाल होऊन, त्यांच्या डोळ्यांतून

ठिणग्या पडतात कीं काय असें वाटूं लागलें. आर्यधर्मशास्त्रांत स्त्रीचा वध करणें, हा अधर्म सांगितला आहे. याकरितां तिला मारणें त्यांना योग्य वाटेना. वडिल बंधूचा रोख पाहून लक्ष्मणानें तिचें नाक व कान कापून टाकले. त्यामुळें विरूप होऊन ती राक्षसी ओरडतच पळून गेली.

त्या राक्षसीचें नांव शूर्पनखा होतें. तिचीं नखें तीक्ष्ण व लांब होतीं. ती परमप्रतापी राक्षसेश्वर रावणाची भगिनी होती. रावण लंकाद्विपाचा अधीश्वर होता. खर व दूषण या नांवाचे तिचे दोघे बंधु होते, व ते त्याच वनांत राहत असत. त्यांच्याजवळ चौदा हजार राक्षसांचें सैन्य होतें. तें सैन्य शूर्पणखीच्या रक्षणाकरितां ठेविलें होतें. जनस्थान नांवाचा प्रदेश त्यांचें मुख्य निवासस्थान होतें. ते राक्षस जनस्थानच्या आसपास राहणाऱ्या लोकांना फार त्रास देत असत. रामचंद्राच्या पर्णकुटिहून ती राक्षसी जी पळाली ती रडत ओरडत आपल्या भावांजवळ येऊन पोहचली, व तेथें घडलेला सर्व प्रकार तिनें त्यांना कळविला. आपल्या बहिणीचें नाक कान कापलेले पाहून त्या दोघां बंधूंना अत्यंत क्रोध आला. त्यांनीं लगेच रामचंद्राला पकडण्याकरितां आपल्या राक्षस सेनेला आज्ञा केली. मग तेथें काय उशीर? खर दूषणांची आज्ञा मिळतांच शस्त्रास्त्रें घेऊन ती सर्वसेना युद्धाला तयार झाली. चौदा हजार राक्षस सैन्य रामचंद्राला पकडण्याकरितां निघालें. दुरून आकाशांत धूळ उडतांना पाहून व असंख्य लोकांचा कोलाहल ऐकून रामचंद्रहि तयार झाले. ती दुष्ट राक्षसी आपल्या भावांना घेऊन आली असावी, हें त्यांनीं त्यावरून ताबडतोब ताडलें. रामचंद्रानीं विचारांत अधिक वेळ न दवडतां ‘सीतेला पर्वताच्या एखाद्या गुहेंत लवकर घेऊन जा’ असें लक्ष्मणाला सांगितलें. त्यांच्या आज्ञेप्रमाणें तो सीतेला एका गुहेंत घेऊन गेला. इतक्यांत समुद्राच्या

लाटांप्रमाणें ती राक्षससेना रामचंद्रावर एकदम तुटून पडली. महावीर रामचंद्रहि हातांत धनुष्यबाण घेऊन एकटेच निर्भयपणें त्यांच्यांशीं युद्ध करूं लागले. त्यांचें अपूर्व युद्धकौशल्य, असीम साहस, व थोर पराक्रम पाहून सर्व राक्षस भयभीत झाले. एकट्या रामचंद्रांनीं त्यांच्याशीं मोठ्या धैर्यानें, व शौर्यानें युद्ध केलें. जेव्हां हजारों राक्षस रामचंद्राच्या तीक्ष्ण बाणांनीं ठार होऊन रणभूमीवर पडले, तेव्हां खर दूषणादि राक्षस त्यांच्यावर बाणांचा सारखा वर्षाव करूं लागले. त्यांनींहि आपल्याकडून शौर्यानें लढण्यांत कसर केली नाहीं. परंतु शत्रूंचें हनन करणाऱ्या रामचंद्राचा ते पराभव करूं शकले नाहींत. याप्रमाणें बराच वेळपर्यंत तुंबळ युद्ध होऊन खर, दूषण, वगैरे राक्षस रामाच्या तीक्ष्ण बाणांनीं ठार होऊन जमिनीवर पडले. रामचंद्र विजयी झाले. युद्ध संपल्यावर लक्ष्मण सीतेला घेऊन परत आला. या युद्धांत रामचंद्राचा विजय झालेला पाहून सीतेच्या आनंदास पारावार राहिला नाहीं.

लक्ष्मणानें शूर्पनखेचे नाक कान अशा अशुभ वेळीं कापले होते कीं, तिनें जे राक्षस आपल्या सहाय्याकरितां बोलाविले होते, ते सर्व रामचंद्राच्या प्रतापानलांत पतंगाप्रमाणें जळून भस्म झाले. जेव्हां त्या राक्षसीनें आपले बंधु खर, व दूषण रामचंद्राच्या तीक्ष्ण बाणांनीं मरून पडलेले पाहिले, तेव्हां ती रडतच लंकेंत रावणाकडे निघून गेली. तेथें गेल्यावर मोठ्यानें आक्रोश करून तिनें आपलें दुःख रावणाला सांगितलें. आपल्या भगिनीचे नाक कान कापलेले पाहून आणि आपल्या महाबली वीर खर दूषणांचा वध झालेला ऐकून रावणाला अत्यंत क्रोध आला. रागानें त्याचे ओंठ कापूं लागले, डोळे लाल झाले, व त्वेषानें तो दांत ओंठ चावूं लागला. शूर्पनखा त्याला म्हणाली ' त्याच्याजवळ एक नारीरत्नहि आहे. तिच्या लावण्याची सर देवांगनांनांहि येणार नाहीं. तिचें रूप असें

मनोहर आहे कीं, त्यामुळें सर्व वन सुशोभित होतें. सीता फार पतिप्रेमिणी आहे. रामहि तिला प्राणाहून अधिक समजतो. रामाचा धाकटा बंधुहि त्याचा अनन्य भक्त आहे. हे रावणा, जर तूं कसेंहिकरून तिला येथें आणशील तर लंकेचीहि शोभा द्विगुणित होईल. तुझ्या राणीवशांत सीतेसारखी एकहि स्त्री नाहीं. तिला येथें आणल्यापासून 'एक पंथ दोकाज' ही म्हण सार्थ होईल. एक तर सीतेशिवाय रामचंद्र मरण पावेल, आणि नंतर लक्ष्मणहि बंधूच्या मरणानें जिवंत राहणार नाहीं; व दुसरें तुलाहि त्या नारीरत्नाचा लाभ होईल. तूं जितक्या देवकन्या आपल्या राणीवशांत आणून ठेविल्या आहेस, त्यांत सीतेइतकी सुंदर एकहि स्त्री नाहीं. प्रथम तुला एक गोष्ट सांगतें, कीं तूं युद्धांत रामाला जिंकून सीतेला आणूं शकणार नाहींस. कारण ते दोघे बंधु महाबली व महापराक्रमी आहेत. तूं त्यांचा पराभव केव्हांहि करूं शकणार नाहींस. याकरितां तुला जर सीता हवी असेल तर तूं तिला कपटानें आण. या उपायानें रक्तपाताशिवाय तुझ्या शत्रूचा मूलच्छेद होईल,

रावण मोठा दुराचारी व पापी होता. जरी तो एका प्रतिष्ठित व उच्च कुलांत जन्मला होता, तरी त्याचीं कर्में फार भयंकर असत; व याचमुळें त्याला 'राक्षस' म्हणत. 'यथा राजा तथा प्रजा'. तो अनाचारी व निर्दय असल्यानें त्याला सर्व साथीदारहि तसेच मिळाले होते. लंकेंत जे राक्षस रहात होते, त्या सर्वांत तो शिरोमणी होता. जरी त्याच्या अंगांत महत शक्ति होती, तरी तिचा उपयोग साधुजनांना त्रास देण्यांतच होत असे. जरी तो विद्वान असून शास्त्राचें मर्म उत्तम रीतीनें जाणत असे, तथापि बालपणापासून तो कुसंगतींत वाढल्यामुळें त्याचा स्वभाव राक्षसी बनला होता. त्यानें आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवण्याचा स्वप्नांत देखील प्रयत्न केला नव्हता. तो स्वतःच इंद्रियवश झाला होता. त्याला

जर कुठें एखाद्या रूपवती स्त्रीचा अथवा कन्येचा पत्ता लागला, तर तो लगेच जाऊन तिला बलात्कारानें घेऊन येत असे. त्याच्या कुकर्मांचें वर्णन करूं लागल्यास एक निराळाच ग्रंथ होईल. त्या दुष्ट रावणाच्या घृणित कृष्ण कृत्यांचें वर्णन करून आह्मी आमच्या वाचकांच्या अंतःकरणरूपी विमल पटावर कलंकाचे शिंतोडे उडवूं इच्छित नाहीं. वाल्मिकी रामायणाच्या आधारावर आह्मीं एवढेंच सांगूं शकतों कीं त्याच्या घरांत एक नाहीं, दोन नाहीं, दहावीस नाहीं, तर शेंकडों स्त्रिया होत्या.

दुष्ट शूर्पनखेच्या तोंडून सीतेच्या रूपलावण्याची प्रशंसा ऐकून दुराचारी रावणाचें मन चंचल झालें. त्यानें आपल्या भगिनीला सांगितलें कीं ' मी कोणत्याहि उपायानें सीतेला आणीन. तूं कांहीं काळजी करूं नकोस. सीतेवांचून तुझा शत्रु आपल्या आपणच मरून जाईल असेंच करीन !' असें म्हणून रावण उठला आणि आपल्या रथावर बसून मारीचाच्या आश्रमाकडे निघून गेला. मारीच मोठा मायावी राक्षस होता. तेथें गेल्यावर रावणानें आपला हेतु त्याला सांगितला. रामचंद्राचें नांव ऐकून तो भीतीनें एकदम दचकला. त्यांचें बाहुबल तो उत्तम रीतीनें जाणत होता. विश्वामित्राच्या आश्रमाजवळ मागें घडलेली गोष्ट त्याच्या दृष्टिसमोर उभी राहिली. त्या मुनीच्या यज्ञाचें रक्षण करीत असतां, रामचंद्रांनीं त्याला एका बाणाच्या तडाक्याबरोबर दूर झुगारून दिलें होतें, त्या गोष्टींचें त्याला आतां स्मरण झालें. त्यामुळें रावणाच्या म्हणण्याला तो एकदम कबूल होईना. उलट त्यानें रावणाला ' या कार्याला प्रवृत्त होऊं नकोस ' म्हणून सांगितलें. परंतु महा दुष्ट रावण त्याचें थोडेंच ऐकणार ! मारीचानें सांगितलेल्या गोष्टीचा त्याच्या मनावर मुळींच परिणाम झाला नाहीं. जेव्हां बुद्धि

भ्रष्ट होते, तेव्हां मनुष्य परमहितकर गोष्टीलाहि अहितकर समजूं लागतो. याच कारणामुळें हितेच्छु मारीचाचें हितकरहि भाषण त्याला आवडलें नाहीं. त्यानें रागानें मारीचाला दटाविलें, इतकेंच नव्हें तर त्याला तेथल्या तेथें ठार मारण्याचेंहि भय घातलें. त्यानें मनाशीं विचार केला कीं, ' हाही मारणारच, तर मग रामाच्याच बाणांनीं मरण आलें तर तें फार चांगलें. ' असें ठरवून शेवटीं तो रावणाला मदत करण्यास तयार झाला. ' रामचंद्राच्या आश्रमासमोर तूं सुवर्णमृग होऊन उड्या मारीत, व चरत रहा; तुला पाहून सीतेचें मन अवश्य लालचावेल. तुला पकडण्याकरितां सीता रामचंद्राला अवश्य आग्रह करील. ते दोघे बंधु तुझ्या पाठीमागें लागून खूप दूर गेले म्हणजे मी मागें संन्याशाच्या वेषानें जाऊन सीतेचें एकदम हरण करीन, ' वगैरे गोष्टी त्यानें त्यांस नीट समजावून सांगितल्या.

मारीचानें रावणाच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें ज्या वेळेस मारीचानें रावणाचें म्हणणें कबूल केलें, त्याच वेळेपासून सीतेचे दिवस मंदगतीनें कां होईना, पण फिरण्यास प्रारंभ झाला.

नंतर ठरल्याप्रमाणें मारीच व रावण दोघेहि पंचवटीच्या आश्रमाजवळ येऊन दाखल झाले. पर्णकुटीजवळ येतांच मारीच सुंदर सुवर्णमृगाचें रूप घेऊन इतर हरिणांच्या कळपांत जाऊन चरूं लागला. पर्णकुटींत बसलेल्या सीतेची दृष्टि एकदम त्या सुवर्णमृगावर गेली. तो केव्हां केव्हां कदलीवनांत जाई, तर केव्हां केव्हां उंच गवतांत अदृश्य होई. केव्हां केव्हां तो पर्णकुटीच्या जवळहि येऊन चरूं लागे. त्याची सुंदरता, त्याचें उड्या मारणें, वगैरे त्याच्या लीला पाहून सीतेचें मन मोहित झालें. तिनें आनंदून रामचंद्र व लक्ष्मण यांना तो हरिण दाखविला. ती म्हणाली ' हे आर्य-

पुत्र, पहा, हा मृग कसा मनोहर आहे तो!' रामचंद्रानींहि तो पाहिला. त्यांनाहि पण तो सुंदरच वाटला. लक्ष्मणानें जेव्हां त्याला, तीक्ष्ण व सूक्ष्म नजरेनें पाहिलें, तेव्हां त्याला हा मृग खरा नसून यांत कांहीं कपट आहे, असें समजून आलें. त्यानें रामचंद्रालाहि ती गोष्ट सांगितली. परंतु तें त्याचें सांगणें, त्याची शंका सीतेला आवडली नाहीं. ती त्याचें म्हणणें खोडून काढून रामचंद्राला म्हणाली–' स्वामी, हा सुंदर मृग मला फार आवडला आहे. हा फारच नयनमनोहर आहे. याला पाहून माझें मन प्रफुल्लित झालें आहे. आपण तो धरून आणावा. मला त्याची फार करमणूक होईल.या आश्रमांत जितके मृग आहेत,त्या सर्वांत हा फार सुरेख आहे. असा सुंदर,असा अलौकिक,असा मनोहर मृग मी आतांपर्यंत पाहिला सुद्धां नाहीं. याच्या अंगावर रंगी बेरंगी ठिपके फारच छान दिसतात.अ-हाहा,काय याचें सुंदर रूप आहे हें!किती गोजीरवाणा दिसतो हा. या मृगानें तर माझें मन पार हरण करून नेलें ! जर आपण याला जिवंत पकडून आणाल तर फार मौज होईल.वनवासाची मुदत संपल्यावर जेव्हां आपण अयोध्येला जाऊं, जेव्हां आपल्याला राजसिंहासन मिळून आपण महालांत राहूं, तेव्हां हा मृग आपल्या महालाची शोभा द्विगुणित करील. तेथें सर्व लोक याला पाहून मोहित व चकित होतील. आपणाला तो जिवंत सांपडला नाहीं, मेलेला सांपडला तरी चालेल. ह्याचें कातडें फारच सुंदर आहे. मी यांचें कातडें येथें कुशपत्रांवर घालून त्याच्यावर बसेन. स्वार्थाला वश होऊन स्वामीला इतके कष्ट देणें मला उचित नाहीं, हा स्त्रियांचा धर्म नाहीं, हें मी जाणतें, तरी मी स्वामी, यावेळीं लाचार आहें. जेव्हां मी हा मृग पाहिला, तेव्हां पासून हा मृग आपल्याला हवाच, इतकें माझें मन त्याच्या विषयीं उत्सुक व चंचल झालें आहे. तेव्हां कृपा करून

तो आपण लवकर आणून देऊन माझें उत्कंठित मन शांत करा, हेंच माझें मागणें आहे.' (वा. रा. कां ३ सर्ग ४३).

ज्या पासून आपल्या पतीला कष्ट होतील अशा कोणत्याही कृत्याला पतिव्रता स्त्री स्वार्थ साधनाकरितां अथवा सुखाकरितां आपल्या पतीला प्रवृत्त करीत नाहीं, ही गोष्ट सीतेला चांगल्या तऱ्हेनें माहित होती. परंतु हें समजत असूनही सीतेनें हा धर्म या वेळीं पाळला नाहीं, हीच खरी आश्चर्याची आणि खेदाची गोष्ट आहे. स्त्रीला जर एखादी वस्तु पाहिजे असेल तर ती तिनें आपल्या पतीजवळ मुळींच मागूं नये, असें आमचें ह्मणणें नाहीं. माझ्या ह्मणण्याचा हेतू एवढाच कीं कोणतीहि वस्तु मागतांना पतीला कष्ट पडतील कीं काय, अथवा हें काम ते करूं शकतील किंवा नाहीं, याचा तिनें विचार करावा. ज्यावेळीं सीतेनें रामचंद्राला सुवर्ण मृग आणण्याबद्दल सांगितलें, त्यावेळीं त्यांच्या हातून हें काम होणार नाहीं, अशी तिची मुळींच भावना नव्हती. तर हें काम त्यांना दुष्कर नाहीं अशीच तिची खात्री होती. ती आपल्या स्वामीचें सामर्थ्य जाणून होती; आणि म्हणूनच तिनें तो सुवर्णमृग जिवंत अथवा त्याला ठार मारून त्याचें कातडें आणून देण्याबद्दल त्यांच्याजवळ आग्रह धरला होता. अशा स्थितींत आम्ही सीतेला दोष देऊं शकत नाहीं. परंतु हा प्रसंग सीतेची दुर्दशा होण्याला आणि रामचंद्र लक्ष्मण, व त्यांची मित्र मंडळी यांना क्लेश देण्याला मात्र कारण झाला. जी गोष्ट सीता पूर्णपणें जाणत होती, आणि ज्या स्त्रीकर्तव्याचें तिनें आपल्या मुखानें वर्णन केलें होतें, तें जर तिनें यावेळी पाळलें असतें, तर लंकेंत राहून दुर्दिन पाहण्याचा जो प्रसंग तिजवर आला, तो तिला खास आला नसता, असें त्या गोष्टींचें, व त्यांनीं भोगलेल्या कष्टाचें स्मरण झालें म्हणजे म्हटण्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

येथें ही पण गोष्ट विचार करण्यासारखी आहे, कीं निरपराधी मृगाला मारा म्हणून तरी सीतेनें कसें म्हटलें ? सीतेच्या तोंडून मृगाला मारा म्हणून केलेला प्रस्ताव, एक मोठी आश्चर्यजनक व कुतुहलपूर्ण गोष्ट आहे. आमच्यामतें असा प्रस्ताव करणें सीतेला योग्य नव्हतें. असो.

प्रियतमा जानकीची प्रार्थना ऐकून रामचंद्राला आनंद झाला. ते जेव्हां हातांत धनुष्यबाण घेऊन जाण्यास तयार झाले, तेव्हां ते लक्ष्मणाला म्हणाले, ' बा वत्सा, जर तो खरोखरच मृग असेल, तर मी त्याला खास जिवंत पकडून आणीन. नाहींतर मारून आणीन. जर तुझ्या म्हणण्याप्रमाणें तो मृग नसून मायावी राक्षस असेल तर त्याला मारणें हें उचितच आहे. एवढ्याकरितां मी जातों, आणि लवकरच मैथिलीची इच्छा पूर्णकरून परत येतों, ते आणखीहि ह्मणाले कीं ' वत्सा पहा, आजकाल राक्षस माझा फार द्वेष करीत आहेत. तूं सावध रहा. जानकीला एक क्षणभरहि एकटी सोडूं नकोस.

रामचंद्र निघून गेल्यावर सीतेच्या रक्षणाकरितां लक्ष्मण पर्णकुटींत बसला. जर त्या मृगाला नुसतें ठार मारावयाचें एवढेंच काम असतें, तर रामांनीं तें तेथूनहि केलें असतें.परंतु सीतेच्या इच्छेप्रमाणें त्याला ते जिवंत धरण्याची खटपट करीत होते. जेव्हां ते हरिणाजवळ जाऊन पोहचले, तेव्हां त्यांच्या हातांत धनुष्यबाण पाहून तो दूर पळून गेला. केव्हां तो त्यांच्याजवळ येई. तेव्हां याला आतां आपण पकडूं असें त्यांना वाटे. केव्हां तो फार दूर जाऊन लपे. याप्रमाणें रामचंद्र त्याच्या पाठीमागें लागून पुष्कळ दूरवर निघून गेले. लांब निघून गेल्यावर रामचंद्राच्याही मनांत त्याच्याविषयीं संदेह उत्पन्न झाला. त्यांनाही नंतर वाटलें कीं हा कांहीं साधारण मृग नाहीं आहे. यांत कांहीं तरी खास राक्षसी माया आहे. इतकें

मनांत आल्याबरोबर त्यांनीं भात्यांतून एक तीक्ष्ण बाण काढून धनुष्याला लावला, आणि त्याच्यावर नेम धरून तो सोडला. तो बाण धनुष्यापासून सुटून मृगाच्या शरिरास लागतांच तो अदृश्य होऊन त्याच्या ऐवजीं एक राक्षस पडतांना त्यांना दिसला. त्या राक्षसाचें नांव मारीच होतें. पडतां, पडतां, 'हा लक्ष्मणा, हा सीते,' असें मोठ्या आर्त स्वरानें ओरडून त्यानें प्राण सोडला. त्याला पाहून ते तेथेंच स्तब्ध उभे राहिले. त्यांना फार आश्चर्य वाटलें. 'हा लक्ष्मणा, हे सीते, या त्याच्या अंतकाळीं निघालेल्या शब्दामुळें त्यांना विशेष चिंता वाटूं लागली. हे शब्द जर लक्ष्मणानें आणि जानकीनें ऐकिलें तर त्यांची काय दशा होईल, याबद्दल ते विशेष काळजींत पडले.

इकडे सीता व लक्ष्मण आपल्या पर्णकुटींत बसून रामचंद्राची वाट पहात होते. जेव्हां त्यानां यावयास वेळ लागला, तेव्हा तीं दोघेंहि त्यांच्यासंबंधानें काळजी करूं लागलीं. तीं अशीं काळजी करीत बसलीं आहेत, इतक्यांत मारिचानें मरतांना काढलेला आर्तस्वर त्याच्या कानीं आला. तो ऐकून सीतेच्या हृदयांत धडकी भरली. ती लगेच व्याकूळ होऊन गेली. ती मनांत विचार करूं लागली, कीं आर्यपुत्राला कोणी राक्षसानें पकडलें तर नाहीं ना? देवा, त्यांना किती कष्ट होत असतील! ते कोणत्या आपत्तींत सांपडून लक्ष्मणाला व मला मंदभागिनीला हाका मारीत आहेत. हे विचार तिच्या मनांत येतांच, सीतेच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. ती दुःखानें कळवळून जाऊन लक्ष्मणाला म्हणाली— 'लक्ष्मणा, पहा, लवकर उठा, आणि धांवत जाऊन आपल्या प्रियबंधूला सहाय्य करा. तुमचे बंधु यावेळीं राक्षसाच्या तावडींत सांपडले आहेत, आणि दुःखानें ते तुम्हाला हाक मारीत आहेत! उठा, लवकर जा, वेळ करूं नका.'

सीता अशा रीतीनें आपल्या ठिकाणीं अगदीं घाबरून गेली असतां, लक्ष्मणाच्या मनाची स्थिति कशी झाली होती, तो स्वतः सीतेप्रमाणें घाबरून गेला होता किंवा नाहीं, इकडेहि थोडसें आपण लक्ष पुरविलें पाहिजे. नाहीं, लक्ष्मण मुळींच घाबरलेला दिसत नाहीं. त्याचें मुख तर प्रफुल्लित आहे. त्याच्या तोंडावर किंचित्हि फरक दिसत नाहीं. त्याचे नेत्र पूर्वीप्रमाणेंच आनंदी असून त्याच्या मुखावर नेहमींचें हास्य दिसत आहे. मारिचाचा कपटी आर्तस्वर ऐकून त्याच्या मनांत मुळींच चिंता उत्पन्न झाली नाहीं. तो सीतेची भयभीत वृत्ति पाहून तिला शांतपणानें म्हणाला 'आपण कांहीं काळजी करूं नका. रामचंद्राला कशाचेंहि भय नाहीं. ते निर्भय आहेत. त्यांच्या मुखांतून दीन शब्द केव्हांहि निघणार नाहींत. त्यांच्या पुढें क्षुद्र राक्षसांची कथा काय? सर्व जगांत त्यांना कोणीहि पराजित करूं शकणार नाहीं. मला खात्री आहे कीं, ही वाणी रामचंद्राची नव्हे, तर एखाद्या कपटी राक्षसाची आहे. आपण धीर धरा. ते आतां लवकरच कुशल परत येतील. लक्ष्मणाच्या या धीराच्या गोष्टींनीं सीतेचें मन स्वस्थ झालें नाहीं, व तिचीकाळजीहि कमी झाली नाहीं. हें लक्ष्मणाचें भाषण ऐकून ती अधिकच व्याकुल झाली.

या गोष्टीला जरी आज हजारों वर्षें होऊन गेलीं आहेत, तरी सीता देवीच्या या वेळच्या अविचाराच्या कृतीचें स्मरण झालें कीं अजूनहि आमचें हृदय विदीर्ण होऊन जातें. सीता स्त्री तर होतीच. तेव्हां स्त्रीजनोचित दुबर्लता आणि अविचारशीलता यांना वश होऊन आणि स्वामीच्या काल्पनिक आपत्तीनें भिऊन धर्मनिष्ठ लक्ष्मणाच्या गुणाला ती एक वेळच कां होईना, पण पार विसरून गेली. ती भ्रतृप्रेमशून्य नाना प्रकारच्या निंद्य शब्दांनीं त्याची निर्भत्सना व अपमान करूं लागली. सीता लक्ष्मणाला वरचेवर दुर्भाषणांनीं टोचीत होती. तरी

तो पूर्वींप्रमाणेंच शांत बसला होता. त्यानें तिला प्रत्युत्तर मुळींच दिलें नाहीं. लक्ष्मणाची ही अशी शांति, धीरता, आणि निश्चितता पाहून सीता रागानें अगदीं बेभान होऊन गेली. ती त्याला त्वेषानें म्हणाली, ' हे नराधमा, कुलांगारा, तूं मोठा पापी व जुलमी आहेस. तुझ्या वडील भावाला दुःख झालें तर तुला त्याबद्दल सुख वाटतें. असें नसतें तर तूं या वेळीं असा स्वस्थ कसा बसला असतास! तुझ्या मनांस जर लवमात्र भातृप्रेम असतें, तर तूं अशी गोष्ट बोललाच नसतास. तूं महा कपटी व क्रूर आहेस. अरे दुष्टा, तुझा हेतु मी जाणला. तुझें कपट आतां बाहेर पडलें. मला वाटतें तुला भरतानें पाठविलें असून तूं त्याला मिळाला आहेस. पण तुझे मनोरथ केव्हांहि पूर्ण होणार नाहींत, हें तूं पक्कें लक्षांत ठेव. तुझी पापवासना केव्हांही फलद्रूप होणार नाहीं. मीं याच क्षणीं तुझ्या समोर प्राणत्याग करीन. रामचंद्राशिवाय एक क्षणभर देखील मीं आपला जीव ठेवणार नाहीं. "

(वा. रा. कां. ३ सर्ग ४५)

हे सरस्वती, तूं सीतेच्या जिव्हेवर बसून, तिच्या मुखानें अशी अप्रशस्त व दुष्ट वाणी कशी वदविलीस. अशा निंद्य शब्दांचा उच्चार करतांना सीतेच्या त्या जिव्हेचे शतशः तुकडे तुकडे कसे झाले नाहींत? ती गळून कशी पडली नाहीं. स्वर्गीय सौख्य घेतां घेतां सीतादेवी एकदांच कां होईना, पण नरकांत कशी जाऊन पडली. देवतुल्य लक्ष्मणाच्या साधुतेविषयीं संदेह उत्पन्न होणें, ही काय आश्चर्याची गोष्ट नव्हे! जो सीतेला सुमित्रेप्रमाणें पूज्य मानीत असे, आणि सीताही ज्याच्या गुणांची एक वेळ नव्हे तर वारंवार प्रशंसा करीत असे, ज्यानें रामचंद्राच्या सेवेकरितांच केवळ सर्व सुख सोडलें, रामचंद्राला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊं नये एवढ्याच विचारानें ज्यानें घरांतील सर्व सुखसंपत्तीवर तिळांजली

देऊन व चिरवल्कल धारण करून वनांत प्रस्थान केलें, ज्यानें वनांत येतांच रामचंद्राकरितां व सीतादेवीकरितां खाणें पिणें देखील सोडून त्यांची एकनिष्ठपणें सेवा केली, ज्यानें आपल्या आचरणानें संसारांत साधुतेचा आदर्श करून ठेवला, जो आत्मत्यागाकरितां आणि अलौकिक भ्रातृप्रेमाकरितां जगांत प्रसिद्ध झाला, ज्यानें त्या दिवसापासून आमरण केव्हांही सीतादेवीच्या मुखाकडे डोळा वर करून देखील पाहिलें नाहीं, त्या देवतुल्य दीरावर सीतेच्या मुखांतून असल्या दुर्वाक्यांचा भडिमार व्हावा, ही फार अनर्थाची गोष्ट आहे. सुशील व सदाचारी लक्ष्मणाविषयीं सीतेची अशी दुर्भावना झालेली पाहून कोणीही कोणत्याही प्रकारानें याबद्दलचा सीतेचा निर्दोषीपणा सिद्ध करणार नाहीं. आमचें तर असें स्पष्ट मत आहे कीं, सीतेनें लक्ष्मणाच्या वर्तनाविषयीं जो संशय प्रकट केला, तो सर्वथा मिथ्या व निर्मूल आहे. त्याच्यांत लेशमात्रही तथ्यांश नाहीं. सीता लक्ष्मणाला असलीं कटु भाषणें बोलेल, आणि त्याच्या सत्शीलाबद्दल शंका दाखवील, असें आम्हांला स्वप्नांत देखील वाटलें नाहीं. सीतेच्या पवित्र व सरळ स्वभावावरून अशी गोष्ट तिच्या हातून घडेल, हें केव्हांच संभवनीय नव्हतें. ही गोष्ट तिच्या नेहमींच्या स्वभावाविरुद्ध तिच्याकडून घडली. तर मग तिच्या तोंडून असले अभद्र शब्द कसें निघाले? सीतादेवी आपणा स्वतःला अशी सहजपणें कशी अगदीं विसरून गेली. तिनें आपल्या नेहमींच्या स्वभावाविरुद्ध असें वर्तन कां केलें? आमची परम स्नेहवती, प्रियवादिनी, आणि सतिशिरोरत्न चरित्रनायिका जानकी एखाद्या साधारण स्त्रीयेप्रमाणें कशी झाली! खचित यांत कांहींतरी गूढ आहे, तेव्हां त्याचा आतां सूक्ष्म रीतीनें विचार केला पाहिजे.

लक्ष्मण एक उत्तम कोटींतील वीरपुरुष होता. त्याच्यांत साहस व तेजस्वीपणा विलक्षण होता. राक्षसांबरोबर झालेल्या युद्धाचा

परिणाम तो पूर्णपणें जाणून होता. ज्या अपूर्व मृगाला पाहून सीतादेवी इतकी मोहित झाली होती, व ज्याला पकडण्याकरितां स्वतः रामचंद्र धांवून गेले होते, त्याला पाहतांक्षणींच बुद्धिवान व दूरदर्शी लक्ष्मणानें संशय प्रकट केला होता. त्याला पाहिल्याबरोबरच त्यानें हा कांहीं खरा मृग नाहीं, मायावी आहे,' असें सांगितलें होतें. तो ह्मणाला—

'मृगो ह्येवंविधो रत्नविचित्रो नास्ति राघव ।
जगत्यां जगतीनाथ माय़ैषा हि न संशयः ॥'
(वा. रा. अ. कां. सर्ग ४३ श्लोक ८.)

'हे राघवा, जगांत असला विचित्र मृग नसतो. निःसंशय ही माया आहे. मृग नव्हे.'

ज्या वेळेस रामचंद्राच्या आवाजाप्रमाणें आवाज काढून त्या मायावी राक्षसानें 'हा सीते, हे लक्ष्मणा,' हे शब्द त्या जंगलांत मोठ्यानें उच्चारिले, त्याच वेळस लक्ष्मणानें त्याचा हेतु जाणला, व तो सीतेसही कळविला. परंतु ती पुष्पाप्रमाणें कोमल हृदयाची होती. ती नेहमीं पतिपरायणा होती. त्याला किंचितही क्लेश होण्याचा संभव असला तर तिचें हृदय दुःखी होई. तशीच ती फार भोळ्या स्वभावाची होती. यामुळें लक्ष्मणानें समजून सांगितलें तरी तिची त्या मृगासंबंधानें खात्री होईना, व त्याच्या बोलण्यावर तिचा विश्वासही बसेना. राक्षसाची ती आर्तवाणी ऐकून तिचें हृदय थरथर कांपू लागलें. अबला सीतादेवीला ' वीरवर लक्ष्मणानें लवकर धनुष्यबाण घेऊन रामाच्या मदतीला जावें, असें वाटलें. परंतु त्यानें तसें कांहीं न करितां तें ऐकून तो तसाच तेथें स्वस्थ बसून राहिला. तो सीतेसारखा अधीर व व्याकुळ झाला नाहीं. लक्ष्मणाला स्थीर व शांत पाहून सीता एखाद्या उन्मादिनी स्त्रीप्रमाणें भीषण मूर्ति बनली. ती पतीकरितां किंचित् दुःखी होऊन पुत्राप्रमाणें लक्ष्मणाला व आपणा-

स्वतःलाहि पार विसरून गेलीं. थोड्या वेळांत ' किंकर्तव्यमूढ ' अशी सीतेची स्थिति बदलून गेली. तिला आपल्या कर्तव्यकर्माचेंहि ज्ञान राहिलें नाहीं. अशा स्थितींत पतिप्राणास्त्रीचा स्वभाव याप्रमाणें बदलून जातो, हें यावरून स्पष्ट होत आहे.

ज्या वेळेस सीतेनें त्याच्यावर वाग्बाणांचा वर्षाव केला, त्या वेळेस साधुशील लक्ष्मणाच्या कोमल हृदयावर केवढा आघात झाला असेल, व त्याला त्यापासून किती प्राणांतिक वेदना झाल्या असतील, त्याची सहृदय वाचक कल्पना करतील. सीतेच्या कटुवाक्यांना लक्ष्मणानें तसेंच कटु शब्दांनीं उत्तर दिलें नाहीं असें जरी मानलें, तरी त्याच्या हृदयाला तिच्या वाग्बाणांनीं कमी पीडा झाली असें नाहीं. तो मोठा धार्मिक, साधु, व भ्रातृभक्त होता. तो सीतेला मातेप्रमाणें समजत असे. लक्ष्मण इतका आत्मसंयमी होता कीं, त्यानें सीतेचें तें दुर्भाषण मुकाट्यानें ऐकून घेतलें. अशा साधुशील दिराचें मन उगीच दुखविणें हें पाप नाहीं काय! अशा सच्चरित्र महापुरुषाच्या चारित्र्यावर असा मिथ्या कलंक लावणें हा घोर अन्याय नव्हे का? आमच्या अल्पमतीला हें मोठें पाप व घोर अन्याय वाटतो. आमच्या समजुतीनें तर निर्दोष लक्ष्मणाला दोष लावणें व त्याला दुःशब्दांनीं ताडण करणें चांगलें नाहीं असेंच वाटतें. असो.


सीतादेवीचें तें दारुण भाषण ऐकून दुःख, क्रोध आणि अभिमान हे सर्व विकार लक्ष्मणाच्या हृदयांत एकदम जागृत झाले; परंतु तो आपले हे सर्व विकार मनांतल्या मनांत दाबून टाकून सीतेला हात जोडून म्हणाला, ' देवी, आपण मला पूजनीय आहांत. मी आपणाला साक्षात् देवीच समजतों. आपल्याला प्रत्युत्तर देणें माझें काम नाहीं. तें मी देऊं शकत नाहीं. अनुचित गोष्टी बोलणें स्त्रियांकडे आहे. त्यांचा स्वभावच असला असतो. आपला यांत

कांहीं दोष नाहीं. परंतु आपल्या या कठोर भाषणानें माझ्या मनाला अत्यंत पीडा होत आहे. मी निष्कपटभावानें आपल्या कल्याणाकरितां बोलत होतों, याबद्दल ईश्वर साक्षी आहे. इतक्या वरही जर आपण माझ्याविषयीं शंका घेत असाल तर आपल्याला धिःक्कार असो. आपल्या बुद्धींत असा भयंकर फरक पडणें, हें आपल्या आपत्तींचें सूचक आहे. मी वडील बंधूच्या आज्ञेचें पालन करण्यास पहात होतों; पण आपण मला तसें करूं देत नाहीं. आपण आपल्या स्त्रीस्वभावाला अनुसरून माझ्याशीं हें भाषण केलेंत. आतां ईश्वर आपलें रक्षण करो. आपल्या म्हणण्याप्रमाणें मी रामचंद्राकडे जातों. मला या वेळीं फार वाईट शकून होत आहेत. ईश्वर व वनांतील प्राणी आपलें संरक्षण करोत. हे परमात्मन्, आम्ही दोघे बंधु परत आलों म्हणजे सीतेला या कुटींत कुशल पाहूं, एवढीच आपण कृपा करा.'

(वा. रा. कां. ३. सर्ग ४९).

लक्ष्मणाचें हें वरील भाषण ऐकून सीतेनें त्यावर कांहींएक उत्तर दिलें नाहीं. ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. ही फार हट्टी आहे, आपला हट्ट केव्हांही सोडणार नाहीं, आणि आपल्या सांगण्यानें हिची समजूतही पटावयाची नाहीं, असें लक्ष्मणानें पाहिलें तेव्हां तो रागारागानें रामचंद्राकडे निघून गेला.

लक्ष्मण निघून गेल्यावर सीता एकटीच आपल्या कुटींत त्याची व रामचंद्राची मार्गप्रतिक्षा करीत बसली. कांहीं वेळ गेल्यावर त्या कुटीच्या दाराशीं एक संन्याशी येऊन उभा राहिला. त्यानें गेरूनें भगवीं केलेलीं वस्त्रें परिधान केलीं होतीं. त्याच्या डाव्या हातांत दंड व उजव्या हातांत कमंडलु होता. जेव्हां तो संन्याशी कुटीच्या दाराशीं येऊन पोहोंचला, आणि त्यानें सीतेला पाहिलें, तेव्हां तिचें अलौकिक सौंदर्य पाहून तो मनांत अगदीं चकित होऊन गेला.



रावण रामाश्रम गमन.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

सीतादेवीच्या कमलासमान नेत्रांतून अश्रुबिंदु टपटप गळत आहेत, असें त्यानें पाहिलें. त्या वेळेस ती खोल विचारांत गढून गेली होती. जरी ती त्या वेळीं दुःखांत चूर होऊन गेली होती, तरी तिच्या मुखावर एकप्रकारचें दिव्य तेज चमकत होतें. संन्याशानें दाराशीं येतांच सीतेच्या सौंदर्याची मुक्त कंठानें प्रशंसा केली. नंतर तो तिला म्हणाला, 'तूं येथें एकटी कां बसली आहेस.'

सीता स्वतः शोकाकुल स्थितींत असतां तिनें आपल्या दाराशीं आलेल्या संन्याशाकडे लक्ष दिलें नसेल, असें वाचकांच्या मनांत येण्याचा संभव आहे, परंतु तसें नव्हे. सीतेचें अंतःकरण धार्मिक शिक्षणानें पवित्र झालें होतें. तिच्या ठिकाणीं तें पूर्णपणें भिनलें होतें. संन्याशाला पाहतांच ती डोळे पुसून उठून उभी राहिली. तिनें त्याला नमस्कार करून बसावयास आसन दिलें. इतकेंच नव्हे तर त्याला फळेंहि खावयास दिलीं. सारांश, अतिथीच्या सेवेंत कोणत्याच प्रकारचा तिनें उणेपणा दिसूं दिला नाहीं. याचें नांव धर्मशिक्षण! ती त्याला नम्रपणानें म्हणाली 'महाराज,' आपण थोडा वेळ थांबा. विश्रांति घ्या. इतक्यांतच माझे स्वामी व दीर येतील! हें सीतेचें भाषण ऐकून तिच्या म्हणण्याप्रमाणें रामचंद्र-लक्ष्मणांची वाट पहात बसण्यास तो खरा संन्याशी थोडाच होता! तो कपटवेषधारी संन्याशी होता. इकडे तिकडे पाहून तो सीतेला म्हणाला 'जानकी, ज्याच्या प्रतापाला देव, असुर, व सर्व मानवप्राणी भितात व ज्याचें नांव ऐकतांच मोठमोठे वीर पुरुष कांपतात, तोच मी राक्षसेश्वर रावण होय. तूं फार सुंदर आहेस. तुला पाहतांच माझें मन मोहित होऊन गेलें आहे. मी अनेक ठिकाणांहून असंख्य रूपवती रमणी हरण करून आणिल्या आहेत. माझ्या राणीवशांत एकाहून एक सुंदर अशा शेंकडों राण्या आहेत, परंतु त्यांत तुझ्यासारखी एकही सुंदरी नाहीं. याकरितां तूं माझी पट्टराणी

हो. माझी राजधानी लंका आहे. लंकापुरी फार सुंदर असून ती एका पर्वतावर वसलेली आहे. तिच्या सर्व बाजूंनीं समुद्र आहे. तूं माझी पट्टराणी हो, म्हणजे हजारों स्त्रिया तुझी सेवा करण्यांत तत्पर राहतील. लंकेंतील सुखाचा एकदां अनुभव घेतल्यावर वनवासाचे क्लेश तूं पार विसरून जाशील. तूं माझा स्वीकार कर. मी नेहमीं सर्वस्वीं तुझा अनुगामी होऊन राहीन. मी तुझ्या मनाविरुद्ध कोणतेंही काम करणार नाहीं. तूं त्या यःकश्चित् रामाला विसरून माझें ध्यान कर. जो पुरुष एका स्त्रीच्या सांगण्यावरून आपलें राज्य सोडून वनांत चालून आला, त्या निर्बुद्ध व अल्पायु रामावर एवढी भक्ति व प्रीति कां करतेस?

रावणाच्या तोंडून असलें अभद्र भाषण ऐकून सीता आश्चर्य सागरांत बुडून गेली. ती क्रुद्ध होऊन सिंहिणीप्रमाणें गर्जना करूं लागली. पाहतां पाहतां तिच्या मुखावर क्रोधाग्नि प्रज्वलित झालासा दिसूं लागला. क्रोधाच्या अतिरेकानें तिचें अंग कांपूं लागलें. कांहीं वेळपर्यंत तर तिच्या तोंडांतून रागानें शब्द सुद्धां निघाला नाहीं. नंतर ती रावणाचा धिःकार करून तिरस्कारानें म्हणाली–' अरे पाप्या, तूं हें काय बोलत आहेस. जे हिमाचलाप्रमाणें स्थीर असून सागराप्रमाणें गंभीर आहेत, ते रामचंद्र जेथें असतील, तेथेंच मी जाईन. जे सत्यप्रतिज्ञ, धर्मात्मे, कीर्तिमान आणि शूर आहेत, त्यांच्याच जवळ मी जाणार. ज्यांचे बाहुयुगल सुदीर्घ, विशाल वक्षस्थल, आणि मुख चंद्राप्रमाणें आल्हादकारक आहे त्यांच्याचकडे मी जाईन. ज्यांचा सिंहाप्रमाणें पराक्रम असून, ज्यांची गतिहि सिंहासारखीच आहे, त्या पुरुषोत्तम रामचंद्राखेरीज मी अन्य ठिकाणीं कधींच राहणार नाहीं. अरे नीच राक्षसा, तूं गिधाड होऊन सिंहाचा भाग घेऊं पहातोस काय? ज्याप्रमाणें सूर्याच्या प्रभेला कोणीहि स्पर्श करूं शकत नाहीं, त्याप्रमाणें तूं

मलाही स्पर्श करूं शकत नाहींस. अरे, तूं त्या रामचंद्राच्या प्रियपत्नीचा अभिलाष धरून व्यर्थ काळाला कां पाचारण करतोस ? सापाचे आणि सिंहाचे दांत उपटण्याचें तूं कां इच्छितोस ? सुईच्या अग्रानें डोळे कां खाजवतोस ? गळ्यांत दगड बांधून तूं समुद्र पार कसा उतरणार ? विस्तवाला आपल्या पदरांत बांधून कशाला घेतोस ? कांट्यांवर चालावयाची इच्छा करणें चांगलें नाहीं. समुद्र आणि नाला, तसेंच सिंह आणि गिधाड, सुवर्ण आणि लोह, गरुड आणि कावळा, हंस व बगळा, या सर्वांमध्यें जेवढें अंतर आहे, तेवढें तुझ्यांत आणि रामचंद्रांत अंतर आहे. अरे दुष्टा, जरा थोडा वेळ थांब, आतां इतक्यांत धनुर्धारी रामचंद्र वीर लक्ष्मणासह येतील आणि तुला चांगला दंड करतील तूं मोठा पापी, दुराचारी, आणि निर्दय आहेस. जर तूं मला असहाय्य समजून बळानें घेऊन जाशील, तर मी धर्माकरितां आपले प्राण देईन. तूं वाटेल तेवढी आपली बढाई मारलीस, तरी मी तुला कधींही वश होणार नाहीं. जर तूं माझ्या शरिराला स्पर्श केलास तर आपल्या कुलासह नाश पावशील. तूं मला असहाय्य व एकटी पाहून असें घाणेरडें भाषण बोलतोस, पण माझे स्वामी आणि दीर आले म्हणजे त्यांच्या हातून तुझे प्राण वांचणार नाहींत. '

(वा. रा. कां. ३ सर्ग ४७).

ज्या वेळेस सीता रागानें याप्रमाणें रावणाला बोलत होती, त्यावेळेस तिचा चेहरा फारच भयंकर झाला होता. तिची ती क्रोधाविष्ट मुद्रा पाहून रावणाचेंही कठीण हृदय थरथर कांपलें. जेव्हां पापी रावणानें सीता इतकी बिथरलेली पाहिली, तेव्हां तो तिला बलात्कारानें घेऊन जाण्याचा मनाशीं विचार करूं लागला. त्यानें लागलींच भगवीं वस्त्रें फेंकून देऊन एकदम आपलें राक्षसी रूप प्रगट केलें. त्याचें तें भयंकर रूप पाहून जात्याच कोमल प्रकृतीची

सीता त्याच्यापुढें पिंपळाच्या पानाप्रमाणें थरथर कांपूं लागली. तिच्या डोळ्यांपुढें अंधारी आली. रावणानें डाव्या हातानें तिचे केंस व उजव्या हातानें पाय धरून तिला बलात्कारानें उचलून रथांत घातलें. ' मला सोडून दे ' अशी तिनें पुष्कळ वटवट केली; पण तो दुष्ट रावण कसचा ऐकतो ! त्यानें तिला भीति दाखवून रथांत गुपचीप बसण्यास सांगितलें. याप्रमाणें रावणाच्या तडाक्यांत अकस्मात् सांपडून ती रामचंद्राला व लक्ष्मणाला मोठ्यानें हांका मारूं लागली. त्या निर्जन वनांत तिची हांक कोण ऐकणार ? सीतेची दीन वाणी, व तिचा शोक ऐकून त्या वनांतील सर्व वृक्ष, लता, मृग, व पक्षी स्तब्ध झाले. चहूंकडून हाः हाः काराचा ध्वनि उठूं लागला. धरणी कांपूं लागली. रामचंद्राची धर्म पत्नी सीतादेवी हिला रावणाच्या स्वाधीन पाहून सर्व जीव-जंतु व्याकुल होऊन गेले. सीता रडत रडत म्हणाली—'हे ईश्वरा, महात्म्या रामचंद्राच्या पतिव्रता पत्नीला दुष्ट रावण हरण करून नेत आहे. धर्माला अधर्म दाबून टाकीत आहे. पाप पुण्याला तुड-वीत आहे. हाय, हाय, आतां जगांतील धर्म मारला गेला; सत्य-धर्म उठून गेला. दयेचें तर नांवाहि ऐकूं येत नाहीं. दुष्ट रावणाच्या कचाट्यांतून सुटण्याचा सीतेनें आपल्याकडून होता तितका प्रयत्न केला, पण त्या पाप्यानें तिला सोडिलें नाहीं. तो विमानांत बसून आकाशांत उडून गेला. मार्गांत सीता एकसारखी रडत होती. ती दुःखानें आपल्याशींच म्हणाली, ' जर मीं वीर लक्ष्मणाला दुर्भा-षणें बोलून कुटींतून घालविलें नसतें, तर हा पापी मला कां हरण करून नेता ? तिनें पुष्कळ वेळ रडून, आरडून आकांत केला. कोणी जेव्हां सहाय्यक दिसेना, तेव्हां ती शोकसागरांत निमग्न होऊन गेली. तिला मूर्च्छा आली. किंचित् शुद्धीवर येऊन ती पुनः म्हणाली-' हे भ्रातृभक्त लक्ष्मणा! हा दुष्ट राक्षस मला हरण करून नेत आहे,

तुम्ही याला पहात नाहीं काय ! हे स्वामी, हा प्राणपते, आपण धर्माकरितां सर्वस्वाचा त्याग करून वनांत आलांत; फक्त मी एकटीच आपल्या सेवेकरितां राहिलें होतें, ती मी आतां या दुष्ट रावणाच्या हातीं सांपडलें आहें. मला कोणी घेऊन जात आहे हें आपण जाणत नाहीं काय ? महाराज, आपण दुष्टाला दंड करणारे असून मग या रावणाला शिक्षा कां करीत नाहीं ? हे राक्षस-कुला-धमा रावणा, तूं हें नीच कर्म करून मृत्यूच्या जाळ्यांत फसत आहेस. रामचंद्राच्या प्रिय भार्येला चोरून नेऊन तूं जिवंत राहूं शकणार नाहींस ! हायरे देवा, आज कैकयीची इच्छा पूर्ण झाली. आज मी ठार मारलें गेलें. हे जनस्थाना, मी तुला नमस्कार करतें. हे वना, तुला माझा प्रणाम असो. मला रावण घेऊन जात आहे, हें वर्तमान तुह्मी रामचंद्राला लवकर कळवा. हे माते गोदावरी, तुला माझा नमस्कार असो. प्रभु रामचंद्राला माझा समाचार लवकर कळीव. प्रत्यक्ष यम मला घेऊन जाऊं दे, किंवा कोणी मला वाटेल त्या ठिकाणीं नेऊन ठेवो, त्यांना माझें वृत्त कळतांच ते मला तेथून परत घेऊन येतील. मला त्यांचा पूर्ण विश्वास आहे. त्यांच्यासमोर उभें राहण्याची कोणाचीहि शक्ति नाहीं. "

याप्रमाणें विलाप करीत आणि जागोजाग आपल्या अंगावरील भूषणें काढून फेंकीत सीतादेवी रस्त्यानें चालली होती. ती केव्हां रावणाची समजूत करण्याचा प्रयत्न करी, केव्हां कटु शब्दांनीं त्याचा धिक्कार करी. केव्हां त्याला भीति घाली, केव्हां रागानें त्याच्यावर चरफडे. परंतु रावणानें तिच्या कोणत्याहि गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं. एके ठिकाणीं जातां जातां पर्वतावर कांहीं मंडळी बसली होती. त्यांना पाहून हे लोक रामचंद्राला भेटून माझी हकीकत त्यांना सांगतील असें तिला वाटून तिनें आपल्या अंगावरील कांहीं दागिने काढून आणि ते वस्त्रांत बांधून खालीं त्यांच्याकडे

फेंकले. रावण आपल्या जाण्याच्या नादांत होता. तिनें दागिने फेंकलेले त्यानें पाहिलें नाहीं. त्या लोकांनीं वर पाहिलें तों त्यांना एक देवीरूपिणी स्त्री दिसली; परंतु त्याच वेळेस रावणाचें विमान उंच उडून गेल्यानें ते तिला ओळखूं शकले नाहींत.

रावण विजेप्रमाणें लवकर लंकेंत जाऊन पोंहचला. त्यानें सीतेला आपल्या महालांत नेऊन ठेविलें. जी सीता आपल्या पतीबरोबर निर्जन वनांत भ्रमण करूनहि स्वर्गसुखाचा अनुभव घेत होती, ती आतां एकदम दुष्ट रावणाच्या हातीं सांपडून आपला प्राणेश्वर रामचंद्र व गुरुभक्त लक्ष्मण हांच्यापासून शेंकडो कोस दूर जाऊन पडली. काय, सीतेच्या हृदयाला ही गोष्ट कमी दुःखदायक आहे! हाय, सतिवर कोण हा भयंकर प्रसंग! रामजीविता सीता देवीला विधात्यानें तिच्या पतीपासून इतक्या दूर कां टाकलें! आतां खरोखर सीता देवीला आपल्या प्राणेश्वराचें दर्शन पुनः होणार नाहीं काय? ती आपल्या प्राणनाथाशिवाय लंकेंत जिवंत कशी राहील?

कांहीं वेळ सीता रावणाच्या महालांत गेल्यावर दगडाच्या पुतळीप्रमाणें स्तब्ध उभी राहिली. जेव्हां तिथें तिनें आपणा स्वतःला असहाय्य स्थितींत पाहिलें, तेव्हां ती रडण्याखेरीज दुसरें काय करूं शकणार? ती मोठ्यानें रडूं लागली. तिनें आपल्याला वश व्हावें म्हणून रावणानें प्रथम तिची पुष्कळ समजूत केली. तिला पुष्कळ लालूच दाखविली. तिला अनेक प्रकारच्या वस्तु देऊं केल्या. इतकेंहि करून जेव्हां ती ऐकेना, तेव्हां त्यानें तिला राक्षसींच्या पहाऱ्यांत ठेविलें. पापी रावणाच्या आज्ञेनें त्या राक्षसींहि तिला धमकी देऊं लागल्या, व भीति दाखवूं लागल्या. जनकनंदिनी रामप्रिया सीता मोठी पतिव्रता होती; तिनें त्या क्षणींच त्या राक्षसींना व त्यांचा राजा रावण यांना झिडकारून टाकलें. तिनें त्यांना बजाविलें कीं 'मी साधारण स्त्री नव्हे. मी

ब्रह्मज्ञानी जनकाची कन्या, सत्यवादी राजा दशरथाची स्नुषा असून सत्यप्रतिज्ञ महाबली रामचंद्राची धर्मपत्नी आहें' हें लक्षांत ठेवा.'

याप्रमाणें सीता राक्षसींच्या पहाऱ्यांत राहूं लागली. मधून मधून रावण तिची समजूत करीत असे. केव्हां केव्हां 'माझें ऐकिलें नाहींस तर तरवारीनें तुझें डोकें उडवून टाकीन,' अशीहि तिला तो भीति दाखवी. इतका जरी त्यानें प्रकार केला तरी ती आपल्या धर्मपथावर दृढ होती. आत्मप्रशंसा व रामचंद्राची निंदा करून रावणानें कित्येकदां सीतेचें हृदय दुखविलें, तरीहि सीतेचें पवित्र मन धर्मापासून लवलेशहि विचलित झालें नाहीं.

राक्षसेश्वर रावणाच्या मुखानें आपल्या पतीची निंदा ऐकून सीतेचें हृदय क्रोधाग्नीनें जळून गेलें. ती कुपित कालसर्पिणीप्रमाणें गर्जना करून रावणावर अपशब्दांचा वर्षाव करूं लागली. ती त्याला मुळींच न भितां म्हणाली 'हे पाप्या, तूं मला बांध, अथवा ठार मार, पण मी तुझ्या अपवित्र शरिराचा स्पर्श करून घेऊन धर्माला कधींहि अपवित्र व कलंकित करणार नाहीं. मी धर्मात्मा रामचंद्राची धर्मपत्नी आहे. तूं महापापी असून माझ्या शरिराला स्पर्श करण्याला योग्य नाहींस. चांडाळा, तुझें पापी तोंड मी मुळींच पाहूं इच्छित नाहीं.

'तथाऽहं धर्मनित्यस्य धर्मपत्नी दृढव्रता।
त्वया स्प्रष्टुं न शक्याऽहं राक्षसाधम पापिना॥'

(वा. रा. कां. ३ सर्ग ५६).

यावर रावणहि क्रोधानें लाल होऊन तिला म्हणाला—

'श्रुणु मैथिलि मद्वाक्यं मासान् द्वादश भामिनि।
कालेनानेन नाभ्येषि यदि मां चारुहासिनि।
ततस्त्वां प्रातराशार्थं सूदाश्छेत्स्यन्ति लेशशः॥१॥

(वा. रा. कां. ३. सर्ग ५६).

" हे जानकी ऐक. मी तुला बारा महिन्यांची अवधी देतों. त्या अवधींत जर तूं माझ्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास कबूल झाली नाहींस, तर माझे आचारी तुझ्या शरिराचे तुकडे तुकडे करून माझ्या सकाळच्या उपहाराकरितां त्याचा पाक करून वाढतील." इतकें सांगून त्यानें तिला अशोक वनांत पाठवून दिलें. तिच्या रक्षणाकरितां आणखी कांहीं राक्षसीहि त्यानें ठेविल्या, बिचारी मंदभागिनी सीतादेवी पतीच्या वियोगानें आपले दुःखाचे दुर्दिन त्या अशोक वनांत राहून मोठ्या कष्टानें घालवूं लागली.

' न विन्दते तत्र तु शर्म मैथिली। विरूपनेत्राभिरतीव तर्जिता।
पतिं स्मरन्ती दयितं च देवरं। विचेतना भूद्भ्दशोक पीडिता'॥.
(वा. रा. कां. ३. सग ९६)

अर्थात् अशोक वाटिकेंत राहूनहि सीतेचा शोक कमी झाला नाहीं. कां कीं, दुर्मुखी राक्षसी तिला क्षणोक्षणीं भीति दाखवीत होत्या. त्यामुळें ती आपल्या प्रिय पतीचें आणि दिराचें स्मरण करून करून शोकाकुल व भयाकुल होऊन मूर्च्छीत पडत असे.

चौथें कांड.

वालीवध.

‘ हा सीते, हे लक्ष्मणा, ’ अशी वाणी मारिचाच्या मुखांतून निघालेली ऐकून रामचंद्राला अत्यंत चिंता वाटूं लागली, हें आम्ही मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्याचें हृदय धडधडूं लागलें. कांहींतरी मोठें संकट आपणावर येणार आहे, असें त्यांस खास वाटलें. जानकीला एकटी कुटींत सोडून लक्ष्मण तर इकडे येत नसेल असेंहि त्यांना वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. ते मनांत बरेच घाबरून गेले. माझ्याप्रमाणें लक्ष्मणही राक्षसी मायेला फसला नसेलना? असे सीतेविषयींचे अनेक प्रकारचे चित्ताची शांति भंग करणारे विचार-तरंग त्यांच्या हृदयांत उठले. त्याच विचारतरंगांत ते कुटीकडे परभारें येत होते. त्यांचें पाऊलही त्यांना लवकर उचलेना, इतके ते त्या वेळेस व्याकुळ झाले होते. परत येत असतांना अनेक प्रकारचे अपशकुन झालेले पाहून तर त्यांचें उरलेंसुरलें धैर्यहि गळून गेलें. ते अशी काळजी करीत चालले असतां समोरून लक्ष्मण येतांना त्यांना दिसला. त्याला पाहतांच त्यांचें डोकें फिरूं लागलें, घसा कोरडा पडला, आणि कंठ दाटून आला. त्यांनीं कसेंबसें त्याला सीतेचें कुशल विचारिलें. ते दुःखावेगानें लक्ष्मणाला म्हणाले “वत्सा, मी तुला विश्वासपात्र समजून जानकीच्या रक्षणाकरितां मागें ठेवून आलों होतों. असें असून तूं माझ्या आज्ञेविरुद्ध तिला कुटींत एकटी सोडून इकडे कां आलास? पुढें आतां काय संकट ओढवणार आहे, हें मला कळत नाहीं. मला वाटतें, मागें राक्षस तिला घेऊन गेला असेल. एकांत जागा पाहून तो तिला ठार मारून

खाऊनहि टाकील. लक्ष्मणा, जर प्रियतमा जानकी जिवंत असेल तर मीं आश्रमांत येईन. नाहींतर तेथें जाण्यांत काय अर्थ आहे? राक्षसांनीं जर तिला मारलें असेल तर मीं मग जिवंत राहून काय फायदा? कुटींत पाऊल ठेवतांच मला पाहून जर सीतेची कोमल वाणी माझ्या बरोबर प्रेमालाप करणार नाहीं, तर बाबा, माझ्या जगण्याचें प्रयोजन तें काय?'

यांप्रमाणें रामचंद्राला अत्यंत शोकाकुल पाहून लक्ष्मण ह्मणाला 'मीं आपल्या स्वतःच्या इच्छेनें सीतेला एकटी सोडून इकडे आलों नाहीं.' इतकें बोलून 'आपण कां आलों, वगैरे सर्व हकीकत नंतर त्यानें रामचंद्राला सांगितली. सीतेनें रागावून आणि दुर्भाषणें बोलून लक्ष्मणाला येथें पाठवून दिलें, हें ऐकून त्यांचें चित्त अधिकच व्यग्र झालें. ते म्हणाले, 'बंधो, मैथिलीच्या सांगण्यामुळें तूं माझी आज्ञा मोडलीस हें चांगलें केलें नाहींस.'

असें बोलत बोलत ते उभयतां बंधु आपल्या कुटीजवळ येऊन पोहचले. ती शून्य कुटी दुरूनच पाहून रामचंद्राचा दुःखावेग क्षणोक्षणीं वाढत चालला. जलद चालून ते जेव्हां कुटीजवळ येऊन पोहचले, तेव्हां तेथें त्यांना सीता दिसली नाहीं. तिच्याशिवाय ती शून्यकुटी पाहून त्यांना त्या वेळीं इतकें दुःख झालें कीं त्याचें वर्णन करवत नाहीं. दोघां बंधूंच्या त्या वेळच्या हार्दिक वेदना अवर्णनीय होत्या. सीता कुटींत नाहीं असें पहिल्याबरोबर रामाला मूर्च्छा आली. बऱ्याच वेळानें राम शुद्धीवर आल्यावर ते उभयतां तिला कुटीच्या आसपास हुडकूं लागले; पण तेथेंहि जेव्हां तिचा पत्ता कोठें लागेना, तेव्हां रामचंद्र मोठ्या दुःखानें व्याकुल होऊन सीतेला उच्च स्वरानें हाका मारूं लागले. सीतेनें त्यांना ओ दिली नाहीं. हाय, ज्या प्रिय जानकीला रामचंद्र विकलतेनें हाक मारीत होते, तिचा तेथें पत्ता देखील नव्हता. त्यांची प्राण-

प्रिया सीता आश्रमांत नाहीं, हें सरल स्वभावाच्या रामाला मुळींच माहीत नाहीं. समुद्राच्या पार रावणाच्या अशोक वनांत राक्षसींच्या पहाऱ्यांत ती त्या वेळीं आपल्या प्राणेश्वराचें ध्यान करीत बसली आहे, हें त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक? सीतेचें विरहदुःख रामचंद्र फार वेळ सहन करूं शकले नाहींत. ‘ हा प्राणप्रिय सीते, क्वगतासि ’ असें म्हणून ते बेशुद्ध झाले. त्या वेळेस धीरव्रत लक्ष्मणानें ‘ आपण इतकें अधीर होऊं नये, जानकी येथेंच कुठें तरी आश्रमांत फुलें आणण्याकरितां गेली असेल, पर्वतावर इकडे तिकडे फिरण्याकरितां गेली असेल, तिला याचें मोठें वेड आहे, अथवा सरोवरावर स्नानाला गेली असेल, किंवा आपली थट्टा करावी म्हणून कोठें तरी लपून बसली असेल, आपण दोघे तिला आतां शोधून काढूं. काळजी करूं नका; ’ अशी त्यांची पुष्कळ समजूत केली.

नंतर सीतेच्या शोधार्थ ते दोघे बंधु इकडे तिकडे फिरूं लागले. रामचंद्राला समोर जो वृक्ष, जी लता, जे पशु, व जे पक्षी दिसत त्यांना ते सीतेचा पत्ता विचारीत. ते म्हणाले, ‘ हे कदंबा, माझी प्राणप्रिया तुझ्याशीं फार स्नेह ठेवीत होती, जर तूं तिला पाहिलें असशील, तर तूं मला तिचा पत्ता सांग. हे करवीर वृक्षा, तुझ्यावरहि कुरांगी जानकीचें प्रेम होतें, तिची तुला माहिती असेल तर बाबा मला सांग! हे अशोका, तूं शोकनाशक आहेस. मीं या वेळीं शोकाग्नीनें परितप्त झालों आहें, प्रिय जानकीला दाखवून माझा शोक दूर कर. हे तिलक, तूं वृक्षांत मुख्य आहेस, तुझ्या आसपास भ्रमर गुंजारव करीत फिरत आहेत, तूंहि जानकीच्या विशेष आदरास पात्र होतास, तिची कांहीं वार्ता माहीत असेल तर मला सांग. हे कर्णिका, तुझ्या पुष्पांचा सुवास सीता फार घेत असे. जर तिला तूं पाहिलें असशील, तर मला सांग. हे

मृगा, तूं मृगनयना जानकीला अवश्य जाणत असशील. तुला जर तिच्या विषयीं कांहीं शोध लागला असेल तर सांग.'

याप्रमाणें रामचंद्रांनीं तेथील सर्वांना सीतेचा पत्ता विचारला, परंतु त्यांना कोणींच उत्तर दिलें नाहीं. सीतेच्या विरहानें ते लवकर पुन: भ्रांतचित्त झाले. त्यांना सर्व स्वप्नाप्रमाणें वाटूं लागलें. सीता आपल्या समोरून जाऊन थट्टेनें एका वृक्षाच्या आड लपली, असेंहि त्यांना मधून वाटलें. तेव्हां ते त्या कल्पित सीतेला उद्देशून म्हणाले—'हे नीरजनयने, मी तुला पाहीन म्हणून का तूं पळतेस? म्हणूनच कां झाडाच्या आड लपतेस? तूं वृक्षाच्या खोडांत असून माझ्या प्रश्नाचें उत्तर कां बरें देत नाहींस? एकवार तरी माझ्याशीं बोल. अशी निर्दय स्वभावाची कशी बनलीस. अशी थट्टा तूं कधीं करीत नव्हतीस. आतां उगीच उशीर कां लावतेस? माझें सत्व कां बघतेस-मी तुला पूर्णपणें ओळखतों. तूं लवकर लवकर पळून जात आहेस, हें मला दिसतें. तुझ्या हृदयांत जर माझ्याबद्दल कांहीं प्रेम असेल, तर थांब. पळूं नकोस. जानकी, मी तुझ्या विरहाग्नीनें भस्म होत आहें. माझ्यावर दया कर. जवळ ये. ज्या हरिणाच्या बच्च्या बरोबर तूं खेळत होतीस, तें पहा कसें उदास होऊन बसलें आहे.'

कांहीं वेळानें जेव्हां रामचंद्र भानावर आले, तेव्हां त्यांना आपण भ्रमिष्टाप्रमाणें बडबडत होतों, असें समजलें. कोणी तरी राक्षस तिला घेऊन गेल्याबद्दल त्यांची नंतर खात्री झाली. ते पुन: दु:खानें व्याकुल होऊन लक्ष्मणाला म्हणाले, 'बंधो, जानकी कुठें गेली! तिच्यावांचून मी कसा जगेन.' लक्ष्मणानें त्यांची पुष्कळ प्रकारें समजूत केली, परंतु त्याच्या गोष्टी त्यांना रुचल्या नाहींत. सीतेच्या स्मरणानें त्यांना वारंवार दु:ख होऊं लागलें.

रामचंद्राची ती दु:खाकुल स्थिति पाहून लक्ष्मणाला अति वाईट

वाटलें. त्यानें तेथील सर्व स्थळें शोधिलीं; पण सीतेचा कोठेंच पत्ता लागेना. शोधतां शोधतां ते दक्षिण दिशेकडे गेले. मार्गांत त्यांना एक गहन वन लागलें. तेथें देखील त्यांनीं शोध केला, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. जेव्हां ते मतंग ऋषीच्या आश्रमांत जाऊन पोहोंचले, तेव्हां रस्त्यांत त्यांना दुसऱ्या एका संकटाला तोंड द्यावें लागलें. त्या वनांत कबंध या नांवाचा एक राक्षस रहात होता. त्या दोघां सुकुमार बंधूंना पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटलें. त्याच्या मनांत त्यांना मारून खावयाचें होतें. त्याचें तें भयंकर व विकटरूप पाहून मोठमोठ्या धीरवीर पुरुषांचेंहि हृदय भीतीनें कांपत असे. त्याचे हात बरेच लांब होते. जेव्हां रामलक्ष्मण त्याच्याजवळ जाऊन पोहचले, तेव्हां त्यानें आपले दोन्ही लांब हात पसरून त्यांना धरलें. कबंधाच्या हातांत सांपड-ल्यामुळें लक्ष्मण विकल होऊन निराश झाला; त्या वेळेस रामचं-द्रांनीं त्याला पुष्कळ धीर दिला. नंतर त्या दोघां बंधूंनीं भीतीला दूर सारून त्या भीमदर्शक राक्षसाचे दोन्ही हात तोडून टाकले. हात तुटतांच त्याचें सर्व शरीर रक्तबंबाळ होऊन गेलें. तो त्या दुःखानें लागलेंच भूमिवर पडला. पडतां पडतां त्यानें त्या दोघांचा वृत्तांत विचारला. त्यांनीं आपलें सर्व वृत्त त्याला सांगितलें. त्यांची हकीकत ऐकून कबंध त्यांना म्हणाला, मला सीतेचा पत्ता माहीत आहे. तिला रावणानें नेलें आहे. तुह्मी आतां ऋष्यमूक पर्व-तावर जा. तेथें आपल्या मंत्रिमंडळीसह किष्किंधेचा राजा सुग्रीव रहात आहे. त्याच्याशीं मैत्री करा, ह्मणजे तुमचा पुष्कळ फायदा होईल.' इतकें बोलून व त्या दोघांना ऋष्यमूक पर्वताचा मार्ग दाखवून तो कबंध राक्षस तत्काल मरण पावला.

एक गोष्ट या ठिकाणीं फार महत्त्वाची आहे. वाल्मीकि-मुनींनीं आपल्या आदिकाव्य रामायण ग्रंथांत लिहिलें आहे कीं—

' एवमुक्तौ तु तौ वीरौ कबंधेन नरेश्वरौ ।
गिरिप्रदरमासाद्य पावकं विससर्जतुः ॥
लक्ष्मणस्तु महोल्काभि र्ज्वलिताभिः समन्ततः ।
चितामादीपयामास सा प्रजज्वाल सर्वतः ॥
(वा. रा. कां. ३ सर्ग ८२)

सारांश एवढाच कीं, याप्रमाणें रामचंद्राशीं संभाषण करून जेव्हां कबंध मरण पावला, तेव्हां त्याचें मृत शरीर दोघां बंधूंनीं उचलून एका गुफेंत नेऊन ठेवलें; नंतर लक्ष्मणानें अग्नि दिल्यावर त्याचें भस्म झालें.

अशा संकट कालीं देखील सदाचारी रामचंद्र समयोचित सत्कार्य करावयास विसरले नाहींत. विसरतील कसे ? कारण ते खरे आर्य होते. धार्मिक शिक्षणानें त्यांनीं आपला आत्मा पवित्र व उज्ज्वल ठेविला होता. एवढ्या मोठ्या चक्रवर्ती राजाचे ते ज्येष्ठ पुत्र असूनहि कबंधाच्या शरिराला स्पर्श करण्यांत व त्याची दहनक्रिया करण्यात त्यांना अप्रतिष्ठा वाटली नाहीं. अत्यंत नीच कबंध राक्षसाच्या अपवित्र शरिराला अग्नि देण्यांत त्यांनीं धर्मपालन, लोक सेवा, आाणि परोपकार यांची पराकाष्ठा करून दाखविली. जर त्यांनीं त्याच्या शरिराला अग्नि दिला नसता तर तें तेथेंच सडून गेलें असतें, आणि त्या योगानें हवा मात्र दूषित झाली असती. रामचंद्र महाज्ञानी व विचारशील होते. ते सर्व गोष्टींचें रहस्य चांगल्या प्रकारें जाणत होते, याकरितां त्यानीं कबंधाच्या शवाला अग्नि देऊन आपल्या कर्तव्याचें पालन करून सर्वांना कर्तव्यपालनाचा, परोपकाराचा, आणि लोकसेवेचा धडा घालून दिला. अहाहा, याचें नांव धर्मशिक्षण.

रामचंद्राच्या उपासकांनों, काय, तुम्ही नुसते तोंडानें ' राम, राम, ' च जपत बसणार, किंवा त्यांच्या उपदेशप्रद, आणि अनु-

करणीय अशा सच्चरित्रापासून कांहीं बोध घेऊन आपल्या त्यांच्या संबंधाच्या खऱ्या भक्तीचा परिचय करून देणार ! जोंपर्यंत पुरुषोत्तम रामचंद्राचें अनुकरणीय चरित्र तुम्ही मन लावून वाचणार नाहीं, आणि त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवणार नाहीं, तोंपर्यंत तुमचें रामभक्त म्हणविणें, म्हणजे निव्वळ थट्टा समजली जाईल. ती विटंबनाच होय. जर तुम्ही खरे रामभक्त असाल, तुमच्या हृदयांत रामचंद्राविषयीं किंचित् जरी प्रेम असेल तर या संसाराच्या कर्मक्षेत्रांत कंबर बांधून उभे रहा; आणि उच्च–नीच हा भेद न बाळगितां समस्त प्राणिमात्राला एकाच परमेश्वराचीं अपत्यें समजून त्यांना प्रेमानें भेटा, व विपत्तीच्या समयीं यथाशक्ति त्यांस मदत करा.

कबंधाच्या त्या पंचभौतिक शरिराला अग्नि देऊन नंतर ते त्यानें सांगितलेल्या ऋष्यमूक पर्वताच्या मार्गाला लागले. त्या वेळेस त्या दोघां बंधूंचीं अंतःकरणें सीतेच्या विरहाग्नीनें इतकीं संतप्त होऊन गेलीं कीं, तेथें असलेल्या अनेक दर्शनीय आश्रमांचीं दर्शनें घेऊनहि त्यांच्या मनाला शांति मिळेना. अशा स्थितींत सीतेचा शोध करीत करीत ते पंपा सरोवराजवळ येऊन पोहोंचले. त्या सरोवराच्या पश्चिमेकडील बाजूला एक रमणीय आश्रम होता. तेथें शबरी नांवाची एक तपस्विनी राहत होती. शबरीचा जन्म जरी नीच कुलांत झाला होता, तरी साधुजनांच्या सहवासानें तिचें आचरण उत्तम प्रकारचें झालें होतें. त्या सुरम्य आश्रमांत राहून ईश्वरस्मरणांत ती आपली कालक्रमणा करीत असे. हे दोघे बंधु आश्रम पहात पहात, त्या शबरीजवळ गेले. वृद्ध तपस्विनी शबरीची ती तेजःपुंज मूर्ति पाहून दोघेहि प्रसन्न झाले. त्यांचें दर्शन घडल्यामुळें आपला जन्म कृतकृत्य झाला असें शबरीलाहि वाटलें. तिनें मोठ्या भक्तीनें रामचंद्र व लक्ष्मण यांची अतिथि-

पूजा केली. तिचें आदरातिथ्य पाहून त्यांना आनंद झाला. तेथून ते परत पंपासरोवरावर आले. तें सरोवर फार रमणीय होतें. त्याचें पाणी अत्यंत निर्मल असून त्यांत पुष्कळ कमळें फुललेलीं होतीं. तेथं नाना तऱ्हेचे पक्षी मंजूळ शब्द करीत होते. चिखलाचें तेथें नांवहि नव्हतें. सर्वदूर स्वच्छ असून वालुकामय होतें. अनेक तऱ्हेचीं फुलें फुललीं होतीं. त्याच्या सर्व तीरावर नानाप्रकारचे वृक्ष त्याची शोभा वाढवीत होते. त्याचप्रममाणें त्या पंपासरोवराजवळ अनेक सुरम्य उपवनें होतीं. आनंदांत मग्न होऊन तेथें मयूरगण गोड स्वरानें ओरडत होते. त्या सरोवराची मनोरम शोभा पाहून रामचंद्राच्या हृदयांत पत्नीविरहाची आग अधिकच भडकली. सीतेचें स्मरण करून लहान बालकाप्रमाणें ते विलाप करूं लागले. धीरबुद्धि लक्ष्मणानें मोठ्या धैर्यानें रामचंद्राची समजूत करण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला ' आर्य, आपल्यासारखे विद्वान, व धैर्यवान पुरुष इतका शोक करीत नाहींत. महाराज, शोक करण्यापासून काय बरें उपयोग आहे ! आत्तां सीतेला प्राप्त करून घेण्याचा उपाय प्रथम केला पाहिजे. '

पंपासरोवराच्या जवळच ऋष्यमूक पर्वत होता. तेथें सुग्रीव रहात होता. त्याच्या वडील भावाचें नांव वाली. तो मोठा पापी होता. त्यानें सुग्रीवाचें राज्य, स्त्री, धन वगैरे सर्व कांहीं हरण करून घेऊन त्याला वाड्यांतून हांकून दिलें होतें. त्याच्या भीतीनें सुग्रीव आपल्या चार पांच मित्रांसह ऋष्यमूक पर्वतावर येऊन राहिला होता. दुरून त्या दोघां अस्त्रधारी वीरांना येतांना पाहून त्याला त्यांच्याबद्दल शंका आली. त्याला नेहमीं वालीचें भय वाटत होतें, हें त्याचें कारण होय ! त्यानें आपल्या मित्रांना त्यांच्यासंबंधानें काय करावयाचें याबद्दल विचारिलें. सर्वांच्या संमतीनें प्रधान मंत्री हनुमान याला पुढें पाठवून त्यांची चौकशी करावी

असें ठरलें. हनुमान मोठा विद्वान, धार्मिक, बुद्धिमान, आणि स्वामिभक्त होता. राजाची आज्ञा शिरसावंद्य करून तो रामचंद्राकडे गेला. हनुमान राजनीतिज्ञ असल्यानें राजनीतीचे डावपेंच त्याला पूर्णपणें अवगत होते. तो आपल्या खऱ्या वेषानें रामचंद्राकडे न जातां भिक्षुक ब्राह्मणाच्या वेषानें गेला. त्याच्या मनांतून त्यांच्या मनाचा प्रथम भेद घ्यावयाचा होता.

दोघां बंधूंजवळ जाऊन त्यानें प्रथम त्यांचा परिचय करून घेतला, आणि नंतर आपली हकीकत सांगून तो त्यांना म्हणाला, ' महाराज, सुग्रीव वानरराज आपल्याशीं मैत्री करूं इच्छितात, ' हनुमानाच्या तोंडचे हे शब्द ऐकून त्यांना फार आनंद झाला. ते मनांत म्हणाले ' ज्याला आम्ही शोधतों आहोंत, ज्याच्याशीं आमची मैत्री व्हावी असें आम्हांला वाटत आहे, तो स्वतःच आमच्याशीं मैत्री करण्याची इच्छा करतो यापेक्षां आणखी चांगली गोष्ट ती कोणती घडून यावी ! सुग्रीव पहिल्यापासूनच आपलें मित्रत्व संपादण्यास इच्छितो, हें वृत्त हनुमानापासून ऐकून त्यांना खरोखर अतिहर्ष झाला. लक्ष्मणानेंहि आपलें वृत्त त्यांस कळवून त्यांच्याशीं बोलण्यास सुरुवात केली. हनुमानाचें शुद्ध, व प्रौढ भाषण ऐकून रामचंद्र मुग्ध झाले. त्यानें लक्ष्मणाजवळहि सुग्रीवाची पुष्कळ स्तुति केली.

वाचक हो, हनुमानाची यथार्थ स्तुति करण्यास येथें अवकाश नाहीं. त्याच्या गुणांचें यथार्थ वर्णन केलें तर त्याचा एक स्वतंत्रच ग्रंथ होईल. त्याच्या गुणांचा परिचय त्याच्या कार्यावरूनच होईल. आम्हांला येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, तो अनुपम बली होता.

या दोघां सुकुमार राजकुमारांना पर्वत चढतांना फार कष्ट होतील, असें जेव्हां हनुमानानें पाहिलें, तेव्हां त्यानें त्या दोघांना

आपल्या खांद्यांवर उचलून घेतलें, आणि वेगानें तो त्यांच्यासह सुग्रीवाजवळ येऊन पोंहोंचला.

सुग्रीवाजवळ येतांच स्वतः हनुमानानें रामचंद्र आणि लक्ष्मण यांची स्तुति करून त्यांचा त्यास परिचय करून दिला. ती ऐकून सुग्रीव प्रसन्न अंतःकरणानें म्हणाला, ' रामचंद्रा, मी हनुमानाच्या तोंडून आपली प्रशंसा ऐकिली. आपण मोठे तपस्वी, व धर्मात्मा आहांत. मी एक वनवासी तुच्छ प्राणी आहें. मी आपल्या-बरोबर मैत्री करूं इच्छितों. आपल्याबरोबर मैत्री करण्यांत माझा लाभ असून सन्मानहि आहे. जर आपणहि माझ्याशीं मित्रत्व करूं इच्छित असाल, तर या, हे मी आपले बाहू तुम्हांला आलिं-गन देण्याला पसरले आहेत. आपण माझी विनंती मान्य करा, आणि मैत्रीची प्रतिज्ञा सदा अढळ राखा. "

हें सुग्रीवाचें भाषण ऐकून रामचंद्रांनीं त्याला दृढालिंगन दिलें. इतक्यांत महा बुद्धिमान हनुमानानें तेथें त्यांच्या समोर अग्नि आ-णून ठेविला. रामचंद्र आणि सुग्रीव यांनीं त्या अग्निदेवाला प्रद-क्षिणा करून मित्रत्वाची शपथ घेतली; नंतर तेथेंच जवळ एकां-तांत बसून दोघेहि परस्पर वार्तालाप करूं लागले.

सुग्रीव म्हणाला, ' मित्रा, सीतादेवी आकाशांत असो, अथवा पातालांत असो. मी तिचा जरूर शोध लावून आणून आपल्या स्वाधीन करीन. आपण दुःख करणें सोडून द्या; माझी प्रतिज्ञा केव्हांहि असत्य होणार नाहीं.

सीतेविषयीं बोलतांना सुग्रिवाला एका जुन्या गोष्टीची आठवण झाली. एके दिवशीं आपल्या मित्रांसह सुग्रीव ऋष्यमूक पर्वता-वर बसला असतां, एक राक्षस कोणा तरा स्त्रीला बलात्कारानें आकाश मार्गानें घेऊन जात होता. ती स्त्री मोठ्यानें आक्रांत करीत होती. त्या पर्वताच्या शिखरावर सुग्रीव वगैरे मंडळी बस-

लेली पाहून तिनें आपला पदर फाडून त्यांत कांहीं दागिने बांधून ते खालीं टाकले. सुग्रीवानें ते उचलून सुरक्षीत ठेवले होते.' या गोष्टीचें त्याला या वेळीं एकदम स्मरण झालें. त्यावरून तो राक्षस रावण असून ती आक्रांत करीत चाललेली स्त्री सीताच असावी, अशी त्याची आतां खात्री झाली. नंतर तीं आभूषणें आणून रामचंद्राच्या पुढें ठेवून तो म्हणाला, 'ओळखा-बरें, हें दागिनें कोणाचे आहेत ते? हे सीतादेवींचे तर नव्हेत ना?' पाहतांच ते दागिने रामांनीं ओळखिले. ते पाहून रामचंद्राचे नेत्र अश्रुजलानें भरून आले. ते सीतेची आठवण करून विलाप करीत, आणि वारंवार ते दागिने प्रेमानें हृदयाशीं धरीत. त्या वेळी लक्ष्मणहि त्यांच्याजवळच रडत रडत पाठीमागें बसला होता. त्याजकडे वळून रामचंद्र म्हणाले 'लक्ष्मणा, राक्षसाच्या तावडींत सांपडलेल्या सीतेनें हे दागिने वस्त्रांत बांधून या पर्वतांवर फेंकून दिले. पहा, ओळख तर खरे, हे तिचेच आहेत किंवा नाहींत ते. तीं आभूषणें पाहून लक्ष्मण म्हणाला---

'नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुंडले।
नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवन्दनात्॥'
(वा. रा. कां, ४ सर्ग. ६).

'हे आर्य, मी हें केयूर ओळखीत नाहीं, किंवा कुंडलेंहि ओळखीत नाहीं. मी हीं नूपुरें तेवढीं ओळखतों. कारण मी रोज पादवंदनाकरितां जेव्हां जात असे, तेव्हां तीं पाहिलीं आहेत.'

'सुमित्रानंदवर्धन लक्ष्मणा, तुझी धन्य आहे,' येथें तूं आपल्या धर्मपालनाची खरोखरी पराकाष्ठा दाखविलीस. तुझ्याशिवाय असें धर्मपालन दुसरा कोण मनुष्य करूं शकेल? कोणीहि करूं शकणार नाहीं. तूं मर्यादेचें पालन करणारा, खरा पुरुषोत्तम होय. 'मी सीतेच्या कानांतील कुंडल, अथवा केयूर यांपैकीं कांहीं पाहिलें

नाहीं, ' वगैरे हें लक्ष्मणाचें भाषण वाचकहो तुह्मीं ऐकिलेंत ना! कित्येक वर्षांचा सहवास असूनहि त्याची दृष्टि दागिन्यांकडे गेली नाहीं. मग शरिराकडे तर दूरच राहिली. तपास केला तरी असा धार्मिक दीर आजकाल मिळूं शकेल काय ! असो.

रामचंद्र शोकानें व्याकुल झालेले पाहून सुग्रीवानें त्यांची पुष्कळ समजूत केली. तो म्हणाला ' महाराज, शोक केल्यानें कार्यसिद्धि होत नाहीं. बुद्धिमान मनुष्यानें आपत्ति दूर करण्याचा धैर्यानें प्रयत्न केला पाहिजे. माझीच स्थिति पहा. माझ्या भावानें माझी स्त्री, धन, राज्य सर्व कांहीं माझें हिरावून घेतलें आहे. तो इतकेंच करून राहिला नाहीं, तर त्यानें मला घरांतूनहि हांकून दिलें आहे. हें दुःख मला काय कमी आहे. परंतु मी शोकानें व्याकुल होत नाहीं. धैर्यानें मी कार्य सिद्धीचा उपाय योजीत राहिलों आहें.'

सुग्रीवाच्या वरील भाषणानें रामचंद्राचा दुःखावेग जेव्हां जरा कमी झाला, तेव्हां ते मग कर्तव्यचिंतेंत मग्न झाले. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले ' मित्रा, तुझ्या या भाषणानें माझ्या संतापलेल्या हृदयाला समाधान वाटलें. तुझ्यासारखा मित्र मिळणें कठीण आहे. आतां आपल्याला जानकीचा शोध केला पाहिजे, त्याचप्रमाणें राक्षसाला मारण्याचाहि प्रयत्न केला पाहिजे. तुझें मीं आतां कोणतें कार्य करावें तें सांग.' ज्याला स्वतः रामचंद्र सहाय्य करूं म्हणतात, त्याला मग जगांत दुर्लभ काय आहे ! त्याला त्याचेंच राज्य काय पण देवराज्य देखील मिळणें कठीण नाहीं.

नंतर वालीशीं वैर पडण्याचें कारण, त्याच्याशीं आजपर्यंत झालेलें युद्ध वगैरे सर्व गोष्टी सुग्रीवानें त्यांना सांगितल्या. तो म्हणाला ' महाराज, वालीसारखा पराक्रमी या जगांत कोणी नसेल. मी त्याच्या भीतीनें घर सोडून येथें राहतों.' हें ऐकतांच ' प्रथम आपल्या मित्राचें दुःख दूर करून त्याला सुखी केलें

पाहिजे. ' तो जर प्रथम आपत्तींतून सुटेल तर आपणांस मदत करूं शकेल, असें रामचंद्रांस वाटलें.

असा विचार करून वालीला ठार मारण्याची रामचंद्रांनीं प्रतिज्ञा केली. नंतर त्यानें सांगितलेल्या कित्येक गोष्टी करून दाखवून त्यांनीं आपल्याबद्दल सुग्रीवाची खात्री करून दिली. रामचंद्रांचा पराक्रम पाहून सुग्रीव आणि त्याचे मंत्रिजन आनंदित झाले.

रामचंद्रांच्या सांगण्याप्रमाणें त्या दिवसापासूनच युद्धाला सुरुवात झाली. रामचंद्रास घेऊन तो त्याच दिवशीं किष्किंधेस गेला. ही नगरी वालीची राजधानी होती. किष्किंधेला पोहचतांच सुग्रीवानें वालीला हांक मारिली. सुग्रीवाचा तो सिंहनाद ऐकून वाली क्रोधानें संतप्त झाला. तो लागलेंच बाहेर आला, आणि सुग्रिवाशीं युद्ध करूं लागला. ज्या वेळेस त्या दोघांचें युद्ध जुंपलें, त्यावेळीं रामचंद्र धनुष्याला बाण लावून एका झाडाच्या आड उभे राहिले होते. तेथूनच बाण मारून वालीचा प्राण घेण्यास ते इच्छित होते. परंतु त्या दोघांचें रूप व रंग एकसारखाच असल्यानें वाली कोणता आणि सुग्रीव कोणता, हें चटकन् त्यांच्या ध्यानांत येत नव्हतें. कदाचित् चुकून आपला मित्रच मारला जाईल, या भयानें त्यांनीं बाण सोडला नाहीं.

कांहीं वेळपर्यंत सुग्रीवानें वालीशीं मोठ्या साहसानें व धैर्यानें युद्ध केलें. परंतु शेवटीं वालीनें त्याचा पराभव केला. जेव्हां सुग्रीवाला रामाचीहि आशा वाटेना, तेव्हां तो ऋष्यमूक पर्वताकडे पळत सुटला. कांहीं दूरपर्यंत तर वालीनें त्याचा पाठलाग केला. पण तो फार लांब पळत गेल्याचें पाहून वाली परत किष्किंधेस आला.

सुग्रीवानें वालीच्या हातून इतका मार खाल्ला होता कीं, त्याचें सर्व शरीर रक्तबंबाळ व जर्जर होऊन गेलें होतें. आणखी

कांहीं वेळ जर सुग्रीवानें वालीशीं युद्ध केलें असतें, तर तो वालीच्या हातून मारलाच गेला असता.

सुग्रीव येऊन बसला, इतक्यांत राम, लक्ष्मण, व हनुमान ही मंडळी येऊन पोंहचली. त्यांना पाहून सुग्रीवानें लज्जेनें खालीं मान घातली. कांहीं वेळानें रागानें बेफाम होऊन तो रामचंद्राला कठोर वचनें बोलूं लागला. रामचंद्र फार शांत व विचारी होते. त्यांनीं त्यावेळच्या त्याच्या कठोर भाषणाचें दु:ख मानलें नाहीं.उलट ते त्याची समजूत करूं लागले. ते म्हणाले ' मित्रा ' रागावूं नको. मीं आज कोणत्या कारणानें बाण सोडला नाहीं, तें ऐक. जेव्हां तुम्ही दोघे युद्ध करीत होता, तेव्हां दुरून मी तुम्हां दोघांना नीट ओळखूं शकलों नाहीं. एवढ्याचमुळें मी प्राणांतक बाण सोडला नाहीं. मला वाटलें कीं, चुकून मित्रघात मात्र न व्हावा. मी खरोखर सांगतों, आणि तूंहि खात्री ठेव कीं तुझ्याशिवाय या वेळेस आमचा दुसरा कोणी सहाय्यक नाहीं. या वेळीं मी, जानकी, आणि लक्ष्मण तुझ्याच आधीन आहोंत. पुन: जाऊन तूं वालीबरोबर युद्ध कर. यावेळीं माझ्या एकाच बाणानें वालीचा वध होतो कीं नाहीं हें तुझ्या दृष्टीस पडेल. इतकें बोलून युद्धाच्या वेळीं सुग्रीव ओळखूं यावा म्हणून त्यांनीं त्याच्या गळयांत नागपुष्पीलता बांधिली.

रामचंद्राच्या आज्ञेनें ते सर्वजण लगेच किष्किंधेला जाऊन पोहचले. मुख्य दरवाजाजवळ जाताच सुग्रीवानें पुन: वालीला युद्धाला बोलाविलें. सुग्रिवाची ती गर्जना ऐकून महाबली वालीचे नेत्र क्रोधानें अग्नीप्रमाणें लाल झाले. तो रागानें तसाच उठून युद्धाकरितां बाहेर आला. तो बाहेर युद्धाला निघाला, इतक्यांत त्याची तारा नांवाची स्त्री त्याच्यापुढें मार्गांत आडवी येऊन उभी राहिली. तारा मोठी पतिप्रणयिनी व बुद्धिमती होती. रस्ता अडविण्याचें कारण वाली जेव्हां तिला विचारूं लागला, तेव्हां बुद्धिमती तारा

त्याला म्हणाली ' स्वामी, आज आपल्याला युद्धाला जातांना पाहून माझें हृदय धडधड करतें. आज आपण युद्धभूमीवर जाऊं नये. काल किंवा परवां सुग्रीव आपल्या हातून पराजित होऊन पळाला असतां, पुनः आज मुद्दाम आपणाला बोलावीत आहे, तेव्हां यांत कांहीं तरी कपट आहे, खास. अवश्य यांत कांहीं तरी गुप्त भेद आहे. खरोखर यांत गुप्त भेद आहेच. दोन चार दिवसांपूर्वीं युवराज अंगद मला येऊन म्हणाला. ' आई, मी आज मुख्य हेराच्या तोंडून असें ऐकिलें आहे कीं; राम, लक्ष्मण, या नांवांचे दोन राजकुमार ऋष्यमूक पर्वतावर सुग्रीवाजवळ येऊन राहिले असून त्यांच्याबरोबर त्याची मैत्रीहि झाली आहे. मीं आणखी हेंहि ऐकिलें आहे कीं, ते दोघे मोठे पराक्रमी वीर आहेत. ' या गोष्टीची मला आतां आठवण झाली. सुग्रीव इतक्या लवकर ज्या अर्थीं पुनः युद्धाला आला, त्या अर्थीं हेंच माझें अनुमान खरें आहे. त्याला रामचंद्राकडून सहाय्य करण्याबद्दल वचन मिळालें असेल. हाच त्यांतील मुख्य अर्थ दिसतो. असें ज़र नसतें तर सुग्रीव दुसऱ्या कोणाच्या बलावर दुसऱ्यांनदा आपल्या बरोबर युद्ध करावयास येता ? माझें अनुमान जर खरें असेल, म्हणजे रामचंद्र जर त्याला सहाय्य करणार असतील तर ते आपल्या कल्याणाचें खास नव्हे, असें मला खात्रीपूर्वक वाटतें.

याप्रमाणें तारेनें वालीची पुष्कळ समजूत केली. वाली मोठा तेजस्वी पुरुष होता; तो म्हणाला, ' रामचंद्र धर्मज्ञ, व कर्तव्यपरायण आहेत. ते असलें घोर पाप केव्हांहि करणार नाहींत, हें मला ठाऊक आहे.

याप्रमाणें तारेची समजून करून वीर वाली युद्धभूमीवर येऊन सुग्रिवाशीं घोर युद्ध करूं लागला. वाली मोठा बलवान होता. त्याचे प्रहार मोठे कठीण होते. त्याच्या मुष्टिप्रहारांनीं सुग्रीवाचें अंग अगदीं खिळखिळें होऊन गेलें. याही वेळेस रामचंद्र हातांत

सुग्रीवाचे मित्र होते, याचा त्यानें विचार करावयास पाहिजे होता. मित्राला सहाय्य करणें हा मित्राचा परम धर्म आहे. दुसरें त्यांनीं सुग्रीवाजवळ वालीच्या वधाविषयीं प्रतिज्ञा केली होती. रामचंद्र सत्यप्रतिज्ञ होते. आपल्या प्रतिज्ञेचें पालन करणें हाच त्यांचा मुख्य धर्म होता. तिसरें कारण, वालीनें आपल्या धाकट्या भावाची धर्मपत्नी बलात्कारानें घेतली होती. कन्येप्रमाणें असलेली बंधूची स्त्री वश करून ठेवणें हें पाप नव्हे का ? यांकरितां अशा पापी वालीला मारण्यांत रामचंद्रांनीं अन्याय केला नाहीं. तर त्यांनीं हें धर्माचें व न्यायाचेंच काम केलें. याबद्दल विचारशील माणसें रामचंद्राला दोषी अथवा अधर्मी म्हणूं शकणार नाहींत.

वालीच्या मृत्यूचें दुःखदायक वर्तमान अल्पावकाशांतच साऱ्या किष्किंधेभर पसरलें. ही भयंकर वार्ता ऐकतांच तारेच्या आंगाला विजेप्रमाणें झटका बसला. ती रडत रडतच वालीचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां रणभूमीकडे चालली. तिच्या बरोबर तिच्या दासीहि चालल्या. सर्व शहरांत एकच हाःहाःकार माजला. रणक्षेत्रांतून वीरशय्यवर वालीला निजलेला पाहून तारा मोठ्यानें विलाप करूं लागली. त्या वेळचा तिचा दारुण विलाप ऐकून पाषाण हृदयहि द्रवलें असतें. तिचा शोक पाहून सुग्रीव अधीर झाला. युवराज अंगद आपल्या पित्याची ती दशा पाहून आक्रोश करूं लागला. तेथें जितकीं मनुष्यें त्या वेळीं होतीं, त्या सर्वांत रामचंद्र आणि लक्ष्मण हे जास्त धैर्यवान होते. परंतु त्यांचेंहि चित्त तारेचें दुःख पाहून विरघळल्याशिवाय राहिलें नाहीं. वाली कंठींप्राण धारण करून पडला होता. त्यानें तशाच स्थितींत सुग्रीवाला जवळ हाक मारली. नंतर तो त्याला दुःखानें म्हणाला, ' सुग्रीवा, मी आपल्या दुर्भाग्यानें अथवा पाप कर्माच्या फलानें अशा अवस्थेला येऊन पोहचलों. मी आपल्याच हातानें आपल्या पायावर कुऱ्हाड मारून

धनुष्यबाण घेऊन झाडाच्या आड उभे होते. ‘ युद्ध करतां करतां सुग्रीव अगदीं थकून गेला आहे, तो आतां पुनः पळण्याच्या बेतांत आहे,’ असें जेव्हां रामचंद्रांनीं पाहिलें तेव्हां त्यानीं एक भुजंगभूषणबाण काढून धनुष्याला लावला, आणि आकर्ण त्याची दोरी ओढून वालीवर नेम धरून तो तत्काल सोडला. तो बाण सूं सूं करीत जो आला तो वालीच्या शरिरांत शिरला. तो मर्मस्थानीं बसतांच वीर वाली वृक्षाप्रमाणें धाडकन् जमिनीवर कोसळून पडला. त्याला प्राणांतिक वेदना होऊं लागल्या. तो मोठ्या कष्टानें श्वासोश्वास घेऊं लागला. ‘ रामचंद्र मोठे धार्मिक व शूर वीर आहेत, ’ म्हणून जो त्याचा या वेळपर्यंत दृढ विश्वास होता तो आतां पार नाहींसा झाला. रामचंद्राच्या हातून असलें कापुरुषतेचें काम होईल, व ते करतील, असें वालीच्या स्वप्नीं सुद्धां नव्हतें. तो कण्हत कण्हत म्हणाला “रामचंद्रांनीं माझ्या समोर न येतां. मला जो आडून बाण मारला, त्याबद्दल सर्व जग त्यांची निंदाच करील. मी त्यांचा आतांपर्यंत अजाणतां एकहि अपराध केला नाहीं. तर मग अकारण द्वेषाला वश होऊन त्यांनीं मला कां मारलें ? अकारण द्वेषभाव ठेवणें हें पाप नव्हे काय ? ते धर्मज्ञ नसून पापी आहेत; अशी माझी आतां खात्री झाली. ते उच्छृंखल व चंचल आहेत; म्हणूनच राज्यकारभाराला अयोग्य समजून कैकयीनें त्यांना वनवासाला पाठवून दिलें हें योग्यच केलें. जर रामचंद्राला त्यांच्या सीतेचा पत्ताच पाहिजे होता तर त्यांनीं मला कां नाहीं सांगितलें ? त्याच वेळेस मीं पापी रावणाला ठार मारून सीतेला सहज आणून त्यांच्या स्वाधीन केली असती. असल्या क्षुल्लक कामाकरितां त्यांनीं हें एवढें मोठें पाप कां केलें ? ”

यांप्रमाणें भूमीवर जखमी होऊन पडल्या पडल्या वालीनें रामाची मनसोक्त निंदा केली. परंतु तें सर्व खोटें. पहिल्यानें रामचंद्र हे

घेतली. तूं माझा अपराध लक्षांत घेऊं नये, असा तो नाहीं. माझ्या भाग्यांत भ्रातृप्रेमाबरोबर राज्य सौख्य भोगण्याचें नव्हतें. नाहीं तर मला हा बुद्धिमोह कां झाला असता ? असो. आतां तूंच या राज्याचें पालन कर. माझ्या प्राणांताची वेळ जवळ आली.' इतकें बोलून वालीनें प्राणप्रिय अंगदाचें आणि तारेचें रक्षण करण्यास सुग्रीवाला सांगितलें. नंतर अंगदाला कांहीं उपदेश करून व रामचंद्राची क्षमा मागून ईशस्मरण करीत करीत वाली अनंत निद्रेंत निमग्न झाला.

वालीच्या मृत्यूची वार्ता ऐकून तारा आणि अंगद यांनाच पुष्कळ दुःख झालें असें नाहीं, तर त्यांच्याबरोबर सर्व नगरी शोक सागरांत अगदीं बुडून गेली. नंतर सर्व लोक वालीचा मृत देह पालखींत घालून स्मशान भूमीकडे घेऊन चालले. तेथें चंदनाची चिता रचून त्यांनीं त्याचा अंत्येष्टी संस्कार केला.

हें कृत्य आटोपल्यावर किष्किंधेच्या राजसिंहासनावर सुग्रीवाची स्थापना होऊन अंगदाला युवराज पद देण्यांत आलें. पित्याच्या आज्ञेप्रमाणें रामचंद्र किष्किंधेंत गेले नाहींत. त्यांनीं हें सर्व कार्य लक्ष्मणाला तेथें पाठवून करून घेतलें.

इतक्यांत वर्षाकालाला आरंभ झाला. वर्षाकालांत यात्रागमनाचें वगैरे काम बंद ठेवतात. त्याचें कारण या वेळीं यात्रेकरूंना प्रवासांत नानातऱ्हेच्या अडचणी येतात, हें होय. एवढ्याकरितां रामचंद्रांनीं सुग्रीवाला सांगितलें कीं ' आतां वर्षाकाल आला. हा संपल्यावर कार्तिक महिन्यांत तूं आपल्या सेवकांना जानकीच्या शोधाकरितां पाठीव. सांप्रत तूं आपल्या नगरींत सुखानें रहा, आणि राज्यकार्य कर.'

रामचंद्राच्या आज्ञेनं सुग्रीव किष्किंधेंत राहूं लागला. रामचंद्र आणि लक्ष्मण हे तेथून निघून प्रस्रवण पर्वतावर जाऊन राहिले.

जेव्हां पाऊस पडूं लागे तेव्हां ते गुहेंत रहात. तो गेल्यावर बाहेर पडून फिरत असत. याप्रमाणें सृष्टिसौंदर्य वगैरे पाहून ते आपले दिवस कसेबसे घालवीत होते.

वर्षाकाळाची प्राकृतिक शोभा पाहून रामचंद्राच्या मनांत जानकीचा विरहाग्नि अधिकच वाढला. जेव्हां पहावें तेव्हां त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वहात असत. सीतेचा वियोग त्यांना सतत जाळीत असे. धीर वीर लक्ष्मण त्यांचें यथाशक्ति समाधान करीत असे, परंतु रामचंद्राच्या हृदयांतून विरहदुःख कमी झालें नाहीं. पाऊस पडल्यामुळें जिकडे तिकडे जडचेतन वगैरे सर्व शीतल झालें. परंतु ज्याप्रमाणें चुन्याच्या खड्यावर पाणी टाकलें म्हणजे त्यांत उष्णता उत्पन्न होते, त्याचप्रामाणें मेघांच्या गर्जनेनें, व पावसाच्या वृष्टीनें, विजेच्या चमकण्यानें, आणि शीतल, मंद, सुगंधित पवनानें रामचंद्राच्या विरहाग्नीनें दग्ध झालेल्या हृदयाला शांति मिळाली नाहीं. त्यामुळें त्यांचा विरहाग्नि उलट अधिकच प्रज्वलित झाला.

वर्षाकाल संपून शरत्कालाला आरंभ झाला, तरी सीतेचा शोध करण्याकरितां सुग्रीवानें कोणालाच पाठविलें नाहीं. राज्य सुखोपभोगांत सुग्रीव आपल्या हितकारी मित्राचें कार्य पार विसरून गेला. सुग्रिवाच्या या स्वस्थपणाचा रामचंद्राला राग आला. त्यांनीं त्याला जागें करण्याकरितां लक्ष्मणाला त्याच्याकडे पाठविलें.

वडील बंधूची आज्ञा होतांच लक्ष्मण किष्किंधेकडे जाण्यास निघाला. तो क्रोधानें संतप्त झाला होता. त्याचे डोळे लाल झाले होते. नगराच्या महाद्वाराजवळ पोहोंचतांच त्याचा राग अधिकच वाढला. नगरवासी जनांपैकीं ज्यांनीं त्याची ती भीषण मूर्ति पाहिली, ते भयभीत होऊन गेले. ज्यावेळेस तो सुग्रीवाच्या राजमहालाजवळ जाऊन पोहोंचला, त्यावेळेस सुग्रीव राज्यमदानें धुंद होऊन आपल्या रंगमहालांत ऐषआरामांत दंग होऊन गेला होता. आपण

आल्याचें वृत्त लक्ष्मणानें द्वारपालाकडून त्याला कळविलें. लक्ष्मणाचा निरोप कळतांच झोंपेंतून जागा झाल्याप्रमाणें तो लगेच शुद्धीवर आला. त्यांत लक्ष्मण अतिशय संतापला आहे असें कळतांच तर तो फारच घाबरून गेला. आपण आतां काय करावें, हेंच त्याला सुचेना. त्या वेळेस किंचित विचार करून त्यानें बुद्धिमती तारेला लक्ष्मणास बोलाविण्याकरितां पाठविलें. तारा बुद्धिमान आहे, ती कांहीं तरी युक्ति काढून लक्ष्मणाचा राग शांत करील, लक्ष्मण धार्मिक आहे, तो स्त्रीवर रागावणार नाहीं, हाच तिला पाठविण्यांत त्याचा मुख्य हेतू होता; आणि तसेंच झालें. प्रियदर्शना तारा लगेच उठून बाहेर आली. तिच्या नूपुरांचा ध्वनि ऐकतांच लक्ष्मण एका बाजूला जाऊन उभा राहिला. तिला पाहताच त्याचा राग शांत झाला. बुद्धिमती तारा आपल्या मधुर, आणि कोमल वाणीनें त्याचा राग शांत करून म्हणाली, ‘ महाराज, सुग्रीव आपल्या वडील बंधूचा मित्र आहे तेव्हां तोहि बंधुप्रमाणेंच आपणाला माननीय आहे. याकरितां आपणासारखें बुद्धिवान वीर आपल्या अपराधी बंधूवर रागावणार नाहींत. राज्यसुख भोगण्यांत तो दंग झाला आहे, हें जरी कबूल केलें, तरी त्याला रामचंद्राच्या कार्याचें विस्मरण झालें आहे, असें नाहीं. सीतेचा शोध करण्याची आणि रावणाला मारण्याची त्यानें जी प्रतिज्ञा केली आहे, ती तो शेवटास नेण्याला तयार आहे. आपण येण्याच्या अगोदर ‘ सर्व सैन्य तयार ठेवा, ’ म्हणून एका दूताबरोबर सेनापतीला त्यानें निरोप सुद्धां धाडला आहे. लवकरच सर्व सैन्य जमून येथें हजर होईल. याकरितां महाराज, आपण माझ्याबरोबर अंतःपुरांत चला, आणि राजा सुग्रीवाची भेट घ्या. ’

तिच्या विनंतीप्रमाणें लक्ष्मण तिच्याबरोबर अंतःपुरांत गेला. तेथें त्यानें सुग्रीवाला विलासांत मग्न असलेला पाहिलें. त्यामुळें त्याचा क्रोधाग्नि जास्तच भडकला. तो त्याला रागानें म्हणाला,

- वालीला मारून रामचंद्रांनीं तुला जें राज्य दिलें, तें तूं नेहमीं विलासांत दंग व्हावेंस एवढ्याचकरितां दिलें काय ? रामाचे हे उपकार राज्यैश्वर्य मिळाल्याबरोबर तूं विसरून गेलास, ही मोठी आश्चर्याची व दुःखाची गोष्ट आहे. उपकाराबरोबर प्रत्युपकाराची प्रतिज्ञा करून तूं असें निश्चिंत बसावें हा कृतघ्नपणा नव्हे काय ? पावसाळा संपून शरत्काल आला, युद्धाची वेळ आली, तरी तुला अजून तुझ्या कर्तव्याचें स्मरण असूं नये ! आपला शत्रु मेला, आपलें राज्य मिळालें, स्त्री मिळाली, आपली आतां कृतकृत्यता झाली, असें समजून तूं स्वस्थ झोंप घेत पडला आहेस. रामचंद्राला सीतेचें दुःख किती झालें आहे, हें तुला माहीत नाहीं काय ? त्यांचे उपकार फेडण्याची आतां ही तुझी वेळ आहे. ऊठ, आपल्या कर्तव्याला जाग. आपल्या प्रतिज्ञेचें पालन कर. आतां जर तूं आपली प्रतिज्ञा शेवटास नेणार नाहींस, तर ज्या मार्गानें वाली गेला, त्याच मार्गानें तुलाहि जावें लागेल, हें मी तुला स्पष्ट सांगतों.

लक्ष्मणाचें हें रागाचें भाषण ऐकून सुग्रीवाचें अंतःकरण थरारलें. त्यानें उठून लक्ष्मणाला लगेच प्रणाम केला. त्याबरोबर त्याचा राग शांत झाला. लक्ष्मणाचा राग गेल्यावर ' आपण आपल्या मित्राला कठोर वचनें बोलून दुखविलें, ' याबद्दल लक्ष्मणालाहि पश्चात्ताप झाला. तो मनांतल्या मनांत लज्जित झाला. नंतर दोघेहि प्रेमानें एकमेकांस भेटले. सुग्रीवानें लक्ष्मणाची त्यावेळीं पुष्कळ स्तुति करून, त्याला धन्यवाद दिला. त्यानें लगेच लक्ष्मणाच्या समोर हनुमान, अंगद इत्यादि त्याच्या मंत्र्यांना बोलावून वानरसैन्य जमा करण्यास आज्ञा केली. राजाच्या आज्ञेप्रमाणें सैन्याला बोलाविण्याकरितां दूत रवाना झाले.

मग लक्ष्मणाला पालखींत बसवून सुग्रीव प्रस्रवण पर्वताकडे जाण्यास निघाला. तेथें पोहचल्यावर चहूंकडे दूत पाठविल्याचा मज-

कूर लक्ष्मणानें रामचंद्राला कळविला. आपला मित्र युद्धाची तयारी करीत आहे. असें पाहून त्यांना हर्ष झाला. कांहीं दिवसांनीं सुग्रीवाची फौज एकत्र झाल्यावर त्यानें सीतेच्या शोधार्थ चहूंकडे दूत रवाना केले. कोणी पूर्वेकडे गेले, कोणी पश्चिमेकडे गेले, कोणी उत्तरेकडे गेले. सीता दक्षिणेकडे असण्याचा संभव आहे, असें सर्वांना वाटे; त्यामुळें सर्वांत बलवान, बुद्धिमान, आणि नीतिज्ञ असे दूत तिकडे पाठविले. त्यांत महाबुद्धिमान हनुमान, महाबली अंगद, आणि सुनीतिज्ञ जांबवान हे मुख्य होते. राजा सुग्रीवानें सर्वांना सांगितलें कीं, सीतेचा शोध करून तिचा पत्ता लागो, अथवा न लागो एक महिन्याच्या आंत सर्वांनीं येथें हजर झालें पाहिजे. जे कोणी सीतेचा शोध लाविल्याशिवाय एक महिन्यावर दिवस लावितील, ते भयंकर दंडास पात्र होतील.

रामचंद्राचाहि दक्षिण दिशेला जाणाऱ्या मंडळींवर विश्वास होता. त्या सर्वांत ते महाबुद्धिशाली हनुमानाला अधिक चतुर आणि स्वामिभक्त समजत होते. यामुळें जाते वेळेस रामचंद्रांनीं आपल्या बोटांतील आंगठी काढून हनुमानाजवळ दिली, आणि ते त्याला म्हणाले. ' प्रिय हनुमान, जर तुला कोठें सीतेचा शोध लागून तिची भेट झाली तर तिला विश्वास पटण्याकरितां ही अंगठी दे. '

राजाच्या हुकुमाप्रमाणें सर्व सैन्य, व दूत आपापल्या दिशेला निघून गेले. पूर्व दिशेला जें सैन्य गेलें, त्याचा मुख्य विनत होता. उत्तरेस गेलेल्या सेनानायकाचें नांव शतबली आणि पश्चिमेकडे गेलेल्या सेनापतीचें नांव सुषेण होतें.

एक मास पूर्ण होण्याला जेव्हां दोन तीन दिवस बाकी राहिले, आणि कोणीकडूनहि सीतेच्या शोधाची बातमी आली नाहीं, तेव्हां सुग्रीव आणि रामचंद्र हताश झाले. इतक्यांत पूर्व, पश्चिम, आणि उत्तर दिशेला गेलेली मंडळी निराशेनें परत आली. त्यांना

सीतेचा कांहीं पत्ता लागला नाहीं. परंतु अवधि होऊन गेल्यावरहि जेव्हां हनुमान आणि अंगद दक्षिणेकडून परत आले नाहींत, तेव्हां रामचंद्राला किंचित् आशा वाटूं लागली. ते मग अगदींच निराश झाले नाहींत.

आतां आपण दक्षिण दिशेकडे गेलेल्या मंडळींच्या हकीगतीकडे वळूं. हनुमान आणि अंगद यांनीं तिकडे सीतेचा पुष्कळ शोध केला. पण त्यांना तिचा कुठेंच पत्ता लागेना. शोधतां शोधतां एक महिना केव्हांच निघून गेला. सीतेचा जेव्हां त्यांना पत्ता लागला नाहीं, तेव्हां त्यांची निराशा झाली. सर्वांना सुग्रीव–रामचंद्राची फार भीति वाटूं लागली. त्या सर्वांनीं शेवटीं प्रायोपवेशन करून तेथेंच मरण्याचा निश्चय केला. दक्षिण समुद्राच्या कांठावर बसून सर्वजण मृत्यूची मार्गप्रतीक्षा करूं लागले. इतक्यांत तेथें दैवयोगानें एक वृद्ध पुरुष त्यांना भेटला. त्याचें नांव संपाती होतें. संपातीनें त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्या निराशेचें कारण विचारिलें. त्यांनीं त्याला सर्व हकीकत कळविली. संपातीला रावणाचें निवासस्थान माहीत होतें. तो म्हणाला ' तुम्ही उगाच निराश कां होतां ? उद्योग करा. रावणाचा पत्ता मला माहीत आहे, मी तुम्हांला सांगतों. या समुद्राच्या पार लंका नांवाचें एक बेट आहे, तेथें तो राहतो. तुमच्यांत जर कोणी सामर्थ्यवान असेल, तर तो तेथें जाऊन सीतेचा शोध लावूं शकेल.

सीतेचा शोध लागण्याची ही वार्ता ऐकून त्या सर्वांना फार आनंद वाटला. परंतु इतक्या दूरचा प्रवास होणें अशक्य म्हणून ते पुनः निराश झाले. सर्व लोक आपापल्या शक्तीबद्दल खात्री देऊं लागले. परंतु लंकेपर्यंत जाण्याचें साहस कोणाला होईना, त्यामुळें तिकडे जाण्याचें नांव कोणी काढीना. शेवटीं पुष्कळ विचार करून सीतेचा शोध आणण्याकरितां जाण्यास हनुमान तेवढा

तयार झाला. महाबली हनुमानानें रामचंद्राचें स्मरण करून लगेच उड्डाण केलें. पाहतां पाहतां महाबली हनुमान अंगदाच्या दृष्टीपार निघून गेला.



पांचवें कांड.

सीतान्वेषण आणि लंकादहन.

भारत वर्षाच्या दक्षिण दिशेला प्राचीनकाळीं लंका नांवाचें एक बेट होतें. त्यालाच हल्लीं सिलोन म्हणतात. त्या बेटांत वनें, उपवनें, पर्वत, नद्या, सरोवरें वगैरे सर्व होतें. तें बेट फार सुंदर व रमणीय होतें. लंकेच्या चहूं बाजूंनीं समुद्र होता. शिवाय सभोंवतीं मोठा तट होता. लंकेला चहू दिशेला चार दरवाजे होते. त्यांवर आणि सर्व तटांवर सशस्त्र राक्षस सैनिक रात्रंदिवस पहारा करीत होते. तेथील प्रासाद उंच असून चांदीप्रमाणें झळकत होते. त्याचप्रमाणें तेथील रस्ते मोठे असून स्वच्छ होते. कित्येक रस्त्यांवर रोज चंदनाचे व सुगंधित द्रव्यांचे सडे घालीत असत. तेथील मोठमोठ्या वाड्यांना सुवर्णाचे खांब व जाळ्या होत्या. लंका नगरी त्रिकूट नांवाच्या पर्वतावर वसल्यामुळें दुरून असें वाटे कीं, जणूं काय ती आकाशांत उडून जात आहे. तेथें किती तरी मंदिरें एवढीं मोठीं होतीं कीं, त्यांना सात सात, आठ आठ चौक होते. प्रासादांच्या उंचीविषयीं तर कांहीं विचारूंच नये. त्यांचीं शिखरें जणूं काय आकाशाशींच गोष्टी बोलत आहेत. लंकेच्या मध्यभागीं असलेल्या उद्यानांची, काननांची आणि सरोवरांची शोभा पाहण्यासारखी होती. कुठें पुष्पमंदिर, तर कुठें चित्रशाला, तर कुठें अत्यंत रमणीय क्रीडाभूमि होती. कोठपर्यंत तिचें वर्णन करावें ! सारांश, लंकेंतील प्रत्येक गोष्ट मन आकर्षण करणारी होती.

महाबली रावण त्या लंकापुरीचा अधीश्वर होता. त्याचा पिता

ब्राह्मण असून माता राक्षसी होती. त्याला दोन बंधू होते. एकाचें नांव कुंभकर्ण व दुसऱ्याचें नांव बिभीषण होतें. कुंभकर्ण भीमकाय, विकटाकार, असून रावणाप्रमाणेंच दुराचारी होता. परंतु त्याचा धाकटा भाऊ बिभीषण तसा नव्हता. तो जितेंद्रिय, सदाचारी, आणि धर्मात्मा होता. रावणाचे दुराचार पाहून तो नेहमीं मनांत दुःखी असे. वेळोवेळीं तो पापी रावणाची त्याच्या तोंडावर त्याच्या दुष्कृत्यांबद्दल निंदाहि करी. रावणाचा एक मुलगा होता. त्याचें नांव इंद्रजित होतें. देवराज इंद्राला जिंकून त्यानें ही पदवी मिळविली होती. त्याचें दुसरें नांव मेघनाद असें होतें. तो दुष्टहि दुराचारांत आपल्या पित्यापेक्षां कमी नव्हता.

रावण मोठा स्वेच्छाचारी आणि दुराचारी होता. इंद्रियांनीं त्याला इतकें वश केलें होतें कीं तो भोगविलासांची केवळ मूर्तिच बनून गेला होता. त्यानें आपलें जीवित सांसारिक उपभोग प्राप्त करून घेण्यांत खर्च केलें होतें. त्याची सर्व शक्ति, सर्व बल आणि सर्व उद्योग इंद्रियभरणाकरितांच होते. धर्मविचार करण्यांत त्यानें एक क्षणही घालविला नसेल. त्यानें दूरदूरच्या सुंदर स्त्रियांना बलात्कारानें आणून आपल्या महालांत ठेविलें होतें. त्याच्या दुराचाराला पारावारच नव्हता. मंदोदरी नांवाची त्याची एक मुख्य राणी होती. ती जरी बुद्धिमान:होती तरी आपल्या पापी स्वामीला ती धर्ममार्गावर आणूं शकली नाहीं. शूर्पणखा त्या पापी रावणाची सख्खी बहीण होती. तीं दोघें एकाच आईच्या उदरांतून उत्पन्न झालीं होतीं, तेव्हां त्यांच्या अवगुणांत अंतर तरी कां असावें? आमचें सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं शूर्पनखा दुराचरणांत आपल्या भावापेक्षां कोणत्याहि गोष्टींत कमी नव्हती. त्याच दुष्टेनें वनांत जाऊन रामचंद्र आणि लक्ष्मण यांना आपली पापी वासना पूर्ण करण्याबद्दल प्रार्थना केली होती. महाबुद्धिमान लक्ष्मणानें तिला जी शिक्षा केली होती ती

अगदीं योग्य होती. त्या दुष्टेनें लंकेंत जाऊन सीतेला हरण करून आणण्याबद्दल रावणाला उत्तेजन दिलें. आमच्या वाचकांना हा वृत्तांत आधींच माहीत आहे. ज्याप्रमाणें पतंग ज्योतीला पाहून मोहित होतो, त्याप्रमाणें शूर्पनखेच्या जाळ्यांत सांपडून रावणानें एकाएकीं सीतादेवीचें हरण केलें.

सीतादेवी खरोखरच अत्यंत रूपवती होती. तिच्या रूपलावण्याची तुलना जगांत कोणी करूं शकत नव्हतें. तिचें सौंदर्य अलौकिक होतें. तिचें तें सौंदर्य स्वाभाविक असल्यामुळें ती देवतेप्रमाणें सुंदर दिसे. त्यांत यौवनावस्थेनें भर टाकल्यामुळें तें अधिकच मोहक होतें. या दोन गुणांमुळेंच सीतादेवीच्या सौंदर्याला अलौकिकता आली होती काय? नाहीं. हे दोन गुण तर जगांत कोणत्याही स्त्रींत एकत्र झालेले आढळतील. परंतु या दोन गुणांशिवाय दुसऱ्या अधिक गुणशालीपणानें ती जगांत रूपशाली झाली होती. सीतेमध्यें चंचलता वास करीत नव्हती, हा तिच्या सौंदर्यांत एक विशेष होता. तिची दृष्टि सरळ, स्थिर, आणि शांत होती. तिचें मुखारविंद अलौकिक प्रतिभेनें प्रदीप्त होतें. तिच्या नेत्रांतून पवित्रतेचा प्रकाश झळकत होता. तिचें दर्शन होतांच पहाणाऱ्याच्या मनांत एक प्रकारचें भय उत्पन्न होई. ती स्वाभाविक तेजानें अग्नीप्रमाणें प्रदीप्त झाली आहे असें वाटे. जर सीतादेवीच्या समोर कोणी पाप्याहून पापी आला, तर त्याचें सर्व पाप आणि साधुस्वभाव लज्जेनें नाहींसे होत. घोर दुराचारीहि तिच्या अपवित्र दृष्टीसमोर येतांच आपले दुराचार सहसा विसरून जाई. तिचें दर्शन होतांच तिच्या विषयीं श्रद्धा आणि भक्ति हीं उत्पन्न होत. जेव्हां सीतादेवीची अमृतमय दृष्टि क्रूराहूनही क्रूर आणि कठोराहूनही कठोर मनुष्यावर पडत असे, तेव्हां तोहि आपली क्रूरता आणि कठोरता विसरून जाऊन तिचा विनीत दास बनून जाई. सीतादेवी तिच्या

अलौकिक सरलता, आणि पवित्रता इत्यादि गुणांमुळें जगज्जननी-प्रमाणें वाटत होती. तिच्या समोर मोठ्या दुर्दान्त पाप्याचेंहि हृदय भीतीनें पानाप्रमाणें कांपे. हेंच तिच्या सौंदर्यांत विशेष होतें; आणि याच विशेषामुळें तिचें स्वाभाविक सौंदर्य शंभर पट वाढलें होतें. सीतेची सद्गुणकीर्ति ऐकून रावणानें तिचें हरण करण्याचा निश्चय केला, असें जरी धरून चाललें, तरी त्याच्यामध्यें सूड घेण्याची बुद्धि अधिक होती. ज्या वेळेस रावणानें प्रथमच तपस्वी वेषानें सीतेचें अलौकिक रूपलावण्य पाहिलें, त्याच वेळेस त्याच्या मनांत तिच्या सौंदर्याचा दरारा उत्पन्न झाला. रावणाच्या मंदिरांत किती तरी रमणीरत्नें होतीं; परंतु सीतेची बरोबरी करणारें त्यांत एकहि नव्हतें. सीतादेवीला पाहतांक्षणींच जरी पापी रावण आसक्त झाला असला, तरी तिच्या समोर आल्याबरोबर त्याला मनांतून भीति वाटे. येथें अशी एक शंका उत्पन्न होते कीं, सीतादेवी तर एक असहाय अबला होती. तिला पाहून महा प्रतापी व दिग्विजयी रावणाच्या मनांत साहाजिक भीति उत्पन्न होऊन तो कांपू लागला याचें कारण काय?

वास्तविक अबला सीतादेवीला पाहून रावण मुळींच भ्याला नव्हता. जर तो भ्याला असता तर तिला बलात्कारानें हरण करून कसा आणता? परंतु ज्या वेळेस त्यानें सीतादेवीचें तेजःपुंज मुख-मंडळ आणि तिची अलौकिक पवित्रता अवलोकन केली, त्या वेळेस त्याच्या हृदयांत भय उत्पन्न झालें होतें. रावणाचें पापी हृदय सीता-देवीचें पुण्यमय तेजःपुंज मुखमंडळ पाहून विरमलें. असाधुतेनें साधु-तेपुढें हार खाल्ली. धार्मिकबलापुढें पाशव बल निर्वीर्य झालें. त्याची पशुवृत्ति मावळली. दैवी शक्तिपुढें राक्षसी मायेनें मस्तक नमविलें. परंतु या जड सृष्टीचा असा एक नियम आहे कीं, प्रबल पाशव शक्ति ही निर्बल दैवी शक्तीवर आपला अधिकार गाजविते. तदनु-

सार रावणानें अबला सीतेचें हरण केलें. सीता देवीला रावणानें चोरून नेलें हें खरें, परंतु पाप पुण्यावर विजय मिळवूं शकतें काय? धर्मानें अधर्मापुढें मान वांकविली काय? काय, दैवी विभूति राक्षसी मायेला भ्याली? असें मुळींच झालें नाहीं. रावणानें सीतेला लंकेंत नेऊन बंदींत ठेवल्यावर तिला किती प्रलोभन दाखविलें, तिला किती भीति दाखविली, परंतु असहाय व अबला सीतादेवीनें शत्रूच्या नगरींतच महाबली रावणाचा वारंवार तिरस्कार करून, त्याला प्रत्येक वेळीं झिडकारून त्याचा सर्व अभिमान मातीस मिळविला. ती क्रोधानें आपलें डोळे लालबुंद करून रावणाला म्हणाली—

"इदं शरीरं निःसंज्ञं बन्ध वा घातयस्व वा ।
नेदं शरीरं रक्ष्यं मे जीवितं वापि राक्षस ॥
न तु शक्यमक्रोशं पृथिव्यां दातुमात्मनः ।
वा. रा. कां. ३ सर्ग ५६.

हे राक्षसा, हें शरीर निःसंज्ञ आहे. तसेंच जड आहे. तूं त्याला वाटेल तर बांधून ठेव, वाटेल तर त्याचे तुकडे तुकडे कर. मी आतां या शरिराचें व प्राणांचें रक्षण करणार नाहीं. जगांत असाति ह्मणवून घेऊन जगणार नाहीं, तशीच निंदाहि पण ऐकून घेणार नाहीं."

वाचक बंधु भगिनींनो, पाहिलेंत ना! पुण्याच्या तेजापुढें पाप क्षणभर देखील टिकत नाहीं. पुण्यपवनानें पापरूपी कापसाच्या राशीला सहज लीलेनें उडवून दिलें.

पापी रावणानें सीतेला बलात्कारानें लंकेंत नेलें खरें, पण त्याची पापवासनारूपिणी कुमुदिनी सीतादेवीच्या पुण्यप्रभाकरापुढें अगदीं निर्माल्यवत् झाली. रावणानें विचार केला कीं धन दिल्यानें साधारण स्त्रिया वश हातात, त्यांतीलच सीताहि असेल; म्हणून त्यानें तिला लालूचहि दाखविली. परंतु सीतेचें मन त्या प्रलोभनानें लाल-

चावण्याचें तर दूरच राहिलें, उलट तिनें भीषणभाव मात्र धारण केला. सीतादेवींचें तें लक्षण पाहून ज्याप्रमाणें क्षुधित सिंह आपल्या भक्ष्यावर रागावतो, त्याप्रमाणें तो तिच्यावर रागावला. त्यावेळ-पर्यंत रावणानें शेंकडों स्त्रिया वश केल्या असतील, परंतु त्यावेळ-पर्यंत सीतादेवीप्रमाणें कोणीहि तिरस्कारपूर्ण आपली प्रतिकूलता त्याला दाखविली नव्हती. सीतादेवीचा असा पवित्र व अनुपम मनोभाव पाहून ' रामपत्नि साधारण स्त्री नव्हे, असें त्याच्याहि लक्ष्यांत आल्यावांचून राहिलें नाहीं. ती सिंहिणीप्रमाणें तेजस्विनी आणि एकांत--पतिपरायणा आहे, तिला वश करणें कोणालाहि साध्य नाहीं अशीच जरी त्याची खात्री झाली, तरी रावणानें आशा सोडली नाहीं. कांहीं छलानें, आणि कांहीं दिवस येथें बंदींत राहण्याच्या त्रासानें कंटाळून कंटाळून शेवटीं ती आपणास वश होईल असेंच त्याला वाटलें.

आतां येथें अशी शंका येते कीं, राक्षस रावण कामांध तर होताच, मग त्यानें बलात्कारानें सीतेला वश कां करून घेतलें नाहीं? काय तो असें करूं शकला नसता? बलवान निर्बल्याला दडपून टाकील यांत संशय नाहीं. परंतु पाशविकबल धर्मबलाला दाबून टाकूं शकणार नाहीं, हें हि लक्षांत ठेवलें पाहिजे. ही गोष्ट सिद्ध करण्याला एकच काय, पण शेंकडों उदाहरणें देतां येतील. विशेषें करून या भारत वर्षांत अशीं स्त्रियांचीं आणि बालकांचीं सुद्धां उदाहरणें हवीं तितकीं देतां येतील, परंतु ग्रंथविस्ताराकरितां तसें येथें करतां येत नाहीं. ज्यांनीं रामायण आणि महाभारत वाचलें असेल व ज्यांना दशरथ, हरिश्चंद्र, मयूरध्वज, ययाति, नहुष, आदि धर्म-वीरांचे जीवनवृत्तांत अवगत असतील, त्यांना धर्मबलापुढें मोठमोठ्या दुर्वर्तनी राजांच्या गर्वाचा चुराडा झाला आहे, हेंहि कळून आलें असेल. ज्यांनीं राणी दुर्गावती, ताराबाई, पद्मावती, अकरा वर्षांचे

गुरु गोविंदसिंगाचे दोन पुत्र यांचीं चरित्रें वाचलीं असतील, त्यांना धर्मबलापुढें मोठमोठे पापी चक्रवर्ती देखील कःपदार्थ आहेत, हेंहि विदित झालें असेलच. प्रतापाहून प्रतापी आणि दुराचाराहूनहि दुराचारी पापी राजे असहाय धर्मवीरांचा एक रोमहि वांकडा करूं शकले नाहींत. धर्मवीरासमोर जातांच कठोर मनुष्याच्या हातांतील शस्त्रहि गळून पडल्याचीं उदाहरणें आहेत. त्याचें शरीर त्याच्यापुढें कांपतें, आणि शेवटीं त्याला त्याच्यासमोर हारच खावी लागते. दुर्बल सात्विक मनुष्यें सबल पापीयांकडून घोर अत्याचारांनीं पीडिलीं जातात, आणि त्यांचीं क्षणभंगुर शरिरें वेळीं नाशहि पावतात, परंतु पुण्याला आणि धर्मवीर मनुष्याला केव्हां कोणी पराजित केल्याचें कधीं आढळण्यांत येतें काय! फारच कमी. आमचा तर असा दृढ विश्वास आहे कीं, संसारांत अशी एकहि शक्ति नाहीं कीं, जी खऱ्या धर्मवीराला विचलित करील. तेजस्वी व धर्मवीर मनुष्यें आपल्या आत्मविश्वासाकरितां, व धर्मरक्षणाकरितां हा अनित्य संसार, त्याचप्रमाणें आपलें जीवितहि तुच्छ समजतात. धैर्यवान मनुष्यें आपल्या प्राणप्रिय धर्माकरितां हंसत हंसत, आणि मोठ्या आनंदानें मृत्यूशय्येवर निजतात, आणि जगांतील सर्व शक्ति धर्मापुढें कांहीं एक करूं शकत नाहींत, हें आपल्या उदाहरणांनीं सर्व जगाच्या निदर्शनास आणून देतात. धर्मरक्षणाकरितां धार्मिक मनुष्य घातक्यासमोर संतोषानें मान खालीं करतो. धार्मिक मनुष्य धन, रत्नें वगैरे कशाचीहि इच्छा करीत नाहीं. धर्मवीर पुरुषाचें एक मात्र धर्मच आश्रयस्थान आहे. धर्मनष्ट झाला तर धर्मवीर एक क्षणभर देखील जिवंत राहणार नाहीं. तो धर्मविरहित जीवन निरर्थक समजतो.

रावणाची पाशविक शक्ति धर्मप्राणा सीतादेवीच्या धर्मशक्तीपुढें कुंठित झाली. यामुळें इच्छा असूनही त्यानें भयानें सीतेवर जुलूम

केला नाहीं. जेव्हां जेव्हां रावण नानाप्रकारचें तिला प्रलोभन देई, आणि भीति दाखविण्याकरितां तिच्याजवळ येई, तेव्हां तेव्हां ती आपल्यामध्यें आणि रावणामध्यें एक गवताची काडी ठेवीत असे. ती काडी साहसानें उल्लंघून रावण पुढें येईल अशी त्याची शक्ति नव्हती. याचें कारण मनुस्मृतींत दिलें आहे तें असें—

" धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।
तस्माद्धर्मो न हन्तव्यो मानो धर्मो हतोऽवधीत् ॥

म्हणजे जो मनुष्य आपल्या धर्माचें रक्षण करतो, त्याचें रक्षण स्वतः धर्मच करतो; व जो धर्माचा नाश करतो त्याला धर्महि मारतोच. एवढ्याकरितां निदान आपल्या रक्षणाकरितां तरी मनुष्यानें केव्हांहि धर्मावर आघात करूं नये.

या आर्य वचनानुसार सीतेनें ज्या धर्माकरितां आपल्या जीवाचीहि पर्वा केली नाहीं, ज्या पातिव्रत्य धर्माकरितां तिनें आपले प्राणहि ओंवाळून टाकण्याचा दृढ संकल्प केला, तो धर्म सीतेचें रक्षण करणार नाहीं काय ? सीतादेवीच्या धर्माचाच प्रताप असा होता कीं, त्या काडीजवळ येण्याची रावणासारख्या बलिष्ठाची देखील छाती झाली नाहीं.

जेव्हां रावणानें आपले सर्व उपाय करून पाहिले आणि आपले मनोरथ कोणत्याहि रीतीनें सिद्ध होत नाहींत, असें त्याच्या लक्षांत आलें, तेव्हां त्याला वाटलें कीं सीतादेवी मोठी तपस्विनी आहे. हिची प्रकृति साधारण स्त्रियांप्रमाणें नव्हे. जर हिला आपण धर्मभ्रष्ट केलें, तर त्याच्या अगोदरच ही आत्मघात करून घेईल, अशी त्याची बालंबाल खात्री होऊन गेली. कारण धर्माकरितां सीता आपलें प्राण देण्यास तयार होती. पापी रावण तिला आपली राजमहिषी करण्यास तयार होता, पण त्याची ही इच्छा ती मेली तरी पूर्ण होणारी नव्हती. या कारणाकरितां बुद्धिवान रावणानें कसे तरी

आपले मनोविकार दाबून सीतेला एक वर्षाची अवधि दिली. त्यानें राक्षसींना आज्ञा केली कीं, एक वर्षाच्या आंत जर सीता माझी इच्छा पूर्ण करण्यास तयार होणार नाहीं, तर हिला ठार मारून सकाळच्या जेवणाच्या वेळीं मला हिचें मांसान्न तयार करून वाढा. सीतादेवीला एक वर्षाचा अवकाश देण्यांत त्याचें कांहीं गूढ रहस्य होतें काय ? हो, अवश्य होतें.

रावणानें विचार केला कीं, सीतेला आतां तिच्या पतीची आठवण येत असेल. आणि एक वर्षांत मी कदाचित् त्यांना भेटेन असें हि तिला वाटत असेल, व ते मला मुक्त करून नेतील, अशी तिची खात्री असेल. पण कांहीं दिवस राहिल्यावर वेळोवेळीं विनंति करून आणि राक्षसींकडून धाक दाखवून ही शेवटीं निराश होऊन त्या स्थितींत आपणाला वश होईल. रावणानें अशा रीतीनें किती तरी स्त्रिया वश केल्या होत्या. त्याला तसा अनुभवही आला होता. यामुळेंच व याच कारणाकरितां रावणानें सीतेला एक वर्षाची मुदत दिली होती. परंतु त्या वेळीं आपल्या कुवासना सफल होऊं देणार नाहीं, अशा देवीशीं गांठ आहे, हें त्याला विदित नव्हतें. रावणाच्या या एका वर्षाच्या सवलतीनें सीतेला कष्ट सहन करावे लागले नाहींत. ती फार बुद्धिमान होती. ती त्याचा अर्थ तात्काळ समजली. दुष्ट रावणानें महात्म्या रामचंद्राच्या धर्मपत्नीला अद्याप पुरतेपणीं ओळखिलें नाहीं.

रावणाच्या आज्ञेनें सीतेला अशोक वनांत नेऊन ठेवण्यांत आलें. तिच्या रक्षणार्थ पुष्कळ राक्षसी ठेवल्या. त्यांनीं रात्रंदिवस तिच्या जवळ राहावें, अशी त्यांना कडक आज्ञा होती. त्यांनीं रावणाच्या आज्ञेप्रमाणें सीतादेवीची पुष्कळ समजूत केली, तिला भय दाखविलें, वाटेल तें केलें; परंतु त्या दुष्टाच्या कुवासनेला कांहींच फळ आलें नाहीं.

सज्जन पुरुष केव्हांहि आपल्या वचनापासून ढळत नाहींत. ते जें बोलतील तेंच करतील. सीतेबरोबर रावणानें जी प्रतिज्ञा केली होती, ती त्याला पाळलीच पाहिजे होती. एक वर्षपर्यंत तो कांहींच बोलूं शकत नव्हता. परंतु दुष्ट रावण या धर्मनीतीला काय महत्त्व देणार ! तो तर पूर्ण दुर्नीतिपरायण होता. त्यानें सीतेला ही अवधि स्वार्थाकरितां दिली होती. तो तर सीतेच्या रूपाग्निशिखेवर मोहित होऊन पतंगाप्रमाणें झडप घालूं पहात होता. त्याला रात्रंदिवस सीतेचाच ध्यास लागला होता. अशा स्थितींत जर रावणासारखा पापी मुदतीच्या आंतच आपली पापवासना पूर्ण करण्यास उद्युक्त झाला, तर त्यांत आश्चर्याची गोष्ट मुळींच नव्हे. याकरितां रावण मधून मधून सीतादेवीला छळण्याकरितां, व त्रास देण्याकरितां अशोकवनांत येत असे, तेव्हां तिला अत्यंत मानसिक क्लेश होत असत. रावण अनेक मार्गांनीं तिला भीति वगैरे दाखवीत असत; ती आपल्या धर्मापासून विचलित झाली नाहीं. ती रागानें एक-सारखी त्याला झिडकारीत असे. तिचें असें वर्तन पाहून रावणालाहि तिचा क्रोध येई, पण तो तिच्यावर अत्यंत आसक्त असल्यानें त्याचा राग नाहींसा होऊन लगेच शांत होई.

अशोक वाटिकेंतहि सीतेला त्याच्यापासून इतकें दुःख होई कीं, त्याचें वर्णन करवत नाहीं. सीता पतिचिंतनांत नेहमीं मग्न असे. तिला दिवसा अन्न गोड लागत नसे, आणि रात्रीं झोंप येत नसे. तिची स्थिति फार शोचनीय होती. पतीच्या विचारानें तिचें शरीर इतकें दुर्बल झालें होतें कीं, केवळ ती अस्थिपंजर मात्र राहिली होती. ती नेहमीं मनाशीं विचार करी कीं, मला आतां प्राण-नाथाचें दर्शन होईल काय ! तें केव्हां होईल, ते अजून जिवंत असतील काय ? मला वाटतें माझ्या विरहानें त्यांनीं प्राणत्याग तर केला नसेल ना ? तसें असल्यास ज्येष्ठ

भ्रात्याच्या शोकानें लक्ष्मणही जिवंत राहणार नाहीं. हाय, माझे प्राणेश्वर जर जिवंत नसतील तर मीं मग जगून तरी काय फायदा ! त्या पतिदेवाशिवाय मला सर्व जग शून्य दिसतें. माझें हृदयहि फार कठोर आहे. कारण तें अजून त्यांच्या विरहानें दुभंग होत नाहीं. मीं पूर्वजन्मीं कांहीं तरी मोठें पाप केलें आहे खास ! त्याचेंच हें वाईट फळ मला आतां भोगावें लागत आहे. कौसल्यानंदनाला माझी अजून आठवण झाली नसेल काय ! किंवा माझ्या दुरावस्थेची त्यांना अद्याप वार्ता समजली नाहीं ! माझे स्वामी महावीर आहेत. त्यांना माझा पत्ता लागतांच ते शत्रूचा समूळ नाश करून टाकतील. मी राजर्षि जनकाची कन्या असून महाराजा दशरथाची सून आणि धर्मधुरंधराची धर्मपत्नि आहे. हाय, माझ्या भाग्यांत दुःखच भोगण्याचें लिहिलें आहे काय ? मी जागीं आहें किंवा निजलें आहें, कां मी स्वप्नांत आहें ? या वेळेस मी कुठें आहे ? माझे स्वामी माझ्यापासून किती दूर असतील. मला येथें कोण घेऊन आलें. रावणानें मला अजून माझ्या पतीजवळ कां नाहीं पोहचविलें ? देवा, मीं रावणाचा असा काय अपराध केला होता, कीं त्यानें आमची उभयतांची ताटातूट केली. आतां माझ्या जगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हाय, हाय, या वेळीं मृत्यु येईल तर बरें होईल ! तोहि जर येणार नाहीं तर मला आत्महत्याच करावी लागेल. आत्महत्या करणें मोठें पाप समजतात. तें कितीहि मोठें असलें तरी सतित्व नष्ट होण्यापेक्षां प्राण नष्ट झाले तर तें मला प्रिय आहे. येथें तर आत्महत्या करण्याला साधनहि नाहीं. या दुष्ट राक्षसी नेहमी माझ्यावर लक्ष ठेवीत असतात. मला मरण्याला देखील सवड नाहीं. हायरे देवा, माझ्यासारखी हतभागिनी कोणी नसेल. हा विधात्या, तूं हें काय करीत आहेस !'

एक वेळा नव्हे, दोन वेळां नव्हे, अनेक वेळां सीतेनें अशा

प्रकारचा विलाप केला असेल. जेव्हां तिला आपल्या सुटकेचा कांहींच मार्ग दिसेना, तेव्हां ती :निराशेनें रडत बसे. सीतातर केव्हां उन्मत्ताप्रमाणें बडबडे, तर केव्हां निचेष्ट होऊन जमिनीवर पडे. हे सीते, तुझ्या दुःखाचें थोडेंसें वर्णन ऐकूनच आमचें हृदय विदीर्ण होऊन जात आहे, तुझें हृदय अवश्य वज्राचें असेल, नाहींतर तें असें कठीण दुःख कसें सहन करूं शकेल ? जनकनंदिनी तूं खरोखर धन्य आहेस ! तूं धर्माकरितां इतके कष्ट सहन केलेस, पण आपला धर्म सोडला नाहींस. तुला आमचा अनेक वेळां प्रणाम असो. या तुझ्या धर्मप्रियतेमुळेंच आज हजारों स्त्री, पुरुष तुझें गुणगान करीत आहेत.

आतां आपल्याला हनुमानाच्या वृत्तांताकडे वळलें पाहिजे. समुद्राच्या यात्रेंतून त्रास, दगदग, आणि नानातऱ्हेचीं विघ्नें नाहींशीं करून व तीं उत्पन्न करणाऱ्या शत्रूंचा पाडाव करून हनुमान लंकेंत जाऊन पोहोंचला. लंकेची शोभा पाहून तो चकित झाला. ईश्वराचें स्मरण करून सीतेच्या शोधार्थ त्यानें लंकेंत प्रवेश केला. रावणाच्या राणीवशांत गुप्तपणें जाऊन त्यानें पुष्कळ स्त्रिया पाहिल्या, पण त्यांत सीतादेवी त्याला आढळली नाहीं. त्यानें चोरून रावणाचे सर्व महाल पाहिले. पण रामचंद्रांनीं सीतेविषयीं जीं लक्षणें त्याला सांगितलीं होतीं तीं तेथील कोणाहि स्त्रींत दिसेनात. अनेक स्थळें धुंडाळून, आणि तपास करूनहि जेव्हां तेथें सीतेचा शोध लागेना, तेव्हां त्याला अत्यंत दुःख वाटलें. तो मनांत म्हणाला, ' मीं रावणाच्या राजमंदिरांत अनेक स्त्रिया पाहिल्या, पण जानकीच्या लक्षणाची एकहि स्त्री मला दिसत नाहीं, आतां मी जानकी कोणाला समजूं ! पतिव्रता सीता पतीविरहानें परलोकाला तर गेली नाहीं. !'

याप्रमाणें हनुमानाचें हृदय दुःखानें आणि निराशेनें व्याप्त झालें.

तो पुनः मनाशीं दुःख करून म्हणाला ' माझा समुद्रप्रवास व्यर्थ झाला. जर मला सीतेचा शोध लागला नाहीं, तर मी कोणत्या तोंडानें परत जाऊं. जर सीतेचें कांहींच वर्तमान कळलें नाहीं, तर रामचंद्र प्रियपत्नीच्या विरहाग्नीचें जळून भस्म होऊन जातील. रामचंद्रच राहणार नाहींत, तर लक्ष्मण आणि सुग्रीव त्यांचेंच अनुकरण करतील. मग मी तरी जगण्यांत काय अर्थ आहे. यापेक्षां मी लंकेंतच आत्मघात करून मरणें योग्य आहे !

हनुमान याप्रमाणें आपणाशीं शोक करीत, आणि शोध करीत चालला असतां, समोर त्याला एक गहन वन दिसलें. त्याचें नांव अशोकवाटिका होतें. जरी हनुमान निराश झाला होता, तरी त्यानें आतांपर्यंत सीतेच्या शोधाचा उद्योग सोडला नव्हता. याकरितां तें गहन वन दिसतांच तो तेथें जाऊन पोहोंचला. ती वेळ रात्रीची होती. जातांना तो एका वृक्षावर चढला. तो वृक्ष शिसव्याचा होता. त्या वृक्षाच्या गर्द पानांत लपून बसून त्यानें पाहिलें तों त्या वृक्षाखालीं एक स्त्री बसली आहे असें त्याला दिसलें. तिच्या सभोंवतीं राक्षसी पहारा करीत होत्या. ती पतिविरहांत मग्न असून वारंवार दीर्घ निश्वास सोडीत आहे, व तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या आहेत. तिचें शरीर इतकें कृश झालें होतें कीं, फक्त त्याच्या अस्थि मात्र शिल्लक राहिल्या होत्या. तिच्या अंगावर दागिने वगैरे कांहीं नव्हते. ती फक्त एक साधें लुगडें नेसली होती. पहातां क्षणींच वाटे कीं ही प्रियकराच्या चिंतनांत मग्न आहे.

राक्षसींनीं परिवेष्टिलेल्या अशा स्त्रीला पाहून हनुमानाला वाटलें कीं, सीता देवी ती हीच आहे. रामचंद्रांनीं त्याला सीतेचीं जीं लक्षणें सांगितलीं होतीं, तीं सर्व तिच्यामध्यें त्याच्या दृष्टीस पडलीं. तीं पाहून त्याची सीता देवीसंबंधान खात्री झाली. सीतेचें रूप, शील, आणि गंभीर मुद्रा पाहून रामचंद्राची धर्मपत्नी होण्यास

हींच योग्य आहे, असें हनुमानास वाटलें. रामचंद्र जर हिच्याविषयीं इतका अनुराग दाखवितात, तर ही पण आपल्या स्वामीविषयीं तितकीच भक्तिमती असणें हेंच योग्य आहे, असेंच असलें पाहिजे. समानगुणशील दांपत्यामध्यें असा अनुराग असलाच पाहिजे.

सीतेची अशी शोचनीय स्थिति पाहून हनुमानाचें दयाळू हृदय दयायुक्त झालें त्याच्या नेत्रांतून बाष्पधारा वाहूं लागल्या. महावीर हनमान सर्व रात्रभर त्या वृक्षावरच होता. तेथें बसला असतां सीतेशीं काय बोलावें, कसें बोलावें या विचारांतच ती सर्व रात्र निघून गेली. जेव्हां पहाट झाली, तेव्हां त्याच्या कानीं स्त्रियांचे नूपुरध्वनि येऊं लागले. थोड्याच वेळांत तो आवाज जवळ आपल्याजवळच होत आहे असें त्याला वाटलें. इतक्यांत रावणराज अनेक रूपवती स्त्रियांनीं वेष्टिलेला सीतेच्या दर्शनाकरितां येत आहे असें त्यानें पाहिलें. पापी रावणाला दुरूनच पाहून सीतेचें हृदय भीतीनें कांपं लागलें. ती तें तसेंच हातानें दाबून आणि गुडघ्यांत खालीं मान घालून स्वस्थ बसली. तिच्या नेत्रांतून अश्रुप्रवाह चालले होते. त्या दिवशीं सीतेच्या मनांत रावणाच्या मृत्यूविषयीं कल्पना उद्भवली होती. तो जसजसा जवळ येऊं लागला, तसतशी ती मोठ्यानें आक्रोश करूं लागली. रावण जवळ येतांच तिचे डोळे रागानें लाल झाले. बिचारी असहायाप्रमाणें चहूंकडे पाहूं लागली. पण कोणीच सहायक तिच्या दृष्टीस पडेना.

सीतेच्या जवळ येतांच रावणानें तिला अनेक प्रलोभनाची आशा दाखविली. बऱ्याच बढाया मारल्या, आणि गोड गोड शब्दांनीं तिचें शांतवन करण्याचा प्रयत्न केला. तो सीतेला म्हणाला, 'हे जानकी, तूं मला पाहून इतका संकोच कां करतेस? मीं तुझ्याजवळ प्रणयाची भिक्षा मागत आहें; म्हणून तुला माझा सन्मान केला पाहिजे. तुझी इच्छा नाहीं असें पाहून मीं तुझ्या शरीराला अद्याप

स्पर्शसुद्धां केला नाहीं. हे देवी, तूं विश्वास ठेव, मी तुला केव्हांहि फसवणार नाहीं. तूं मला भिऊं नकोस. कधींतरी घातलेली वेणीं, जमिनीवर शयन, उपवास आणि मलीनवस्त्रधारण, या गोष्टी तुला योग्य आहेत काय! इकडे एकदां लक्ष तर दे. पहा तर खरें! मी पाहतों कीं तूं रात्रंदिवस रामचंद्राचें ध्यान करण्यांत व चिंतन करण्यांत मग्न राहतेस. त्याच्यासंबंधानें काळजी करण्याचें तुला आतां सोडून दिलें पाहिजे. आतां तूं रामापासून आपलें मन परतवून तें मजकडे लाव. माझेंच स्मरण व मनन करीत जा. तूं आपलें अज्ञान आतां सोडून दे. माझ्या अंतःपुरांत एक नव्हे, दोन नव्हे तर हजारों रूपवती स्त्रिया आहेत; त्या सर्वांची तूं मुख्य हो. ही माझी गोष्ट ऐक. मी आतांपर्यंत जेवढा रत्नसंचय केला आहे, तेवढा सर्व तुला अर्पण करतों. तूं माझी भार्या हो. तूं आनंदानें माझा स्वीकार कर. मी तुझ्या प्रसन्नतेकरितां माझे सर्व राज्य तुझ्या पित्याला अर्पण करतों. माझी बरोबरी करूं शकेल, असा जगांत एकहि मायेचा पूत नाहीं. हे देवी, ज्या रामाचें तूं ध्यान करतेस, ज्याच्याकरितां तूं आपलें शरीर इतकें कृश करून घेतलें आहेस, व ज्याच्या वियोगामुळें तूं सर्व सांसारिक सुखोपभोग सोडले आहेस, तो धनानें, ऐश्वर्यानें, बलानें, आणि प्रतिष्ठेनें माझी बरोबरी केव्हांही करूं शकणार नाहीं. या करितां तूं माझी वामांगी होऊन या धनरत्नपरिपूर्ण लंकेची अधीश्वरी हो.'

दुरात्म्या रावणाची अशी संतापजनक आणि दुःखदायक पापी वाणी ऐकून सीता देवी उच्च स्वरानें रडूं लागली. नंतर क्षणभरानें ती आपले मनोविकार शांत करून त्याला म्हणाली, 'हे राक्षसराजा, तूं माझी इच्छा करूं नकोस. तूं आपल्या स्त्रीवरच अनुरक्त रहा. जसा पापी मनुष्य मुक्तीला वश करूं शकत नाहीं, तसा तूं मला केव्हांहि मिळवूं शकणार नाहींस.' इतकें बोलतां

बोलतां सीतादेवीचा क्रोधाग्नि भडकला. ती रावणाकडे तोंड फिरवून म्हणाली, 'अरे नीचा, मी राजा दशरथाच्या ज्येष्ठ पुत्राची धर्मपत्नी आहें. मी पतीची सहधर्मिणी आणि साध्वी आहें. तूं मला साधारण स्त्री समजूं नकोस. धर्माला कल्याणकारक समजून तूं त्याचें अनुष्ठान कर. तूं लंकेश्वर असून जेव्हां इतका पापचारी आहेस त्यावरून येथें कोणीच धर्मात्मा, सज्जन मनुष्य नाहीं, असें वाटतें. काय, तुझा या पापाचरणापासून उद्धार करील, असा एकहि धर्मशील मनुष्य लंकेंत नाहीं! आणि जरी कदाचित् कोणी असला तरी तूं त्याचें ऐकत नसशील. ज्याप्रमाणें सूर्याची प्रभा कोणत्याहि प्रकारानें त्याच्यापासून दूर करतां येत नाहीं, तिला त्याचाच फक्त आश्रय असतो, त्याचप्रमाणें रामाच्या आश्रयाखेरीज मला दुसरा कोणाचाहि आश्रय नको. मी आपल्या पातिव्रत्यधर्मापुढें तुझें राज्यैश्वर्य मातीप्रमाणें लेखतें. जर तुला आपलें आणि राज्याचें कुशल असावें असें वाटत असेल, तर तूं मला माझ्या पतीकडे पोहचवून दे. जर तुला तुझ्या प्राणाची चाड असेल, जर तुला तुझ्या वंशाचें रक्षण व्हावें असें वाटत असेल तर, माझ्या पतीच्या चरणीं शरण जाऊन त्याच्याबरोबर मित्रत्व संपादन कर. जर तूं मला त्यांच्याकडे पोहचवून देशील, तरच त्यांत तुझें कल्याण आहे. नाहींतर कालमुखांत गेलासच म्हणून समज. रामचंद्राच्या समोर उभा राहिल्यावर मग तूं जगणार नाहींस. आणखी थोडे दिवस थांब, म्हणजे लवकरच रामचंद्राच्या महान धनुष्याचा टणत्कार तूं ऐकशील. आणखी कांहीं दिवसांनीं रामचंद्राचे विषगर्भबाण सूं सूं करीत लंकेवर पडूं लागून तुझा विध्वंस करतात कीं नाहीं हेंहि तुझ्या दृष्टीस पडेल! अरे दुष्टा, ज्या वेळेस रामचंद्र रागानें तुझ्यावर बाणाची वृष्टि करतील, त्या वेळेस तूं कैलासास गेलास, किंवा पाताळांत लपून बसलास तरी मग तुझें

त्यांच्यापासून रक्षण होणार नाहीं. तूं खरोखर त्यांच्याच हातानें ठार मरशील, हें पक्कें लक्षांत ठेव. "

सीतेचें हें रोषपूर्ण भाषण ऐकून पापी रावणाला फार राग आला. पण तो इतका काममोहित झाला होता कीं, त्याचा तो राग एकाक्षणांत नाहींसा झाला. सीतेनें त्याची इतकी जरी निर्भर्त्सना केली, इतकी जरी त्याची फजिती केली, तरी त्या निर्लज्जाला त्यांचें कांहींच वाटलें नाहीं. ' कामातुराणां न भयं न लज्जा ' असें जें कोणी एकानें म्हटलें आहे, तें योग्यच आहे. त्याप्रमाणें त्याला भयहि वाटलें नाहीं, आणि लज्जाहि पण वाटली नाहीं. तो पुनः कोडगेपणानें म्हणाला, ' देवी, जरी तुझे वाग्बाण माझ्या हृदयाला टोंचत आहेत, तरी तुझ्याविषयीं माझें चित्त अधिक आसक्त होत आहे. यामुळें मला तुझ्या भाषणाची मुळींच पर्वा वाटत नाहीं. मी तुझा आदर करतों, परंतु तूं मात्र वारंवार माझा अनादर करीत आहेस. तुला ठार मारून टाकावें, असें जरी तुझें भाषण आहे, तरी तसें करावें असें मला वाटत नाहीं. '

रावणाचें हें भाषण ऐकिल्याबरोबर सीतेनें त्याच्या त्या स्त्रियां समक्ष त्यांची आणखी पुष्कळ निर्भर्त्सना केली. रावण पुनः तिला रागानें म्हणाला ' पहा, सीते, मीं तुला एक वर्षाची अवधि दिली होती, तींत आतां फक्त दोनच महिने कमी आहेत. या दोन महिन्यांनंतर जर तूं माझी इच्छा पूर्ण करणार नाहींस, तर माझे आचारी तुझ्या शरिराचे तुकडे तुकडे करून त्याचा पाक करून मला वाढतील. '

जानकी फार धीट झाली होती. ती रावणाच्या या भयानक धमकीला आतां मुळींच भ्याली नाहीं, किंवा तिचें मन चंचलहि झालें नाहीं. ती उलट त्याला अधिकच निर्भर्त्सनेनें आणि निर्भयपणें बोलूं लागली. या वेळीं तिनें त्याची इतकी फजिती उडविली कीं, ती ऐकून तेथें क्षणभर सुद्धां थांबणें व तें ऐकणें त्याला असह्य

झालें. त्यानें लगेच रागानें उन्मत्त होऊन म्यानांतून आपली तरवार बाहेर काढली; आणि लगेच तो तिच्यावर धांवला. तो दुष्ट, कामांध रावण आतां इतक्यांत सीतेवर प्रहार करणार, तोंच त्याच्या एका स्त्रीनें त्याचा हात धरला. त्या स्त्रीचें नांव धान्यमालिनी होतें. तिनें आपल्या मधुर अ णि प्रभावशालिनी वाणीनें त्याला त्या वेळीं स्त्रीहत्येसारख्या घोर पापकर्मापासून वांचविलें. धान्यमालिनीनें या वेळीं मोठें साहसाचें आ णि धर्माचें कार्य केलें. ज्या स्त्रिया आपल्या पतीला आपल्या विद्येनें, बुद्धीनें व युक्तीनें अधर्मापासून परावृत्त करून सन्मार्गाकडे वळविण्याचा प्रयत्न करतात, त्याच स्त्रिया खरोखर धन्य होत.

धान्यमालिनीच्या सांगण्यावरून सीतेला ठार मारण्याचा आपला निश्चय रावणानें सोडून दिला. लगेच त्यानें आपली तरवार परत म्यानांत घातली. त्या वेळेस रावणाला इतका राग आला होता कीं, जर तेथें धान्यमालिनी नसती, तर त्यानें त्या आवेशांत तत्क्षणींच सीतेचें शिर धडापासून वेगळें केलें असतें. धान्यमालिनी आणि इतर स्त्रियांनीं मिळून रावणाला ताबडतोब तेथून दूर नेलें. रावण तेथून निघून गेल्यावरही सीतेच्या मनाला शांतता मिळाली नाहीं. तो गेल्यावर तिच्यावर पहारा करण्याकरितां ठेविलेल्या राक्षसस्त्रिया तिला पुनः त्रास देऊं लागल्या. त्यांनीं तिला पुनः लालूच व भय वगैरे पुष्कळ दाखविण्याचे अनेक प्रकार केले; पण स्वधर्मतत्पर सीतेनें त्याचेंहि म्हणणें बिलकुल ऐकलें नाहीं. त्यांच्या समोरहि सीतेनें रावणाची खूप निंदा केली; व त्याच्या संबंधानें पूर्ण तिरस्कार दर्शविला. सीता अ पल्या व्रताचें पालन करण्यांत खंबीर असल्यामुळें तिला भय वाटलें नव्हतें. ती त्या राक्षसींनाहि फार टाकून बोलली. त्यामुळें संतापून जाऊन त्यांपैकीं कांहीजणी रावणाकडे कागाळी

करण्याकरितां निघून गेल्या, आणि कांहींजणी तिच्या रक्षणाकरितां तेथेंच राहिल्या.

त्यानंतर सीतादेवी अत्यंत शोकाकुल होऊन रडूं लागली. ती त्या झाडाच्या एका पुष्पित शाखेला धरून उभी राहिली, आणि आपल्या मनाशीं आपल्या दुर्दैवाचें चिंतन करूं लागली. ती मोठ्या दुःखानें स्वतःशीं म्हणाली. ' हाय रे देवा, आतां माझ्या आयुष्यांतील फक्त दोनच महिने बाकी राहिले आहेत. दोन महिन्यानंतर हा मेला दुष्ट रावण मला खात्रीनें ठार मारील. हा पापी मला नाना तऱ्हेची भीति दाखवितो, नाहीं नाहीं तीं दर्भाषणें बोलतो. माझें जीवन आतां दिवसेंदिवस अत्यंत कष्टमय होत चाललें आहे. काय, आतांपर्यंत कौसल्यानंदनाला माझा शोध लागला नसावा ! बरें, शोध लागून त्यांनीं मला आपल्या हृदयराज्यांतून काढून तर दिलें नसेल ना ! आतां सुटकेची मला मुळींच आशा करायला नको. मी महाबली पुरुषाची धर्मपत्नी असून इतके क्लेश सोसावे ना ! इतके हाल सोसून मी फक्त स्वामींच्या दर्शनाच्याच इच्छेनें, आणि आशेनेंच या वेळपर्यंत जिवंत राहिलें आहें. पण तीहि आशा आतां दूर राहिली; मला वाटतें माझें मरण जवळ आलें आहे, तेव्हां आतां जगण्यांत तरी काय अर्थ आहे. मला प्राणाधार मिळण्याचीच जर आशा नाहीं, तर जगून लाभ कोणता ? अमूल्य सतित्वरत्न नष्ट होण्यापेक्षां मृत्यूच शंभरपटीनें जास्त चांगला. या राक्षसाच्या हातून मरण्यापेक्षां आत्महत्त्या करून मरणें चांगलें आहें. जरी आत्महत्त्या करून मरणें हें पाप आहे, तरी सतीत्व नष्ट होण्यापेक्षां तेंच जास्त श्रेयस्कर होय. एवढ्याचकरितां मी आत्महत्त्या करीन. त्याचें मला मुळींच दुःख वाटत नाहीं. मृत्यूच्या वेळीं देखील माझ्या स्वामींच्या चरणयुगलाचें मला दर्शन होत नाहीं, एवढेंच मला अत्यंत दुःख वाटत आहे. हर हर ! नाथ, आपण कोठें आहांत.

या वेळीं आपली प्राणप्रिया या जगाला सोडून परलोकीं जात आहे. हे विधात्या, मीं इतकें काय पाप केलें कीं, त्यामुळें मरणसमयीं देखील मला माझ्या स्वामींचें दर्शन घडत नाहीं. हाय, माझ्यासारखी जगांत कोणीही हतभागिनी नसेल. माझें दैव खरोखर फार वाईट, फार खोटें आहे.'

सीता याप्रमाणें आपल्याशीं रुदन करीत आत्महत्त्येचा विचार करूं लागली. तिनें आपल्या मनाशीं बराच विचार केला, पण आत्महत्त्या करण्यास सोपें साधन तिला जवळपास कोठें सांपडेना, चहूंकडे पाहून तिला मृत्यू आणण्याचें कांहींच साधन जेव्हां सांपडेना तेव्हां ती निराश होऊन ह्मणाली, 'कोण मी अभागिनी, आत्महत्त्येकरितां येथें मला एक लहानसा दोरीचा तुकडा देखील सांपडत नाहीं.' परंतु किंचित् वेळानें कांहीं आठवलेंसें होऊन तिचें मन प्रसन्न झालें. ती स्वतःशीं ह्मणाली, 'मला जरी दोरीचा तुकडा मिळाला नाहीं, तरी हरकत नाहीं. ही माझ्या पाठीवर पडणारी वेणीच माझें काम करील. मीं पतिव्रताधर्माच्या रक्षणाकरितांच जर ही वेणी घातली आहे, तर त्याच वेणीच्या द्वारानें मी आपले प्राण विसर्जन करून स्वधर्माचें रक्षण करीन.' असा विचार करून सीतादेवी त्या शिशमाच्या एका शाखेला धरून, व शोकानें विव्हल होऊन रामचंद्र, लक्ष्मण आणि इतर आप्तजन यांचें चिंतन करीत, आणि आत्महत्त्या करण्याच्या योग्य संधीची वाट पहात बसली.

ज्या शिशवाच्या वृक्षाची शाखा धरून सीता आत्महत्त्येच्या संधीची वाट पहात होती, त्याच वृक्षावर महावीर हनुमान बसला होता. तेथें लपून बसल्या बसल्याच रावणाचें आगमन, त्याचें भाषण, सीतेचा विलाप, तिचा आत्महत्त्या करण्याचा निश्चय, वगैरे सर्व गोष्टी त्यानें आपल्या दृष्टीनें पाहिल्या. आत्महत्त्या करण्याकडेच सीतेची प्रवृत्ति पाहून त्याला फार चिंता वाटूं लागली. तो मनांत

ह्मणाला, "जर सीतादेवी आपले प्राण विसर्जन करील, तर मी इतक्या दूर समुद्र ओलांडून आल्याचें व्यर्थच होईल. आतां हिला लवकरच सर्व वृत्त कळविलें पाहिजे." असें तो मनाशीं विचार करीत आहे तोंच पुन: 'ही मला रावणाचा दूत समजून माझ्याशीं बोललीच नाहीं, तर कसें होईल?' ही शंका लगेच त्याच्या मनांत उत्पन्न झाली. पुन: कांहीं वेळ विचार करून हनुमानानें सीतेशीं संस्कृतांत बोलण्याचा निश्चय केला. नंतर हनुमान सीतेच्या जवळच्या फांदीवर खालीं उतरून आला, आणि सीतेला रामचंद्राची व तिची सर्व जुनी हकीकत त्यानें सांगितली. त्यांत रावणानें जेव्हां सीतेचें हरण केलें, तेव्हां ते सीतेला शोधीत फिरत होते हेंहि सांगितलें. याप्रमाणें शोधतां शोधतां सुग्रीवाबरोबर त्यांची मैत्री झाली. 'त्यांनीं एकाच बाणानें वालीचा वध करून किष्किंधेचें राज्य सुग्रीवाला दिलें. त्यांच्या व सुग्रीवाच्या आज्ञेनें मी येथें आपल्या शोधाकरितां आलों आहें, आणि आपणाला लंकेंत जिवंत पहात आहें, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.'

आत्महत्या करण्यास तयार झालेली सीता एकाएकीं रामचंद्राचें नांव ऐकून चकित झाली. तिनें वर मान करून पाहिलें तों समोरच्या शाखेवर हनुमान बसला आहे. त्याला पाहतांच ती आश्चर्यचकित झाली; 'हा कोणी दुष्ट रावणाचा दुसरा दूत तर नसेल ना! अशीहि शंका तिच्या मनांत उत्पन्न झाली. ही शंका येतांच तिला भीति वाटली. जेव्हां हनुमानानें तिची शंकित आणि भयचकित मुद्रा पाहिली, तेव्हां रावणाच्या भीतीनें सीता आपल्याकडे पहात नाहीं, असें त्यानें तात्काळ जाणलें. तो लगेच फांदीवरून उतरून खालीं आला, आणि त्यानें हात जोडून तिला प्रणाम केला. नंतर तो मोठ्या नम्रपणानें तिला म्हणाला, 'मातुश्री, माझ्याविषयीं आपण कांहीं शंका घेऊं नका. मी राजा सुग्रीव आणि

रामचंद्र यांचा दूत आहें, आणि त्यांच्याच आज्ञेनें आपल्या शोधाकरितां येथें आलों आहें.'

याप्रमाणें सीतेच्या मनांत विश्वास उत्पन्न करण्याकरितां सीताहरणापासून आपल्या समुद्रोल्लंघनापर्यंतचा वृत्तांत क्रमवर हनुमानानें सीतेला सांगितला; हेंच नाहीं, परंतु त्यानें रामचंद्राच्या आणि लक्ष्मणाच्या शारीरिक वर्णाचें वगैरे वर्णन करून आणखी दुसऱ्या खुणाही सांगितल्या. इतकें जेव्हां त्यानें सर्व सांगितलें. तेव्हां कुठें सीतेला त्याचा विश्वास वाटला. रामचंद्र आणि लक्ष्मण यांचा कुशल–समाचार ऐकून सीतेच्या मनाला, जो आनंद झाला त्याचें आह्मी वर्णन करूं शकत नाहीं. प्रत्येक स्त्री–पुरुषाला आपल्या स्वतःच्या अनुभवावरून त्याचें अनुमान सहज करतां येईल आपल्या प्रिय माणसाचा कुशलसमाचार कळल्यावर किती अत्यानंद होतो, हें शब्दांनीं सांगतां येत नाहीं.

त्यानंतर सीतादेवीनें रामचंद्र व लक्ष्मण यांच्या संबंधाच्या बऱ्याच गोष्टी हनुमानाला विचारिल्या. क्षेमकुशल विचारिल्यावर तिनें आपली क्लेशपूर्ण आणि हृदयविदारक कहाणी सांगितली. ती ह्मणाली ' माझ्या स्वामींनीं इतक्या दिवसपर्यंत माझी आठवण कां केली नाहीं? आतां माझ्या मृत्यूला दोनच महिने बाकी आहेत. या दोन महिन्यांच्या आंत जर मी त्यांच्याजवळ पोहोचलें नाहीं, तर ही मुदत संपतांच माझा प्राण नाश होईल.' हें बोलत असतां, तिच्या नेत्रांतून अश्रूंची झड लागली. तिला अत्यंत कष्टी पाहून हनुमानानें तिची समजूत केली, आणि सांगितलें कीं ' सुग्रीवाच्या सहाय्यानें श्रीरामचंद्र युद्धाची तयारी करीत आहेत. आपला शोध लागतांच ते येथें येऊन आणि दुष्ट रावणाला मारून आपल्याला घेऊन जातील. आपण धीर सोडूं नका, असें म्हणून रामचंद्रांनीं खूण पटण्याकरितां जी, त्याला अंगठी दिली होती, ती त्यानें सीतेच्या

हातांत टाकिली. ‘ आपल्याला विश्वास वाटावा म्हणून त्यांनीं ही आंगठी दिली आहे.’ असें तो म्हणाला. अंगठीवर ‘ राम ’ हीं अक्षरें खोदलीं होतीं. ती अंगठी ओळखतांच सीतेला अत्यंत हर्ष होऊन ती तिच्याकडेच एकसारखी पाहत राहून दुःख करूं लागली.

सीतेला अत्यंत दुःखी पाहून हनुमानानें तिला आपल्या पाठीवर बसवून लंकेंतून रामाजवळ घेऊन जाण्याची इच्छा दर्शविली. पण हा त्याचा विचार तिला आवडला नाहीं. त्याचीं कारणें अनेक होतीं. पहिलें कारण, ती फार भीरु स्वभावाची होती. पाठीवरून निसटून समुद्रांत पडलें तर कसें होइल. दुसरें कारण, राक्षसांनीं त्याला घेऊन जातांना पाहिलें म्हणजे ते हनमानाबरोबर युद्धाला येतील, मग त्यानें त्यांच्याशीं युद्ध करावें किंवा तिचें रक्षण करावें. त्या युद्धांत जर राक्षसांना जय आला तर अधिकच अनर्थ हाणार. तिसरें कारण, सीता मोठी पतिव्रता स्त्री होती. ती परपुरुषाचा स्पर्श होणें अगदीं अनुचित समजत असे. येथें कोणी शंका घेतील कीं रावणानें जेव्हां तिला हरण करून नेलें, तेव्हां तर तिला परपुरुषस्पर्श झालाच होता कीं नाहीं? त्याचें ‘ सीता त्या वेळीं परस्वाधीन होती.’ हेंच उत्तर आहे पण तो प्रकार येथें नाहीं. आपत्कालीं सर्व धर्म शिथिल असतात. चौथें कारण हें होतें कीं, हनुमान जर सीतेला घेऊन गेला असता, तर रावणाला त्याच्या दुष्कृत्याबद्दल कांहींच शिक्षा मिळाली नसती. रामचंद्राची सुवीरता जगाला दिसली नसती. नेहमीं लोक म्हणाले असते कीं याला आपल्या स्त्रीला देखील सोडवितां आलें नाहीं. याचा हा भित्रेपणाच होय.’ याप्रमाणें सीतेनें आपल्या असंमतीचीं कारणें दाखविलीं. हीं ऐकून हनुमानाला तिच्या धार्मिक शुद्धतेबद्दल, आणि दूरदर्शीपणाबद्दल आनंद वाटला. त्यानें त्याबद्दल तिची प्रशंसा केली. तो

मनांत म्हणाला, ' सीते, तूं धन्य आहेस. खरोखरच तूं रामचंद्राची धर्मपत्नी होण्यायोग्य आहेस.'

नंतर सीता देवीची पुष्कळ समजूत घातल्यावर हनुमानानें रामचंद्राकडे परत जाण्याबद्दल तिची आज्ञा मागितली. 'रामचंद्रालाहि विश्वास पटण्याकरितां कांहीं खूण द्या' असें त्यानें सीतादेवीला म्हटलें. तें ऐकून मोठ्या प्रसन्नतेनें तिनें आपल्या गळ्यांतील चूडामणी काढून त्याच्या हातीं दिला ' हा पाहून त्यांना माझी, माझ्या पित्याची, आणि राजा दशरथाची आठवण होइल.' असें तिनें सांगितलें. तो चुडामणी घेऊन आणि सीतेला नमस्कार करून हनुमानानें तिचा निरोप घेतला.

चुडामणि घेऊन परत जात असतां हनुमानानें मनाशीं विचार केला कीं, सीतेचा शोध लागून तिची प्रत्यक्ष भेट झाली, पण रावणाच्या शक्तीबद्दल कांहींच तर्क करतां येत नाहीं. कोणत्या उपायानें त्याच्या बलाची परीक्षा करतां येईल बरें! असा किंचित् वेळ विचार करून त्याच्या मनांत एक युक्ति आली; आणि लगेच त्यानें रावणाच्या या पुष्पवाटिकेची नासधूस करण्यास प्रारंभ केला. तों त्या बागेवरील रक्षक लोक तिच्या रक्षणाकरितां हनुमानाच्या अंगावर धांवून आले. त्या सर्वांचा त्यानें खूप समाचार घेतला. त्यांचा त्यानें पूर्ण:पराभव करून टाकला. त्या लोकांनीं धांवतच रावकडे जाऊन हनुमानाच्या कृतीची व आपल्या पराभवाची हकीकत त्यास सांगितली. ती ऐकून घेऊन रावणानें हनुमानाला पकडून आणण्याकरितां आणखी राक्षस पाठविले. परंतु त्यांनाहि त्यानें ठार मारून टाकिलें. नंतर रावणानें तें वर्तमान ऐकून आपला मुलगा अक्ष याला आणखीं सैन्य देऊन त्यावर पाठविलें. कुमार अक्ष सेनेसहित हनुमानाजवळ पोहोंचतांच हनुमानालाहि आणखी स्फुरण चढलें. तो निर्भयपणें गर्जना करून त्यांच्यावर चालून गेला.

बराच वेळ पर्यंत त्या दोघांचें घोर युद्ध झालें. हनुमानानें त्याच्या सर्व सैन्याचा नाश करून शेवटीं आक्षालाहि तेथें रणक्षेत्रावर कायमची वस्ती करावयास लाविलें. अक्षाच्या सेनेचा आणि त्याच्या मृत्यूचा वृत्तांत ऐकून रावणाला अत्यंत दुःख झालें. तो रागानें संतप्त होऊन त्यानें आपले डोळे लाल केले. नंतर त्यानें आपला ज्येष्ठपुत्र मेघनाद याला हनुमानाला पकडून आगण्याकरितां पाठविलें. मेघनाद मोठा बलवान होता. पित्याची आज्ञा होतांच तो सशस्त्र होऊन हनुमानाला पकडून आणण्याकरितां चालला. त्याची आणि हनुमानाची गांठ पडून आणि कांहीं वेळ लढाई होऊन मेघनादानें त्याला ब्रह्मपाशांनीं बांधिलें. जरी हनुमान त्या पाशांतून मुक्त होऊं शकला असता, तरी त्याच्या मनांतून रावणाचा दरबार पहावयाचें असल्यानें, त्यानें त्यांतून सुटून जाण्याचा उद्योग केला नाहीं. तो त्याच्यांत अडकून राहिला. नंतर महाबली मेघनाद त्याला घेऊन रावणाकडे चालला. रस्त्यानें रक्षक राक्षसांनीं तो आतां पूर्णपणें आपल्या ताब्यांत सांपडला असें पाहून त्याला खूप त्रास दिला; परंतु स्वामीकार्याकडेच केवळ नजर देऊन त्यानें त्या लोकांचा त्रास, मार आणि त्यांनीं केलेला अपमान मोठ्या आनंदानें सहन केला.

मेघनादानें हनुमानाला बांधून रावणाच्या दरबारांत आणल्यावर रावणानें त्याच्याकडे पाहून त्याला ठार मारून टाकण्याची रक्षकांस आज्ञा केली. परंतु त्याचा धाकटा भाऊ बिभीषण यानें त्याची समजूत घातल्यावर त्यानें तो बेत रहित केला. त्याचें आणि रावणाचें दरबारांत नंतर बरेंच वाग्युद्ध झालें. त्यांत हनुमानानें तेथील बरीच महिती काढून घेतली. शत्रूच्या सर्व भेदांची माहिती काढून घेऊन आणि जातां जातां लंकेची होळी करून आणि आपला पराक्रम तेथील लोकांस दाखवून हनुमान पुनः एकदां सीतेचें दर्शन घेण्याकरितां आणि तिला सर्व हकीकत सांगण्याकरितां अशोक वनांत गेला नंतर पुनः

एकवार तिचें दर्शन आणि निरोप घेऊन त्यानें तेथून प्रस्थान केलें.

समुद्राच्या उत्तर तीरावर वाट पहात बसलेल्या अंगद वगैरे वीरांनीं त्याची गर्जना लांबून ऐकिली. त्याचा आवाज ऐकतांच सर्व जण आनंदानें हात हालवूं लागले, इतक्यांत हनुमानहि त्यांच्याजवळ येऊन पोहोंचला.

नंतर हनुमानाच्या मुखानें सीतेच्या शोधाची वगैरे हकिकत ऐकून त्या सर्वांना अत्यंत आनंद झाला तेथून ते सर्वजण त्याला पुढें करून रामचंद्राजवळ गेले. तेथें पोहोंचल्यावर सीतेच्या शोधाचा, समुद्रयात्रेचा आणि लंकेंत घडलेल्या प्रकाराचा सर्व वृत्तांत त्यानें रामचंद्राला सांगितला.

हनुमानाच्या तोंडून सीतेची दीन दशा, तिची पतिपरायणता, तिचा आत्महत्येचा उद्योग, त्याचप्रमाणें रावणाची दुष्टता वगैरे हकीकत ऐकून त्यांना फार वाईट वाटलें. सीतेनें दिलेला चूडामणि ओळखून रामचंद्राच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

सीतेचा शोध आणि समाचार कळण्याचाच काय तो अवकाश होता. रामचंद्रांनीं लागलेच लंकेवर स्वारी करण्याची सुग्रिवाला आज्ञा केली. बोलतां बोलतां युद्धाची तयारी झाली. किष्किंधेच्या सुग्रीव राजानें आपल्या सर्व सेनेला लंकेवर चढाई करून जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सर्व सेनापति आपापलीं सैन्यें घेऊन दक्षिण दिशेकडे चालले.

जेव्हां रामचंद्र सैन्यासह समुद्रावर जाऊन पोहोंचले, तेव्हां त्यांना समुद्र ओलांडून पार कसें जावें याबद्दल चिंता वाटूं लागली. ते मग त्याबद्दल उपाय योजूं लागले.

तिकडे रावणाला जेव्हां रामचंद्राचें सैन्य येत आहे म्हणून बातमी लागली, तेव्हां तो ही आपल्या ठिकाणीं घाबरून गेला. त्यानें आपल्या सर्व मंत्र्यांना बोलावून आणून आतां काय करावें म्हणून

त्याची सल्लामसलत विचारिली. राजाच्या होला हो म्हणणारे कांहीं कमी नसतात. त्याप्रमाणें रावणाच्या दरबारींहि त्याची कांहीं कमतरता नव्हती. एका बिभीषणाखेरीज सर्वांनीं रावणाच्या होला हो ठेवून दिली.

धर्मात्मा मनुष्य केंव्हांच स्वस्थ बसत नाहीं. असत्य आणि अधर्म त्याला मुळींच पाहवत नाहींत. भर सभेंत बिभीषण रावणाला म्हणाला, ' बंधो, आपण रामचंद्राबरोबर युद्ध करूं नका. त्यांच्याशीं द्वेष केल्यानें आपलें कल्याण होणार नाहीं. जर आपण स्वतःचें आणि राज्याचें कुशल इच्छित असाल, तर माझें म्हणणें ऐका. पतिव्रता सीतादेवीला त्यांच्याकडे परत पाठवून देऊन आपल्या अपराधाबद्दल क्षमा मागा. मला खास आशा आहे कीं, आपण असें केल्यावर दयालु रामचंद्र आपल्याला खात्रीनें क्षमा दान करतील. '

' विनाशकाले विपरीत बुद्धि: ' या नियमाप्रमाणें रावण कालाच्या स्वाधीन होता. याच कारणामुळें त्यानें आपल्या धाकट्या बंधूचा अमृतमय उपदेश ऐकिला न ऐकिलासा केला. इतकेंच करून तो थाबला नाहीं. त्यानें भरदरबारांत बिभीषणाला लाथ मारून तेथून काढून दिलें. बिभीषणालाहि तो अपमान सहन न होऊन, तो लागलींच लंका नगरी सोडून उत्तर तीराला रामचंद्राजवळ येऊन पोहोंचला. रामचंद्रानीं बिभीषणाचा शुद्धभाव पाहून त्याज बरोबर मित्रत्व केलें. त्याच्यापासून रामचंद्राला लंकेंतील पुष्कळ गुप्त गोष्टी व भेद कळला.

शेवटीं मोठ्या प्रयत्नानें नल वगैरे मंडळी यांनीं समुद्रावर पूल बांधिला; आणि त्यावरून सर्व सेनासमुद्र पार होऊन पलीकडे गेली. समुद्राच्य पारच लंकेची सीमा होती. रामचंद्राच्या सैन्यानें तेथें पोहोंचतांच एकदम सर्व दरवाजे रोकून धरिले.

सहावें कांड.

रावणवध, सीतेची परीक्षा, भरतभेट, आणि रामराज्याभिषेक.

रामचंद्र आणि रावण यांच्या सैन्याचें युद्ध सुरू होण्यापूर्वीं सीतेविषयीं एक दोन गोष्टी प्रथम सांगणें अवश्य समजून त्यांकडे आम्ही आधीं वळतों.

रावणानें सीतेला लंकेंत आणून ठेवल्यापासून तों हनुमानाची भेट होईपर्यंत जितक्या गोष्टी सीतादेवीसंबंधानें लिहिल्या, त्या वाचून खात्रीनें आमचे वाचकवाचिका फार दुःखित झाल्या असतील. परंतु आतां सीतादेवीसंबंधानें एक दोन गोष्टी सांगितल्या म्हणजे तें त्यांचें दुःख अगदीं जरी नाहीसें झालें नाहीं, तरी किंचित् तरी कमी होईल असें वाटतें.

सर्व मनुष्यांचा स्वभाव एकसारखाच असत नाहीं, किंवा असूं नये, असा ईश्वरी नियमच आहे. या नियमाप्रमाणें मनुष्यें क्रूरहि नसतात, तशींच दयाळुहि नसतात. लंकेंतहि तशीच स्थिति होती. तेथील सर्वजण क्रूर अथवा पापी नव्हते. तेथेंहि कांहींजण धर्मात्मे, दयाळु, आणि सज्जन होते. जरी असंख्य नरा धमांपुढें दोन चार सज्जन धर्मात्म्यांची कांहींच गणती नाहीं, हें खरें आहे, तथापि लंका नगरी या गोष्टीसंबंधानें अगदीं शून्य होती असें नाहीं. तेथेंहि कांहीं धर्मात्म्ये आणि न्यायशील लोक होते.

सीता लंकेंतील अशोक वाटिकेंत असतां जरी पापी रावणाकडून तिला अनंत क्लेश व त्रास होत होता, तरी लंकेंतील कांहीं सज्जन स्त्री-पुरुष मंडळींकडून तिला वेळोवेळीं सहाय्यहि मिळत

होतें. अशा स्त्रीजनांपैकीं त्रिजटा आणि सरमा या दोन स्त्रिया होत्या.

सीता आपल्या पतिवियोगाच्या दुःखानें जेव्हां अगदीं व्याकुळ होऊन रडत बसत असे, तेव्हां या दोघीजणीं तिची समजूत करून तिला पुष्कळ धैर्य देत असत. सीतादेवीच्या पावन चरित्राचा त्यांच्या मनावर इतका परिणाम झाला होता कीं, त्या आंतून सीतादेवीच्या निस्सीम उपासक बनल्या होत्या. रावणाच्या भीतीनें आणि आज्ञेनें त्या जरी तिला सर्वांच्या देखत वारंवार वरून धमकी देत असत, तरी एकांत मिळतांच त्या सीतेजवळ आपल्या अपराधाची क्षमा मागत असत. या दोघींची रावणाकडून तिच्या रक्षणार्थ योजना झाली होती. रावणाच्या गुप्त गोष्टी सरमा सीतेला सांगत असे.

ज्या ज्या वेळेस रावण सभेंत बसून सीतेविषयीं चर्चा करीत असे, त्या त्या वेळेस त्याचा धाकटा बंधु बिभीषण सीतेची कड घेऊन त्याचा निषेध करीत असे. आणि याच कारणामुळें बिभीषणाला लंका सोडावी लागली.

बिभीषणाची कन्या कला ही सुद्धां मधून मधून सीतेचें समाधान करून तिला धैर्य देत असे. रावणाचा एक मामा होता. त्याचें नांव माल्यवान होतें. तोही तेथेंच रहात होता. 'रामचंद्राशीं लढाई करणें बरें नाहीं, सीता त्यांना परत नेऊन द्या,' असें त्यानेंहि अनेक वेळां रावणाला समजावेलें. परंतु त्याचें तें सांगणेंहि व्यर्थ झालें.

रामचंद्राचें सैन्य येऊन त्यानें लंकेला वेढा दिल्याचें वर्तमान ऐकून रावणाची मुख्य स्त्री मंदोदरी हिनेंहि त्याची पुष्कळ समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ती आपल्या पतीला म्हणाली ' आपण रामचंद्राबरोबर युद्ध करण्याच्या भानगडींत पडूं नका. सीता त्यांच्या स्वाधीन करून त्यांच्याशीं तह करा. '

'विनाशकाले विपरीतबुद्धिः' या नियमानुसार आसन्नमृत्यु रावणानें कोणाचेंहि म्हणणें मान्य केलें नाहीं. रामचंद्राच्या महाबलासंबंधाची हकीकत ऐकून जरी त्यांच्या मनांत संदेह उत्पन्न झाला होता, तरी कुमंत्र्यांनीं प्रोत्साहित केल्या कारणानें रामचंद्राबरोबर तो युद्धच करण्याची तयारी करूं लागला.

रावण महाबली असूनहि युद्ध केल्याशिवाय सीतादेवीनें आपल्या आधीन व्हावें म्हणून इच्छित होता. त्यानें मनाशीं विचार केला कीं, कोणत्यातरी रीतीनें सीतेच्या मरणाची बातमी रामचंद्राला खरी वाटावी असें कांहीं मायावी कृत्य केलें म्हणजे, आपल्या प्राणप्रियेची तशी स्थिति झालेली पाहून अथवा ऐकून ते स्वतःच प्राणत्याग करतील, किंवा देशत्याग तरी करतील, किंवा सीतेलाच रामचंद्र मृत्यु पावल्याचें भासवावें, म्हणजे ती आतां रामचंद्र नाहींत असें समजून आपला स्वीकार करील. कारण अशी कांहीं कपटकृति किंवा युक्ति केल्याशिवाय कितीहि मोठी आशा, अथवा लालूच दाखवूनहि सीतादेवी आपल्या धर्मापासून भ्रष्ट होणार नाहीं, अशी रावणाची इतक्या दिवसांच्या अनुभवानें तिच्यासंबंधानें पूर्ण खात्री होऊन चुकली होती; ह्मणून त्यानें शेवटीं मायाजाल पसरण्याचा निश्चय केला.

रावणाजवळ एक विद्युज्जिव्ह म्हणून मोठा राक्षस होता. तो मायावी असून आपल्या त्या कामांत निपुण होता. रामचंद्राच्या शिराप्रमाणें एक हुबेहुब शीर तयार करून अणण्यास रावणानें त्याला आज्ञा केली. तेथें काय उशीर! तो लगेच गुप्तपणानें जाऊन प्रथम रामचंद्राला नीट लक्षपूर्वक पाहून आला, आणि त्यानें त्यांच्या शिराप्रमाणें व चेहऱ्याप्रमाणें अगदीं हुबेहुब दुसरें खोटें शिर तयार करून आणून रावणापुढें ठेविलें. तें बनावट रक्तानें भरलेलें रामाचें शिर हातांत घेऊन तो धांवतच अशोक वनांत सीतेकडे

जाऊन व तें बनावट रामाचें शीर सीतेला दाखवून रावण तिला मोठ्या आव्यतेनें म्हणाला, ' जानकी, ज्याच्या चिंतनानें तूं आपली दुर्दशा करून घेतलीस, आणि ज्याच्या भेटीच्या आशेनें तूं माझ्या प्रार्थनेचा व विनवणीचा अव्हेर केलास, तो तुझा पति मीं आज ठार मारला आहे. पहा हें त्याचें शिर आहे ! काय, तूं अजूनहि माझ्या स्वाधीन होणार नाहींस ?

जरी तें रामचंद्राचें शिर बनावट होतें, आणि सीतेला जरी त्याच्यापासून कांहीं एक भीति नव्हती, त ी विद्युज्जिव्हाच्या क्रियाकुशलतेचें तें एक उत्कृष्ट प्रदर्शनच होतें. महाबुद्धिमान सीतासुद्धां तें खरेंच समजली. तें राक्षसी मायाजाळ पाहून तिला सुद्धां भ्रम उत्पन्न झाला. ती तें शिर पाहून तें आपल्या स्वामीचेंच आहे असें समजून हाःहाःकार करून रडूं लागली. ती त्याच्याकरितां हृदयविदारक विलाप करूं लागली. ती अत्यंत दुःखानें रावणाला म्हणाली, ' रावणा, तूं मला स्वामीच्या शरिराजवळ घेऊन जाऊन, तेथेंच ठार कर. अशा रीतीनें तरी आम्हां भर्ता व पत्नीला एकत्र होऊं दे. मी त्यांच्याबरोबर परलोकवासी जाईन. आतां मीं क्षणभरहि जिवंत राहूं शकत नाहीं.'

याप्रमाणें सीता शोकविव्हल होऊन बोलत असतां, रावणानें तिच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. ऐकिलें न ऐकिलेंसें करून तो आपल्या दरबारांत कांहीं कामाकरितां निघून गेला. तो निघून गेल्यावर इकडे सरमेनें येऊन सीतेला त्याची सर्व लबाडी सांगितली. ती ह्मणाली, ' सीते, हें सर्व मायाजाळ आहे. याच्यांत सत्त्याचा लेशही नाहीं. तुझा छळ करण्याकरितांच रावणानें हें सर्व केलें आहे. तूं कांहीं काळजी करूं नकोस. इतक्यांत रामचंद्राच्या सैन्याचा कोलाहल त्यांच्या कानीं आला. त्यानें सर्व लंकानगरी दुणाणून गेली. गलबला ऐकून ' ती मायावी राक्षसांची खरोखरच

माया होती, ' अशी सीतेचीहि खात्री झाली. सरमेनें तिला हीं गोष्ट सांगितल्याबद्दल सीतेनें तिची पुष्कळ प्रशंसा केली. ती तिला म्हणाली, ' भगिनी, या तुझ्या उपकाराबद्दल मी तुझी ऋणी आहें. पण या दुष्ट रावणाच्या कचाट्यांतून तुझ्या अहेतुक कृपेनें मी केव्हां सुटेन, आणि तुझ्या उपकाराची फेड मी केव्हां करीन, तो आनंदाचा दिवस केव्हां पाहीन, हें मला माहीत नाहीं. तें एक परमेश्वरच जाणे. '

त्यानंतर लवकरच रामचंद्राच्या आणि रावणाच्या सैन्यांत घनघोर युद्ध सुरू झालें. राजा सुग्रीवाचे महावीर सैनिक आपल्या जिवाची पर्वा न करितां युद्ध करूं लागले. त्यांनीं रावणाचे कित्येक वीर पाडाव केले. असंख्य वीर रणभूमीवर पडून वीर गतीला गेले. तेथील भूमि रक्तानें लाल होऊन गेली. रक्तमांसाचा नुसता तेथें चिखल झाला होता.

असें दोन्ही सैन्यांचें घनघोर युद्ध बरेच दिवस चाललें असतां, एके दिवशीं रावणाकडील वीर पुष्कळ मारले गेले. तेव्हां रावणाला वाईट वाटून त्यानें आपल्या पराक्रमी पुत्र इंद्रजितास आणखी सैन्य देऊन युद्धास पाठविलें. तो मोठा शूर होता. मेघाप्रमाणें गर्जना करीत तो रणभूमीवर आला, आणि त्यानें रामचंद्र व लक्ष्मण यांना युद्धाकरितां बोलाविलें. ते दोघेहि तयारच होते. लगेच ते आपली सेना घेऊन आले, आणि त्याच्याशीं निकरानें युद्ध करूं लागले. मेघनादानें मोठ्या शौर्यानें युद्ध केलें. जेव्हां तो फार वेळ युद्ध करून दमला, तेव्हां त्यानें राम-लक्ष्मणांवर नागपाश टाकून त्यांस बांधून टाकिलें, आणि नंतर तो त्यांस रावणाकडे घेऊन चालला. आपल्या पुत्राचा हा विजय ऐकून रावणाला अत्यानंद झाला. त्यानें भर सभेंत आपल्या पुत्राची पुष्कळ प्रशंसा केली. इंद्रजितानें उभयतां रामलक्ष्मणांला बांधून टाकिलें, अशी अमोल संधी रावण फुकट थोडीच


घालविणार होता. त्यानें लागलेंच सरमेला बोलावून आणून तिला आज्ञा केली कीं, सीतेला रथांत बसवून रणक्षेत्रांत घेऊन जा, आणि त्या दोघांना इंद्रजितानें नागपाशांनीं कसें बांधून टाकिलें आहे, तें दाखीव. नाईलाजामुळें सरमेनें तसेंच केलें. आपले स्वामी व दीर नागपाशांत अडकून पडलेले पाहून सीतेला अत्यंत दुःख झालें. ते दोघे मरणच पावले आहेत असें तिला वाटून तिच्या दुःखाला सीमा राहिली नाहीं. तिच्या आक्रोशानें आकाश भरून गेलें. सीतेचा विलाप ऐकून सरमेनें तिची समजूत घातली. व त्यांतील गुह्य तिला सांगितलें. ती सीतेला म्हणाली, 'बाई, हे दोघे मेले नाहींत हे मूर्छित झाले आहेत. आणखी थोड्या वेळानें ते सावध होतील. तूं काळजी करूं नकोस.' असें जेव्हां सरमेनें सीतेला सांगितलें तेव्हां ती जरा शांत झाली, आणि तिला धैर्य आलें. सरमा तिला नंतर अशोक वनांत घेऊन गेली-

थोड्या वेळानें मेघनादाची ती राक्षसी माया दूर झाली त्याबरोबर उभयतां रामलक्ष्मणहि त्यांतून मुक्त झाले. पण युद्ध थांबलें नाहीं. रामचंद्राच्या बलवान सेनेशीं युद्ध करतां करतां रावणाचे अनेक पराक्रमी वीर मारले गेले. त्यांत धूम्राक्ष, अकंपन, वज्रदंष्ट्र, कुंभकर्ण, प्रहस्त, महोदर, अतिकाय, कुंभ, निकुंभ, मकराक्ष, हे दहा मरुय होते. याशिवाय वीस वीर असे होते कीं, त्यांच्या भरंवशावर रावण फार फुगत असे. या सर्वांच्या मृत्यूमुळें लंकापुरी वीरशून्य होऊन गेली. आतां नांव घेण्यासारखे काय ते फक्त दोनच वीर राहिले होते. एक रावण स्वतः, आणि दुसरा त्याचा पुत्र मेघनाद. मेघनादहि मोठा मायावी होता. रावणानें ज्या प्रमाणें रामचंद्राचें बनावट शीर सीतेला दाखवून तिला भीति दाखविली, व बहकविण्याचा प्रयत्न केला, त्याचप्रमाणें मेघनादहि रामचंद्राला फसविण्याकारेतां आपली मायावी युक्ति योजूं लागला.

एका मायावी सीतेला रथांत बसवून तो तिला रणक्षेत्रांत घेऊन आला, आणि त्यानें तिला रामचंद्रासमोर आणून ती रडत असतां, एकदम तिचें शिर आपल्या खड्गानें धडापासून वेगळें केलें. त्या सीतेची ती दशा पाहून रामचंद्र, लक्ष्मण आणि इतर मंडळी विलाप करूं लागली. महामती बिभीषण त्या वेळीं तेथें होता. त्यानें तें राक्षसी मायेचें गूढ उकलून सांगतांच सर्वजण निःसंदेह झाले. यामुळें त्या दुष्ट मेघनादाचें तें कृत्य निष्फळ झालें.

नंतर मेघनाद पुनः त्या युद्धभूमीवर येऊन सिंहगर्जना करूं लागला. या खेपेला लक्ष्मणानें त्याच्यावर बाणांचा इतका वर्षाव केला कीं, त्यामुळें तो अगदीं विकल होऊन गेला. थोडक्याच वेळांत लक्ष्मणाशीं युद्ध करतां करतां मेघनादाला मूर्च्छा आली. तो रथांतून खालीं पडला. या वेळीं तो रणभूमिर असा निजला कीं, त्या महानिद्रेंतून तो पुनः उठलाच नाहीं.

लक्ष्मणाच्या हातून मेघनाद मृत्युपावल्याचें वर्तमान ऐकून रावण दुःखानें मूर्छित झाला. थोड्या वेळानें सावध होतांच तो दुःखानें आणि क्रोधानें लाल होऊन गेला. तो लगेच हातांत तरवार घेऊन अशोक वाटिकेकडे चालला. सर्व अनर्थाचें मूळ जी सीता; तिला जाऊन ठार करावें, असा त्याचा विचार होता. ज्या वेळेस हातांत तरवार घेऊन आणि क्रोधानें आपल्याशीं बडबडत रावण सीतेकडे जाण्यास निघाला, त्या वेळेस त्याच्या समोर जाण्याचें कोणाचेंहि सामर्थ्य नव्हतें. रावणाची त्या वेळची ती भयानक मुद्रा पाहून 'आपला काळ आतां जवळ आला,' असें सीतेला वाटलें. ती आपल्या एका आराध्य दैवत पतीच्या चरणारविंदाचें ध्यान करीत रावणाच्या तरवारीच्या प्रहाराची प्रत्येक क्षणोक्षणीं वाट पहात बसली. दुरात्मा रावण सीतेवर प्रहार करणार इतक्यांत त्याच्या स्त्रियांनीं धांवत जाऊन त्याचा हात धरला; आणि '



रावण प्रयाण.

लक्ष्मी आर्ट, भायखळा, मुंबई.

वीर पुरुष अबलेवर शस्त्र धरीत नाहींत,' असें सांगून त्यांनीं स्त्री-हत्त्यारूपी घोर पापापासून त्याला परावृत्त केलें. रावण मोठ्या दुःखानें घरीं परत आला; परंतु तो घरीं येऊन स्वस्थ बसलानाहीं. मेघनादाच्या मरणानें त्याला फार क्लेश झाले होते त्याला त्याचाच मोठा भरंवसा होता. त्याच्या मृत्यूमुळें रावणाच्या जयाशेवर पाणी फिरलें, तरी हताश होऊन तो स्तब्ध राहिला नाहीं. आतां तो स्वतःच युद्धाला निघाला. रणभूमीवर येऊन त्यानें रामचंद्राबरोबर घनघोर युद्ध केलें. थोडा वेळ युद्ध केल्यावर लक्ष्मण दृष्टीस पडतांच-त्यानें त्याच्यावर एक भयंकर शक्ति टाकिली. ती शक्ति लक्ष्मणाला मर्मस्थानीं लागून तो रणभूमीवर मूर्च्छित होऊन पडला. आपला प्राणप्रिय भ्राता लक्ष्मण त्या शक्तीनें मेला असें समजून रामचंद्र मोठ्यानें विलाप करूं लागले. त्यांच्याबरोबर सुग्रीव वगैरे वीरहि शोक करूं लागले. रामचंद्राच्या सैन्यांत हाः हाः कार होऊन त्यावर दुःखाची छाया दाट पसरली गेली. वीर लक्ष्मणपडतांच रामचंद्राची विजयपताका खालीं पडण्याच्या बेतांत आली. त्या-वेळेस त्यांनीं जो हृदयविदारक विलाप केला तो ऐकून कोणालाहि रडूं आल्याशिवाय राहणार नाहीं. वाल्मिकी रामायणांतून तें सर्व प्रकरण काढून येथें द्यावें, कीं, ज्याच्या वरून रामचंद्रांनीं त्या वेळीं किती कारुणिक आक्रंदन केलें, त्याची बरोबर कल्पना वाचकांस यावी; परंतु तसें करून आमच्या प्रिय वाचक बंधुभगिनींचीं कोमल अंतःकरणें शोकानें विव्हल करून टाकावींत, अशी आमची इच्छा नाहीं. त्या वेळच्या रामचंद्राच्या विलापप्रकरणांपैकीं फक्त दोन चार श्लोकच आम्हीं खालीं देत आहोंत. ते दुःखानें ह्मणाले—

'अयं स समरश्लाघी भ्रातर्मे शुभलक्षणः ।
यदि पंचत्वमापन्नः प्राणैर्मे किं सुखेन वा ॥
किं मे युद्धेन किं प्राणैर्युद्धकार्यं न विद्यते ।

यत्रायं निहतः शेते रणमूर्धनि लक्ष्मणः ॥
यथैव मां वनं यान्तमनुयाति महाद्युतिः ।
अहमप्यानुया स्यामि तथैवैनं यमक्षयम् ॥
देशे देशे कलत्राणि देशे देशे च बांधवाः ।
तन्तु देशं न पश्यामि यत्र भ्राता सहोदरः॥
एकाकी किं नु मां त्यक्त्वा परलोकाय गच्छसि ।
विलपंतं च मां भ्रातः किमर्थं नावभाषसे ॥
(वा. रा. कां. ६ सर्ग १०१)

अर्थः—'जेव्हां हा युद्धविशारद माझा भाऊ लक्ष्मणच परलोकाला गेला, तेव्हां मी जगून तरी अर्थ काय? मग मला कसल्याही सुखाची काय जरूर आहे? ज्या अर्थी हा वीर लक्ष्मणच मृत होऊन जमिनीवर पडला आहे, त्या अर्थी युद्ध करून तरी काय होणार? मग मी जिवंत राहून काय करणार! बस्स, आतां युद्धाचें काम संपलें. हा लक्ष्मण जसा वनांत येतांना माझ्या मागोमाग आला, तसाच मीहि त्याचेंच आतां अनुकरण करून त्याच्या मागोमाग परलोकाला जाईन. जगांत मनुष्याला गांवोगांवीं स्त्रिया मिळतील, बांधवजन मिळतील, परंतु सहोदर भ्राता मिळणार नाहीं. हे बंधो, लक्ष्मणा, तूं मला येथें एकटा सोडून परलोकाला कां बाबा जात आहेस? या वेळीं तेवढें मला दुःख करतांना पाहून तूं बोलत कां नाहींस बरें!'

या रामचंद्रजीच्या भाषणावरून त्यांचें बंधुप्रेम किती होतें तें स्पष्ट दिसून येत आहे. हनुमानाच्या बुद्धीची प्रशंसा आमच्यानें करवत नाहीं. इतर सर्व मंडळी लक्ष्मणाच्या दुःखांत चूर होऊन गेली होती. परंतु महावीर हनुमान काय करीत होते, हें आपणांस माहीत आहे काय? तोहि इतरांप्रमाणेंच शोकसागरांत निमग्न झाला होता काय? नाहीं. दुःख तर त्याला झालेंच होतें. परंतु तो

इतरांपेक्षां जास्त धैर्यवान होता. त्या वेळेस त्यानें आपलें दुःख आंवरून जें महत्कार्य केलें, त्याचें वर्णन सहस्रमुखी शेषानें जरी केलें तरी तें कमीच होणार आहे. तें हें कीं, त्यानें लागलींच एक वैद्य सुषेण या नांवाचा बोलावून आणून त्याच्या सांगण्याप्रमाणें एका दूरच्या पर्वतावरील एक वनस्पती आणिली. ती लक्ष्मणाला लावतांच त्याची मूर्च्छा दूर झाली. नंतर तो सावध होऊन उठून बसला. त्याबरोबर रामचंद्राची सर्व काळजी दूर झाली. सुग्रीवाची सर्व सेना मोठ्या आनंदानें उड्या मारूं लागली, व गर्जना करूं लागली. रामचंद्राच्या सैन्याचा तो गोंगाट ऐकून रावण पुनः युद्धाला आला. या वेळेस त्यानें अशी प्रतिज्ञा केली कीं, एक पृथ्वी अराम तरी होईल, किंवा अरावण तरी होईल. दोहींपैकीं कोणची तरी एक गोष्ट घडेल. अशी भयंकर प्रतिज्ञा करून रावण रामचंद्राबरोबर लोमहर्षण युद्ध करूं लागला. तें रामरावणयुद्ध पाहण्याकरितां किती तरी देव आपापल्या विमानांत बसून आकाशांत उपस्थित झाले होते. जेव्हां रामचंद्राच्या पक्षाचा विजय होई तेव्हां ते आकाशांतून त्यांच्यावर पुष्पवृष्टि करीत होते.

याप्रमाणें दोघांचें फार वेळ युद्ध चाललें होतें. शेवटीं रामचंद्रांनीं क्रोधानें संतप्त होऊन रावणावर ब्रह्मास्त्र सोडलें. तें रावणाच्या हृदयावर येऊन आदळतांच त्याच्या शरिरांतून प्राणरूपी पक्षी तेंव्हांच उडून गेले. तो तत्काल मरून भूमीवर पडला. रावण रणांत पडतांच सर्व लंकापुरींत एकच हाहाःकार उडून गेला. रामचंद्राची सर्व सेना आनंदानें नाचूं लागली. रावणाचें निधनवृत्त समस्त ऐकून ऋषि, मुनि, आनंद पावले. देवतांनीं दुंदुभि वाजवून आपला आनंद प्रदर्शित केला. रामचंद्राच्या जयध्वनीनें सर्व आकाशमंडळ भरून गेलें. लंकेंत ही दुःखद वार्ता पोंचतांच रावणाच्या सर्व स्त्रिया हृदय पिटी-

तच रणक्षेत्रावर आल्या. त्याच्या शवाजवळ बसून त्यांनीं नानाप्रकारें कारुणिक विलाप केला.

रामचंद्रांनीं त्यांची पुष्कळ समजूत करून बिभीषणाकडून रावणाची अंत्य क्रिया करविली. तें सर्व कृत्य झाल्यावर त्यांनीं लक्ष्मणाच्या हातून लंकेंत बिभीषणाला राज्याभिषेक करविला. रामचंद्रमित्र बिभीषण सर्व लंकेचा अधीश्वर झाला.

महापापी रावणाच्या वधानें रामचंद्राची प्रतिज्ञा पूर्ण झाली. त्याचप्रमाणें सुग्रीवाची सुद्धां झाली. नंतर रामचंद्रांनीं रावणाचा वध केल्याचें शुभ वर्तमान सीतेला सांगण्याकरितां व तिला आपल्याकडे आणण्याकरितां हनुमानाला अशोक वनांत पाठविलें. हनुमानानें तेथें जाऊन सीतेला नमस्कार केला व रामचंद्र आणि लक्ष्मणाचें कुशल कळवून रावणवधाचें आनंददायक वर्तमान तिला सांगितलें. पापी रावणाच्या मरणाचें वर्तमान ऐकतांच तिला जो आनंद झाला तो वर्णन करवत नाहीं. शत्रूच्या मृत्यूची वार्ता ऐकून सीतेच्या मुखांतून किती तरी वेळपर्यंत शब्दच उमटेना. कांहीं वेळानें ती गद्गद वाणीनें म्हणाली, ' हनुमाना, तूं जो मला आज आनंददायक वृत्तांत कळविलास त्याची फेड मी कशी करूं ! जगांत अशी एक देखलि वस्तु नाहीं कीं, जी मी तुला देऊन ऋणमुक्त होऊं शकेन. जगांतील सर्व धनरत्नें देऊनही तुझ्या उपकाराची फेड होणार नाहीं. असें बोलत असतां सीतेच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वहात होते.

आपल्या परमपूज्य सीतादेवीच्या मुखानें आपली अशी प्रशंसा ऐकून हनुमानाला अपार हर्ष झाला. सीतेचीं मधुर वचनें ऐकून तो आपणा स्वतःला कृतकृत्य समजला. नंतर ज्या तिच्या जवळच्या राक्षसींनीं तिला अनेक प्रकारचे कष्ट दिले, व वारंवार धमक्या दिल्या होत्या, त्या सर्वांना रावणाच्या बरोबर यमलोकाला पाठवून

देण्याबद्दल तो सीतेची आज्ञा मागूं लागला. परंतु दीनवत्सल सीतेनें त्याला तसें करण्याची परवानगी दिली नाहीं. ती म्हणाली, ' वत्स, ह्या सर्व राक्षसिणी पराधीन आहेत. त्यांना ठार मारण्याचें कारण नाहीं. या तर रावणाच्या अधीन होत्या. त्या त्याच्या नोकर. तो जसें त्यांस सांगत असे, तसें त्या वागत असत. यांत त्यांचा काय दोष आहे ? आपल्या स्वामींच्या आज्ञेचें पालन करणें हाच सेवकाचा परम धर्म आहे. आतां तर तो दुष्ट मेला. या मला आतां त्रास देणार नाहींत. जर कोणा मनुष्यानें कोणाच्या प्रेरणेनें कांहीं अपराध केला तर बुद्धिमान अपराध करणाऱ्याला अपराधी समजत नाहींत. तर त्याच्या प्रेरकाला तो अपराधी समजतो, आणि त्या प्रेरकालाच तो त्याचें उलट फळ देतो. मला जें दुःख भोगावें लागलें तें सर्व माझ्या कर्माचें फळ आहे. त्यांत कोणाचा अपराध नाहीं.'

सीतेचें तें उदार, धर्मयुक्त भाषण ऐकून हनुमान संतुष्ट झाला. त्यानें तिची स्तुति करून परत रामचंद्राकडे जाण्याची तिचे-जवळ परवानगी मागितली. तेव्हां सीता त्याला म्हणाली, ' वत्स, मी भक्तवत्सल पतीचें दर्शन घेऊं इच्छितें.' महामति हनुमान म्हणाला, ' आपण मनात शंका धरूं नका. आजच आपणाला प्रभु रामचंद्राचें दर्शन होईल. इतकें बोलून व तिला अभय देऊन आणि नमस्कार करून तो रामचंद्राकडे परत गेला.

हनुमानाच्या मुखानें जानकीचें वर्तमान ऐकून रामचंद्राच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. त्यांनीं त्या वेळीं धैर्य धरून बिभीषणाला सांगितलें, ' लंकेश्वर, तूं लंकेंत जाऊन आणि सीतेला सुंदर वस्त्र-भूषणें देऊन तिला येथें लवकर घेऊन ये. मी तिला पाहूं इच्छितों.' रामचंद्राची अशी आज्ञा होतांच बिभीषण लंकेंत गेला, आणि त्यानें सीतेला सुंदर वस्त्रालंकारांनीं मंडित करून व पालखींत बसवून तो रामाकडे तिला मोठ्या थाटानें घेऊन येऊं लागला.

ज्या वेळेस सीतादेवी स्नान करून आणि नवीन उत्कृष्ट वस्त्राभरणें लेऊन आपल्या पतिदेवाकडे पालखींत बसून येण्यास अशोक वनांतून निघाली, त्या वेळस तिच्या मनांत नानाप्रकारचे भाव उदय पावले. आपण दुष्ट रावणाच्या तडाक्यांतून सुटूं व पतिदेवाच्या मुखारविंदाचें दर्शन घेऊं, अशी आशा तिला स्वप्नांत सुद्धां वाटली नव्हती. परंतु तीच सीता देवी आज आपल्या स्वामीच्या मुखचंद्राचें दर्शन घेण्याकरितां मोठ्या प्रसन्नतेनें जात आहे, हीच किती आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट आहे, व ती आज खरी झालेली पाहून सीतेलाहि फार आनंद झाला होता, परंतु तिचा हा हर्षोल्लास क्षणभंगुर नाहींना ? मार्ग चालत असतां सीतादेवी मनांतल्यामनांत परमात्म्याला नमस्कार करून सहृयपणें अनेकवार त्याचे धन्यवाद गाऊं लागली.

अनेक स्त्रियांसह सीता पालखींत बसून येत होती. इतक्यांत बिभीषणानें पुढें येऊन सीतागमनाचें शुभ वर्तमान रामचंद्रांना कळविलें. त्या वेळीं रामचंद्राच्या मनाची स्थिति फारच विचित्र झाली होती. त्यांच्या मनांत नानाप्रकारचे विचार उत्पन्न होत होते. त्यांचें हृदयक्षेत्र त्रिविध प्रकारच्या भावनांचें एक लीलाक्षेत्रच झालें होतें. एकीकडे क्षत्रिय तेज, व वीरत्वाभिमान, तर दुसरीकडे दांपत्यप्रेम आणि प्रियासंमीलन. एकीकडे सीतेचा राक्षसगृहनिवास, तर त्याच्या उलट तिची पवित्रता, एका बाजूला लोकापवाद, तर दुसऱ्या बाजूला आपल्या मनांत सीतेच्या शुद्धपणाविषयीं पूर्ण विश्वास. एकीकडे माधुर्य तर दुसरीकडे भीषणता, अशा अनेक परस्पर विरोधी मनोविकारांचें त्यांच्या मनांत तुमुल युद्ध सुरू झालें. रामचंद्रांना तेव्हां अगदीं निर्विकार पाहून बिभीषण म्हणाला, ' वीरसिंहादेवी जानकी आली आहे. राक्षसेंद्र रावणाच्या घराहून सीता आली आहे असें जाणून रामचंद्र पूर्वी-

पेक्षांहि अधिकच चिंतामग्न झाले. त्या वेळेस त्यांच्या मनांत आनंद, क्रोध, व दुःख हे विकार एकवटले. किंचित् वेळानें, चिंतायुक्त स्वरानें ते म्हणाले, ' बिभीषणा, जानकीला लवकर मजजवळ घेऊन ये. रामचंद्र इतकें बोलले खरे, पण पुनः ते चिंतासागरांत बुडून गेले. पूर्वीं उल्लेख केलेल्या भावनांचें स्वप्न पाहतांच जशी एखाद्याची स्थिति होते, तसेंच त्यांना या वेळीं झालें.

सीता जवळ येत आहे असें पाहून धर्मात्म्या बिभीषणानें सर्व प्रेक्षकजनांना दूर जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सर्व लोक उठून जाऊं लागले त्यांच्या जाण्याच्या गडबडीनें रामचंद्राच्या स्वप्नाचा भंग झाला. लोक जात आहेत, व बिभीषण त्यांना घालवीत आहे असें पाहून ते त्याला रागें भरून म्हणाले—

' किमर्थं मामनादृत्य क्लिश्यतेऽयं त्वया जनः ।
निवर्तयैनमुद्वेगं मनोऽयं स्वजनो मम ॥
न गृहाणि, न वस्त्राणि न प्रकारस्तिरस्क्रिया ।
ने दृशा राजसत्कारा वृत्तमावरणं स्त्रियः ॥
व्यसनेषु न कृच्छ्रेषु न युद्धेषु स्वयंवरे ।
न क्रतौ नो विवाहे वा दर्शनं दुष्यते स्त्रियः ॥
सैषा विद्गता चैव कृच्छ्रेण च समान्विता ।
दर्शने नास्ति दोषोऽस्या मत्समीपे विशेषतः ॥
विसृज्य शिबिकां तस्मात्पद्भ्यामेवापसर्पतु ।
समीपे मम वैदेही पश्यन्त्वेते वनौकसः ॥'

(वा. रा. का. ६ सर्ग ११४.)

' हे बिभीषणा, तूं माझा अनादर करून, मला न विचारितां या लोकांना कां त्रास देतोस ? त्यांना जाऊं देऊं नकोस. थांबीव व त्यांना येथेंच बसूं दे. हे सर्व आप्तसंबंधींच आहेत. गृह, वस्त्र, दुर्ग, इत्यादि वस्तु स्त्रियांचें रक्षण करूं शकत नाहींत. या वस्तु

त्यांच्या अवडंबराकरितां आहेत. सदाचरण हेंच त्यांचें खरें आवरण आहे. जर स्त्रिया खऱ्या सदाचरणी असल्या तर त्यांना कशाचीच जरूर नाहीं; आणि जर त्या सदाचारसंपन्न नसतील तर, त्यांना कसलाहि पडदा ठेवा, मोठ्या दुर्गमस्थळीं ठेवा, कांहीं करा, त्यांचें रक्षण होणार नाहीं. विपत्ति, युद्ध, संकट, स्वयंवर, आणि विवाह, या सर्व प्रसंगीं स्त्रियां ा जनांनीं पाहणें कहीं वाईट गोष्ट नाहीं. या वेळीं त्यांना उघडपणें पहाण्यास आणि वागण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां ही विपत्तींतच आहे. तेव्हां या वेळीं हिला लोकांनीं पाहण्यांत कांहीं एक दोष नाहीं; आणि माझ्या समोर असतां तर दोषाचें नांवच नको. एवढ्याचकरितां हिला पालखींतून उतरून पायांनींच माझ्याकडे येऊं दे, म्हणजे तिला पाहण्याची या वनवासी जनांची इच्छा तृप्त होईल; ते स्वस्थ अंतःकरणानें तिला माझ्याजवळ पहातील. '

यावर रामचंद्राच्या अनुज्ञेनें बिभीषणानें कोणालाहि तेथून 'जा' म्हणून म्हटलें नाहीं. उलट जे लोक तेथून दूर पळून गेले होते त्यांनाहि त्यानें परत बोलाविलें. नंतर त्यानें सीतेजवळ जाऊन तिला रामचंद्राचा निरोप सांगितला. रामचंद्राची आज्ञा ऐकतांच ती संकुचितपणानें आणि खालीं मान घालून पायींच आपल्या पतीकडे चालली. रामचंद्राची मुद्रा त्या वेळीं गंभीर होती. सीतादेवीनें हळूहळू चालून पतीजवळ जाऊन पोहोंचतांच आपल्या तोंडावरील बुरखा दूर केला. त्या वेळीं त्यांच्या हृदयांत विस्मय, हर्ष, व स्नेह हे सर्व एकाच वेळीं एकवटले. सीता देवीनें आपल्या स्वामीच्या पूर्ण चंद्रनिभ प्रशांत मुखमंडलाचें दर्शन केलें. तिची दृष्टि सरळ व स्थिर होती. तिच्या नेत्रांतून एकप्रकारचें तेज निघालें, आणि त्यानें तिचें समस्त मुखमंडल प्रदीप्त केलें. सीतादेवी किती वेळपर्यंत आपल्या स्वामीजवळ उभी राहिली. ती रामचंद्राच्या जवळ उभी असतां आपणां-

स्वतःलाच विसरून गेली. ती कितीवेळपर्यंत आणि कसल्या विचारांत होती, हें तिचें तिलाच ठाऊक नाहीं. त्या वेळीं तिला असें वाटलें कीं, आपण आपल्या पतीबरोबर फिरतां फिरतां कोणत्या देव-राज्यांत पोहचलों. तिला असेंहि वाटलें कीं, या देवराज्यांत कुठेंहि पाप नाहीं व अस्वस्थताहि नाहीं. तेथें तिला पारिजातकांचे वृक्ष पुष्पांनीं भरलेले दिसले. किंचित् कालपर्यंत सीतादेवी त्या मनोराज्यांत विहार करीत होती. ज्याच्या वियोगामुळें सीता आपलें सुख व जीवित मातीमोल मानीत होती, ज्याच्या विरहानें तिनें आपलें शरीर अस्थिपंजर करून घेतलें, लंकेंत रात्रंदिवस ती ज्याचें ध्यान करीत होती, ज्याच्या दर्शनलालसेनें तिला चैन पडत नसे, ज्याला ती आपलें सर्वस्व समजत असे, त्या आपल्या प्राणवल्लभाचा मुखचंद्र एकवार पहातांच ती विव्हल झाली. ती बराच वेळपर्यंत एकसारखी त्यांच्या तोंडाकडे पहात होती. ही तिची स्थिति फार वेळ टिकली नाहीं. ती लागलीच सावध झाली. या वेळपर्यंत जें स्वप्न ती पहात होती, तें सर्व जेव्हां पार नाहींसें झालें, तेव्हां तिला कळलें कीं, आपल्याला रावणाच्या अशोक वनांतून आणून येथें रणक्षेत्रांत सर्वांसमोर उभें केलें आहे. नंतर ती स्वस्थपणें रामासमोर उभी राहिली.

रामचंद्र लज्जावनतमुखी जानकीला आपल्यासमोर उभी पाहून म्हणाले, ' हे भद्रे, मी युद्धांत जिंकून तुला येथें आणिलें आहे. मी पुरुषार्थाला पराकाष्ठेला पोंचविलें. आतां माझा क्रोध शांत झाला. आतांपर्यंत रावणानें जो माझा अपराध केला होता, त्या सर्वांची पूर्णता झाली. आतां माझा पराक्रम सर्वांनीं पाहिला आहे. आज माझ्या सर्व श्रमांचें सार्थक झालें. माझी प्रतिज्ञा आज पूर्ण झाली. जें कार्य मीं पुरें करीन असें म्हटलें होतें, तें पूर्ण झालें. माझें प्रभुत्व सर्व जगानें पाहिलें. तुझ्यावर जो हा दैवी कोप झाला होता, त्याला मी मानवी शक्तीनें दूर केलें आहे. आज महावीर हनुमानाची

समुद्रयात्रा सफल झाली. मित्र सुग्रिवाच्या सर्व प्रयत्नांला यश आलें, आणि महामति बिभीषणाचे सत्परामर्श आणि परिश्रम सिद्ध झाले.'

रामचंद्राचें हें गंभीर भाषण ऐकून सीतेच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले. जेव्हां रामचंद्रांनीं सीतेच्या मुखाकडे पाहिलें, तेव्हां तिचे सजलनयन पाहून त्यांचेंहि हृदय कंपित झालें. ते आपले मनोविकार त्या वेळीं मोठ्या धैर्यानें दाबून तिला म्हणाले, 'हे जानकी, अपमानाची फेड करण्याकरितां मानधन मनुष्याचें जें कर्तव्य होतें, तें सर्व मीं केलें आहे. रावणाबरोबर जें करणें मला उचित होतें, तें मी केलें आहे. त्याला मारून मी कृतकृत्य झालों. आपल्या मित्रांच्या भुजबलाच्या सहाय्यानें हा जो मीं शत्रूचा नाश करून विजय मिळविला, तो केवळ तुझ्याचकरितां नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेव. तुझ्या प्राप्तीकरितां मीं हें घोर युद्ध केव्हांच केलें नाहीं. मीं जें हें सर्व केलें, तें केवळ स्वतःच्या चरित्ररक्षणाकरितांच केलें आहे. जनापवाद दूर करण्याकरितां व आपल्या प्रख्यात वंशाला लागलेला डाग धुवून टाकण्याकरितां मला हें सर्व करावें लागलें. तुझ्या चरित्रासंबंधानें मला संदेह उत्पन्न होतो. कारण तूं परक्याच्या घरीं रहात होतीस. तूं या वेळेस माझ्या समोर उभी आहेस हें खरें आहे, तथापि ज्याप्रमाणें डोळे दुखणारा मनुष्य उजेडाकडे पाहूं शकत नाहीं, त्याच्या डोळ्यांना प्रकाश सहन होत नाहीं, त्याप्रमाणेंच तूं समोर उभी असल्यानें माझी स्थिति झाली आहे. आतां तूं माझ्या डोळ्यांना खपत नाहींस; याकरितां तुला सांगतों कीं, तूं वाटेल तिकडे खुशाल जा. आतां तूं मला दृष्टीसमोरही नको आहेस. स्वतः तूं बुद्धिमान आहेस. असा कोण सत्कुलाभिमानी असेल कीं जो दुसऱ्याच्या घरीं राहिलेल्या आपल्या स्त्रीचा अंगीकार करील ? याचा तूं स्वतःच विचार कर. रावणानें तुला उच-

लून नलें, हें सर्व जगाला माहित आहे. त्याच्या शरिराचा स्पर्श तुझ्या अंगाला झाला आहे, हेंही सर्वांना ठाऊक आहे; तर मग मी आपल्या निर्दोष कुलाचा विचार करून तुझा अंगिकार कसा करीन. तुझ्या सुटकेकरितां व उद्धाराकरितां मीं जे कांहीं श्रम, उद्योग,आणि प्रयास केले ते सर्व फलद्रूप झाले. तुझा मीं अंगिकार करावा अशी अवश्यकता मला दिसूत येत नाहीं. तूं आतां तुला वाटेल तिकडे चालती हो.'

आपल्या देवाच्या तोंडचें असें वज्रघातासारखें कठोर भाषण ऐकून सीतेचें हृदय कांपूं लागलें. तिचें मस्तक फिरूं लागून तिच्या डोळ्यांना अंधेरी आली. त्या वेळेस तिला मरणापेक्षांही अधिक दुःख झालें. तिच्या मस्तकावर तेव्हां वज्राघात झाला असता, तरी सुद्धां तिला तितकें दुःख झालें नसतें, इतकें दुःख तिला रामचंद्राच्या या कठोर भाषणानें वाटलें. हाय, हाय, सीतेचें सर्व सुखस्वप्न एकदम भंग पावलें. तिच्या सर्व आशालतांवर अग्निकणांचा वर्षाव झाला. तिच्या सर्व शुभ संकल्पावर विद्युत्पात झाला. ती लज्जेनें मेल्याप्रमाणें झाली. ती डोळ्यांत पाणी आणून रडूं लागली. नंतर ती तोंड झांकून गद्गदवाणीनें म्हणाली, 'महाराज, ज्याप्रमाणें एखादा नीच पुरुष साधारण नीच स्त्रीला कटु भाषण बोलतो, त्याप्रमाणें आपण या वेळीं मला बोलत आहांत. आपण मला जशी हलकी समजतां तशी मी नाहीं बरें. हलक्या वृत्तीच्या साधारण स्त्रीप्रमाणें मी आपला धर्म बुडविणार नाहीं. आपण माझ्या भाषणावर विश्वास ठेवावा. नीच स्त्रियांचें अपवित्र आचरण पाहून माझ्या पवित्र आचरणाला आपण दोष लावितां, ही फार अयोग्य गोष्ट आहे. जेव्हां मी आपल्या पवित्रपणाचें प्रत्यक्ष प्रमाण दाखवीन, तेव्हां तर आपण माझें चरित्र दूषित समजणार नाहीं ना? रावणाच्या ज्या अंगस्पर्शाबद्दल आपण बोललांत ती गोष्ट आपत्कालची होय. मी

त्या वेळीं मी पराधीन होतें. मी त्या स्थितींत काय बरें करूं शकलें असतें ? जर आपल्यामध्यें आणि मजमध्यें वाढलेल्या अनुरागाला व प्रीतीला आपण स्मरत नाहीं, तिचें आपणांला जर विस्मरण झालें आहे, तर, हाय ! रे दैवा, मी मृत्यूवांचून ठार मेलें गेलें असें म्हटलें पाहिजे. ज्या वेळेस माझ्या शोधाकरितां हनुमान लंकेंत आला होता, त्या वेळेस माझा आपण त्याग केल्याची गोष्ट मला कां कळविली नाहीं ? त्याच वेळीं जर ही गोष्ट मला कळली असती, तर मी त्याच्या समक्षच आपला प्राण दिला असता; आणि असें झालें असतें, म्हणजे आपल्यालाहि इतके कष्ट पडले नसते, व आपले मित्रहि रणसंग्रामांत पडले नसते. राजन्, आपण विचारशील असूनहि माझ्या चरित्राला दोषपूर्ण दृष्टीनें पाहतां ना ? याला काय म्हणावें ! आपण मला या वेळपर्यंतहि पूर्णपणें ओळखिलें नाहीं, याबद्दल मला अति वाईट वाटतें, मला फार फार खेद होतो. एवढ्याचकरतां काय विवाहकालीं माझें आपण पाणीग्रहण केलें होतें ? महाराज, या वेळीं आपण क्रोधाला वश होऊन माझें सर्व प्रेम, माझा अनुराग, आणि माझी आपल्या ठिकाणची अचल भक्ति हीं सर्व विसरून गेलांत ना ?'

नंतर सीता मोठ्या दुःखित अंतःकरणानें रडत रडत लक्ष्मणाला म्हणाली, 'लक्ष्मणा, माझ्याकरितां चिता लवकर तयार कर. माझ्या या आपत्ति रोगावर बाबा, हें एकच औषध आहे. मी खोटा अपमान केव्हांहि सहन करणार नाहीं. माझे पति आतां माझ्यावर रुष्ट झाले आहेत. सर्वांसमोर त्यांनीं माझा त्याग केला. आतां मी अग्नींत भस्म होऊन प्राणत्याग करणार !'

सीतेचें हें निश्चयाचें भाषण ऐकून लक्ष्मणानें त्या वेळीं रागानें रामचंद्राकडे पाहिलें. रामचंद्रालाही त्याच्या क्रोधयुक्त दृष्टीचा अर्थ कळला. लक्ष्मणानें एक शब्दही न बोलतां उदासपणें चिता

तयार केली. जेव्हां चिता प्रज्वलित झाली, तेव्हां सीतेनें रामचंद्राला प्रदक्षिणा करून तींत उडी टाण्याची तयारी केली. सीतेला अग्निप्रवेश करतांना पाहून तेथें जमलेल्या सर्व स्त्रिया अगदीं चकित होऊन गेल्या. विशाललोचना सीता पूर्णाहुतीप्रमाणें अग्नींत पडूं पाहत आहे हें पाहण्यास महर्षि, देवगण, आणि सर्व मनुष्यें जमलीं. विमानांत बसलेले देवगणहि विशुद्धचरित्रा जानकी वसुधारेप्रमाणें अग्नींत उडी घेत आहे हें पाहून विस्मयानें थक्क झाले.

सीतादेवी जेव्हां अग्नींत उडी घेण्यास तयार झाली, तेव्हां तिनें अग्नीजवळ त्याला हात जोडून प्रार्थना केली. ती म्हणाली, ' हे अग्निदेवा, हे प्रकाशस्वरूप परमात्मन्, जर मी खरी साध्वी असेन, जर मी पातिव्रत्यधर्म पाळला असेल, तर तूं माझें रक्षण कर. हे देवगणहो, जर मीं आपल्या स्वामीच्या ठिकाणीं पूर्ण भक्ति ठेविली असेल, आणि जर माझें मन पवित्र असेल, तर आपण सर्वजण माझें रक्षण करा. '

याप्रमाणें अग्नीची प्रार्थना करून सीतेनें लगेच अग्नींत उडी टाकिली. त्या वेळेस चहूंकडे एकच हा हाःकार उडून गेला. त्या वेळेस तेथें जरी असंख्य स्त्रीपुरुष जमले होते. तरी त्यांपैकीं कोणा एकाची सुद्धां रामचंद्रासमोर जाण्याची शक्ति नव्हती. त्यांच्या रोषपूर्ण मुखमंडलाकडे देखील कोणाच्यानें पहावलें नाहीं.

महावीर रामचंद्राचेंही हृदय त्या वेळीं कांपूं लागलें, व मन विचलित झालें. आपल्या प्राणप्रियेला अग्नींत प्रवेश करतांना पाहून ते अस्वस्थ झाले. सीतेनें अग्नींत उडी घेतली, इतक्यांत विमानांत बसलेले देवगण कांहीं बोलूं लागले. त्यांचें भाषण पुढीलप्रमाणें होतें. ते म्हणाले, ' हे राजराजेश्वर, हे रघुपुंगव, हे रामचंद्रा,. तूं महाज्ञानी आहेस. सीतादेवीची इतकी कठीण परीक्षा करून तिला दुःखी करूं नकोस. सीता अगदीं निष्पाप साध्वी आहे. तिचें चरित्र

सर्वस्वी पवित्र आहे. तूं तिचें ग्रहण कर.आह्मी समस्त देवगण सीतेच्या पवित्रतेबद्दल साक्षी आहोंत. आम्ही धर्माला साक्षी ठेवून निश्चयपूर्वक सांगतों कीं, 'सीतेनें मनानें, वाचेनें, व शरिरानें, कोणत्याही प्रकारानें आपल्या चरित्राला दूषित केलें नाहीं. पराधीन असतांहि तिनें तुझें ध्यान सोडलें नाहीं. घोर रूपिणी राक्षसींनीं हिचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु हिनें धर्मरक्षणाकरितां त्यांची एकही गोष्ट मान्य केली नाहीं. हिचे आंतरिक भावहि विशुद्ध आणि पवित्र आहेत. याकरितां आम्ही सर्वजण आग्रहपूर्वक तुला सांगतों कीं, तूं हिचा स्वीकार कर. हिच्या चारित्रासंबंधानें तूं लेशमात्रहि संदेह धरूं नकोस.'

टीप—या गोड प्रसंगावर रा. अनंत नारायण भागवत यांनीं एक मुलींना म्हणण्यासारखें गाणें केलें आहे, तें या ठिकाणीं देणें अवश्य वाटल्यावरून देत आहें.

गाणें. चालः–(हे सीते कोमल गात्रे, अतिसकुमारे, कुठें लपालिस जनक कुमारे).

रणधीरा, रघुकुलतिलका, रिपुहननारे । कां मौन आजि धरिलें रे ॥ धृ० ॥
कंठांत धरुनि प्राणास । भेटिची आस । ठेविली मोठी । तव चरणीं लावुनि दृष्टि ॥ तूं जाणसि मन्मन सारें । कोप कां करिसी । हें दुःख होतसे मजसी ॥ चाल । परगृहीं वास मज घडला ।
हा काय दोष मम झाला ।
मी हीन दीन ही अबला ।
करुं गत कैसी । सांगा मजसी । बलजलधेरे ॥ कां मौ० ॥ १ ॥
मी समजे प्राणापरिस, शील मम थोर । त्यागीन दूषिता शरिर ॥ नच चाड मला अन्याची, खास महिवर । तव कृपाछत्र, चामर ॥ चाल ॥
साध्वीसी पतिप्रेमाची ।
जोडचि कीं सुरलोकींची ।

(पान एकशें नव्याण्णव पाहा.)

ही देववाणी ऐकून रामचंद्र आनंदित होऊन, सीतेला ग्रहण करण्यास तयार झाले. त्यांनीं तिला चितेंतून बाहेर काढिलें. नंतर त्यांनीं सर्व देवतांच्या साक्षीनें, व सर्वांसमोर सीतेचें ग्रहण केलें. ज्या वेळेस रामचंद्रांनीं सीतेचा आदरपूर्वक स्वीकार केला, त्या वेळेस सर्वत्र आनंदीआनंद पसरला. सर्व लोक हर्षानें नाचूं लागले. विमानांत बसलेल्या देवगणांनीं आकाशांतून त्यांच्यावर पुष्पवृष्टि करण्यास सुरवात केली. रामचंद्राच्या आणि सीतेच्या जयध्वनीनें चारी दिशा दणाणून गेल्या. इतके दिवस इतकी आपत्ति सहन केल्यावर आपल्या प्राणेश्वराची भेट झाल्यामुळें सीतेला जो आनंद झाला, तो अनिर्वचनीय होता. त्या दांपत्यसंमीलनाचें पूर्णपणें वर्णन कोण करूं शकेल? इतकी आमच्या लेखणींत शक्ति नाहीं.

वर आम्हीं लिहिलें आहे कीं, रामचंद्रांनीं मोठ्या बुद्धिमत्तेनें आणि चातुर्यानें सीतेची शुद्धता चांगल्या रीतीनें सर्वांच्या नजरेस

वाटे ती निश्चल साची ।
तिजवीण जगतीं । नाहीं सुगति । कपि सुहृदारे ॥ कां मौन० ॥ २ ॥
या जनकसुतेचा वाली, द्विशिर हा आतां । राखील हिची तो शुचिता ।
पतिचरणीं ठेवुनि माथा । जोडुनि हस्ता । जाहली सिद्ध—महिदुहिता ॥
चाल । उदरीं बा, घे कन्येसी ।
म्हणुनियां तनू अग्नीसी ।
अर्पिली तिनें त्यासरसी ।
गडबड झाली । कपिदळिं समुळी । भूमि थरारे ॥ कां मौन. ॥ ३ ॥
पाहुनी सत्व सीतेचें, प्रगट मग झाला । नारायण, कथी रामाला । ही
मूर्ति शुचि सत्वाची । घेई हिजला । सोडुनी सर्व शंकेला ।
चाल । मम कन्या ऐसें मानी ।
ऐकतांचि ती सद्वाणी ।
रामानें आलिंगुनी ।
श्रम परिहरिले । तिज सुखवीलें । गुणगंभीरे ॥ कां मौन० ॥ ४ ॥

आणून देऊन ऋषि, मुनि आणि देवगण यांच्या सांगण्यावरून तिचा स्वीकार केला, त्या वेळेस दोघां पतिपत्नींस जो हर्षोल्लास झाला त्याचें वर्णन आम्ही करूं शकत नाहीं. रामचंद्रांनीं तिचा स्वीकार केल्यावर त्या भेटीच्या आनंदांत सरल स्वभावाची सीता रामचंद्रांनीं पूर्वीं केलेला तिचा तिरस्कार व अपमान पार विसरून गेली.

सीतासंमीलनाच्या पश्चात् रामचंद्रांनीं विचार करून पाहिलें तों वनवासाचा अवधि संपण्यास फक्त अर्धा दिवसच बाकी आहे; असें त्यांस आढळून आलें. त्याच वेळेस भरताच्या दृढ प्रतिज्ञेचें त्यांस स्मरण झालें. त्याचें स्मरण होतांच त्यांनीं अयोध्येला जाण्याची तयारी केली.

रावणाजवळ एक फार उत्तम विमान होतें. त्याची शोभा पाहण्यासारखी होती. तें आकाशांत उडत असे. शिवाय तें इच्छेस येईल तिकडे चालवितां येत असे, हा त्यांत एक विशेष गुण होता. तसेंच वाटेल तेव्हां आणि वाटेल तेथें तें थांबवितांहि येत होतें. रामचंद्रांची इच्छा अयोध्येला त्वरित जाण्याची पाहून बिभीषण तें लवकरच घेऊन आला. तें पाहून रामचंद्रांनीं त्याच्यांतून अयोध्येला जाण्याचें ठरविलें. वाल्मिकी मुनींनी आपल्या ग्रंथांतून ह्या विमानाची फारच प्रशंसा केली आहे. तें समग्र वर्णन आम्हीं येथें दिलें तर फारच ग्रंथविस्तार होईल; याकरितां त्याचें संक्षिप्त वर्णन देत आहों.

‘ प्राचीन कालीं भारतवर्षांत अनेक शिल्पकला विशारद विद्वान् होऊन गेले. आतां नसले म्हणून काय झालें. त्या कालीं एकाहून एक श्रेष्ठ शिल्पकार विद्यमान होते. त्यांच्यामध्यें विश्वकर्मा आणि मय, हे दोघे फार प्रसिद्ध शिल्पकार होते. त्या विमानाचें नांव पुष्पक होतें. त्याचा कर्ता विश्वकर्मा होता. त्यानें तें मोठें विमान तयार केलें होतें. त्याचा रंग श्वेत होता. त्याच्या चहूं बाजूंना

पताका फडकत होत्या. त्याच्यांत सुवर्णाचें खोदीव काम केलें होतें. तशांत त्यांत एक नव्हे, तर अनेक जागा केल्या होत्या; त्यांत सर्व प्रकारच्या सोयी होत्या. त्या विमानाच्या एका कोंपऱ्यांत एक मोठे पुस्तकालयहि होतें. त्यांत सर्व प्रकारचीं पुस्तकें ठेविलीं होतीं. त्याचप्रमाणें त्यांत भोजनालय, पाकशाला, व्यायामशाला, शयनगृह वगैरे सर्व शाला उत्तम रीतीनें तयार केल्या होत्या. बसण्याकरितां नरम गाद्या घातल्या होत्या. जागजागीं पुष्पांचे गुच्छ ठेविले होते. सर्व विमानांत दिव्य सुगंध भरला होता. त्याचें वर्णन कोठवर करावें. तें विमान सर्व प्रकारच्या सुखाचें केवळ स्थानच होतें. असो.

विमान आल्यावर जेव्हां रामचंद्र त्यांत सीता, लक्ष्मणासह बसून जाण्यास तयार झाले, तेव्हां बिभीषण आदिकरून राक्षस, त्याचप्रमाणें सुग्रीव, त्याचे मंत्री, सेनापति, आणि त्याची सेना वगैरे सर्व जणांनीं रामचंद्राबरोबर अयोध्येला चलण्याची आपली इच्छा प्रगट केली. रामचंद्रांनींहि त्यांची मनापासून इच्छा पाहून त्यांस बरोबर येण्याची आज्ञा दिली. सर्व लोक जाण्यास आनंदानें तयार झाले. प्रथम रामचंद्रांनीं सीतेला हातीं धरून विमानांत चढविलें. नंतर लक्ष्मणासह ते आपण त्यांत बसले. त्यांच्या मागून सुग्रीव, बिभीषण, व हनुमान इत्यादि चढले. सर्व लोक आपापल्या आसनावर प्रशस्तपणें बसल्यावर रामचंद्राच्या आज्ञेनें तें विमान आकाशमार्गें चालूं लागलें.

जेव्हां पुष्पक विमान आकाशांत उडालें, तेव्हां खालीं लंका, युद्धभूमि वगैरे दृश्य पदार्थ स्पष्टपणें दिसूं लागले. ज्या ठिकाणीं मुख्य मुख्य गोष्टी घडल्या तीं सर्व स्थलें आणि रणभूमि रामचंद्रांनीं सीतेला बोटांनीं दाखविली. नंतर विमान उत्तर दिशेला

चाललें. तेव्हां नल, नील वगैरे वीरांनीं समुद्रावर बांधलेला सेतु पाहून सीतेला फार आनंद झाला.

मार्गांत जीं जीं प्रसिद्ध स्थळें दिसत, तीं तीं रामचंद्र सीतेला मुद्दाम दाखवीत असत. समुद्राच्या उत्तर तीरावरच्या बाजूला होऊन नंतर तें विमान किष्किंधेकडे चाललें. थोड्याच वेळांत ते किष्किंधेला येऊन पोहोंचलें. तेथें पोहोंचतांच सीतादेवीनें सुग्रीवादिकांच्या स्त्रियांनाहि आपल्याबरोबर अयोध्येस नेण्याची इच्छा दर्शविली. तिची तशी इच्छा पाहून रामचंद्रांनीं विमान खालीं उतरविलें. विमान खालीं उतरतांच तारा व रुमा इत्यादि सुग्रीवाच्या स्त्रियाहि विमानांत बसल्या.

नंतर विमान पुनः आकाशांत उडालें, व अयोध्येकडे चाललें. ऋष्यमूक पर्वताजवळ पोंहचतांच रामचंद्रांनीं सीतेला सांगितलें कीं, ' याच ठिकाणीं किष्किंधेचा नरेश सुग्रीव याच्याबरोबर मैत्री झाली, मग पंपासरोवराचें वर्णन करून ते म्हणाले, ' तुझा वियोग झाल्यामुळें तुझ्याकरितां मी येथेंच विलाप केला. ' त्यावर महातपस्विनी शबरीचा आश्रम लागला. तो दाखवून तेथेंच कबंध राक्षसाला मारलेलें ठिकाण होतें, तेंहि त्यांनीं दाखविलें. तेथून किंचित् अंतरावर पुढें विमान गेलें. इतक्यांत पवित्रतीरा परम पावन गोदावरी नदी दिसूं लागली. तिचें दर्शन घेऊन मग तें पंचवटीजवळ जाऊन पोंहचलें. तेथें जातांच रामचंद्रांनीं आपली रहाण्याची पर्णकुटी दाखविली. त्यानंतर महामुनि अगस्ति, महात्मा शरभंग, सुतीक्ष्ण,आणि अत्रि मुनि, यांचे आश्रम लागले. त्यांचें दर्शन करून ते चित्रकूटाजवळ येऊन पोंहचले. तेथून प्रयागास जाऊन व गंगायमुनांचा आल्हादजनक संगम पाहून सर्वांना फार आनंद झाला. इतक्यांत भारद्वाज ऋषींचा आश्रम आला. तेथें रामचंद्रांनीं विमान खालीं उतरविलें. विमान खालीं उतरतांच त्यांतून उतरून रामचंद्रांनीं

भारद्वाज ऋषींना प्रणाम केला. भारद्वाज ऋषीहि रामचंद्राला पाहून संतुष्ट झाले. रामचंद्राच्या वनवासाचा सर्व वृत्तांत थोडक्यांत ऐकून भारद्वाजांना आनंद वाटला. सीताहरणाचें दुःखदायक वर्तमान ऐकून त्यांना प्रथम फार दुःख झालें, परंतु जेव्हां त्याचा परिणाम म्हणजे हाच अर्थात् दुष्ट रावणादिकांचा वध त्यांनीं ऐकला तेव्हां त्यांना अपार हर्ष झाला.

सीतादेवीच्या पातिव्रत्य धर्माचा महिमा ऐकून भारद्वाजांनीं तिला अनेक धन्यवाद देऊन तिची प्रशंसा केली. ते म्हणाले, ' सीतादेवी राजर्षि जनकाची पुत्री, महाराज दशरथाची सून आणि धर्मधुरंधर रामचंद्राची पत्नी होऊन तिच्या हातून असें कां होणार नाहीं ? असेंच होणार, ही माझी खात्री होती. नंतर त्यांच्या तोंडून भरत आणि अयोध्यावासी अन्यान्य आत्मीयजन यांचें कुशल वृत्त ऐकून त्यांना मोठा आल्हाद वाटला.

रामचंद्रांनीं भारद्वाजाच्या आश्रमांतूनच अयोध्येचा समाचार आणण्याकरितां हनुमानाची रवानगी केली. तापस वेषधारी भरत हनुमानाच्या मुखानें आपल्या परमपूज्य, ज्येष्ठ भ्रात्याच्या आगमनाचें कुशल वर्तमान ऐकून अत्यंत प्रसन्न झाला. हर्षातिशयामुळें त्याचे नेत्र अश्रूंनीं भरून आले, व शरीर पुलकित झालें. हनुमानानें रामचंद्राच्या वनवासाची कथा थोडक्यांत भरताला कळविली. आपल्या बंधूंचें तें शौर्य कर्म ऐकून भ्रातृभक्त भरताचें सदय हृदय आनंदानें अगदीं भरून आलें. रामचंद्र लवकरच येणार हें वर्तमान ऐकून सर्व अयोध्या नगरींत आनंदोत्सव करण्याबद्दल भरतानें आज्ञा केली. तिकडे लोक आनंद प्रदर्शित करूं लागले. अयोध्यानगरी शृंगारली गेली. राजपथांवरून सुवासिक द्रव्यांचे सडे घातले. घरोघर तोरणें बांधिलीं. चहूंकडे ध्वजा–पताका फडकूं लागल्या.

जेव्हां राजमहालांत ही बातमी पोहचली, तेव्हां राजमहालच काय, परंतु सर्व शहर आनंद ध्वनीनें भरून गेलें.

त्या वेळेस जो जसा ज्या स्थितींत होता, तो तसाच त्या स्थितींत उठून रामचंद्राच्या दर्शनाकरितां चालूं लागला. कौसल्यादि माता, गुरु वसिष्ठाबरोबर अयोध्येंतून निघून नंदिग्रामीं भरताजवळ येऊन पोहोंचल्या. पाहतां पाहतां असंख्य जनांची तेथें एकच गर्दी जमली.

सर्व लोक मोठ्या आशेनें आणि आतुरतेनें रामचंद्राचें विमान येण्याची उत्तरेकडे दृष्टि लावून वाट पहात राहिले होते. इतक्यांत विमान दिसूं लागलें. भरत, गुरुजी, माता, मंत्रिजन, पौरजन वगैरे सर्व आपली वाट पहात उभे राहिलेले रामचंद्रांनीं विमानांतून पाहून लगेच त्यांनीं विमान खालीं उतरविलें. नंतर ते आपणच खालीं उतरून पायींच त्यांच्या भेटीस चालले. रामचंद्राला पाहून सर्वांच्या आधीं भरतानें त्यांस साष्टांग नमस्कार घातला. रामचंद्रांनीं त्याला वर उचलून आपल्या हृदयाशीं कवटाळून धरिलें, त्याचें कुशल विचारिलें, आणि त्याचे अश्रु पुसले. त्याला प्रेमानें कुरवाळिलें. रामचंद्र आणि भरत यांच्या भेटीच्या आनंदपूर्ण प्रसंगाचें वर्णन करण्यास जेथें आदिकवि वाल्मीकि मुनि आणि गोस्वामी तुलदासजी यांची समर्थ लेखणीहि थकली तेथें माझ्यासारख्या तुच्छ पामराची तें करण्याची शक्ति किती! जेव्हां ते दोघे बंधु भेटले, तेव्हां दोघांचीं हृदयें प्रेमभरानें भरून आलीं. तें प्रेम इतकें अनावर झालें कीं, तें त्यांच्या हृदयांत मावेना. तें पुनः पुनः त्यांच्या नेत्रांच्या द्वारें बाष्परूपानें एकसारखें वाहूं लागलें.

त्यानंतर भरतानें लक्ष्मणाशीं आदर व प्रेमपूर्वक भाषण करून सीतेला अभिवादन केलें. नंतर सुग्रीव, हनुमान, बिभीषण आदिकरून वीरांना प्रेमपूर्वक भेटून त्यांचा परिचय करून घेतला. इत-

त्यांत महावीर लक्ष्मणानें येऊन रामचंद्र, लक्ष्मण, व सीता यांना प्रणाम केला. मग समोरच आपल्या माता उभ्या आहेत, असें पाहून प्रथम त्यांनीं कैकयीला प्रणाम करून नंतर कौसल्या व सुमित्रा यांना आनंदविलें.

नंतर रामचंद्रांनीं आपल्या प्रेमपूर्वक दृष्टीनें जमलेल्या सर्व नगरवासी जनांकडे पाहून प्रसन्न मनानें त्यांचें स्वागत केलें, व त्यांचा कुशल समाचार विचारिला. सर्व लोकांनींहि त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें.

या संमीलनोत्सवानंतर धर्मात्म्या भरतानें त्यांच्या पूर्वीं आणलेल्या पादुका आणून रामचंद्राच्यापुढें ठेविल्या; व त्या त्यांच्या पायांत आपल्या हातानें घालून तो मोठ्या नम्रपणानें म्हणाला, 'हे नाथ, आपण जें आपलें राज्य कांहीं दिवसांकरितां माझ्या स्वाधीन केलें होतें, तें मी आतां आपल्याला अर्पण करतों. आपण त्याचा आतां स्वीकार करा. आपण आज अयोध्येंत आलांत, हें पाहून मला आनंद वाटतो. आज माझ्या जन्माचें सार्थक झालें. आतां आपण आपला कोश, सेना, इत्यादि सर्व संभाळा. आपल्या कृपेनें मी आपला खजिना दसपट वाढविला आहे.'

नंतर भरताच्या आज्ञेनें रामचंद्राच्या राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली. त्यांचे गुरु वसिष्ठ यांनीं या उत्सवाकरितां विजय, जाबालि, कश्यप, गौतम, आणि वामदेव आदिकरून ऋषि–मुनींना निमंत्रण पाठवून बोलाविलें. या सर्व ऋषि–मुनींनीं मिळून वेदोक्त विधिप्रमाणें रामचंद्राला राज्याभिषेक केला. रामचंद्र राजसिंहासनावर बसल्यावर सर्व प्रजाजन आपणास सनाथ समजूं लागले. रामचंद्राच्या राज्याभिषेकाचा उत्सव सर्व राज्यांत मोठ्या आनंदानें आणि थाटानें साजरा करण्यांत आला.

राजसिंहासनावर बसल्यानंतर रामचंद्रांनीं सुग्रीव, अंगद, बिभी-

षण वगैरे वीरांना अनेक रत्नालंकार देऊन त्यांचा मोठा गौरव केला. त्या वेळेस त्यांनीं एक बहुमोल रत्नजडित हार सीतेला पारितोषिक म्हणून अर्पण केला. तो हार सीतेनें लगेच आपल्या गळ्यांतून काढून रामचंद्राच्या अनुमतीनें महा वीर, महापराक्रमी हनुमानाच्या गळ्यांत घातला. त्या प्रीति-उपहारसंबंधीं हाराला ग्रहण करतांना हनुमानाला मोठी धन्यता वाटली.

कांहीं दिवस अयोध्येस राहून व रामचंद्राचा पाहुणचार घेऊन सुग्रीव आणि बिभीषण रामचंद्राचा निरोप घेऊन आपापल्या राजधानीला परत गेले.

नंतर रामचंद्र आपल्या बंधूसह आणि मंत्र्यांसह प्रजेचें पुत्रवत् पालन करूं लागले. त्यांच्या राज्यांत प्रजेला जें सुख मिळालें, जें स्वातंत्र्य अनुभविण्यास सांपडलें, त्याची स्मृति हजारों वर्षें होऊन गेलीं, तरी भारतवासी लोकांच्या मनांत अद्याप जागृत आहे. जोंपर्यंत चंद्रसूर्य आहेत, तोंपर्यंत रामचंद्राच्या सुखदायक, सौख्यपूर्ण राज्याचें प्रत्येक आर्यास स्मरण झाल्याशिवाय राहणार नाहीं.

पुढें रामचंद्रांनीं अनेक यज्ञ केले. त्यांचें अनुकरण करून सर्व प्रजाजन वैदिक यज्ञाचें अनुष्ठान करूं लागले. त्यांच्या राज्यांत चारी वर्णांचे लोक आपापल्या धर्माप्रमाणें आचरण करीत असत.

सीतापतीच्या सुराज्यांत सत्याचा प्रचार अधिक होता. प्रायः सर्व लोक सत्यवादी होते. यामुळें त्यांच्या न्यायमंदिरांत अधिक गर्दी रहात नसे, तेव्हां अर्थातच वकिलांचें काम नसे; अथवा असें म्हटलें तरी चालेल कीं, त्यांच्या राज्यांत एकहि खोटें काम होत नव्हतें. कारण जें खरें असेल, न्याय्य असले, व धर्मयुक्त असेल, तेथें मध्यस्थाची काय आवश्यकता आहे? जेथें साक्षात् न्यायमूर्ति धर्मावतार न्यायासनावर विराजमान होत असत, तेथें अधर्माचें व अन्यायाचें काम काय! ज्याप्रमाणें अग्नीजवळ शीत येत नाहीं, व

धर्मासमोर अधर्म दिसत नाहीं, त्याचप्रमाणें रामचंद्राच्या राज्यांत अधर्म, अन्याय, व दुराचाराचें नांवहि ऐकूं येत नसे.

आतां सीतादेवी राजमहिषी झाली. परंतु याचा अर्थ कोणी असा करूं नये कीं, याच्यापूर्वी तिला कांहीं कमी होतें. ज्यादिवशीं सीतादेवी आपल्या पतीबरोबर चौदा वर्षें वनवासाला गेली होती, त्या दिवशींहि तिला कांहीं कमी आनंद नव्हता. वनवासांतहि तिनें कधीं दुःख मानिलें नाहीं. सीतादेवी पतिव्रता, पतिपरायण असल्यामुळें पतिदेवाच्या चरणसेवेंतच तिला नेहमीं सुख वाटे. त्याच्या चरण सरोरुहाच्या दर्शनांतच तिनें वनवासाचे दिवस मोठ्या आनंदानें घालविले. तिनें केव्हांहि आणि कसल्याहि गोष्टीकरितां कधीं खेद दाखविला नाहीं. सीतादेवी, राजपुत्री, व राजस्नुषा, तशीच स्वतःअति सकुमार असूनहि पतीबरोबर चौदा वर्षेपर्यंत आनंदानें वनांत राहिली. तिच्या मनांत प्राकृतिक सौंदर्याची लालसा स्वाभाविक असल्यानें त्याचें निरीक्षण करण्यांत व स्वामीच्या चरणकमलांची सेवा करण्यांतच तिनें वनवासांतील कष्टांना, व दुःखाला सुखच मानिलें. दुष्ट रावणाच्या बंदींत जें तिला दुःख झालें तें खरें दुःख. त्यांत खरें दुःख दिला पतिवियोगाचेंच होतें. वास्तविक पतिव्रता स्त्रीला पतीच्या सेवेंतच जो आनंद वाटतो, त्याच्या सहवासांत जें अनुपम सौख्य वाटतें, तें दुसरें कशांतच वाटत नाहीं. असो.

सीतादेवी राजमहिषी झाल्यामुळें आतां तिच्या आनंदाला सीमाच नव्हती. तिला कोणी सवत नव्हती. तिचे स्वामी कोणाहि स्त्रीकडे नुसत्या वांकड्या नजरेनें पहात नसत. ते जसे जितेंद्रिय व धर्मपरायण होते, तसेच आपल्या पत्नीविषयीं अत्यंत अनुरागी होते. ते सीतेला प्राणाहूनहि प्रिय समजत असत. राजमहिषी सीतादेवी आज खरोखरच मोठी भाग्यशालिनी आहे. आज ती आपल्या स्वामीबरोबर समस्त राज्यैश्वर्याची अधीश्वरी झाली आहे. आज

शेंकडों भृत्यवर्ग तिच्या कृपाकटाक्षाची अपेक्षा करीत आहे. रामचंद्राला आपल्या प्रतापानें राज्यशासन व प्रजापालन करतांना पाहून सीतेला परमावधीचा आनंद वाटे. परंतु असा गौरव प्राप्त झाला असतांहि सीतादेवीला लेशमात्रहि अभिमान उत्पन्न झाला नाहीं. त्याचप्रमाणें तिच्या स्वभावांतहि किंचित् देखील बदल झाला नाहीं. लहानपणापासून जरी तिचें चरित्र पाहिलें, तरी अतिरिक्त अवस्था परिवर्तनामुळेंहि तिच्यांत फरक झाला नव्हता. राजमहिषीला ज्या गुणांची आवश्यकता होती, ते सर्व गुण सीता देवीमध्यें होते. एवढ्या मोठ्या राज्याची अधिष्ठात्री असूनहि सीतादेवी मोठी श्रद्धापूर्वक पतिसेवा करीत होती; इतकेंच नव्हे तर, ती आपल्या सासवांचीहि सुश्रुषा मोठ्या आनंदानें करीत होती.

सीतादेवी स्वामीच्या सुखालाच आपलें सुख समजे. त्याच्या भाग्यांत आपलें भाग्य व त्याच्या यशांतच आपलें यश मानी. आपल्या कर्तव्यपालनांत ती नेहमीं दत्तचित्त रहात असे. तिनें आपल्या कर्तव्यपालनांत केव्हांहि उणेपणा येऊं दिला नाहीं.

रामचंद्र नेहमीं राज्यकारभार आटोपल्यावर मध्यान्हीनंतर राजमंदिरांत येऊन सीतादेवीबरोबर गोष्टी बोलत बसत. त्या वेळेस तीहि पण सुंदर वस्त्रभूषणांनीं सुमंडित होऊन पतीबरोबर नाना विषयांवर बोलत बसे.

याप्रमाणें पुष्कळ दिवसपर्यंत अनेक सुखोपभोग भोगीत असतां एके दिवशीं सीतेच्या मुखमंडलावर पांडुरता पाहून रामचंद्र मनांत आनंद पावले. अनेक लक्षणांवरून सीता देवी गरोदर असल्याचें त्यांस समजून चुकलें. त्यांनीं अत्यंत प्रेमानें सीतेला अंकावर घेऊन विचारिलें कीं, ‘ प्रिये, मी पाहतों तों गर्भिणी स्त्रीच्या मुखावर जीं चिन्हें दिसून येतात तीं मला तुझ्या मुखावर सांप्रत दिसत आहेत. याकरितां मी तुला आनंदानें विचारतों कीं, या वेळीं तुला जी

इच्छा होत असेल ती तूं मोकळ्या मनानें मला सांग. तें तुझें प्रिय-काम, ती तुझी इच्छा, मी मोठ्या आनंदानें पूर्ण करीन.

हें आपल्या प्रिय नाथाचें प्रिय भाषण ऐकून सीतादेवी लज्जेनें खालीं मुख करून किंचित् मंदहास्य करून बोलली कीं, 'नाथ, या वेळीं मला ऋषींच्या आश्रमांचें दर्शन घ्यावें अशी प्रबल इच्छा झाली आहे. जेथें भगवती भागीरथीच्या तीरावर महामुनि तपश्चर्या करितात, तेथें जाऊन त्या पुण्य तपोभूमीचें दर्शन करावें असें मी इच्छितें. फार दिवसांकरितां नाहीं फक्त एकच दिवसाकरितां जर आपण मला वन्य आश्रमांचें दर्शन करविण्याची कृपा कराल आणि ही माझी इच्छा पूर्ण कराल तर उत्कृष्ट होईल.'

सीतादेवीला पूर्वीपासूनच सृष्टिसौंदर्य पाहण्याची फार आवड होती, हें आम्ही मागें अनेक वेळां सांगितलें आहे. तिच्या जीवन-चरित्रांत विशेषच असेल तर तीं याच गुणामुळें आहे. राजमहिषी असून राज्यसुखाचा त्याग करून वनांतील फळें खाण्याची इच्छा होणें ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? प्रिय स्वजन सोडून सिंहमृगाकीर्ण अशा भयंकर वनांत जाण्याची प्रबळ इच्छा होणें हें तिच्या प्रकृतिसौंदर्य प्रियतेचें प्रत्यक्ष लक्षण नव्हे का! परंतु हाय! हे अभागी जानकी, ही तुझी लालसा, ही तुझी वन्य आश्रमाबद्दलची दिदृक्षा तुझा सर्वस्वीं नाश करण्याला कारण होईल, हें तुला माहीत नाहीं. असो.

प्रियतमा जानकीचें हें भाषण ऐकून रामचंद्रांनीं तिला दुसऱ्या दिवशीं तपोवनांत पाठविण्याचें कबूल केलें. तें ऐकून सीतेला आनंद झाला. तिला आनंदांत पाहून रामचंद्रहि उल्हसित अंतः-करणानें दुसरीकडे अन्य कामाला निघून गेले.

सातवें कांड.

सीता वनवास.

मागें आम्हीं सांगितलेंच आहे कीं, ' रामचंद्र पुत्रवत् प्रजेचें पालन करीत होते. त्यांच्या राज्यांत कोणीहि मनुष्य निर्धन नव्हता, तसाच चिर–रोगीहि नव्हता. सर्व लोक मोठ्या प्रसन्नतेनें आपापलीं कामें करीत असत. त्यांच्या सुशासनानें प्रजा इतकी संतुष्ट होती कीं, ती त्यांस पित्याप्रमाणें मानीत असे. त्यांनीं चांगल्या राज्यपद्धतीनें थोड्याच अवकाशांत प्रजेला आपल्या मुठींत ठेविलें, एवढेंच नव्हे, तर प्रजेच्या धर्माचेंहि त्यांनीं उत्तम प्रकारें रक्षण केलें. त्यांनीं कोणाच्याहि धर्माला दुखविलें नाहीं. राजा प्रजेच्या धनाचा आणि जीविताचा जसा रक्षक असतो, तसाच तो प्रजेच्या धर्माचाहि शास्ता असतो. जो राजा प्रजेच्या धर्माचें रक्षण करीत नाहीं, तिची धार्मिक उन्नति करण्यास सहाय्य करीत नाहीं, तो फक्त नांवाचा मात्र राजा होय. जो राजा प्रजेच्या मालमत्तेचें रक्षण करून तिचें पुत्राप्रमाणें पालन करतो, आणि प्रजेच्या धर्माला धक्का पोहचूं देत नाहीं, त्यालाच धर्मशास्त्रांत राजा ही उपमा दिली आहे. रामचंद्राप्रमाणें उदार, न्यायप्रिय, न्यायकर्ता, आणि धर्मात्मा राजा ज्या प्रजेचें शासन करीत आहे, त्या प्रजेचें खरोखर केवढें भाग्य ! त्याचें वर्णन किती करावें.

आपल्या प्रजेला सुखी आणि उन्नत पाहून रामचंद्रांना अपार हर्ष वाटे. ते निर्भयतेनें राज्य करीत होते. ते कशालाहि भीत नसत, इतकी त्यांच्यांत निर्भयता होती. त्यांना जर भीति असेल तर ती दोन गोष्टींची होती. एक अधर्म आणि दुसरी अपयश, यांची.

किंचित्‌हि अपयशापासून ते दूर दूर जात असत. लोकनिंदा सहन करण्याची त्यांच्यांत मुळींच शक्ति नव्हती. तिला ते इतके भीत असत कीं, मिथ्या अपवादापुढें ते आपल्या स्वतःच्या दृढविश्वासावर भरवंसा ठेवीत नसत, व त्याची मग तितकी पर्वाहि करीत नसत. रामचंद्रासारख्या धर्मपरायण महापुरुषांत असला स्वभाव म्हणजे मोठा दोष नव्हे काय! काय, कोणाच्याहि खोट्या अपवादाच्या भीतीनें त्यांनीं आपला खरा विश्वास पायाखालीं तुडविलाच पाहिजे! केव्हांहि असें होतां कामा नये! परंतु रामचंद्र मिथ्या अपवादापुढें त्याची पर्वा करीत नसत, ही गोष्ट खरी आहे. या मनाच्या दौर्बल्यामुळें एक वेळां त्यांनीं मोठा अनर्थ करून सोडला. तो सीतादेवींच्या भविष्य कालच्या जीवनांत पुढें येईलच.

रामचंद्राविषयीं आम्हीं जें वर दोषपूर्ण विवेचन केलें आहे, तें आमचें स्वतःचें मत आहे. हें आमचें मत, विचार, अनुमान, कदाचित् भ्रामक असेल. मोठ्यांच्या गोष्टी मोठेच जाणोत. 'सर्वं हि महतां महत्' या लोकोक्तीप्रमाणें मोठ्याचें सर्व कांहीं मोठेंच असतें. त्यांच्या या स्वभावदौर्बल्यांत एखादी महत्त्वाची गोष्ट गुप्त असल, दुसऱ्या एखाद्या मोठ्या उद्देशानें त्यांनीं आपलें हें मनाचें दौर्बल्य जाणूनबुजून तसेंच कायम ठेविलें असल्याचा संभव आहे. असो, आम्हीं येथें एवढेंच अवश्य सांगतों कीं, रामचंद्राच्या या मनोदौर्बल्यामुळें बिचाऱ्या निरपराध सीतादेवीला मात्र तिच्या आयुष्याच्या शेवटच्या भागांत असह्य कष्ट भोगावे लागले

प्रजेच्या अंतरबाह्य भागांतीलही बातम्या समजण्याकरितां रामचंद्रानीं गुप्त हेरांची योजना केली होती. ते रोज रात्रीं येऊन रामचंद्रांना सर्व राज्यांतील, व शहरांतील वर्तमान कळवात असत.

सीतादेवीला वनांत जाऊन ऋषींच्या आश्रमांचें दर्शन करून ये असें सांगून, ज्या ठिकाणीं सर्व हेर येऊन बातम्या देत असत,

त्या ठिकाणीं रामचंद्र बातम्या ऐकिण्याकरितां येऊन बसले. त्या-दिवशीं एका हेरानें येऊन सांगितलें. कीं, ' महराज, सर्व प्रजा आपली प्रशंसा करीत आहे, परंतु आज एका साधारण मनुष्याच्या तोंडून एक गोष्ट ऐकिली. आज्ञा होईल तर सांगतों. ती गोष्ट अगदीं खोटी आहे, ती आपण ऐकिली तर आपणास अत्यंत दुःख होईल हेंहि खरें आहे. तथापि, " तूं जें काय ऐकशील तें सर्व येऊन आम्हांला सांगत जा, मग ती आमची निंदा असो, किंवा स्तुति असो, कांहीं असो; ' अशी आपण मला आज्ञा केली आहे, म्हणून ती आज्ञा पाळण्याकरितां मी ती आपणांस सांगतों, ती प्रभूनें ऐकावी.

' एका साधारण मनुष्याला,' ' महाराज, मीं असें बोलतांना ऐकिलें आहे कीं, ' रामचंद्र तसे तर मोठे सत्यप्रतिज्ञ, धर्मात्मा, शूर, वीर, आणि प्रजावत्सल आहेत. परंतु कित्येक महिने रावणाच्या घरीं राहिलेल्या सीतेचा त्यांनीं पुनः स्वीकार कां व कसा केला, हें माहीत नाहीं. जर राजाच धर्माचा विचार बाळगीत नाहीं, तर प्रजा काय राखणार ? माझ्यावर जर कदाचित् तसाच प्रसंग आला, तर मग मीहि तसेंच करीन.'

हें त्या हेराचें भाषण ऐकतांच रामचंद्राच्या हृदयावर वज्रा-घात झाल्याप्रमाणें झालें. सीतादेवीच्या पवित्र चरित्रावर सामान्य प्रजेनें खोटा कलंक लाविल्याची गोष्ट ऐकून त्यांचें मस्तक फिरूं लागलें. त्यांच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली. सीतादेवीच्या शुद्ध चारित्र्याविषयीं त्यांचा पूर्ण विश्वास होता. जानकीचें चरित्र सर्वथा निष्कलंक आहे, अशी त्यांची पूर्ण खात्री होती. तथापि सामान्य मनुष्याच्या तोंडून मिथ्यापवादाची गोष्ट ऐकतांच त्यांची मनोवृत्ति गडबडून गेली. अधीरपणानें त्यांच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. ते आपल्या दुर्भाग्याची निंदा करून आपल्याशीं म्हणाले, ' हाय!

निरपराधिनी, प्रेमाची प्रतिमा, प्रियतमा जानकी मी घरांतून कशी बाहेर काढून लावूं ! प्रियेशिवाय मी कसा जिवंत राहीन ? मला मृत्यु कां बरें येत नाहीं ? जानकीचा त्याग करून राजा जनकाला मी कसें तोंड दाखवूं ? हा लोकापवादरूपी कलंक जानकीचा त्याग केल्याशिवाय धुवून टाकणें अगदीं असंभाव्य आहे. हाय ! प्रिये जानकी, हा रामजीविते, हा प्राणप्रिये, तुला मी कसें वेगळें ठेवूं ? ' याप्रमाणें सीतेच्या दुःखानें रामचंद्र अगदीं विव्हल होऊन गेले.

इतक्यांत भरत व लक्ष्मणहि तेथें येऊन पोहचले. दुरूनच रामचंद्राला दुःखी पाहून त्यांच्या मनांत नानाप्रकारच्या कल्पना उद्भवल्या. ते जवळ येतांच रामचंद्राचा दुःखावेग अधिकच वाढला. थोड्या वेळानें दुःख आंवरून त्यांनीं सीतेवर आलेल्या अपवादाची गोष्ट त्यांना सांगितली. नंतर ते लक्ष्मणाला म्हणाले, ' बा लक्ष्मणा, आपल्या अनुपस्थितींत दुष्ट रावणानें पंचवटींतून जानकीला चोरून नेलें होतें. त्या अपमानाचा बदला त्याला रणांत ठार मारून आह्मी घेतला. तो मेल्यावर जेव्हां माझ्या सन्निद्ध जानकीला घरीं आणिलें होतें, तेव्हां तिच्या चरित्राबद्दल मी संदेह प्रकट केला होता. त्याचें कारण तिचें चरित्र कलंकित होतें म्हणून नव्हे; तिच्या पावित्रपणावर, सदाचारावर, माझा पूर्ण भरंवसा होता. मी तिला नेहमीं निष्पाप समजतों, परंतु अपयश दूर करण्याकरितां केवळ लोकोपचाराच्या विचारानें मीं तिच्या शुद्ध चरित्राबद्दल त्या वेळीं शंका प्रदर्शित केली होती. ती शंकाहि जानकीनें दिव्य करून सर्वांसमक्ष दूर केली. देव, ऋषि, आणि मुनि या सर्वांनीं सर्वजनांसमोर जेव्हां जानकी शुद्ध आहे असें सांगितलें, तेव्हांच मीं तिचा स्वीकार केला. परंतु मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं, अजूनही कांहीं लोक जानकीला पापदुषित समजतात.

हें भाषण करतां करतां, रामचंद्राच्या डोळ्यांतून अधिक वेगानें अश्रुधारा वाहूं लागल्या. तो लोकापवाद ऐकून त्यांच्या हृदयाला जितक्या या वेळीं वेदना झाल्या, तितक्या पूर्वीं केव्हांच झाल्या नव्हत्या. कांहीं वेळानंतर ते म्हणाले, 'असो, जानकीच काय; पण मी आल्या प्राणाचा सुद्धां या अपयशाच्या भीतीनें त्याग करीन. त्याचप्रमाणें तुमचा सर्वांचाहि मी त्याग करीन. मी निंदितजीवन सर्वथा त्याज्य समजतों. मला जन निंदेमुळें जितकें दुःख होतें, तितकें मरणामुळेंहि वाटणार नाहीं. एवढ्याकरितां हे बंधो, तूं उद्यां प्रातःकाळीं जानकीला रथांत बसवून गंगेच्या पार तमसा नदीच्या कांठीं जेथें वाल्मिकी मुनीचा आश्रम आहे, तेथें नेऊन एकांत जागीं सोडून दे. यांत पणबीण करण्याचें कांहीं कारण नाहीं. मला जर तूं श्रेष्ठ, वडील समजत असशील तर, माझ्या सांगण्याप्रमाणें कर. जानकीचा त्याग केल्याशिवाय मी या अपवाद रूप दुःख सागरांतून बाहेर निघणार नाहीं. तिनें स्वतःच तापसांच्या आश्रमाचें दर्शन करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. मी तिला जाण्याची आज्ञाहि दिली आहे. असें केल्यानें तिचीहि पण इच्छा पूर्ण होईल, असें बोलून अश्रुविसर्जन करीत रामचंद्र शयनागारांत निघून गेले; आणि लक्ष्मण व भरतहि शोक करीत तेथून आपापल्या कामाला चालते झाले.

प्रातःकाल झाल्यावर लक्ष्मणानें सुमंत्राला रथ जोडून आणण्यास आज्ञा केली. नंतर तो सीतेजवळ जाऊन तिला म्हणाला, 'आर्ये' आपल्या इच्छेप्रमाणें माननीय भ्रात्या रामचंद्रानें तुला वनांत जाण्याची आज्ञा दिली आहे. आतां रथ तयार होऊन येईल, आपण तयार असा.' सीतेनें सांगितलें कीं, 'मी तयार आहें. हीं पहा, मी सर्व वस्त्रें एके ठिकाणीं बांधून देखील ठेविलीं आहेत. हीं मी तेथील ऋषिपत्न्यांना वांटून देईन.'

इतक्यांत सुमंत्र रथ जोडून घेऊन आला. सीतेला रथांत बसवून लक्ष्मणहि बरोबर निघाला. थोड्याच वेळांत रथ अयोध्येच्या बाहेर निघून गेला. अनेक वनें, उपवनें, वाटिका, नदी, नद, सरोवरें, त्याचप्रमाणें अन्यान्य प्राकृतिक सौंदर्य पाहून सीतेला हर्ष झाला. ती मनांतल्या मनांत आपल्या पतीच्या सुस्वभावाची, आणि अनुरागशीलतेची प्रशंसा करून, रामचंद्राला धन्यवाद देऊं लागली. परंतु तिचा तो आनंद क्षणांत मावळला. तिचें चित्त चंचल झालें. तिच्या डोळ्यांपुढें एकदम अंधार पसरला. तिचें हृदय कांपूं लागलें. कंठ कोरडा पडूं लागला. हें पाहून सीता मनांत भिऊन म्हणाली, 'मला हें असें कां बरें होतें?' असें आपल्याशीं बोलून ती लक्ष्मणाच्या तोंडाकडे पाहूं लागली. त्याचेंहि तोंड उतरलेलें पाहून तिला अधिकच आश्चर्य वाटलें. तिची ती शंका त्याच्याकडे पाहून दृढ झाली. ती लक्ष्मणाला म्हणाली, 'भावोजी' माझें मन या वेळीं अस्वस्थ कां होत आहे, कोण जाणे! सांगा, स्वामी तर आनंदांत आहेत ना? आपल्या कुटुंबांतील इतर मंडळी तर खुशाल आहेत ना? नगरवासी जनांवर कांहीं संकट तर येणार नाहीं ना? सीतेला अत्यंत व्याकूळ पाहून लक्ष्मणानें आपला दुःखावेग मोठ्या कष्टानें दाबला, आणि तो तिची समजूत घालूं लागला. सीताही आपल्या कुटुंबांतील मंडळी, पति, व नगरवासी जन यांच्या मंगलाकरितां देवाला मनांत प्रार्थना करूं लागली.

जेव्हां रथ गंगेच्या जवळ गेला, तेव्हां दुरूनच गंगेला पाहून लक्ष्मणाचें हृदय अधीर झालें. त्या वेळीं तोहि आपला दुःखावेग दाबूं शकला नाहीं. त्यालारि रडें कोसळलें. लक्ष्मणाची ती स्थिति पाहून सीता अधिक घाबरली. ती म्हणाली, 'वत्सा, तूं मला गंगेपार पोंचीव. आपण हीं वस्त्रें तपस्विनींना देऊन व आश्रमांचें दर्शन करून उद्यां परत अयोध्येला जाऊं. येथें चार दिवस राहून व

फिरून मौज पाहावी, आणि नंतर अयोध्येला जावें, असें प्रथम माझ्या मनांत होतें, पण या वेळीं माझें मन अस्वस्थ झालें आहे. त्यांतून तुझी विकलता पाहून माझें राहिलेंसाहिलें धैर्य पार नाहींसें झालें आहे. मी तुझ्याबरोबर उद्यांच अयोध्येला येईन. केव्हां एकदां स्वामींचें दर्शन घेईन असें मला झालें आहे.

नंतर लक्ष्मणानें सीतेला नावेंत बसवून गंगापार केलें. पैलतीरा-वर पोहोंचतांत त्याचें मन पूर्वींपेक्षांही अधीक अधिर झालें. आतां तर त्याला दुःखावेग मुळींच आवरला गेला नाहीं. तो लहान मुला-प्रमाणें ओक्साबोक्सीं रडूं लागला. त्याची ती विकल स्थिति पाहून सीता देवी अगदीं व्याकूळ होऊन त्याला म्हणाली, ' वत्सा, तूं असें कां करीत आहेस ? तुला काय होत आहे तें लवकर सांग. तुझे वडील बंधु कुशल आहेत ना? ज्याच्यामुळें तुला इतकें वाईट वाटत आहे, असें दुःखदायक वर्तमान काय सांगावयाचें आहे ? तें बाबा, लवकर सांग. माझें हृदय घोर दुःखानें विदीर्ण होत आहे. ' सीतेचें हें भाषण ऐकून लक्ष्मण सद्गदित होऊन तिला म्हणाला, ' आर्यें, काय सांगूं, महाराज रामचंद्रांनीं लोकनिंदेच्या भीतीनें तुझा त्याग केला आहे. तूं रावणाच्या घरीं राहिली असल्यामुळें राज्यांतील कांहीं लोक तुला दोषी समजतात. जरी स्वतः रामचंद्र तुला सच्चरित्र आणि निष्पाप समजतात, तथापि लोकापवादाच्या भयानें ते तुझा त्याग करीत आहेत. ज्या ठिकाणीं तुला सोडून येण्यास त्यांनीं मला आज्ञा केली आहे, तें स्थल हेंच होय. आर्यें, माझ्यासारखा अभागी या संसारांत दुसरा कोणीच नसेल. मी जर याच्या आधींच मेलों असतों, तर हें दुःख माझ्या दृष्टीस पडलें नसतें. देवि, तूं माझ्यावर रागावूं नकोस. यांत माझा कांहीं अपराध नाहीं. मी तर रामचंद्राचा सेवक आहें. त्यांनीं जी आज्ञा केली ती पाळणें हा माझा धर्म आहे. येथून जवळच वाल्मिक ऋषींचा

आश्रम आहे. ते माझ्या पित्याचे परम मित्र आहेत. आतां तूं त्यांना शरण जाऊन आपला शेषकाल त्यांच्या पुण्यसमागमांत घालवावा. माझ्यावर कोप करूं नकोस. माझे अपराध क्षमा कर.' लक्ष्मणाच्या तोंडून हें हृदयविदारक भाषण ऐकतांच सीता अचेतन होऊन भूमीवर पडली. कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन ती अश्रुपूर्ण नयनांनीं लक्ष्मणाला म्हणाली, 'हे लक्ष्मणा, यांत बाबा तुझा कांहींच अपराध नाहीं. मला वाटतें कीं, विधात्यानें मला या जगांत दुःख भोगण्याकरितांच जन्मास घातलें आहे. असें नसतें तर इतके कष्ट मला कां भोगावें लागते ? अथवा विधात्याचाहि कांहीं दोष नाहीं. मीं जसें कर्म पूर्वी केलें असेल, तसें मला फळ मिळत आहे. मीं कोणत्या तरी स्त्रीला तिच्या पतीपासून वेगळें केलें असेल, तेव्हां हें आतांचें दुःख त्याचेंच फळ असेल. मला निष्पाप समजूनही जर माझे पति माझा त्याग करीत आहेत, तर यापेक्षां आणखी दुर्भाग्य तें कोणतें असणार ! हाय, या निर्जन वनांत मी एकटी कशी राहूं ? मी आतां आपलें दुःख कोणाला सांगूं. जेव्हां महर्षि आणि त्यांचे शिष्य त्याग करण्याचें कारण मला विचारतील, तेव्हां मीं त्यांना कितीहि समजून सांगितलें तरी मोठ्या अपराधामुळेंच रामचंद्रांनीं हिला टाकून दिलें असेल, असेंच ते म्हणणार. मी कसें बोलून आणि काय सांगून त्यांचें समाधान करूं. लक्ष्मणा, जर मी गर्भवती नसतें, व रामचंद्राचा वंशधर गर्भ माझ्या उदरांत नसतां, तर मीं तुझ्या समक्षच गंगेंत उडी टाकून खचित आत्मघात केला असता. मी तुझा दोष कांहींच समजलें नसतें. तूं तर आपल्या बंधूची आज्ञा पालन केलीस. असो. मी आतां माझ्या कर्माचें फल भोगीन. तूं अयोध्येला परत जा. तेथें जातांच माझ्या सासूबाईंना माझे नमस्कार सांग. धर्मनिष्ठ महाराजांनाहि कुशलपूर्वक माझें अभिवादन सांगून माझ्यातर्फे अशी

विनंति कर कीं, ' मी शुद्धाचरणी आहें किंवा नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या चरणीं माझा अनुराग किती आहे, या सर्व गोष्टी आपल्याला चांगल्याप्रकारें माहीत आहेत. आपण माझा जो अशा दीन अवस्थेंत परित्याग केला आहे, तो केवळ लोकनिंदेमुळेंच केला आहे, यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आपण मला निष्पाप समजत आहांत, ही माझी खात्री आहे. आपण माझा त्याग करून चांगलें काम केलें. ' मिथ्या–अपवाद-हि यशाला खाऊन टाकतो,' याकरितां यशोर्थी पुरुषानें तो सहन करूं नये. मला आशा आहे, कीं जसे तुम्ही आपल्या बंधूंना प्रिय समजून त्यांचें पालन करीत आहांत, तसेंच प्रजेलाहि समजून तिला संतुष्ट ठेवाल. प्रजेचें मनरंजन करणें, हाच राजाचा मुख्य धर्म आहे. आपण आपल्या निर्मल चरित्राला कोणत्याही प्रकारचा कलंक लागूं देणार नाहीं, ही माझी पूर्ण खात्री आहे. स्त्रीचें सर्वस्व पति हाच आहे; तोच तिचा देव आहे, तोच तिची गती, व तोच तिचें जीवन आहे, हेंच शास्त्राचें रहस्य आहे, हेंही मला ठाऊक आहे. आपल्या मांगल्यांकरितां माझे प्राण गेले तरी मला त्यांत संतोष आहे. शेवटीं माझी इतकीच विनंती आहे कीं, आपण माझ्या अपराधाची क्षमा करावी. मी आपल्याला नमस्कार करतें.'

सीतेचें हें करुणाजनक भाषण ऐकून लक्ष्मणाचें हृदय दुःखानें भरून आलें. त्याच्यानें बोलवेना. सीतेला नमस्कार करून तो स्फुंदत स्फुंदत म्हणाला, ' देवी, मी आतां जातों. तुम्ही माझ्यावर संतुष्ट रहा ' इतकें बोलत असतां, त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वहात होत्या. शेवटीं सीतेला प्रदक्षिणा करून परत जाण्याकरितां तो नावेंत बसला, आणि पाहतां पाहतां परतीराला पोंहचला. जातांना तो वारंवार मागें वळून सीतेकडे पहात होता; सीताहि त्याच्याकडे पहात होती. जेव्हां लक्ष्मण रथ घेऊन दूर निघून

दृष्टि आड झाला, तेव्हां सीता स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. त्या-वेळीं तिला जें दुःख झालें, त्याच्या शतांशाचेंहि आम्ही वर्णन करूं शकत नाहीं.

सीतेच्या आर्तस्वरानें तें सर्व वन, तसेच आश्रमहि भरून गेले. तिच्याजवळच कांहीं ऋषिकुमार फुलें, समिधा, पानें, वगैरे आणण्याकरितां आले होते. सीतेचें तें कारुणिक क्रंदन ऐकून ते तिच्याजवळ आले. तिची ती दुःखाकुल अवस्था पाहून त्यांनीं आश्रमांत जाऊन ती सर्व हकीकत वाल्मीकि ऋषींस कळविली. तें वृत्त ऐकतांच स्वतः वाल्मीकि ऋषि उठून तेथें तिच्याजवळ आले. पहातांच त्यांनीं तिला ओळखिलें. ते तिला प्रेमानें म्हणाले, 'वत्से, तूं राजा दशरथाची स्नुषा आहेस. तूं राजा जनकाची कन्या व धर्मधुरंधर राजा रामचंद्राची प्रियतमा धर्मपत्नी आहेस. तुझें येथें येण्याचें कारण मला माहीत आहे. मला हेंहि ठाऊक आहे कीं तूं अगदीं पवित्र आहेस. बाळे, आतां तूं रडूं नकोस. धैर्य धर, आणि माझ्या बरोबर आश्रमांत चल. तेथें तूं आनंदानें रहा. मी तुझें कन्येप्रमाणें पालन करीन. माझ्याकडून होईल तितकें तुला कष्ट होऊं देणार नाहीं.

महर्षि वाल्मिकींचें तें अमृतमय वचन ऐकून सीतादेवीनें उठून त्यांना भक्तिपूर्वक प्रणाम केला. नंतर ती त्यांना हात जोडून म्हणाली, 'हे तपोधन, मी आपल्याच पवित्र आश्रमांत राहून आपले दुर्दिन कंठीन.' असें म्हणून सीतादेवी त्यांच्याबरोबर आश्र-मांत निघून गेली. आश्रमांत गेल्यावर वाल्मीकि ऋषींनीं एक नवीन पर्णकुटिका बांधून तींत तिला ठेविलें. त्यांच्याच सांगण्यावरून त्यांच्या आश्रमांत जितक्या तपस्विनी होत्या, तितक्या सर्व सीतेला रिझवावें, तिला दुःख वाटूं नये, म्हणून झटूं लागल्या. देवी जान-

की, मुनिकन्या व मुनिपत्न्या यांच्या सत्कारानें आनंदित होऊन आपले दिवस तेथें कंठूं लागली.

जरी सीतादेवीनें वाल्मीकीच्या आश्रमांत राहून अनेक प्रकारचें प्राकृतिक सौंदर्य पाहिलें, अनेक वन्य पदार्थांचें सेवन केलें, तसेंच जरी अनेक गोष्टींचें निरक्षण केलें, तरी तिच्या पतिविरहानल हृदयाला केव्हांहि शांति मिळाली नाहीं. पतिव्रता स्त्रीला पतीशिवाय सुख, व शांतीं कोठून मिळणार बरें ? कोठूनहि मिळणार नाहीं. याच कारणामुळें अमावस्येच्या निश्चंद्रिका रात्रीप्रमाणें सीतादेवीहि आपलें अंधकारमय जीवन घालवूं लागली.

लोकापवादाच्या भीतीनें रामचंद्रांनीं सीतेला नगरींतून काढून वनांत पाठवून दिलें खरें, परंतु ते तिला आपल्या हृदयमंदिरांतून मात्र काढून टाकूं शकले नाहींत. सीतेनें आपल्या सद्गुणांनीं त्यांचें मन इतकें आकर्षून टाकिलें होतें, त्यांचें अंतःकरण इतकें व्यापून टाकलें होतें कीं, त्यांच्या मनांत नेहमीं सीतेचीच मूर्ति वसत होती. दोघेंहि परस्पर अनुरागाच्या बंधनानें इतकीं बांधिलीं गेलीं होतीं कीं, तीं एकमेकांला क्षणभर देखील विसरत नसत. शरिरानें तीं दोघें भिन्न होतीं. पण मनानें मुळींच नव्हतीं. सीतेच्या वियोगानें रामचंद्राला जें दुःख झालें, तें येथें लिहवत नाहीं. वनांत, गंगेच्या काठीं जशी सीता शोक करीत होती, तसेच तेहि अयोध्येंत दुःख करीत होते. आपल्या प्रियेशिवाय सर्व ऐश्वर्यसंपन्न अयोध्यानगरी त्यांना निर्जनवनाप्रमाणें दुःखदायिनी वाटूं लागली. त्यांचें मन इतकें एखादे वेळीं भडकून जाई कीं, ते शेवटीं शोकसागरांत निमग्न होऊन जात. त्यांचें मन मग कोणत्याच कामांत लागत नसे. ते कोणालाहि भेटत नसत, कोणाचें कांहीं ऐकत नसत, व राजकार्यहि करीत नसत. ' शुद्धाचारिणी, व निरपराधिनी, जनकनंदिनीला लोकापवादाच्या भीतीनें मी वनांत नेऊन सोडिली, '

या गोष्टीचें त्यांना जेव्हां जेव्हां स्मरण होई, तेव्हां तेव्हां त्यांच्या हृदयांत दारुण दुःखाग्नीची ज्वाला प्रज्वलित होई. यामुळें त्यांना दिवसा जेवण जात नसे, व रात्रीं झोंप येत नसे.

याप्रमाणें सीतेला अयोध्येंतून पाठवून दिल्यापासून त्यांची तीन दिवसपर्यंत स्थिति होती. चौथ्या दिवशीं लक्ष्मण अयोध्येस परत आला. तो रिकामा रथ घेऊन आला, हें पाहून रामचंद्र हाहाःकार करून रडूं लागले. सर्वांनीं त्यांची पुष्कळ समजूत केली, परंतु त्यांच्या पत्नीविरहानलदग्ध हृदयाला कशानेंहि शांति वाटेना. त्या वेळेस लक्ष्मणालाहि बरेंच दुःख झालें होतें. वडील बंधु दुःखविव्हल झालेले पाहून त्याचें हृदयहि अधीर झालें. कसें तरी करून त्यानें आपला शोक आंवरला, व रामचंद्राची समजूत केली. तो म्हणाला, 'प्रभो, ज्या प्रजारंजनाकरितां आपण एवढें मोठें दुष्कर कृत्य केलें आहे, त्या राजधर्माचें आतां आपण अनुष्ठान करा. आपल्यासारखे महापुरुष असल्या गोष्टीकरितां विमोहित होत नाहींत. संसारांत सर्व संबंध क्षणभंगुर आहेत. आपल्यासारख्या महाज्ञान्यांना कोणत्याच विरहाचें इतकें दुःख होऊं नये. ज्या लोकापवादाच्या भीतीनें आपण असलें अलौकिक कृत्य केलें आहे, त्याकरितां जर असाच आपण शोक करीत रहाल, आणि राजकार्य करणार नाहीं, तर तो लोकापवाद तसाच राहील. आपण नेहमीं शोकाकुल राहिल्यानें तो लोकापवाद लोकांना नवाच वाटणार. एवढ्याचकरितां शोक आंवरा, आणि धैर्य धारण करून राजकाजांत मन रमवा.'

लक्ष्मणानें व इतर बांधवांनीं त्यांची अशी समजूत घातल्यावर रामचंद्र पूर्वीप्रमाणें राजकाय पाहूं लागले. परंतु सीतेचें विस्मरण त्यांना एक क्षणभर देखील झालें नाहीं. वरून ते राजकार्य करीत, परंतु तें आटोपतांच तें मग काय करीत असत हें आपणांस माहीत आहे काय ? ते मग सर्व आमोदवर्धक गोष्टी सोडून देऊन सीतेचें

ध्यान करीत असत. सीता एकटीच गेली नाहीं, तर ती आपल्याबरोबर रामचंद्राचें सर्व सौख्यच घेऊन गेली. रामचंद्रांनींहि सीतेबरोबर आपलें सुख व आनंद वनांत पाठवून दिला. सीतेला वनांत पाठविल्यावर राजकार्य व प्रजापालन यांशिवाय रामचंद्रांना दुसरें कर्तव्यच राहिलें नव्हतें. परंतु, अशा मनाच्या दुःखित स्थितींतहि त्यांनीं राज्यकारभारांत केव्हांहि घोंटाळा होऊं दिला नाहीं.

तिकडे प्रातःकालच्या चांदणीप्रमाणें, व मेघाच्छन्न विजेप्रमाणें आणि धूलिधूसरित सुवर्णरेखेप्रमाणें शोचनीय आणि प्रभाहीन अवस्थेंत सीता वाल्मिकीच्या आश्रमांत राहून तपश्चर्या करूं लागली. तीहि रात्रंदिवस पतिचिंतनांत व त्याचे गुणवर्णनांत अनुरक्त असे. ती सदैव पतीचें मंगल चिंतित असे. तिला स्वतःच्या वनवासांतील दुःखाचें कांहींच वाटत नसे. आपल्या हातून पतीची सेवा मुळींच होत नाहीं, याचेंच तिला अतिशय दुःख होत होतें. पतीपासून ती पुष्कळ दूर राहिली होती, तरी तिचें मन पतिचरणींच असे. त्या वेळीं सीतेला जें दुःख झालें, तें तिनें मोठ्या धैर्यानें सोसलें. ती नेहमीं म्हणे कीं, माझ्या स्वामींनीं जें कांहीं केलें, तें योग्यच असलें पाहिजे. वनवासांतील दुःखासंबंधानें स्वप्नांतहि तिनें कधीं रामचंद्राच्या विषयीं दुर्भाव प्रकट केला नाहीं. नेहमीं ती पातिव्रत्य धर्माचें पालन करीत असे.

रामचंद्रांनीं जेव्हां सीतेला वनांत पाठविलें, तेव्हां ती गर्भवती होती, हें वाचकांना स्मरत असेलच. दहा महिने पूर्ण झाल्यावर तिला दोन जुळे मुलगे झाले. तिचे ते पुत्र देवकुमारांसारखे सौंदर्यवान होते. वाल्मीकि मुनींनीं मोठ्या हर्षानें त्यांचें जातकर्म करून विधिपूर्वक नामकरणहि केलें. त्या दोघां कुमारांत जो प्रथम जन्मला तो वडील; त्याचें नांव कुश, आणि मागून जन्मला तो लव. आपल्या देवतुल्य सुंदर पुत्रांना पाहून सीतादेवीच्या नेत्रांतून अश्रु-

धारा वाहूं लागल्या. वाल्मिकी मुनींच्या देखरेखीखालीं त्यांचें लालनपालन व शिक्षण झालें. जेव्हां ते दोघे कुमार मोठे झाले, तेव्हां ते रामचंद्राप्रमाणें दिसूं लागले. जरी त्यांची नेहमींची राहणी ऋषिकुमारांप्रमाणें होती, तरी वाल्मिकी मुनींनीं त्यांना क्षत्रियांप्रमाणें शिक्षण दिलें होतें. त्यांना विद्यारंभसंस्कार झाल्यावर ते लवकरच सर्व शास्त्रांत प्रवीण झाले. त्यांनीं आपल्या कुशाग्रबुद्धीनें अनेक शास्त्रांचें पठन केलें. थोड्याच काळांत ते विद्वान् झाले.

वामीकिरामायण वाचल्यावर असें आढळून येतें कीं, ज्या वेळेस रावणाला मारून रामचंद्र अयोध्येस आले, व त्यांस राज्याभिषेक होऊन ते राज्यकारभार पाहूं लागले, तेव्हां एकदां नारदमुनि महर्षि वाल्मिकीच्या आश्रमांत आले होते. तेव्हां वाल्मीकींनीं विचारल्यावरून नारदांनीं सांगितलें कीं, या जगांत सर्व पुरुषांत उत्तम, धीर, वीर, धर्मज्ञ, सत्यसंघ, प्रजापालक, गोब्राह्मणसेवक, पितृभक्त नीतिज्ञ, गुणी, कृतज्ञ, दृढव्रत, सच्चरित्र, परोपकारी, विद्वान, समर्थ, प्रियदर्शन, जितक्रोध, तेजस्वी. क्षमेमध्यें पृथ्वीसमान, दानांत कुबेरासारखा आणि महाबुद्धिमान, असा एकच पुरुष आहे. त्याचें नांव ' रामचंद्र. ' हे महर्षे, तूं त्याचें अलौकिक आणि पावन चरित्र काव्यरूपानें वर्णन कर. माझ्या मतें रामचंद्राच्या चरित्रासारखें दुसऱ्या कोणाचें चरित्र पवित्र व अनुकरणीय नाहीं.

याप्रमाणें देवर्षि नारदाच्या सांगण्याप्रमाणें वाल्मिकींनीं ' रामायण ' या नांवाचें काव्य लिहिण्यास आरंभ केला. त्या काव्याची त्यांनीं सहा कांडें केलीं. ज्या वेळेस कुश आणि लव प्रौढ होऊन विद्वान झाले, त्याच सुमारास त्यांचें तें काव्य पूर्ण झालें. आदिकवि वाल्मीकींनीं तें स्वरचित मनोहर काव्य कुमार कुशलवांना शिकविलें. त्या दोघांनीं आपल्या तीक्ष्ण बुद्धीनें तें सर्व काव्य लवकरच तोंडपाठ केलें. त्यांची वाणी मधुर, आणि रसवंती होती. जेव्हां ते

दोघे वीणा घेऊन तें काव्य सुरावर म्हणत, तेव्हां त्यांचें तें गायन मोठें सुस्वर आणि मनोहर होत असे.

सीतादेवीचे ते दोघे कुमार निरनिराळ्या ऋषींच्या आश्रमांत जाऊन तें काव्य गाऊन दाखवीत असत. एक तर मर्यादापुरुषोत्तम रामचंद्राचें तें परम पावन चरित्र, दुसरें आदिकवि श्री वाल्मीकि मुनींची ओजस्विनी कविता, आणि तिसरें दोघां कुमारांचे गोड व मनोहारिणी कंठ, मग काय विचारावें बरें! सुवर्ण व सुगंध यांचाच तो मिलाफ—ज्या वेळेस ते कुमार गाणें गात असत, त्या वेळेस मनुष्यच काय, पण पशु, पक्षीहि त्यांचें तें गाणें ऐकून मोहित होत असत. त्यांचें गायन ऐकून ऋषि, मुनि, वगैरे त्यांना नानाप्रकारच्या वस्तु संतुष्ट होऊन बक्षीस म्हणून देत असत.

एके दिवशीं महर्षि आपल्या आश्रमांत बसले होते. इतक्यांत एका दूतानें येऊन त्यांच्या हातीं एक पत्र दिलें. त्यांनीं पत्र उघडून पाहिलें तों हस्ताक्षर श्री रामचंद्राचें होतें. त्यांत रामचंद्रांनीं त्यांस शिष्यांसह आपल्या यज्ञोत्सवाकरितां बोलाविलें होतें. त्या निमंत्रणाचा स्वीकार करून वाल्मिकी आपल्या शिष्यांसह अयोध्येस चालले. कुश व लव त्यांच्याबरोबरच होते. वाल्मिकीच्या सांगण्यावरून दोघे कुमार जेथें तेथें गात असत. त्यांनीं त्या दोघांस हेंहि पण सांगून ठेविलें होतें कीं, ' जर रामचंद्रांनीं रामायण ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. तर त्यांच्या समोरहि तें गाऊन दाखवा. त्यांनीं त्याबद्दल तुम्हांला जर कांहीं द्रव्य दिलें, तर घेऊं नका. आम्ही फळें, मुळें, खाणारे तपस्वी आहोंत. आम्हांला द्रव्याची मुळींच गरज नाहीं. ' असें त्यांस सांगा. त्यांनीं तुमची ओळख वगैरे विचारिली तर सांगा कीं, ' आम्ही वाल्मीकि मुनींचे शिष्य आहोंत. ' राजा सर्वांचा पिता असतो म्हणून त्यानें सांगितल्यास त्यांस सभेंत गाणें ऐकवा. ' आपल्या गुरुजींच्या सांगण्या-

प्रमाणें कुश, लव, निरनिराळ्या जनसमुदायांमध्यें जाऊन तें रामायण काव्य गाऊन दाखवूं लागले. ज्यांनीं ज्यांनीं त्यांचें गाणें ऐकिलें ते ते सर्व मोहित होऊन गेले. ते ज्या ज्या ठिकाणीं आपलें गायन सुरू करीत त्या त्या ठिकाणीं तें ऐकण्यास मनुष्यांची अगदीं गर्दी जमे.

जेव्हां त्यांच्या गाण्याची प्रशंसा रामचंद्राच्या कानांवर गेली, तेव्हां त्यांनीं त्यांना सभेंत गावयास बोलाविलें. त्यांच्या आज्ञे-प्रमाणें ते सभेंत येऊन ' रामायण ' गाऊं लागले. त्यांचें गाणें ऐकिणें तर दूरच राहिलें, परंतु त्यांचें सौंदर्य व आपल्यासारखेंच रूप पाहून रामचंद्राचें हृदय प्रेमानें भरून आलें. त्यांना पाहतांच रामचंद्राच्या दृष्टीसमोर सीतादेवीची मूर्ति उभी राहिली. हे दोघे कुमार सीतादेवीचेच आहेत, हें ते मनांत समजले. आपल्या पुत्रांना तपस्व्याच्या वेषांत पाहून रामचंद्राच्या नेत्रांना पाणी आलें. ते आपला प्रेमप्रवाह थांबवूं शकले नाहींत. त्यांनीं तावडतोब सभा विसर्जन करून त्यांना सांगितलें कीं, ' आतां तुम्ही जा. आणखी एखादे दिवशीं सवड झाली म्हणजे मी तुमचें गाणें ऐकेन. इतकें सांगून व त्यांच्या गाण्याची पुष्कळ प्रशंसा करून कोषाध्यक्षाला त्यांना विपुल द्रव्य देण्याची त्यांनीं आज्ञा केली. परंतु आपल्या गुरुजीच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं तें घेतलें नाहीं. त्यांची ती निर्लो-भता पाहून रामचंद्राला अत्यंत विस्मय वाटला; व त्यांचा जास्त परिचय करून घ्यावा असें त्यांना वाटलें. त्यांनीं तशी आपली इच्छा दर्शवितांच, ते दोघे कुमार त्यांच्या पुढें हात जोडून मोठ्या नम्रपणें म्हणाले, ' महाराज, आम्ही वाल्मीकि मुनींचे शिष्य आहोंत, असें जरी त्यांनीं सांगितलें तरी हे दोघे कुमार जानकीचे पुत्र आहेत, असेंच त्यांना खात्रीपूर्वक वाटलें. त्यांनाच एकट्याला असें वाटलें इतकेंच नव्हे, तर भरत, लक्ष्मण यांनाहि तसेंच वाटलें. कौस-

त्यादि वृद्ध राण्यांनाहि त्यांना पाहून तसें वाटल्याखेरीज राहिलें नाहीं.

जेव्हां रामचंद्राची याविषयीं पक्की खात्री झाली, तेव्हां त्यांनीं वाल्मिकींना बोलावून आणून सांगितलें, ' भगवन्, जानकी जर शुद्ध आहे, सच्चरित्रा आहे, तर तिनें आपल्या शुद्धतेचा, व सच्चरित्राचा परिचय येथें येऊन सर्वांना प्रत्यक्ष करून द्यावा. येथें येऊन तिनें लोकांत पसरलेला मिथ्यापवाद दूर करावा, ' असें माझें तिला सांगणें आहे. हा माझा निरोप आपण तिला कळवावा.

दुसरे दिवशीं पुनः सभा भरली. तेथें ऋषि, मुनि, राजे, मंत्री वगैरे सर्व लोक जमले होते. त्या यज्ञोत्सवाला, सुग्रीव, हनुमान, बिभीषण वगैरे मित्रांनाहि बोलाविलें होतें. तेहि त्याप्रमाणें तेथें आले होते.

सभेंत जमलेले लोक आपापसांत निरनिराळ्या गोष्टी करूं लागले. इतक्यांत सीतादेवीला घेऊन महर्षि वाल्मीकि सभेंत आले. पुढें वाल्मीकि, व त्यांच्या मागून जानकी येत होती. जानकी त्या वेळीं काषाय वस्त्र नेसली होती. आपल्या स्वामीच्या विरहानें आणि तपश्चर्येनें जरी ती अगदीं कृश झाली होती, तरी तिच्या मुखमंडलावर पातिव्रत्याचें विलक्षण तेज चमकत होतें. सीतेची ती दशा पाहून सर्व सभा सजलनयन होऊन तिच्याकरितां दुःख करूं लागली.

सभेंत आल्यावर वाल्मीकि मुनींनीं रामचंद्राला म्हटलें, ' राजन्, ही आपली धर्मपत्नी सीता आहे. हे दोघे कुमार आपलेच आहेत. माझ्याच आश्रमांत यांचें जातकर्म झालें. हे धनुर्विद्येंत निपुण आहेत. सीतादेवी अगदीं निष्पाप आहे, हें मी खरें, आणि खात्रीनें सांगतों. आपणहि हिला शुद्धच समजत आहांत. केवळ लोकनिंदेच्या भयानेंच आपण हिचा त्याग केलात. जर

आपण हिला आज्ञा कराल, तर ही आपल्या सच्चरित्राचा परिचय सर्वांना येथेंच करून देईल.'

त्यावर रामचंद्र म्हणाले, 'भगवन्, आपलें म्हणणें यथार्थ आहे. आपण म्हणतां तशी जानकी पवित्र आहे. लंकाविजय केल्यावर मीं सर्वांना हिच्या पवित्रपणाची साक्ष पटवून दिली होती; परंतु हे महर्षे, लोकानिंदा फार प्रबल आहे. मी फक्त लोकनिंदेच्याच भयानें तिला वनांत पाठवून दिली होती. दुसरें कांहीं कारण नव्हतें. मी या वेळेसही हिला निष्पापच समजत आहें. पण लोकापवादाच्या भीतीनेंच आतां मीं हिचा स्वीकार करूं शकत नाहीं.'

जेव्हां सीतादेवीनें पाहिलें कीं, 'ज्या अर्थीं आपणाला शुद्ध समजूनहि केवळ खोट्या लोकानिंदेच्या भयानें रामचंद्र आपला स्वीकार करीत नाहींत, त्या अर्थीं आतां जगण्यांत तरी अर्थ काय! आतां मरणच योग्य आहे.' असा मनाशीं विचार करून ती भर सभेंत रामचंद्रासमोर अधोमुख करून पृथ्वी मातेची प्रार्थना करूं लागली. 'हे धरणी माते, तूंच माझी जननी आहेस. तुझ्याच लालनपालनानें मी लहानाची मोठी झालें, आणि म्हणूनच माझा देह तुझ्या विराट स्वरूपांत मिळून जावा, असें मला वाटतें. आतां मी क्षणभरहि जिवंत राहण्याची इच्छा करीत नाहीं. हे माते, पतीनें माझा त्याग केल्यावर जणूं काय माझा सर्व जगानेंच त्याग केला आहे. आतां मला फक्त तुझाच आश्रय आहे. काय, तूं आपल्या दु:खी कन्येला निरंतरची मांडीवर घेणार नाहींस? नाहीं, नाहीं. माते, आतां माझें हें शरीर निरंतरकरितां तूंच मांडीवर घेशील, हा माझा पूर्ण विश्वास आहे. हे पंचभौतिक देहा, आतां कां बाबा, उगीच वेळ लावतोस? हे भगवन्, परमात्मन्, तूं अंतर्यामी सदैव जागृत आहेस. जर मी खरी निष्पाप असेन, जर मी रामचंद्रावांचून दुसऱ्या पुरुषाचें स्वप्नांतहि कधीं ध्यान केलें नसेन, आणि

जर माझी रामचंद्रावर खरी खरी भक्ति असेल, तर हे विश्वंभर देवी, तूं या वेळीं मला या दुःखांतून मुक्त करशील. '

याप्रमाणें अत्यंत करुण वाणीनें भूमिमातेची प्रार्थना करून, व मनांत पतीच्या चरणकमलांचें ध्यान करीत सीतादेवी जानकी जन्मभूमीच्या मांडीवर सुखानें शयन करती झाली. ती पुनः त्या चिरसमाधींतून उठली नाहीं.

महामान्या भगवती सीतादेवीच्या लीलासंवरणाची अद्भुत लीला पाहून महाराज रामचंद्र व सर्व सभा आश्चर्य, खेद व शोकसागर यांत निमग्न होऊन गेली.

सीतादेवी लोकांतरित झाल्यावर कांहीं दिवसांनीं महाराज रामचंद्रहि आपल्या भ्रात्यांसह पुत्रावर राज्यभार सोंपवून व आपली लीला संवरण करून निजधामाला गेले.

समाप्त.

श्री.

याच लेखिकेनें लिहिलेली

व

दक्षिणा प्राईजकमेटीनें बक्षीस दिलेली कादंबरी.

राजकुमारी.

कि. ८ आणे.

ही कादंबरी एका हिंदी उपन्यासावरून मराठींत तयार केली आहे. हिच्यांतील कथानक अलीकडील असून त्यांत अद्भुत रसाची झाक आहे. ही सर्वांस घेतां यावी, म्हणून हिची किंमतही अल्प ठेविली आहे.

रा. रा. अनंत नारायण भागवत यांनीं लिहिलेलीं पुस्तकें.

१ पितृबंध मोचन भाग १. आवृत्ति दुसरी. ही एक शिवकालीन ऐतिहासिक कादंबरी आहे. किं. १० आणे. पृष्ठ २००

२ उमाजी नाईकाचें चरित्र किं. १ रु. मोठ्या आकाराचीं पृष्ठ सुमारें २७९.

नेपाळ वर्णन. रा. आजगांवकृत. किं. ९ आणे.

हीं सर्व पुस्तकें खालील पत्त्यावर ग्रंथकर्त्याकडे व प्रकाशकाकडे मिळतील.

पत्ता:—पुणें, शुक्रवारपेठ, घर नं. २९४ बडवे यांचा वाडा. } कर्ता व प्रकाशक अनंत नारायण भागवत.